# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# दूर शिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

स्पेशल पेपर–९ (अ)

# ग्रामीण समाजशास्त्र

**(Rural Sociology)**

स्पेशल पेपर–१४ (अ)

# भारतातील ग्रामीण समाजशास्त्र

**(Rural Sociology in India)**

सेमिस्टर–५ व ६ करिता

(शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१८
बी. ए. भाग-३ समाजशास्त्र पेपर (९ (अ) व १४ (अ)) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ४००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-637-7

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## समाजशास्त्र समन्वय समिती

अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) जगन कराडे,**
विभागप्रमुख, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शैलजा माने**
  आर्टस्, कॉमर्स कॉलेज, नागठाणे,
  जि. सातारा
- **डॉ. उषा पाटील**
  महावीर महाविद्यालय,
  कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर–९ (अ) ग्रामीण समाजशास्त्र**
**पेपर–१४ (अ) भारतातील ग्रामीण समाजशास्त्र**
बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **श्री. चंद्रकांत खंडागळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली | १, २, ३, ४ | १, २, ४ |
| **डॉ. अरुण व्ही. पौडमल**<br>यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेज, कोल्हापूर | – | २ |
| **प्रा. पी. ए. घोंगडे**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी | – | ३ |
| **प्रा. पांडुरंग सारंग**<br>सदाशिवराव मंडलीक महाविद्यालय, मुरगूड. | – | ४ |

■ **संपादक** ■

**श्री. चंद्रकांत खंडागळे**
विभागप्रमुख, समाजशास्त्र
(पदवी आणि पदव्युत्तर)
श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज,
सांगली.

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागांतर्गत बी. ए. पदवी अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थी मित्रांचे मी हार्दिक स्वागत करतो. या पदवीसाठी तुम्ही समाजशास्त्राचे सत्रपद्धतीनुसार एकूण दहा पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी सत्र ५ साठी पेपर क्रमांक ९ (अ) 'ग्रामीण समाजशास्त्र' व सत्र ६ साठी पेपर १४ (अ) 'भारतातील ग्रामीण समाजशास्त्र' असे आहेत. या दोन्ही पेपर्समध्ये एकूण आठ अध्ययन घटक समाविष्ट असून त्यांचे लेखन अत्यंत सुलभपणे व पद्धतशीरपणे केलेले आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना ग्रामीण समाजाचे यथार्थ आकलन होईल याची मला खात्री आहे.

सदर पुस्तक लेखनात सहकार्य केलेले सहलेखक श्री. अरुण पौडमल, श्री. प्रा. पी. ए. घोंगडे व श्री. पांडुरंग सारंग यांना मनःपूर्वक धन्यवाद. दूर शिक्षण केंद्राचे संचालक, उपसंचालक आणि केंद्रातील सर्व कर्मचारी या सर्वांचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

**श्री. चंद्रकांत खंडागळे**
विभागप्रमुख, समाजशास्त्र
(पदवी आणि पदव्युत्तर)
श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज,
सांगली.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | घटकाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–९ (अ)** | |
| १. | ग्रामीण समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र | १ |
| २. | ग्रामीण समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना | १६ |
| ३. | ग्रामीण समुदाय | ३३ |
| ४. | ग्रामीण विकास | ४५ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१४ (अ)** | |
| १. | भारतातील ग्रामीण समाजशास्त्र | ६३ |
| २. | ग्रामीण सामाजिक संरचना | ८१ |
| ३. | ग्रामीण पुनर्रचना | १०९ |
| ४. | पंचायत राज्यव्यवस्था | १३३ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक : १

# ग्रामीण समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र

## (Field of Rural Sociology)

**घटक संरचना**


१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

  १.३.१ ग्रामीण समाजशास्त्राची व्याख्या व अभ्यास विषय

  १.३.२ ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप

  १.३.३ ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास

  १.३.४ ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व

१.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.५ सारांश

१.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

१.८ चिंतन आणि कार्य

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.१ प्रस्तावना (Introduction)

समाजशास्त्र हे अलिकडील काळात म्हणजे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धाच्या शेवटच्या टप्प्यात उदयास आलेले सामाजिक शास्त्र आहे. मानव समाजाचा समग्र व पद्धतशीर अभ्यास समाजशास्त्र करते. अखिल मानव समाजाचे ग्रामीण व नागर असे दोन विभाग पडतात. या दोन्ही विभागांचा परस्परसंबंध येत असला तरी त्यांच्यात भिन्नता आहे. शिवाय त्यांच्या समस्याही भिन्न आहेत. म्हणून या दोन्ही विभागांचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे योग्य ठरेल असे समाजशास्त्रज्ञांना वाटू लागले. त्यातूनच ग्रामीण विभागाचा म्हणजेच समाजाचा अभ्यास करणारे ते ग्रामीण समाजशास्त्र व नागर विभागाचा म्हणजे समाजाचा अभ्यास करणारे ते नागर समाजशास्त्र अशा दोन शाखा उदयास आल्या आहेत. त्यापैकी ग्रामीण समाजशास्त्र या शाखेचा सविस्तर अभ्यस आपण या पुस्तकात करणार आहोत.

## १.२ उद्दिष्टे (Objectives)

या अध्ययन घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास –

- ग्रामीण समाजशास्त्राची व्याख्या करता येईल.
- ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय व व्याप्ती सांगता येईल.
- ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
- ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व विशद करता येईल.
- ग्रामीण समाजशास्त्रातील पद्धती व तंत्रे वा साधने स्पष्ट करता येतील.

## १.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

या अध्ययन घटकात तुम्ही ग्रामीण समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र समजावून घेणार आहात. त्यादृष्टीने या घटकाचे पाच विभाग पाडण्यात आलेले आहेत. पहिल्या विभागात तुम्ही ग्रामीण समाजशास्त्राच्या कांही व्याख्या अभ्यासणार आहात. दुसऱ्या विभागात ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय व व्याप्ती समजावून घेणार आहात. तिसऱ्या विभागात ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप कसे आहे हे पाहणार आहात. चौथ्या विभागात ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व समजावून घेणार आहात. तर शेवटच्या पाचव्या विभागात ग्रामीण समाजशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या अभ्यासपद्धती व तंत्रे किंवा साधने अभ्यासणार आहात.

### १.३.१ ग्रामीण समाजशास्त्राच्या व्याख्या व अभ्यास विषय

या ठिकाणी आपण सर्वप्रथम ग्रामीण समाजशास्त्राच्या कांही मान्यवर ग्रामीण समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या विचारात घेणार आहोत.

१. **प्रा. चंद्रकांत खंडागळे :** ग्रामीण समाजाचा म्हणजेच ग्रामीण सामाजिक संबंधांचा व त्या संबंधातून उद्‌भवणाऱ्या सामाजिक समस्यांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करून त्या अभ्यासाच्या आधारे ग्रामीण समाजाच्या विकासाचे नियम शोधून काढणाऱ्या समाजशास्त्राच्या शाखेस ग्रामीण समाजशास्त्र असे म्हणतात.

२. **प्रा. जिलेट :** ग्रामीण समुदायातील परिस्थितींचा व प्रवृत्तींचा शोध घेऊन ग्रामीण प्रगतीची तत्त्वे प्रस्थापित करण्यासाठी त्या समुदायांचा पद्धतशीर अभ्यास करणारी समाजशास्त्राची शाखा म्हणजे ग्रामीण समाजशास्त्र होय.

३. **टी. एल. स्मिथ :** ग्रामीण सामाजिक संबंधांच्या अभ्यासातून निष्पन्न झालेल्या समाजशास्त्रीय घटना आणि तत्त्वे यांना ग्रामीण समाजशास्त्र असे म्हणता येईल.

४. **बर्ट्रांड आणि इतर :** व्यापक अर्थाने ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण पर्यावरणातील मानवी संबंधाचा अभ्यास आहे.

५. **डी. सँडरसन :** ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण पर्यावरणातील जीवनाचे समाजशास्त्र आहे.

६. **एफ. एस. चॅपीन :** ग्रामीण लोकसंख्या, ग्रामीण सामाजिक संघटन व ग्रामीण सामाजिक प्रक्रिया यांचा अभ्यास म्हणजे ग्रामीण जीवनाचे समाजशास्त्र होय.

७. **डॉ. ए. आर. देसाई :** ग्रामीण समाजाच्या विकासाच्या नियमांचे शास्त्र म्हणजे ग्रामीण समाजशास्त्र होय.

वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की ग्रामीण समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे. या शाखेत ग्रामीण समाजातील सामाजिक संबंधांचा, सामाजिक संघटनांचा, सामाजिक प्रक्रियांचा व समस्यांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला जातो आणि या अभ्यासाच्या आधारे ग्रामीण समाजाच्या प्रगतीचे किंवा विकासाचे नियम किंवा तत्त्वे शोधून काढली जातात.

**ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय (Subject Matter of Rural Sociology)**

वरील व्याख्यावरून हे लक्षात येते की ग्रामीण समाज हा ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे. ग्रामीण लोकांचे जीवन, त्यांचे परस्परसंबंध, त्यांच्या संस्था, संघटना, समूह तसेच सामाजिक समस्या इत्यादींचा शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करून ग्रामीण समाजाच्या विकासाचे नियम शोधून काढण्याचे कार्य ग्रामीण समाजशास्त्र करते. या शास्त्राचा अभ्यासविषयक नेमका काय आहे हे समजण्यासाठी कांही मान्यवर समाजशास्त्रज्ञांची यासंदर्भातील मते आपण अभ्यासणार आहोत.

१. **लॉरी नेल्सन** यांच्या मते ग्रामीण पर्यावरणातील विविध समूहांचे वर्णन व विश्लेषण करणे हा ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे.

२. **टी. एल. स्मिथ** यांच्या मते 'ग्रामीण सामाजिक समस्यांचा विचार करणे हा ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे.

३. **ए. एल. बर्ट्रांड** यांच्या मते 'ग्रामीण सामाजिक संघटना' हा या शास्त्राचा अभ्यासविषय आहे.

४. **ए. डब्लू. हेज** यांच्या मते ग्रामीण समाजाशी संबंधित असणाऱ्या सर्व प्रकारच्या ''सामाजिक घटना'' हा ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे.

५. **प्रा. टायलर** यांच्या मते ग्रामीण लोकांचे परस्परसंबंध, ग्रामीण लोकांचे जीवनमान, ग्रामीण सामाजिक संस्था, ग्रामीण जीवनातील विविध समस्या इत्यादी बाबींचा समावेश या शास्त्राच्या अभ्यास विषयात होतो.

ग्रामीण समाजशास्त्रांच्या वरील मतांच्या आधारे ग्रामीण समाजशास्त्राच्या अभ्यास विषयात किंवा व्याप्तीत पुढील बाबींचा अंतर्भाव होतो.

**१. ग्रामीण समुदायाचा अभ्यास :** ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण समुदायांचा म्हणजेच खेड्यांचा सर्वांगिण व पद्धतशीर अभ्यास करते. त्यादृष्टीने ग्रामीण समुदायाचा अर्थ, वैशिष्ट्ये, ग्रामीण समुदायात होणारे बदल, ग्रामीण समुदायांची रचना, ग्रामीण समुदायांचे म्हणजे खेड्यांचे विविध प्रकार इत्यादींचा अभ्यास या शास्त्रात होतो.

**२. ग्रामीण सामाजिक जीवनाचा अभ्यास :** ग्रामीण समाजशास्त्रात ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक इत्यादी सर्व अंगांचा किंवा पैलूंचा

सविस्तर अभ्यास केला जातो. **सँडरसन** म्हणतात त्याप्रमाणे या शास्त्रात ग्रामीण लोकसंख्या, पर्यावरण, ग्रामीण लोकांचे जीवनमान, व्यवसाय, आर्थिक स्थिती इत्यादींचा अभ्यास केला जातो.

**३. ग्रामीण सामाजिक संघटनांचा अभ्यास : बर्ट्रांड** म्हणतात की ग्रामीण समाजशास्त्रात ग्रामीण सामाजिक संघटनांचा म्हणजेच ग्रामीण भागातील सामाजिक संस्था, समूह, सामाजिक स्तरीकरण व्यवस्था इत्यादींचा अभ्यास होतो. त्यामुळे ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था, धर्मसंस्था इ. सामाजिक संस्थांचा, आप्तसंबंधी समूह, व्यावसायिक समूह इ. सामाजिक समूहांचा, जातिव्यवस्था व वर्गव्यवस्था यासारख्या सामाजिक स्तरीकरण व्यवस्थेचा आणि राजकीय संस्था (स्थानिक स्वराज्य संस्था) व धार्मिक-सांस्कृतिक यंत्रणांचा अभ्यास करते.

**४. ग्रामीण सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास :** ग्रामीण समाजातील व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह आणि समूह-समूह यांच्यात घडणाऱ्या सामाजिक प्रक्रियांचा अभ्यासही या शास्त्रात केला जातो. त्यादृष्टीने ग्रामीण समाजातील सहकार्य, स्पर्धा, संघर्ष इत्यादी प्रक्रियांचा ऊहापोह हे शास्त्र करते.

**५. ग्रामीण आर्थिक जीवनाचा अभ्यास :** शेती हा ग्रामीण समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. तेथील इतर व्यवसायही प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे शेतीवरच अवलंबून आहेत. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था ही शेतीप्रधान आहे. त्यामुळे ग्रामीण समाजात जमिनीला खूप महत्त्व आहे. म्हणून ग्रामीण लोकांचे परस्परसंबंध हे जमिनविषयक संबंधावर आधारलेले आहेत. ग्रामीण समाजव्यवस्थाही शेती व्यवसायाशी निगडीत आहे. ग्रामीण लोकांचे आचारविचार, श्रद्धामूल्ये, सणसमारंभ, इच्छाआकांक्षा, जीवनविषयक दृष्टिकोन व जीवनपद्धती इत्यादीवरही शेतीव्यवसायाचा मोठा प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे ग्रामीण समाजजीवनाचे यथार्थ आकलन होण्यासाठी ग्रामीण आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणून शेती व्यवसायाची स्थिती, त्या व्यवसायातील समस्या, शेतकरी, कुळे, शेतमजूर यांचे परस्परसंबंध, ग्रामीण लोकांचे जीवनमान इत्यादी आर्थिक बाबींचा अभ्यास हे शास्त्र करते.

**६. ग्रामीण धर्माचा अभ्यास :** बहुसंख्य ग्रामीण लोक अडाणी, निरक्षर, अंधश्रद्ध, देवभोळे व रुढीप्रिय आहेत. त्यामुळे त्यांच्यावर धर्माचा मोठा पगडा आहे. धार्मिक विधी व कर्मकांड ते मोठ्या श्रद्धेने पार पाडतात. ग्रामीण लोकांचे परस्परसंबंध, दैनंदिन व्यवहार, सणसमारंभ, आदर्श व मूल्ये, मनोरंजनाचे प्रकार इत्यादीवर धर्माचा विलक्षण प्रभाव पडलेला आहे. ग्रामीण लोकांची जीवनपद्धती व वर्तन हे धर्माद्वारे नियंत्रित होते. त्यामुळे ग्रामीण समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्यांच्या धर्मश्रद्धा, धर्माचरण, कर्मकांड, धार्मिक स्थळे (देवालय, तीर्थस्थळे इ.) ग्रामीण धर्म व इतर सामाजिक संस्था यांच्यातील परस्परसंबंध इत्यादी गोष्टींचा अभ्यास या शास्त्रात केला जातो.

**७. ग्रामीण व नागर समाजातील भिन्नतेचा अभ्यास :** अखिल मानव समाजाचे ग्रामीण व नागर समाज असे दोन प्रकार पडतात. या दोन्ही समाजात पर्यावरण, आकारमान, लोकसंख्येची घनता, व्यवसाय, स्तरीकरण व्यवस्था, सामाजिक आंतरक्रियांचे स्वरूप, सामाजिक गतिशिलता इत्यादीबाबतीत भिन्नता आहे. ही भिन्नता अभ्यासल्याशिवाय ग्रामीण समाजाचे (नागर समाजाचेही)

यथार्थ स्वरूप समजणार नाही. म्हणून **टी. एल. स्मिथ** म्हणतात की ग्रामीण व नागर समाजातील भिन्नता स्पष्ट करणाऱ्या गोष्टींचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्रात केला पाहिजे.

**८. ग्रामीण सामाजिक समसयांचा अभ्यास :** ग्रामीण समाजात विविध सामाजिक समस्या असून त्यांची तीव्रता सतत वाढत चालली आहे. त्यामुळे ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना त्या समाजातील अज्ञान, दारिद्र्य, बेकारी, अनारोग्य, लोकसंख्यावाढ, रूढिप्रियता, अंधश्रद्धाळूपणा, मनोरंजन व शिक्षण सुविधांचा अभाव, संयुक्त कुटुंबाचे विघटन, शहराकडे होणारे स्थलांतर, नैतिक व धार्मिक मूल्यांचा होणारा ऱ्हास इत्यादी समस्यांची कारणे, परिणाम व त्यांच्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास केला जातो. **प्रा. टायलर** यांनी ग्रामीण सामाजिक समस्यांच्या अभ्यासावर विशेष जोर दिलेला आहे.

**९. ग्रामीण पुनर्रचनेचा अभ्यास :** आधुनिक काळात औद्योगिकीकरण, नागरीकरण, दळणवळणाची प्रगत साधने, शिक्षणप्रसार इत्यादींचा प्रभाव पडून ग्रामीण समाजाचे विघटन सुरू झाले. त्यामुळे ग्रामीण समाजात अनेक समस्या निर्माण होऊन ग्रामीण लोकांचे जीवन अत्यंत कष्टदायक बनले. त्यामुळे या समस्यांची सोडवणूक करून ग्रामीण समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी अनेक योजना, प्रकल्प व कार्यक्रम सुरू करण्यात आले. यालाच ग्रामीण पुनर्रचना असे म्हणतात. या पुनर्रचना कार्यक्रमाचा प्रभाव पडून ग्रामीण विकासास चालना मिळाली आहे. त्यामुळे ग्रामीण समाजशास्त्रज्ञ हे ग्रामीण पुनर्रचनेचा अर्थ, उद्दिष्टे, साधने, पुनर्रचना कार्यक्रमांचे मूल्यमान इत्यादी बाबींचा अभ्यास करू लागले आहेत. यासंदर्भात **डॉ. ए. आर. देसाई** म्हणतात की ग्रामीण समाजाचा शास्त्रीय अभ्यास करून ग्रामीण विकासाचे नियम शोधणे हे ग्रामीण समाजशास्त्राचे कार्य आहे. त्यामुळे ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामीण समाजशास्त्राने महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे.

**१०. ग्रामीण सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास :** अलिकडील काळात औद्योगिकीकरण, नागरीकरण, लोकशाहीकरण, निधर्मीकरण दळणवळणाची प्रगत साधने, शैक्षणिक व आरोग्य सुविधांचा प्रसार, ग्रामीण पुनर्रचनेचे कार्यक्रम इत्यादी घटकांचा प्रभाव पडून ग्रामीण समाजात परिवर्तन होऊ लागले आहे. त्यामुळे या परिवर्तनाचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्राला करणे भाग पडत आहे. यादृष्टीने ग्रामीण परिवर्तनाचे स्वरूप, त्याची कारणे, त्या परिवर्तनाच्या मार्गातील अडथळे, त्या परिवर्तनाची दिशा व गती इत्यादी बाबींचा वस्तुनिष्ठ अभ्यास या शास्त्रात होतो.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की ग्रामीण समाजशास्त्राची व्याप्ती अत्यंत विस्तृत आहे. ग्रामीण समाजाचा समग्र अभ्यास या शास्त्रात होतो. बदलत्या परिस्थितीनुसार ग्रामीण समाजात नवे नवे प्रश्न व समस्या उद्‌भवतात; व त्यांची दखल ग्रामीण समाजशास्त्रास घेणे भाग पडते. त्यामुळे या शास्त्राच्या अभ्यासक्षेत्रात सतत नवनवीन घटकांची भर पडत आहे. त्यामुळे ग्रामीण समाजशास्त्राची व्याप्ती स्थिर नसून गतिशील आहे हे लक्षात येते.

### १.३.२ ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप (Nature of Rural Sociology)

ग्रामीण समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय व व्याप्ती अभ्यासल्यानंतर ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप आपण समजावून घेणार आहोत. ग्रामीण समाजशास्त्राच्या स्वरूपाचे यथार्थ आकलन होण्यासाठी पुढील मुद्दे विचारात घ्यावे लागतात.

१. **ग्रामीण समाजशास्त्र हे एक विज्ञान (शास्त्र) आहे.** कारण ग्रामीण समाजाचा ते वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करते. वैज्ञानिक पद्धती ही अभ्यासाची एक विशेष पद्धती आहे. या पद्धतीने एखाद्या विषयाचा अभ्यास करताना सर्वप्रथम त्या विषयाशी संबंधित असलेल्या घटनांची निरीक्षण व इतर साधनांच्याद्वारे माहिती गोळा केली जाते. यालाच तथ्य संकलन (data collection) असे म्हणतात. नंतर त्या माहितीचे संकलन, विश्लेषण व वर्गीकरण केले जाते. त्यानंतर त्या माहितीच्या आधारे घटनाघटनामधील परस्परसंबंधाविषयी अंदाज वा तर्क म्हणजेच अभ्युपगम (hypothesis) केला जातो. पुढे त्या अभ्युपगमाची प्रचिती (verification) घेऊन त्याची सिद्धता (proof) केली जाते. त्यानंतर सिद्ध झालेल्या अभ्युपगमाचे सामान्यीकरण (generalization) करून त्याला सामान्य नियमाचे रूप दिले जाते. आणि शेवटी त्या नियमाचा अगोदरच्या नियमांशी समन्वय साधला जातो. अशा पद्धतीने एखाद्या विषयाला लागू पडणारे अनेक नियम शोधून त्यांची सुव्यवस्थित रचना केली की त्यास विज्ञान असे म्हणतात. वेगवेगळ्या विषयांचा या पद्धतीने अभ्यास होऊ लागल्याने वेगवेगळी विज्ञाने उदयास आलेली आहेत. त्यापैकी प्रत्येक विज्ञान हे आपल्या अभ्यासविषयाला लागू पडणारे नियम शोधून काढून त्यांची व्यवस्थित रचना करते. उदा. पदार्थविज्ञान जडद्रव्यांचा (matter) अभ्यास करून त्यासंबंधिचे नियम शोधून काढते. उदा. गुरुत्वाकर्षणाचा नियम. अर्थशास्त्र हे मानवाच्या आर्थिक क्रियांचा अभ्यास करून त्यासंबंधिचे नियम शोधून काढते उदा. मागणी पुरवठ्याचा नियम. ग्रामीण समाजशास्त्र देखील ग्रामीण समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करून ग्रामीण समाजाच्या विकासाचे सामान्य नियम शोधून काढते व त्यांची व्यवस्थित रचना करते. म्हणून ते एक विज्ञान म्हणजे शास्त्र (science) ठरते.

२. **ग्रामीण समाजशास्त्र हे अनुभवाधिष्ठीत (Empirical) विज्ञान आहे.** अनुभवनिरपेक्ष शास्त्रे (Non-empirical sciences) आणि अनुभवाधिष्ठीत शास्त्रे (empirical sciences) असे एक शास्त्रांचे वर्गीकरण आहे. ज्या शास्त्रातील नियम (ज्ञान) केवळ बौद्धिक चिंतनातून स्फुरलेले असतात व त्यांचे प्रामाण्यही (सत्यता) बुद्धीच्याद्वारे तपासले जाते, त्यासाठी अनुभवाची गरज नसते, त्यांना अनुभव निरपेक्ष शास्त्र असे म्हणतात. उदा. गणित आणि तर्कशास्त्र. याउलट ज्या शास्त्रातील नियमांची उभारणी अनुभवाच्या आधारे केली जाते व त्यांचे प्रामाण्यही अनुभवाद्वारेच तपासले जाते. त्यांना अनुभवाधिष्ठीत शास्त्रे म्हणतात. उदा. पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी. हैड्रोजन व ऑक्सिजनच्या संयोगातून पाणी तयार होते हा रसायनशास्त्रातील नियम किंवा हरितद्रव्य बनण्यासाठी वनस्पतींना सूर्यप्रकाशाची गरज असते हा वनस्पतीशास्त्रातील नियम केवळ बौद्धिक चिंतनाद्वारे कधीच समजला नसता. त्यासाठी प्रत्यक्ष अनुभवाची गरज असते. म्हणून ही शास्त्रे अनुभवाधिष्ठीत ठरतात. ग्रामीण समाजशास्त्र देखील असेच एक अनुभवाधिष्ठीत शास्त्र आहे. कारण त्यातील नियमांची उभारणीही ग्रामीण समाजातील घटनांच्या अनुभवांच्या आधारे होते. ग्रामीण समाजशास्त्र केवळ बौद्धिक चिंतन न करता ग्रामीण सामाजिक घटनांचे वस्तुनिष्ठ निरीक्षण करून त्या

आधारे ग्रामीण विकासाचे सामान्य नियम शोधून काढते व त्यांचे प्रामाण्यही अनुभवाच्या आधारेच तपासून पाहाते. म्हणून ते अनुभवाधिष्ठीत शास्त्र ठरते.

**३. ग्रामीण समाजशास्त्र हे तथ्यात्मक किंवा वस्तुनिष्ठ** (Positive) **विज्ञान आहे.** तथ्यात्मक (Positive) शास्त्रे व आदर्शात्मक (Normative) शास्त्रे असेही एक शास्त्रांचे वर्गीकरण आहे. जी शास्त्रे आपल्या विषयांचा अभ्यास आदर्शांच्या किंवा मूल्यांच्या (ideals or norms) संदर्भात करतात त्यांना आदर्शात्मक शास्त्रे म्हणतात. उदा. तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र, इत्यादी. याउलट जी शास्त्रे आपल्या विषयाचा अभ्यास तथ्यांच्या किंवा वस्तुस्थितीच्या (facts) संदर्भात करतात त्यांना तथ्यात्मक शास्त्रे म्हणतात. उदा. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी. आदर्शात्मक शास्त्रे ''काय असावे'' (what ought to be) या प्रश्नाचा तर तथ्यात्मक शास्त्रे ''काय आहे'' (what is) या प्रश्नाचा अभ्यास करतात. नीतिशास्त्र मानवाचे वर्तन आदर्श स्वरूपात कसे असावे या दृष्टिकोनातून मानवी वर्तनाचा अभ्यास करते म्हणून ते आदर्शात्मक शास्त्र ठरते. याउलट ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण लोकांचे सामाजिक वर्तन प्रत्यक्षात कसे आहे या दृष्टिकोनातून वर्तनाचा अभ्यास करते. नीतिशास्त्राप्रमाणे मानवी वर्तनात चांगले-वाईट, योग-अयोग्य असा भेद न करता ग्रामीण समाजशास्त्र ग्रामीण लोकांचे वर्तन जसे आहे तशा स्वरूपात अभ्यासते. म्हणून ते तथ्यात्मक शास्त्र ठरते.

**४. ग्रामीण समाजशास्त्राकडे पूर्वकथन क्षमता** (power of prediction) **आहे.** कोणत्याही शास्त्रातील नियम हे समान परिस्थितीत सर्वत्र खरेच ठरतात. त्यामुळे त्या नियमांच्या आधारे अचूक पूर्वकथन करता येते. जी स्थिती आता उपलब्ध नाही तिच्याविषयी कांहीतरी निवेदन करणे म्हणजे पूर्वकथन होय. या अर्थाने पूर्वकथन हे भविष्यकाळाप्रमाणेच भूतकाळाविषयीचेही असू शकते. उदा. खगोलशास्त्रातील नियमांच्या आधारे भविष्यात कोठे व केंव्हा सूर्यग्रहण होईल हे अचूकपणे सांगता येते. पुरातत्त्वशास्त्रातील नियमांच्या आधारे उत्खननात सापडलेल्या नाण्यांचा किंवा प्राण्यांच्या सांगाड्यांचा कालावधी सांगता येतो. ग्रामीण समाजशास्त्रातील नियमांच्या आधारेही असे पूर्वकथन करता येते. ज्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करून ग्रामीण समाजशास्त्र निष्कर्ष काढते तीच परिस्थिती इतरत्र विद्यमान असेल तर तेथेही ते निष्कर्ष हमखासपणे लागू पडतील असे कथन ग्रामीण समाजशास्त्र करू शकते. अशा पूर्वकथनाच्या आधारे ग्रामीण समस्या सोडविण्यासाठी व ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी कांही कार्यक्रमही हे शास्त्र सूचवू शकते. अर्थात येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे व ती म्हणजे नैसर्गिक शास्त्रातील नियम हे अधिक निश्चित व काटेकोर असल्याने त्यांच्या साह्याने अचूक पूर्वकथन करता येते. ग्रामीण समाजशास्त्राचे नियम तितकेसे निश्चित व काटोकोर नसल्याने त्यांच्या साह्याने केलेले पूर्वकथन हे नेहमीच अचूक ठरेल याची खात्री देता येत नाही.

**५. ग्रामीण समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे.** ग्रामीण समाजशास्त्राचा उदय अलिकडील काळातील असल्याने ते एक नवीन विज्ञान आहे. तथापि त्याचा अल्पावधीत खूपच विकास झालेला आहे. ग्रामीण समाजाविषयी त्याने मोठ्या प्रमाणात वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे ग्रामीण समाजशास्त्र हे एक स्वतंत्र विज्ञान आहे असा काहींचा समज होऊ शकतो. परंतु येथे हे लक्षात घेतले पाहिजे की ग्रामीण समाजशास्त्रास स्वतंत्र विज्ञान न मानता त्यास

ग्रामीण समाजशास्त्राचीच एक शाखा मानणे अधिक तर्कसंगत ठरते. ग्रामीण समाजाचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ देखील असेच मानतात. यासंदर्भात **प्रा. टायलर** म्हणतात की ''ग्रामीण समाज हा अखिल मानव समाजाचाच एक अविभाज्य भाग आहे हे लक्षात घेऊनच ग्रामीण समाजाचा अभ्यास केला पाहिजे. त्यामुळे मानव समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र हे समाजशास्त्र ठरते आणि ग्रामीण समाजाचा अभ्यास करणारे ग्रामीण समाजशास्त्र हे समाजशास्त्राची एक शाखा ठरते.

थोडक्यात ग्रामीण समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारे ग्रामीण समाजशास्त्र हे अनुभवाधिष्ठीत व तथ्यात्मक विज्ञान असून त्याच्या ठिकाणी पूर्वकथन क्षमता आहे व हे शास्त्र समाजशास्त्राची एक शाखा आहे.

### १.३.३ ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास (Origion and Development of Rural Sociology)

ग्रामीण समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय, स्वरूप इत्यादींचा अभ्यास केल्यानंतर आता तुम्ही ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास समजावून घेणार आहात. ग्रामीण समाजशास्त्र हे अगदी अलिकडील काळात उदयास आलेले विज्ञान आहे हे खरे. तथापि, ग्रामीण समाजाचा अभ्यास प्राचीनकाळापासून होत आलेला आहे. उदा. भारतात वेदग्रंथ, महाकाव्य, मनुस्मृती, कौटिल्याचे अर्थशास्त्र इत्यादी ग्रंथात ग्रामीण समाजाचे तेथील जीवनाचे व समस्यांचे वर्णन केलेले आढळते. इतरही देशातील अनेक विचारवंतानी ग्रामीण समाजाचा अभ्यास केलेला आढळतो. तथापि, हा अभ्यास वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून केलेला नव्हता. त्यामुळे त्यांचा हा अभ्यास शास्त्रीय किंवा वैज्ञानिक स्वरूपाचा नव्हता.

#### अमेरिकेत उदय

ग्रामीण समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करण्याची सुरूवात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिका या देशात झाली. म्हणजेच ग्रामीण समाजशास्त्राचा उदय हा अमेरिकेत झाला. ग्रामीण जीवनाची दुःखद स्थिती व तेथील लोकांने प्रश्न व समस्या यांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने या शास्त्रीची सुरूवात झाली. अर्थात कांही शास्त्रामध्ये या गोष्टींचा अभ्यास होतच होता. मात्र तो अभ्यास आनुषांगिक असल्याने पर्याप्त व समाधानकारक नव्हता. त्यामुळे ग्रामीण समाजाचा खास अभ्यास करणाऱ्या एका वेगळया विज्ञानाची आवश्यकता होती. यातूनच ग्रामीण समाजशास्त्राचा उदय झाला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात औद्योगिकीरण, शहरीकरण, भांडवलशाही अर्थव्यवस्था यांचा प्रभाव पडून ग्रामीण समाजात गरीबी, बेरोजगारी, अन्नधान्याची टंचाई, अशा अनेक समस्या निर्माण झाल्या. परिणामी ग्रामीण जीवनाची दुर्दशा झाली. ग्रामीण लोक रोजगाराच्या शोधार्थ शहरांकडे स्थलांतरीत होऊ लागले. त्यामुळे खेडी ओस पडू लागली. ग्रामीण जीवनाचे विघटन सुरू झाले. या स्थितीकडे विचारवंताचे लक्ष गेले व त्यांनी ग्रामीण जीवनाच्या स्थितीचे व प्रश्नांचे अवलोकन करून त्यावर लिखाण केले व ते प्रसिद्ध केले. या लिखाणातूनच ग्रामीण समाजशास्त्राचा उदय झाला.

#### ग्रामीण समाजशास्त्राचा विकास

ग्रामीण समाजशास्त्राचा उदय १९ व्या शतकात झाला असला तरी त्यांच्या विकासाची सुरुवात २० व्या शतकात झाली. या विकासाचा आढावा आपणास पुढील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

### १) समाजशास्त्र विभागाची स्थापना

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस अमेरिका व युरोपियन देशांतील कांही विद्यापीठामध्ये समाजशास्त्र या विषयाच्या अध्यापनासाठी स्वतंत्र विभाग (Department) स्थापन करण्यात आला. समाजशास्त्राच्या अभ्यासाचा एक घटक म्हणून ग्रामीण समाजाच्या अभ्यासास महत्व देण्यात येऊ लागले. त्यामुळे ग्रामीण समाजशास्त्राच्या अध्ययनास व संशोधनास मोठी चालना मिळाली. अमेरिकेतील अनेक विचारवंत उदा. अँडरसन, बटरफिल्ड, गिलीन, फ्रँकलीन गिडिंग्ज, टायलर इत्यादींनी ग्रामीण जीवनाचे विश्लेषण केले. त्यातून ग्रामीण समाजशास्त्राच्या विकासास गती मिळाली.

### २) ग्रंथनिर्मिती

विद्यापीठांमधून ग्रामीण समाजशास्त्राचा विषयाचे अध्ययन सुरू झाल्यानंतर पुढे या विषयावर अनेक अभ्यासकांनी ग्रंथ लिहीले. उदा. विल्सन, सिस्स, विल्यम्स यांनी सांख्यिकी पद्धतीचा व सर्वेक्षण तंत्राचा अवलंब करून 'क्वेकर हिल', 'ए व्होजिअर व्हिलेज', 'ॲन अमेरिकन व्हिलेज' हे ग्रंथ प्रकाशित केले. त्यानंतर डॉ. सी. जे. गॉल्पिन यांनी ''द सोशियल ॲनाटॉमी ऑफ ॲन ॲग्रीकल्चर कम्युनिटी'' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. पुढ जे. एम. जिलेट यांनी 'कन्स्ट्रक्टीव्ह रूरल सोशियॉलॉजी' हे शीर्षक असलेले ग्रामीण समाजशास्त्रावरील पहिले पाठ्यपुस्तक प्रकाशित केले. पुढे पॉल एल. वाग्ट यांनी 'इंट्रोडक्शन टू रूरल लाईफ' हा ग्रंथ प्रकाशित केला. पुढे सोरोकीन, झिम्मरमन व गॉल्पिन यांनी 'सिस्टिमॅटिक सोर्स बुक इन रूरल सोशियॉलॉजी' हा ग्रंथ व सँडरसन यांनी 'रूरल सोशियॉलॉजी अँड ऑर्गनायझेन' हा ग्रंथ तसेच एन. एल. सिम्स यांनी 'इलेमेंटेस ऑफ रूरल सोशियॉलॉजी' हा ग्रंथ प्रकाशित केला. अशा या विविध ग्रंथांच्या प्रकाशनामुळे ग्रामीण समाजशास्त्र हा विषय हळूहळू विद्यार्थी प्रिय होऊ लागला. विद्यार्थी, शिक्षक व सामान्य वाचक हे या विषयाच्या अभ्यासाकडे आकर्षित होऊ लागले. यातूनच ग्रामीण समाजशास्त्राच्या अभ्यासास मोठी गती मिळाली.

### ३) ग्रामीण जीवन आयोग

अमेरिकेतील भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या प्रभावामुळे ग्रामीण समाजात अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या. या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती **रूझवेल्ट** यांनी **डीन बेली** या विद्वानाच्या अध्यक्षतेखाली १९०७ मध्ये ग्रामीण जीवनाच्या अभ्यासाठी एक आयोग (Commission) स्थापन केला. या आयोगाने ग्रामीण समस्यांविषयी लोकांची मते काय आहेत हे जाणून घेण्यासाठी सुमारे १ लाख अमेरिकन व्यक्तींकडून एक दीर्घ प्रश्नावली भरून घेतली. या प्रश्नांना दिलेले उत्तरे विचारात घेऊन त्यावर एक अहवाल या आयोगाने प्रकाशित केला. या अहवालात ग्रामीण समस्यांची सोडवणूक करण्यासाठी खेड्यांचे सर्वोक्षण करावे व विचारवंताची अधिवेशने भरवून त्यामध्ये ग्रामीण प्रश्नांची चर्चा घडवून आणावी अशी शिफारस केली. या शिफारसीमुळे ग्रामीण समाजाच्या सर्वेक्षणास व संशोधनास अमेरिकेत मोठी चालना मिळाली. तसेच ग्रामीण प्रश्नांचा विचार करण्यामध्ये विचारवंत, राज्यकर्ते, समाजसुधारक तसेच सामान्य लोकही रस घेऊ लागले. थोडक्यात ग्रामीण जीवन आयोगाची स्थापना केल्याने अमेरिकेत ग्रामीण समाजशास्त्राच्या विकासास खऱ्या अर्थाने चालना मिळाली.

### ४) शेती अर्थशास्त्र मंडळ

पहिल्या महायुद्धामुळे जगातील सर्वच राष्ट्रांतील खेड्यांची मोठी दुर्दशा झाली. ग्रामीण आर्थिक–सामाजिक जीवन उद्धस्त झाले. त्यामुळे ग्रामीण समाजाचा विकास घडवून आणण्याची गरज भासू लागली. यातून खेड्यातील समस्यांची सोडवून करण्याचा उद्देशाने अमेरिकेतील शेती खात्याने शेती अर्थशास्त्र मंडळाची (Bureau) स्थापना केली. या मंडळाच्या अंतर्गत **डॉ. गॉल्पिन** यांच्या अध्यक्षतेखाली 'ग्रामीण जीवनाचा अभ्यास' या नावाचा एक स्वतंत्र कक्ष सुरू केला. हा कक्ष आज 'डिव्हीजन ऑफ फार्म पॉप्युलेशन अँड रूरल लाईफ' या नावाने ओळखला जातो. या कक्षाने विविध संस्था, संघटना व शेती खाते यांच्या मदतीने ग्रामीण समाजातील प्रश्नांचे संशोधन करण्यास सुरूवात केली. पण घटकराज्यांची आर्थिक स्थिती पुरेसी चांगली नसल्याने या संशोधन कार्यास त्यांनी आर्थिक मदत केली नाही. त्यामुळे अमेरिकेतील कायदेमंडळाने पर्नेल ॲक्ट या नावाचा कायदा १९२५ मध्ये समंत केला व त्याद्वारे ग्रामीण संशोधनासाठी घटकराज्यांना सत्ता व निधी पुरविला. या कायद्यामुळे ग्रामीण संशोधनास मोठे प्रोत्साहन मिळाले.

### ५) सामाजिक विज्ञाने परिषद

पर्नेल ॲक्टनुसार ग्रामीण संशोधनास मिळणारे अर्थसाहाय्य तितकेसे उपयुक्त ठरले नाही. कारण संशोधनासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षित संशोधक फारसे उपलब्ध झाले नाहीत. असे संशोधक उपलब्ध व्हावेत म्हणून 'सामजिक विज्ञाने परिषद' या नावाची संस्था स्थापन करण्यात आली. या परिषदेने संशोधन तयार करण्यासाठी खास प्रशिक्षण वर्ग सुरू केले व संशोधकांना शिष्यवृत्ती देण्यास सुरूवात केली. एवढेच नव्हे तर या संशोधकांना विविध घटकराज्यांतील शेती विद्यालयात प्रत्यक्ष संशोधन करण्याची संधी उपलब्ध करून दिली. याचा परिणाम म्हणून ग्रामीण समाजाचे संशोधन करण्यासाठी पुरेसे संशोधन उपलब्ध होऊ लागले व त्यांनी संशोधन कार्यात मौलिक योगदान दिले. १९३० मध्ये आलेल्या आर्थिक महामंदीवर मात करण्यासाठी या संशोधकांनी अमेरिकेतील सरकारला मोठे सहकार्य केले.

### ६) त्रैमासिकाचे प्रकाशन

ग्रामीण समाजशास्त्र या नावाचे एक त्रैमासिक (तीन महिन्यातून एकदा प्रकाशित होणारे) १९३६ मध्ये प्रकाशित करण्यास अमेरिकत सुरुवात झाली. या मासिकामधून ग्रामीण जीवनाविषयीची माहिती प्रसिद्ध हाऊ लागली. या मासिकाचा प्रभाव पडून अमेरिकन ग्रामीण समाजशास्त्रज्ञांनी 'ग्रामीण समाजशास्त्रीय संस्था' या नावाची एक संस्था १९३७ मध्ये स्थापन केली. या संस्थेने ग्रामीण समाजाच्या संशोधनास मोठी चालना दिली. परिणामी, ग्रामीण समाजशास्त्राच्या विकासास मोठी मदत झाली.

### ७) अमेरिकन ग्रामीण समाजशास्त्रज्ञांची विदेशातील कामगिरी

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील सर्वच राष्ट्रांमध्ये व तेथील ग्रामीण समाजातही मोठे बदल घडून आले. त्यातून कांही नवीन प्रश्न व समस्या उद्‌भवल्या. याचकाळात अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. त्यांनी आपल्या आर्थिक व सामाजिक विकासाचे कार्यक्रम राबविणे सुरू केले. या कार्यक्रमांचे मूल्यमापन करून मार्गदर्शन करण्यासाठी ग्रामीण समाजशास्त्रज्ञांची आवश्यकता भासू लागली. त्यामुळे

अमेरिकेतील ग्रामीण समाजशास्त्रज्ञांनी या नवोदित स्वतंत्र राष्ट्रांमध्ये जाऊन तेथील ग्रामीण समस्यांचा व ग्रामीण विकासाचा अभ्यास करण्यास सुरूवात केली. उदा. **डॉ. एनस्मिंगर** यांनी भारतातील समुदाय विकास कार्यक्रमाचा अभ्यास केला. **हॉवर्ड वीरसनी** यांनी ग्रीसमधील प्रौढशिक्षण कार्यक्रमास मार्गदर्शन केले. **रॉबर्ट** हे फिलिपाईन्स देशातील ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमामध्ये सहभागी झाले. प्रा. **टायलर** व **स्मिथ** यांनी अनुक्रमे अर्जेंटिना व ब्राझील मध्ये जाऊन तेथे ग्रामीण संशोधन केले. अशाप्रकारे वेगवेगळ्या ग्रामीण समाजशास्त्रज्ञांच्या संशोधन कार्यामुळे ग्रामीण समाजशास्त्राची बीजे अमेरिकेबाहेरील देशातही रूजली गेली. तेथील महाविद्यालयात व विद्यापीठात ग्रामीण समाजशास्त्राचे अध्ययन, अध्यापन व संशोधन होऊ लागले. या विषयावरील पाठ्यपुस्तके व संशोधन पेपर्स प्रकाशित होऊ लागले. उदा. चार्लस् लूमिस यांनी 'स्टडीज इन रूरल सोशल ऑर्गनायझेशन', टी. एल. स्मिथ यांनी 'ब्राझील्स पीपल अँड इन्स्टिट्यूशन्स', लॉरी नेल्सन यांनी 'रूरल सोशियॉलॉजी' कोलब व ब्रुनर यांनी 'ए स्टडी ऑफ रूरल सोसायटी', एफ. एस. चॅपीनचे 'सोशल स्ट्रक्चर इन रूरल सोशियॉलॉजी', बर्ट्रांड व त्यांचे कांही सहकारी यांनी 'रूरल सोशियॉलॉजी' असे विविध ग्रंथ प्रकाशित केले. या ग्रंथामुळे ग्रामीण समाजशास्त्राच्या विकासास जोरदार चालना मिळाली.

**८) आंतरराष्ट्रीय संघटनांची कामगिरी**

राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्रे, आंतरराष्ट्रीय मजूर संघटना, कृषी संघटना, युनेस्को, जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी इत्यादी संघटनांनी ग्रामीण जीवनाच्या विविध प्रश्नांचा व समस्यांचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी मोठी आर्थिक व तांत्रिक मदत व मार्गदर्शन पुरविले. परिणामी, ग्रामीण जीवनाच्या अध्ययनास चालना मिळाली.

**९) ग्रामीण समाजशास्त्राच्या व्याप्तींचा विस्तार**

वर वर्णन केलेल्या विविध घटकांच्या प्रभावामुळे ग्रामीण समाजशास्त्राच्या विकासास चालना मिळाली. महत्वाचे म्हणजे या शास्त्राची व्याप्ती सतत विस्तारत चालली आहे. सुरूवातीस या शास्त्रात ग्रामीण समस्यांच्या अध्ययनावर विशेष भर दिला गेला. त्यानंतर मात्र ग्रामीण जीवनातील संस्था, संघटना, समूह शिक्षण, आरोग्य, मनोरंजन इत्यादीविषयक सोयीसुविधा, ग्रामीण परिवर्तन ग्रामीण विकास, ग्रामीण पुरर्रचना, ग्रामीण–नागर संबंध इत्यदी विषयांचे अध्ययन व अध्यापन केले जाऊ लागले व त्या आधारे ग्रामीण विकासाचे नियम शोधून काढले जाऊ लागले.

अशाप्रकारे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेत ग्रामीण समाजशास्त्राचा उदय झाला व पुढे या शास्त्राचा जगातील विविध राष्ट्रांत विकास घडून आला. अल्पावधीतच या शास्त्राने सामाजिक शास्त्रांतर्गत महत्वपूर्ण स्थान पटकाविले आहे.

## १.३.४ ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व (Importance of Rural Sociology)

ग्रामीण समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यास विषय व स्वरूप अभ्यासल्यानंतर आता तुम्ही या शास्त्राचे महत्त्व किंवा उपयुक्तता अभ्यासणार आहात. मानवी वर्तन व मानवी संबंध यांचा अभ्यास करणारी अनेक शास्त्रे असून त्यापैकी कांही शास्त्रे बरीच जुनीही आहेत. असे असताना ग्रामीण लोकांच्या परस्परसंबंधाचा व वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी एका वेगळ्या शास्त्राची म्हणजे ग्रामीण समाजशास्त्राची गरज का भासली असा प्रश्न पडतो. या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी आपणास

ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व किंवा उपयुक्तता समजावून घ्यावी लागते. या शास्त्राचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१. ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व :** खाद्यसंकलन, शिकार व मासेमारी या अवस्थांमध्ये मानव अन्नपाण्याच्या शोधार्थ सतत भटकत असे. शेतीचा शोध लागल्यानंतर मानवाची ही भटकंती संपली व तो एका ठिकाणी वस्ती करून स्थिर जीवन जगू लागला. त्यातूनच खेडी उदयास आली. पुढे लोकसंख्या वाढत गेली. तसेच मानवी जीवनाचा विकास होत गेला. परिणामी कांही खेड्यांचा विस्तार होऊन त्यांना शहराचे स्वरूप प्राप्त झाले. अशाप्रकारे मानव समाजाच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत प्रथम खेडी व त्यानंतर शहरे उदयास आली. त्यामुळे मानव समाजाचा अभ्यास करताना प्रथम उदयास आलेल्या खेड्यांच्या म्हणजेच ग्रामीण समाजाच्या अभ्यासास ऐतिहासिकदृष्ट्या अग्रक्रम देणे भाग पडते.

**२. सैद्धांतिकदृष्ट्या महत्त्व :** ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण समाजातील सामाजिक संबंध, सामाजिक संघटनांचे प्रकार, सामाजिक संस्था व एकंदर सामाजिक जीवन इत्यादीचा सविस्तर व पद्धतशीर अभ्यास करते. त्यामुळे आपणास ग्रामीण जीवनाचे यथार्थ ज्ञान मिळते व त्यामुळे ग्रामीण समाजाविषयी असलेले आपले पूर्वग्रह, गैरसमजूती काल्पनिक मते दूर होण्यास मदत होते. तसेच ग्रामीण समाजाविषयीचे शास्त्रीय ज्ञान हे शेतीशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादी शास्त्रांना त्यांच्या अभ्यास घटकांचा अभ्यास करण्यासाठी उपयोगी पडते. अशाप्रकारे ग्रामीण समाजाचा अभ्यास हा सैद्धांतिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरतो.

**३. बहुसंख्यांक लोकांचे शास्त्र म्हणून महत्त्व :** जगात सर्वत्रच खेडी व शहरे प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. अगदी सुरुवातीपासूनच खेड्यांत राहणाऱ्या लोकांची संख्या ही शहरात राहणाऱ्या लोकसंख्येपेक्षा नेहमीच जास्त राहिलेली आहे. औद्योगिक क्रांतिनंतर नागरीकरणाच्या प्रक्रियेस प्रारंभ होऊन खेड्यातील लोक शहराकडे स्थलांतर करू लागले. त्यामुळे शहरात राहणाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे. असे असले तरी आजदेखील जगातील एकूण लोकसंख्येपैकी निम्म्याहून अधिक लोकसंख्या खेड्यातच वास्तव्य करताना आढळते. त्यामुळे खेड्यातील लोकांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणारे ग्रामीण समजशास्त्र हे जागतीक बहुसंख्यांक लोकांचे शास्त्र ठरते. जर आपणास ग्रामीण लोकांविषयी पुरेसी शास्त्रीय माहिती नसेल तर आपणास बहुसंख्यांक लोकांविषयी कांहीच माहिती नाही असे होईल. अशाप्रकारे ग्रामीण समाजशास्त्र हे बहुसंख्यांक लोकांचे शास्त्र असल्याने त्याला आपोआपच महत्त्व प्राप्त होते.

**४. सामाजिक समायोजनाच्यादृष्टीने महत्त्व :** आधुनिक काळात दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे ग्रामीण व शहरी समाजांचा परस्परांशी घनिष्ठ संपर्क येत आहे. आपल्या गरजापूर्तीसाठी हे दोन्ही समाज परस्परावर अवलंबून आहेत. आजच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत तर संपूर्ण जग हे एक गाव (खेडे) बनत चालले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या जीवनपद्धतीचे लोक एकत्र येणे अपरिहार्य बनले आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण तसेच शहरी लोकांना परस्परांच्या सामाजिक जीवनाचे यथार्थ ज्ञान असणे आवश्यक ठरते. अन्यथा सामाजिक समायोजनाची समस्या निर्माण होऊ शकते. म्हणून ग्रामीण समाजशास्त्र हे केवळ ग्रामीण लोकांच्या दृष्टीनेच नव्हे तर शहरी लोकांच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरते. म्हणूनच **लॉरी नेल्सन** म्हणतात की ग्रामीण किंवा शहरी व्यक्तीला आपला समाज सोडून इतर

समाज कोणत्या परिस्थितीत राहतो हे माहित नसेल तर ती व्यक्ती पुरेशी सुशिक्षित आहे असे म्हणता येणार नाही. ग्रामीण समाजशास्त्रात ग्रामीण व नागर समाजातील साम्य व भेदाचा तसेच परस्परसंबंधाचा पद्धतशीर अभ्यास होतो. त्यामुळे आपणास दोन्ही समाजाविषयीचे यथार्थ ज्ञान मिळते. आणि असे ज्ञान असलेल्या व्यक्तीचे कोणत्याही समाजात पद्धतशीरपणे समायोजन होऊ शकते. थोडक्यात बदलत्या परिस्थितीत सामाजिक समायोजनाच्या दृष्टीने ग्रामीण समाजाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

५. **ग्रामीण सामाजिक समस्यांच्या निर्मूलनाच्या दृष्टीने महत्त्व :** ग्रामीण समाजशास्त्राचे ज्ञान हे ग्रामीण सामाजिक समस्यांच्या निर्मूलनासाठी उपयोगी पडते. या शास्त्राचा उदयच मूळी ग्रामीण समस्यांच्या अभ्यासाच्या गरजेपोटी झालेला आहे. ग्रामीण समस्यांचा शास्त्रीयदृष्टीने अभ्यास करून त्यांच्या निर्मूलनाचे उपाय हे शास्त्र सूचविते. त्यामुळे ग्रामीण समस्यांच्या निर्मूलनासाठी हे शास्त्र उपयुक्त ठरते. ग्रामीण समस्यांविषयी लोकमत जागृत करणे, लोकांचे त्यादृष्टीने प्रबोधन करणे, त्यासाठी लोकांचे संघटन करणे, ग्रामीण समस्या निर्मूलनासाठी आखलेले कार्यक्रम यशस्वी करणे इत्यादी कार्ये ग्रामीण समाजशास्त्रीय संशोधनाच्या आधारे पार पाडता येतात. उदा. ग्रामीण लोकांना लाकसंख्या वाढीच्या दुष्परिणामांची जाणिव करून देऊन त्यांना लहान कुटुंबाचे महत्त्व पटवून देता येते व त्याद्वारे कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम यशस्वी करता येतो. अशिक्षित असण्याचे तोटे ग्रामीण लोकांना पटवून देऊन त्यांना साक्षर होण्याची प्रेरणा देता येते व अशाप्रकारे साक्षरता प्रसाराचा कार्यक्रम यशस्वी करता येतो.

६. **ग्रामीण विकासाच्यादृष्टीने महत्त्व :** ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण विकास साध्य करण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरते. आज जगात सर्वत्रच ग्रामीण विकासाचे व ग्रामीण पुनर्रचनेचे कार्यक्रम राबविले जात आहेत. ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण समाजाचा शास्त्रीय अभ्यास करून ग्रामीण विकासाचे नियम शोधून काढते. त्यामुळे हे नियम ग्रामीण विकासाच्या व पुनर्रचनेच्या कार्यक्रमास मार्गदर्शक ठरतात. यासंदर्भात **टी. एल. स्मिथ** म्हणतात की ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण जीवनाचे शास्त्रीय ज्ञान तर देतेच शिवाय ग्रामीण कल्याण व ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यात योग्य ते सहकार्य करते. ग्रामीण पुनर्रचनेच्या क्षेत्रात या शास्त्राने गौरवाचे स्थान मिळविलेले आहे. **डॉ. ए. आर. देसाई** यांच्या मते ग्रामीण विकासाचे नियम शोधणे हे या शास्त्राचे उद्दिष्ट आहे. अशाप्रकारे ग्रामीण समाजाचे अध्ययन व संशोधन करून या समाजाच्या विकासाचे नियम शोधणे व त्याआधारे ग्रामीण समाजाचे कल्याण साध्य करणे हे या शास्त्राचे ध्येय आहे. ग्रामीण समाजाचे होणारे विघटन थांबवून तेथे नवीन व्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम हे शास्त्र करू शकते. तसेच ग्रामीण विकास कार्यक्रमांचे विश्लेषण व मूल्यमापन करण्याचे कार्यही हे शास्त्र करते. उदा. भारतातील समुदाय विकास कार्यक्रम, पंचायत राज्यपद्धती, विस्थापितांचे पुनर्वसन इत्यादी कार्यक्रमांचे निरीक्षण, परीक्षण व मूल्यमापन करून ग्रामीण समाजशास्त्रज्ञांनी ग्रामीण विकासात मोलाचे योगदान दिलेले आहे. तात्पर्य ग्रामीण विकासाच्यादृष्टीने ग्रामीण समाजशास्त्रास खूपच महत्त्व आहे.

७. **विविध क्षेत्रातील लोकांच्यादृष्टीने महत्त्व :** ग्रामीण समाजशास्त्र हे विविध क्षेत्रातील लोकांना आपली कार्ये पार पाडण्यासाठी उपयोगी पडते. उदा. राज्यकर्त्यांना ग्रामीण विकासाचे धोरण ठरविण्यासाठी तर प्रशासकांना त्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी या शास्त्राचे ज्ञान उपयोगी

पडते. आज राज्यकारभाराचे क्षेत्र खेड्यापाड्यापर्यंत विस्तारलेले असल्याने शासकीय कर्मचाऱ्यांचा ग्रामीण समाजाशी घनिष्ठ संबंध येत आहे. म्हणून महसूल अधिकारी, कृषी अधिकारी, पशुसंवर्धन अधिकारी, आरोग्याधिकारी, शिक्षणाधिकारी इत्यादींना त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी ग्रामीण सामाजिक संबंधाचे व ग्रामीण समस्यांचे ज्ञान उपयोगी पडते. तसेच ग्रामीण विकास करू इच्छिणाऱ्या सेवाभावी संस्था व सामाजिक कार्यकर्ते यांनाही ग्रामीण समाजाचे शास्त्रीय ज्ञान उपयोगी पडते. अशा ज्ञानाच्या अभावी ग्रामीण विकास कार्यक्रम अयशस्वी ठरू शकतो. थोडक्यात ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामीण समाजाचा शास्त्रीय अभ्यास उपयोगी ठरतो.

## १.४ स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ग्रामीण समाजशास्त्राची कोणतीही एक व्याख्या द्या.

२. ग्रामीण समाजशास्त्रास तथ्यात्मक शास्त्र का म्हणतात?

३. ग्रामीण समाजशास्त्रातील निष्कर्षांच्या आधारे केलेले पूर्वकथन नेहमीच अचूक ठरेल याची खात्री का देता येत नाही?

## १.५ सारांश (Let us Sum Up)

ग्रामीण समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणाऱ्या समाजशास्त्राच्या शाखेस ग्रामीण समाजशास्त्र असे म्हणतात. या शास्त्रात ग्रामीण समुदाय, ग्रामीण सामाजिक जीवन, ग्रामीण सामाजिक संघटना व सामाजिक प्रक्रिया, ग्रामीण आर्थिक व धार्मिक जीवन, ग्रामीण सामाजिक समस्या, ग्रामीण पुनर्रचना व परिवर्तन इत्यादी बाबींचा सविस्तर व पद्धतशीर अभ्यास केला जातो. ग्रामीण समाजशास्त्र हे अनुभवाधिष्ठीत व तथ्यात्मक विज्ञान असून त्याच्याकडे मर्यादित प्रमाणात पूर्वकथन क्षमता आहे. ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यास हा अनेक दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. मानवाच्या सामाजिक जीवनाच्या विकासाच्या प्रक्रियेत प्रथम खेडी उदयास आल्याने खेड्यांच्या म्हणजेच ग्रामीण समाजाच्या अभ्यासास ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त होते. जगातील बहुसंख्यांक लोक ग्रामीण पर्यावरणात वास्तव्य करीत असल्यानेही ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. आधुनिक काळात ग्रामीण व नागर समाजांचा घनिष्ठ संबंध येत असल्याने सामाजिक समायोजनाच्यादृष्टीने ग्रामीण समाजाचा अभ्यास उपयुक्त ठरतो. ग्रामीण सामाजिक समस्यांचे निर्मूलन करून ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी ग्रामीण समाजाचे शास्त्रीय ज्ञान विविध क्षेत्रातील लोकांना उपयुक्त ठरते.

## १.६ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check your Progress)

**एका वाक्यात उत्तरे**

१. बर्ट्रांड आणि सहकारी यांच्या मते व्यापक अर्थाने ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण पर्यावरणातील मानवी संबंधाचा अभ्यास आहे.

२. ग्रामीण लोकांचे सामाजिक वर्तन प्रत्यक्षात कसे आहे या दृष्टिकोनातून त्यांच्या वर्तनाचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्र करते म्हणून त्यास तथ्यात्मक शास्त्र असे म्हणतात.

३. ग्रामीण समाजशास्त्राचे निष्कर्ष तितकेसे यथार्थ, निश्चित व काटेकोर नसल्याने त्यांच्या साह्याने केलेले पूर्वकथन हे नेहमीच अचूक ठरेल याची खात्री देता येत नाही.

## १.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. ग्रामीण समाजशास्त्राच्या व्याख्या देऊन त्याचा अभ्यास विषय स्पष्ट करा.

२. ग्रामीण समाजशास्त्र म्हणजे काय? ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करा.

३. ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास स्पष्ट करा.

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा (टीपा लिहा)**

१. ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व

२. ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप

## १.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- एखाद्या सामाजिक संशोधन करणाऱ्या संस्थेस भेट द्या आणि तेथील संशोधकाकडून खेड्यातील जीवनाविषयीची माहिती गोळा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांची ओळख करून घ्या. तसेच त्यांच्याकडून तथ्यसंकलन करताना येणाऱ्या अडचणी जाणून घ्या. आणि त्याचे एक टिपण करा.

## १.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

१. ग्रामीण समाजशास्त्र - प्रा. चंद्रकांत खंडागळे, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, २००५.

२. ग्रामीण समाजशास्त्र - डॉ. गुरुनाथ नाडगोंडे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९८६.

३. Rural Sociology - N. Jayapalan - Atalantic Publishers and Distributer, New Delhi, 2002.

४. Rural Sociology - Doshi & Jain.

❑❑❑

# घटक २

# ग्रामीण समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना

**(Basic Concepts in Rural Sociology)**

---

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ ग्रामीण समाज

  २.२.२ शेतकरी समाज

  २.२.३ ग्रामीण–नागर भेद

  २.२.४ ग्रामीण–नागर सातत्य

२.३ सारांश

२.४ स्मरणार्थ संज्ञा

२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## २.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास–

- ग्रामीण समाज ही संकल्पना स्पष्ट करता येईल.
- शेतकरी समाज या संकल्पनेचे आकलन होईल.
- ग्रामीण व नागर समाज यांच्यातील भेद सांगता येतील.
- ग्रामीण–नागर सातत्य ही संकल्पना विशद करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

कोणत्याही विज्ञानशाखेचे यथार्थ आकलन होण्यासाठी तिच्यातील मूलभूत संकल्पनांचे स्वरूप समजावून घ्यावे लागते. त्यामुळे ग्रामीण समाजशास्त्राचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्यामधील मूलभूत संकल्पनांचे स्वरूप समजावून घ्यावे लागते. त्यासाठी प्रथम संकल्पना म्हणजे काय हे थोडक्यात पाहू.

**संकल्पनेची व्याख्या :**

**१) चंद्रकांत खंडागळे :** एखाद्या वर्गातील किंवा प्रवर्गातील सर्व सदस्यांना लागू पडणारी सामान्य संज्ञा म्हणजे संकल्पना होय. (A concept is a general term which is applicable to all members of a class or category.)

**२) इली चिनॉय :** वस्तू, घटना, व्यक्ती, प्रक्रिया व कल्पना यांच्या विशिष्ट वर्गातील सर्व सदस्यांचा निर्देश करणारी सामान्य संज्ञा म्हणजे संकल्पना होय. (A concept is a general term that refers to all members of a particular clas of object, events, persons, relationships, processes and ideas.)

प्रत्येक विज्ञानात अनुभवास आलेल्या तथ्यांचे स्वरूप व वैशिष्ट्ये साररूपात व्यक्त करण्यासाठी संकल्पना निर्माण केल्या जातात. उदा. समाजशास्त्रात समाज, समुदाय, सामाजिक समूह, सामाजिक संस्था, सामाजिक संरचना, प्रकार्य इत्यादी संकल्पना आहेत. समाजशास्त्राप्रमाणेच ग्रामीण समाजशास्त्रातही अनेक संकल्पना तयार केलेल्या आढळतात. त्यापैकी याठिकाणी तुम्ही १) ग्रामीण समाज २) शेतकरी समाज ३) ग्रामीण-नागर भेद ४) ग्रामीण -नागर सातत्य या चार संकल्पना अभ्यासणार आहात.

## २.२ विषय विवेचन

ग्रामीण समाजशास्त्रातील संकल्पना समजावून घेण्यासाठी या घटकाचे चार विभाग पाडलेले आहेत. त्यापैकी पहिल्या विभागात ग्रामीण समाज, दुसऱ्या विभागात शेतकरी समाज, तिसऱ्या विभागात ग्रामीण व नागर समाज यातील भेद व चौथ्या विभागात ग्रामीण नागर सातत्य या संकल्पनांचे विवेचन केलेले आहे.

### २.२.१ ग्रामीण समाज (Rural Society)

ग्रामीण समाज ही ग्रामीण समाजशास्त्रातील एक महत्व पूर्ण संकल्पना आहे. ग्रामीण समाजाचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्र करते. त्यामुळे सर्वप्रथम ग्रामीण समाज ही संकल्पना समजावून घ्यावी लागते. ग्रामीण समाज व नागर समाज असे मानव समाजाचे मुख्य दोन प्रकार पडतात. मानवांचे वेगवेगळे समूह जगाच्या वेगवेगळया भूप्रदेशात वस्ती करून राहातात. या वस्तीचे खेडे (ग्राम) व शहर (नगर) असे दोन प्रकार आहेत. खेड्यात राहणाऱ्या लोकांच्या समाजास ग्रामीण समाज तर शहरात राहाणाऱ्या लोकांच्या समाज शहरी समाज असे म्हणतात. त्यापैकी ग्रामीण समाजाचे स्वरूप तुम्ही या ठिकाणी अभ्यासणार आहात.

**ग्रामीण समाजाचे स्वरूप**

ग्रामीण समाजाचे स्वरूप समजण्यासाठी पुढील मुद्दे विचारात घेऊ या.

**१) खेड्यातील समाज:** ग्रामीण समाज हा खेड्यात किंवा ग्रामात (Village) राहाणाऱ्या लोकांच्या समाज आहे. कोणत्याही विशिष्ट समाजातील लोक हे एकतर खेड्यात किंवा शहरात राहातात. खेड्याला ग्रामीण समुदाय (Rural Community) तर शहराला शहरी समुदाय (Urban Community) असे म्हणतात. ग्रामीण समाज हा अनेक खेड्यांचा म्हणजेच ग्रामीण समुदायांचा

मिळून बनलेला असतो. ग्रामीण समुदायाचा अर्थ आपण पुढील तिसऱ्या घटकात सविस्तरपणे स्पष्ट करणार आहोत. थोडक्यात ग्रामीण समाजात अनेक खेड्यांचा समावेश होतो.

२) **सामजिक सजातियता**: ग्रामीण समाजात सामाजिक सजातियता मोठ्या प्रमाणावर आढळते. ग्रामीण समाजातील लोक हे वेगवेगळया खेड्यात राहात असले आणि ते वेगवेगळ्या धर्माचे, जातीचे, भाषेचे, वर्गाचे असले तरी त्यांची जीवनशैली (Life- Style) किंवा जीवनमार्ग (Way of Life) हा बहुतांशी समान असल्याचे आढळते. ग्रामीण लोकांची मते, कल्पना, विचार, वर्तनप्रकार, रूढी व परंपरा, श्रद्धा,मूल्ये, पोशाख व खाण्यापिण्याची पद्धती इत्यादी गोष्टी एकसारख्याच (Uniform) असतात. त्यामुळे त्यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनात बहुतांशी समानता निर्माण झालेली आढळते. थोडक्यात ग्रामीण समाज हा सामाजिकदृष्ट्या सजातीय स्वरूपाचा असतो.

३) **शेती प्रधान जीवन**: ग्रामीण समाज हा शेतीप्रधान समाज असतो. कारण या समाजातील बहुसंख्याक लोकांचा शेती हा मुख व्यवसाय असतो आणि या समाजात जे बिगरशेती व्यवसाय (Non-agricultural occupations) चालतात ते देखील प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे शेती व्यवसायाशी संलग्न असतात. उदा. पशुपालन, दुग्धव्यवसाय, विणकाम, सुतारकाम इत्यादी. त्यामुळे ग्रामीण समाज, कृषक समाज (Agrarian Society), शेतकरी समाज (Peasant Society) इत्यादी संकल्पना समान अर्थाने घेतल्या जातात. शेतीव्यवसायात शेतजमिनीस महत्वाचे स्थान असून ग्रामीण संबंध हे शेतजमिनविषयक संबंधावर आधारलेले असतात. त्यामुळे ग्रामीण लोकांचे केवळ आर्थिक जीवनच नव्हे तर सामाजिक- सांस्कृतिक जीवनदेखील शेतीव्यवसायावरच आधारलेले असते. ग्रामीण लोक व ग्रामीण समाजजीवन यावर शेती व्यवसायाची मोठी छाप पडलेली असते. त्यामुळे ग्रामीण समाज हा शेतीप्रधान समाज म्हणून ओळखला जातो.

४) **नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव**: ग्रामीण समाजावर नैसर्गिक पर्यावरणाचा मोठा प्रभाव असतो. कारण बहुसंख्य खेडी ही निर्सगाच्या सान्निध्यात वसलेली आहेत तसेच शेती व्यवसायामुळे ग्रामीण लोकांचा निसर्गशक्तींशी व घटकांशी (उदा. हवा, पाणी, ऊन, वारा, पशुपक्षी, वृक्षवेली इत्यादी) सतत व घनिष्ठ संबंध येतो. त्यांच्या बहुतेक गरजा या निसर्गाद्वारेच पूर्ण होतात. मात्र निसर्गातील घडामोडींचे वस्तुनिष्ठ ज्ञान ग्रामीण लोकांना नसल्याने ते निसर्गशक्तींना देवदेवता (उदा. पर्जन्यदेवता, जलदेवता, वायुदेवता, सुर्यदेवता, चंद्रदेवता इत्यादी) मानून त्यांची पूजा-अर्चा करतात. त्यामुळे ग्रामीण लोक हे अंधश्रद्धाळू व दैववादी बनलेले आढळतात.

५) **पारंपरिक जीवनपद्धती**: ग्रामीण लोकांची जीवनपद्धती ही पारंपरिक स्वरूपाची आहे. परंपरेने चालत आलेल्या रूढी, वर्तनप्रकार, मूल्ये, श्रद्धा, मते, विचार इत्यादींचा या लोकांवर मोठा पगडा असतो व या गोष्टींचे पालन ते मोठ्या निष्ठेने करतात आणि त्यामध्ये बदल करण्यास ते सहजासहजी तयार होत नाहीत. अर्थात ग्रामीण समाजात परिवर्तनास अजिबात वाव नसतो असा याचा अर्थ नाही. या समाजातही परिवर्तन होत असते, मात्र त्याची गती खूपच संथ असते. थोडक्यात ग्रामीण जीवन हे परंपराप्रिय असते.

६) **अनौपचारिक संबंध**: ग्रामीण लोक हे एकमेकांच्या घनिष्ठ व नित्य संपर्कात असतात. त्यांचा एकमेकांशी समोरासमोरचा संपर्क येत असतो. त्यामुळे त्यांच्यात प्रेम, जिव्हाळा, आत्मियता,

सहकार्य, मोठ्या प्रमाणावर असते. त्यांचे जीवन हे कुटुंब, आप्तमित्र, खेडे अशा प्राथमिक समूहात व्यतीत होत असते. परिणामी, त्यांच्या परस्परसंबंधात अनौपचारिकता मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. थोडक्यात ग्रामीण समाजातील लोकांचे परस्परसंबंध हे अनौपचारिक (informal) स्वरूपाचे असतात.

७) **स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा**: इतर समाजाप्रमाणे ग्रामीण समाजदेखील पुरुषप्रधान आहे. त्यामुळे या समाजात पुरुषाचा दर्जा श्रेष्ठ व स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ (निम्न) मानला जातो. पुरुषांना अनेक विशेषाधिकार दिलेले असून स्त्रियांना मात्र अनेक अधिकारपासून वंचित ठेवले जाते. या समाजातील कार्यविभाजन हे लिंगभेदावर आधारलेले आढळते. स्त्रिया या शेती व इतर व्यवसायात पुरुषांबरोबरीने काम करीत असल्या तरी घरकाम व मुलांचे संगोपन हीच त्यांची प्रमुख कामे मानली जातात. सर्व व्यवहाराचे निर्णय प्रामुख्याने पुरुषच घेतात. स्त्रियांना फारसे निर्णय स्वातंत्र्य नसते. त्यांच्यावर रूढीपरंपरांची बंधने घातलेली आढळतात.

८) **अप्रगत समाज**: शहरी समाजाच्या तुलनेत ग्रामीण समाज हा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्टया अप्रगत किंवा मागासलेला आहे. जगातील बहुसंख्य ग्रामीण समाजात दीर्घकाळ आजच्यासारखी औपचारिक शिक्षणाची व्यवस्था नव्हती. आजही ग्रामीण समाजात आधुनिक शैक्षणिक सोयी सुविधा फारशा उपलब्ध नाहीत. त्यामुळे ग्रामीण समाजात शैक्षणिक मागासलेपणा बऱ्याच प्रमाणात टिकून आहे. शेती हा ग्रामीण समाजाचा मुख्य व्यवसाय असून तो देखील बऱ्याच प्रमाणात अप्रगत आहे. बहुतेक शेतकरी हे अप्रगत तंत्राने शेती करतात. त्यामुळे त्यांचे उत्पन्न अल्पच आहे. परिणामी, ग्रामीण आर्थिक जीवन अप्रगत आहे. ग्रामीण समाजात पायाभूत सुविधा (पक्के रस्ते, वीज, शुद्ध पाणी, वाहतूक व संप्रेषण साधने, आरोग्यविषयक सेवा इत्यादी) पुरेशा प्रमाणात पोहचलेल्या नाहीत. तसेच नवे ज्ञान, कल्पना, मते इत्यादी गोष्टी ग्रामीण लोक त्वरीत स्वीकारीत नाहीत. परिणामी हा समाज सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्याही अप्रगतच असल्याचे दिसते.

### २.२.२ शेतकरी समाज (Peasant Society)

ग्रामीण समाज ही संकल्पना अभ्यासल्यानंतर आता तुम्ही शेतकरी समाज ही संकल्पना समजावून घेणार आहात. तथापि, ही संकल्पना तितकीशी स्पष्ट किंवा असंदिग्ध नाही. कारण ग्रामीण समाज, शेतकरी समाज, कृषक समाज या तीन संकल्पना अनेकजण समान अर्थाने आलटून पालटून वापरताना दिसतात. तसेच या तीन समाजांची वैशिष्ट्ये ही परस्परांपासून फारसी भिन्नही नाहीत. त्यामुळे शेतकरी समाज ही संकल्पना स्पष्ट करणे कठीण जाते. असे असले तरी अनेक शास्त्रज्ञांनी 'शेतकरी समाज' यावर आपापली मते मांडलेली अहेत. त्यांच्या मतांच्या आधारे आपण ही संकल्पना स्पष्ट करणार आहोत.

**शेतकरी समाजाचा अर्थ:** ''ज्या समाजात शेतकऱ्यांचे प्रभुत्व किंवा वर्चस्व असते आणि शेतकऱ्यांचा समूह हा इतर सामाजिक समूहाहून भिन्न असतो त्या समाजास शेतकरी समाज असे म्हणतात.

तथापि, कांही वेळा शेतकरी समाज ही संज्ञा ही ज्या समाजात शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते त्यासाठीही वापरली जाते.

**शेतकरी म्हणजे कोण? :** शेतकरी समाज या संकल्पनेत शेतकरी ही जी संज्ञा वापरलेली आहे तिला एक निश्चित असा अर्थ आहे. इंग्रजी भाषेत शेतकऱ्यासाठी Farmer आणि Peasant या दोन संज्ञा आहेत. मोठ्या आकाराच्या शेतजमिनीवर मालकी असणाऱ्या किंवा अशा जमिनीचे व्यवस्थापन पाहणाऱ्या व्यक्तीसाठी इंग्रजी भाषेत Farmer ही संज्ञा वापरतात. याउलट लहान आकाराच्या शेतजमिनीवर निर्वाह चालविण्याच्या उद्देशाने साध्या उत्पादन तंत्राने शेती व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीसाठी इंग्रजी भाषेत Peasant ही संज्ञा वापरतात. यासंदर्भात **रॉबर्ट रेडफिल्ड** हे शास्त्रज्ञ म्हणतात की निर्वाहासाठी शेतीव्यवसाय करणारी व्यक्ती ही Peasant होय. या व्यक्तीच्या आपल्या जमिनीविषयीच्या भावना तीव्र असतात व तिचा जीवनमार्ग हा पारंपरिक असतो.

**शेतकरी समाजाची व्याख्या:** उपरोक्त विवेचनाच्या आधारे शेतकरी समाजाची (म्हणजे Peasant Society ची) व्याख्या आपणास पुढीलप्रमाणे करता येईल.

''ज्या समाजात सापेक्षतः साध्या उत्पादन तंत्राने व आपल्या कुटुंबियांच्या मदतीने मुख्यतः निर्वाह चालविण्यासाठी जमिनीच्या लहान-लहान तुकड्यावर शेती व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती बहुसंख्याक असतात आणि त्यांचे तेथील सामाजिक संबंधात प्रभुत्व असते त्या समाजास शेतकरी समाज असे म्हणतात.''

**शेतकरी समाजाची वैशिष्ट्ये:** शेतकरी समाज ही संकल्पना समजण्यासाठी शेतकरी समाजाची वैशिष्ट्ये अभ्यासणे उचित ठरते.

**टिओडॉर शानीन** यांनी शेतकरी समाजाचे ४ आयाम किंवा पैलू सांगितलेले आहेत.

१) शेतकरी समाजात कुटुंब हा समूह सामाजिक संघटनेचा मूलभूत घटक (एकक) म्हणून शेती व्यवसाय करतो.

२) शेतकरी समाजात शेतजमीन हेच उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत (साधन) असतो. कांही कुटुंबे पशुपालन करूनही उत्पन्न मिळवितात.

३) शेतकरी समाजाची परंपरागत अशी संस्कृती असते व ती लघु आकाराच्या ग्रामीण समुदायांशी निगडीत असते.

४) शेतकरी समाजातील व्यक्तींचा दर्जा हा दुय्यम स्वरूपाचा असतो.

**रेमंड फर्थ** यांनीही शेतकरी समाजाची ४ वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत.

१) शेतकरी समाजाचा शेती हा प्रमुख व्यवसाय असतो.

२) या समाजात शेती व्यवसाय हा साध्या तंत्राने केला जातो.

३) या समाजातील व्यक्तींकडे शेतजमिनीचे लहान-लहान तुकडे असतात.

४) या समाजात कुटुंब हे आर्थिक घटक म्हणून कार्यरत असते.

वरील विवेचनाच्या आधारे शेतकरी समाजाची पुढील वैशिष्ट्ये आपणास सांगता येतील.

**१) लहान शेतकऱ्यांचा समाजः** शेतकरी समाज हा लहान शेतकऱ्यांचा म्हणजेच अल्पभूधारक शेतकऱ्यांचा समाज असतो. या समाजात शेतकऱ्यांशिवाय इतरही व्यक्ती असतात पण त्या शेतकऱ्यांशीच संबंधित असतात. असे असले तरी या समाजात शेतकऱ्यांच्या समूहाचे प्रभुत्व असते. या समाजातील सामाजिक संबंध हे कुटुंब, आप्तव्यवस्था, शेजार इत्यादी समूहांवर आधारलेले असते.

**२) शेती मुख्य व्यवसायः** या समाजातील व्यक्तींचा शेती हा मुख्य व्यवसाय असून हा व्यवसाय कुटुंबियांच्या साहाय्याने व साध्या उत्पादन तंत्राद्वारे केवळ निर्वाह चालविण्याच्या उद्देशाने केला जातो. जादा उत्पादन झाल्यास ते समाजाबाहेरील व्यक्तींना विकले जाते व त्यातून जीवनावश्यक इतर वस्तू व सेवा खरेदी केल्या जातात. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीविषयी अत्यंत प्रेम असते व ते केवळ आर्थिक फायद्यासाठी आपली जमीन विकण्यास तयार नसतात. शेतीशिवाय इतरही कांही व्यवसाय (उदा. पशुपालन, हस्तव्यवसाय इ.) या समाजात दिसून येतात. पण त्यांचे प्रमाण अल्प असते.

**३) परंपरागत संस्कृतीः** शेतकरी समाजाची वैशिष्ट्यपूर्ण अशी परंपरागत संस्कृती असते आणि तिचे संरक्षण करण्याचा प्रयत्न हा समाज करीत असतो. आपल्या परंपरागत संस्कृतीत बदल करण्यास हा समाज सहसा तयार होत नाही. आपले कुटुंब, शेती, जीवनशैली इत्यादीविषयी या समाजास अभिमान वाटत असतो. जगाकडे पाहण्याचा या समाजाचा दृष्टिकोन सनातनी स्वरूपाचा असतो. हा समाज साधे जीवन जगतो. त्यामुळे संपत्तीचे प्रदर्शन करणे व चैनीचे जीवन जगणे या गोष्टींना या समाजात स्थान नसते.

**४) दुय्यम दर्जाः** उच्च वर्गीय श्रेष्ठजन वर्गांच्या तुलनेत शेतकरी समाजातील व्यक्तींचा दर्जा हा दुय्यम असतो. जॉर्ज डाल्टन म्हणतात की, मध्ययुरोपात पिझंट व्यक्तींचा दर्जा हा कनिष्ठ मानला जाई. उच्चवर्गीय श्रेष्ठजन हे शेतकरी समाज व त्या बाहेरील विश्व यांच्यात मध्यस्थाची भूमिका बजावितात. त्यामुळे शेतकरी समाज हा या श्रेष्ठजनांवर अवलंबून असतो.

**५) सामाजिक संघटनः** शेतकरी समाजाचे संघटन हे कुटुंब, विवाह, आप्तसंबंध यावर आधारलेले असते. कौटुंबिक व वैवाहिक संबंधाद्वारे या समाजाचे बाह्य जगाशी संबंध प्रस्थापित होतात. यासंदर्भात रेडफिल्ड म्हणतात की, सामाजिक संघटनेच्या खालच्या पातळीवर आप्तसंबंध व शेजारसंबंध असतात तर वरच्या पातळीवर व्यक्तिगत व औपचारिक संस्थात्मक संबंध असतात.

**६) स्त्रियांचे कनिष्ठ स्थानः** ग्रामीण समाजाप्रमाणेच शेतकरी समाजातही स्त्रियांचे स्थान व दर्जा कनिष्ठ (निम्न) स्वरूपाचा असतो. या समाजात पुरुषप्रधान व्यवस्था असते. त्यामुळे सर्वच क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व असते. कौटुंबिक व आर्थिक व्यवहारातील सर्व निर्णय पुरुषच घेतात. स्त्रियांचे कार्यक्षेत्र हे 'चुल व मूल' एवढ्यापुरतेच मर्यादित असते. तथापि, स्त्रिया या शेती व्यवसायात महत्वाची भूमिका बजावित असतात. तरीही, घरकाम व मुलांचे संगोपन हीच स्त्रियांची मुख्य कार्ये मानली जातात.

### २.२.३ ग्रामीण – नागर भिन्नता (भेद किंवा फरक) (Rural-Urban differences)

प्रास्ताविक : समुदायाचे ग्रामीण समुदाय (गाव किंवा खेडे) व नागर समुदाय (नगर किंवा शहर) असे दोन प्रकार पडतात. त्यापैकी नागर समुदायाचा समग्र व पद्धतशीर अभ्यास नागर समाजशास्त्रात

होतो. नागर समुदायाचे परिपूर्ण व यथार्थ आकलन होण्यासाठी या दोन्ही समुदायांचा तुलनात्मक अभ्यास करून ग्रामीण समुदाय नागर समुदायाहून कसा भिन्न आहे म्हणजेच त्यांच्यात कोणते भेद आहेत हे समजावून घ्यावे लागते.

**अडचणी :**

तथापि त्यांच्यातील भेद स्पष्ट करण्यामध्ये पुढील अडचणी आहेत.

**१) सार्वत्रिक व्याख्येचा अभाव :** ग्रामीण व नागर समुदाय यांची सर्वत्र लागू पडेल अशी व सर्वांना मान्य होईल अशी व्याख्या करणे अत्यंत कठीण आहे. खेडे म्हणजे काय व नगर म्हणजे काय हे आपणास कळते. तथापि त्यांची समाधानकारक व्याख्या करता येत नाही. म्हणूनच **बर्गेल** म्हणतो की नगर म्हणजे काय हे प्रत्येकास माहित आहे पण त्याची कोणीही समाधानकारक व्याख्या दिलेली नाही.

**२) लोकसंख्येचे प्रमाण :** खेडे कमी लोकसंख्येचे तर नगर जास्त लोकसंख्येचे असते असे स्थूलपणे म्हटले जाते. पण लोकसंख्येच्या आधारे त्यांच्यात स्पष्टपणे भेद करणे कठीण जाते. कारण त्यासाठी वेगवेगळ्या देशात वेगवेगळे प्रमाण स्वीकारलेले दिसते. उदा. फ्रान्समध्ये २०००, अमेरिकेमध्ये २५००, भारतात ५००० तर जपानमध्ये ३०,००० लोकसंख्येच्या वस्तीला शहर मानले जाते.

**३) अंशाचा फरक :** खेडे व शहर हे मानवी वस्तीचे म्हणजेच समुदायाचे दोन प्रकार असून समुदाय जीवनाची प्रमुख वैशिष्ट्ये दोन्हीमध्येही आढळतात. फक्त त्या वैशिष्ट्यांमध्ये अंशाचा म्हणजे प्रमाणाचा फरक (Difference of degree or quantity) आढळतो. खेड्यात शहरांची कांही वैशिष्ट्ये आढळतात तर शहरातही खेड्यांची कांही वैशिष्ट्ये आढळतात. शहराजवळील खेड्यात नागरी जीवनाचे कांही अंश आढळतात तर शहरातील कामगारवस्त्या व झोपडपट्ट्या यांच्यात ग्रामीण जीवनाची झलक पहावयास मिळते. म्हणून त्यांच्यात स्पष्ट अशी विभाजनरेषा आखता येत नाही. म्हणून **मॅकायव्हर** म्हणतात की, ‘नगर कोठे संपते व खेडे कोठून सुरू होते हे ठरविणारी विभाजनरेषा आखणे कठीण आहे.’

**४) पर्यावरणातील भिन्नता :** खेड्यातील व शहरातील पर्यावरण वेगवेगळे असते. तथापि एकाच शहरातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळे पर्यावरण आढळते. उच्चभ्रू श्रीमंतांची कॉलनी, पांढरपेशा मध्यमवर्गीयांचे अपार्टमेंटस्, कामगारांची चाळ व गरिबांची झोपडपट्टी यांच्यातील पर्यावरण वेगवेगळे असते. त्यामुळे यापैकी नेमक्या कोणत्या पर्यावरणाची तुलना खेड्यातील पर्यावरणाशी करावयाची असा प्रश्न पडतो.

**५) बदलते स्वरूप :** या दोन्ही समुदायातील भेद दर्शविण्यामधील एक प्रमुख अडचण अशी की या दोन्ही समुदायाचे स्वरूप बदलत आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण, दळणवळणाची प्रगत साधने इ. मुळे त्यांच्यातील संपर्काचे प्रमाण खूपच वाढले आहे. त्यामुळे त्यांच्यातील अंतर झपाट्याने कमी होत आहे. शहरातील अनेक नागरी सुविधा (उदा. शाळा, महाविद्यालये, बँका, कृत्रिम पाणीपुरवठा, वीज, पक्के रस्ते, दळणवळणाची साधने इ.) खेड्यात उपलब्ध होऊ लागल्या

आहेत. त्यामुळे एखाद्या वस्तीस कोठपर्यंत खेडे म्हणावयाचे व तिला शहर म्हणण्यास केंव्हा सुरुवात करावयाची हे ठरविणे कठीण जात आहे.

थोडक्यात आज शुद्ध ग्रामीण समुदाय व शुद्ध नागर समुदाय आढळत नाही. त्यामुळे त्यांच्यात स्पष्ट भेद दर्शविणे कठीण जाते. असे असले तरी ग्रामीण व नागर समुदायात कांही भेद दाखविले जातात. **सोराकिन व झिम्मरमन** यांनी 'Principles of Rural Urban Sociology' या ग्रंथात कांही निकष वापरून या दोन्ही समाजातील भेद स्पष्ट केले आहेत.

**भेद :**

१) **व्यवसायातील भिन्नता :** शेती हा ग्रामीण लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीशिवाय इतरही कांही व्यवसाय (उदा. पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, विणकाम, लोहारकाम, सुतारकाम इ.) ग्रामीण लोक करतात. तथापि हे व्यवसाय प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे शेतीशीच निगडीत असतात. म्हणून त्यांना जोडधंदे किंवा पूरक व्यवसाय असे म्हणतात. याउलट शहरी लोकांचे व्यवसाय बिगरशेती स्वरूपाचे असतात. लहानमोठे उद्योग, कारखाने, व्यापारपेठा, विविध वस्तूंची विक्री केंद्रे, आरोग्य सेवेची केंद्रे, सल्लादायी केंद्रे, वाहतूक व संदेशवहनाची व्यवस्था, शिक्षणसंस्था, बँका, विमा कंपन्या, शासकीय व निमशासकीय कार्यालये इ. ची शहरात रेलचेल असते आणि त्यांच्यामध्ये काम करून शहरी लोक निर्वाह चालवतात. या सर्व व्यवसायांना बिगरशेती व्यवसाय म्हणतात. शहरात शेती व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उदा. खते, जंतूनाशके, शेती अवजारे इ. चे उत्पादन व विक्री करणारे व्यवसाय असतात आणि त्यामध्ये ही कांही शहरी लोक गुंतलेले असतात. असे व्यवसायही बिगरशेतीच मानले जातात.

२) **पर्यावरणातील भिन्नता :** ग्रामीण समुदायावर नैसर्गिक पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. शेती व्यवसायामुळे ग्रामीण लोकांचा निसर्गाशी घनिष्ठ संबंध येतो. त्यांच्या बहुतांशी गरजांची पूर्तता निसर्गाकडून होते. उदा. त्यांची पाण्याची गरज नदी, ओढे, तलाव यांच्याद्वारे, तर इंधनाची गरज जंगलाद्वारे पूर्ण होते. म्हणून ते निसर्गावर अवलंबून असतात. गरजपूर्तीसाठी ते निसर्गाला शरण जातात. त्यांना नैसर्गिक घडामोडींचे (ऊन, वारा, पाऊस) शास्त्रीय ज्ञान नसल्याने ते नैसर्गिक शक्तींना देवदेवता (उदा. जलदेवता, वायुदेवता, अग्निदेवता, वनदेवता) मानून त्यांची पूजा करतात. त्यामुळे ते दैववादी, अंधश्रद्धा बनलेले दिसतात. त्यांचे आर्थिकच नव्हे तर सामाजिक व सांस्कृतिक जीवनही नैसर्गिक पर्यावरणाने प्रभावित झालेले असते. त्यांचे आचारविचार, सवयी, श्रद्धा, दृष्टिकोन, सणसमारंभ, विविध कला इ. बाबी निसर्गाशी मोठ्या प्रमाणावर निगडीत असतात. याउलट शहरी समुदायावर नैसर्गिक पर्यावरणापेक्षा मानवनिर्मित (कृत्रिम) पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. नैसर्गिक पर्यावरणाचा प्रत्यक्ष प्रभाव शहरी जीवनावर फारसा पडत नाही. शहरी लोक आपल्या गरजापूर्तीसाठी निसर्गावर फारसे अवलंबून न राहता विज्ञान-तंत्रज्ञानावर आधारलेल्या कृत्रिम उपकरणांचा वापर करण्यावर जास्त भर देतात. उदा. पाण्यासाठी कृत्रिम पाणीपुरवठ्याची व्यवस्था करतात. इंधन म्हणून लाकडाऐवजी एल.पी.जी. गॅस व वीज वापरतात. उन्हाळ्यात थंड हवा मिळविण्यासाठी कूलर, पंखा, एअरकंडिशनर वापरतात. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे शहरी लोक चिकित्सक, बुद्धिवादी, विज्ञानवादी, प्रयत्नवादी बनलेले असतात. अंधश्रद्धा, देवभोळ्या कल्पना, अशास्त्रीय विचारसरणी यांपासून ते दूर राहतात. निसर्गाला शरण न जाता त्याचे शास्त्रीय

ज्ञान मिळवून त्याच्यावर मात करण्याचा प्रयत्न करतात. कृत्रिम पर्यावरण उभारून आपले जीवन सुखी व सुसह्य करण्याचा प्रयत्न करतात. थोडक्यात, ग्रामीण लोकांच्या मनोवृत्तीवर व जीवनावर नैसर्गिक पर्यावरणाचा तर शहरी लोकांच्या मनोवृत्तीवर व जीवनावर मानवनिर्मित पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो.

**३) आकारातील भिन्नता :** ग्रामीण समुदाय आकाराने लहान असतो. कारण शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने शेतीसाठी (धान्य लागवडीसाठी) मोठ्या भूभागाची (जमिनीची) गरज भासते. त्यामुळे राहण्यासाठी (वस्तीसाठी) कमी जागा वापराची लागते. याउलट शहरी समुदाय आकाराने मोठा असतो. शहराची लोकसंख्या खेड्याच्या मानाने जास्त असते. मर्यादित जागेवर हजारो, लाखो, करोडो लोक दाटीवाटीने राहतात. शहरे ही उद्योगाची, व्यापाराची, रोजगाराची, शिक्षणाची, भौतिक सोयीसुविधांची केंद्रे असल्याने सभोवतालच्या प्रदेशातील लोक शहराकडे सतत स्थलांतर करीत असतात. त्यातूनच शहराचा आकार किंवा विस्तार वाढत जातो. नगराच्या भोवती उपनगरे अस्तित्वात येतात व त्यातूनच काहींना महानगराचे स्वरूप येते.

**४) लोकसंख्येच्या घनतेतील भिन्नता :** ग्रामीण समुदायात केवळ लोकसंख्याच नव्हे तर लोकसंख्येची घनता देखील कमी असते. दर चौरस कि.मी. मागे किती लोक वास्तव्य करतात यावरून लोकसंख्येची घनता ठरविली जाते. खेड्यातील लोक एकतर शेतात घरे बांधून राहतात किंवा शेताजवळच्या जागेवर राहतात. तसेच खेड्यात रोजगाराच्या संधीही कमीच असतात. परिणामी तेथे लोकसंख्या व तिची घनता कमीच राहते. याउलट शहरी समुदायात लोकसंख्या व लोकसंख्येची घनताही खूपच जास्त असते. शहरात रोजगाराच्या, शिक्षणाच्या संधी विपुल प्रमाणात असल्याने शहराभोवतालच्या प्रदेशातून लोक शहराकडे सतत स्थलांतर करतात. त्यामुळे तेथील लोकसंख्या वाढत राहते. शिवाय शहरात कारखाने, दुकाने, कार्यालये, रस्ते, शाळा, बागा, क्रीडांगणे इ. साठी जागा राखीव ठेवली जाते. त्यामुळे रहात्या जागेची टंचाई निर्माण होते. परिणामी कमीत कमी जागेत जास्तीत जास्त लोकांना निवास करणे भाग पडते. परिणामी लोकसंख्येची घनता वाढत जाते. थोडक्यात ग्रामीण समुदायात लोकसंख्येची घनता कमी तर शहरी समुदायात जास्त असते.

**५) लोकसंख्येची सजातियता व विजातियता याबाबतची भिन्नता :** ग्रामीण समुदायात लोकसंख्येची सजातीयता आढळते. खेड्यातही विविध जातीधर्माचे व वर्गाचे लोक राहत असले तरी त्यांचे जीवन प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे शेती ह्या एकाच व्यवसायावर आधारलेले असते. त्यामुळे त्यांच्या मानसिकतेत व जीवनपद्धतीत मोठ्या प्रमाणावर एकविधता (एकसारखेपणा) आढळते. त्यांचे आचारविचार, श्रद्धामूल्ये, रूढीपरंपरा, सणसमारंभ, सवयी, भाषा, वेषभूषा, केशभूषा, भोजनव्यवस्था इ. बाबतीत बहुतांशी समानता आढळते. यालाच लोकसंख्येची सजातीयता म्हणतात. याउलट शहरी समुदायात लोकसंख्येची विजातीयता अधिक असते. कारण शहरात उद्योगधंद्याची, शिक्षणाची उपलब्धता असल्याने सभोवतालच्या प्रदेशातून भिन्न भिन्न वंशाचे, धर्माचे, जातीचे, भाषेचे संस्कृतीचे लोक शहरात एकत्र आलेले असतात. त्यांची आर्थिक-सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी भिन्न भिन्न असते. त्यामुळे त्यांचे आचारविचार, श्रद्धामूल्ये, रूढीपरंपरा, सणसमारंभ, सवयी, भाषा, वेषभूषा, केशभूषा, भोजनव्यवस्था इ. बाबी भिन्न भिन्न असतात. या भिन्नतेलाच लोकसंख्येची

विजातीयता म्हणतात. थोडक्यात ग्रामीण समुदायात लोकसंख्येची सजातीयता तर शहरी समुदायात लोकसंख्येची विजातीयता असते.

६) **गतिशीलतेतील भिन्नता :** ग्रामीण समुदायात गतिशीलतेस फारसा वाव नसतो. गतिशीलता म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची क्रिया होय. गतिशीलता ही तीन प्रकारची असते.

**(अ) भौगोलिक गतिशीलता :** म्हणजे एका भौगोलिक ठिकाणाहून दुसऱ्या भौगोलिक ठिकाणाकडे जाणे होय. उदा. एक गाव किंवा शहर सोडून दुसऱ्या गावी किंवा शहरी जाणे होय.

**(ब) व्यावसायिक गतिशीलता :** म्हणजे शेती सोडून नोकरी किंवा व्यापार करणे.

**(क) सामाजिक गतिशीलता :** म्हणजे एका सामाजिक दर्जाकडून किंवा स्तराकडून दुसऱ्या सामाजिक दर्जाकडे किंवा स्तराकडे जाणे होय. उदा. कनिष्ठ सामाजिक दर्जात बदल करून उच्च सामाजिक दर्जा मिळविणे.

ग्रामीण समुदायात या तिन्ही प्रकारच्या गतिशीलतेस फारशी संधी नसते. कारण तेथे शेतीशिवाय इतर व्यवसाय फारसे उपलब्ध नसतात. त्यामुळे व्यक्ती शेती व्यवसायातच गुंतली जाते. शिवाय खेड्यातील लोकांमध्ये जिव्हाळ्याचे, आत्मियतेचे संबंध असतात. त्यामुळे आपले गाव, आपले कुटुंब, आपले शेत, आपले आप्तमित्र इ. ना. सोडून दुसरीकडे जाणे व्यक्तीला नकोसे वाटते. त्यामुळे खेड्यात व्यावसायिक व भौगोलिक गतिशीलतेस फारसा वाव मिळत नाही. तसेच खेड्यात व्यक्तीचा सामाजिक दर्जा किंवा स्थान किंवा स्तर हा जन्म, जात, व्यवसाय, लिंग, वय इ. च्या आधारे निश्चित होतो व त्याला रूढीपरंपरेची मान्यता असते. अज्ञान, निरक्षरता, रूढीप्रियता, अंधश्रद्धा, दैववादीवृत्ती इ. मुळे रूढीपरंपरेची बंधने झुगारून देण्याचे धाडस व्यक्तीकडे नसते. म्हणून परंपरेने मिळालेला दर्जा (अर्पित दर्जा) व्यक्ती निमूटपणे स्वीकारते. स्वकतृत्वाने त्यात बदल करण्याची संधीही तिला फारशी मिळत नाही. अशाप्रकारे ग्रामीण समाजात गतिशीलतेस वाव नसतो. याउलट शहरी समुदायात तिन्ही प्रकारच्या गतिशिलतेस मोठा वाव असतो. शहरात व्यक्तिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, दळणवळणाची प्रगत साधने, शिक्षण-प्रशिक्षणाच्या सोयी व विविध व्यवसाय इ. उपलब्ध असल्याने व्यक्ती आपल्या पात्रतेत वाढ करून एका ठिकाणाहून दुसरीकडे जाऊ शकते. एक व्यवसाय किंवा नोकरी सोडून दुसरा व्यवसाय किंवा नोकरी करू शकते. तसेच कनिष्ठ स्तरातील व्यक्ती स्वकर्तृत्वाने उच्च शिक्षण, सत्ता, संपत्ती, कलाकौशल्ये इ. प्राप्त करून त्याआधारे उच्च सामाजिक स्तर वा दर्जा मिळवू शकते. उदा. क्लार्कचा कलेक्टर होऊ शकते. याउलट कर्तृत्वशून्य वा अकार्यक्षम व्यक्ती उच्च स्तरातून कनिष्ठ स्तराकडे फेकली जाऊ शकते. अशाप्रकारे शहरात व्यावसायिक, भौगोलिक व सामाजिक गतिशीलतेस खूपच वाव असतो. थोडक्यात ग्रामीण समुदायात सामाजिक गतिशीलतेस फारसा वाव नसतो तर शहरात तो असतो.

७) **स्थलांतराच्या दिशेतील भिन्नता :** ग्रामीण लोक हे प्रामुख्याने शहराकडे स्थलांतर करतात. म्हणजे ते वेगळ्या प्रकारच्या पर्यावरणामध्ये स्थलांतर करता. औद्योगिक क्रांतीनंतर जगात सर्वत्रच ग्रामीण समुदायाचे मोठ्या प्रमाणावर विघटन सुरू झाले. त्यामुळे खेड्यातून लोक शहराकडे स्थलांतर करू लागले. यालाच नागरीकरण म्हणतात. नागरीकरणाची ही प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढतच आहे. याउलट शहरी लोक हे प्रामुख्याने एका शहराकडून दुसऱ्या शहराकडे किंवा शहराच्या एका

विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे स्थलांतर करतात. म्हणजेच ते समान पर्यावरणामध्ये स्थलांतर करतात. साधारणपणे शहरात जन्मलेली व वाढलेली व्यक्ती खेड्याकडे स्थलांतर करीत नाही. तसेच खेड्यातून शहराकडे गेलेली व तेथे रुळलेली व्यक्तीही पुन्हा खेड्याकडे स्थलांतर करण्यास सहसा तयार नसते असा अनुभव आहे.

८) **सामाजिक स्तरीकरणातील भिन्नता :** ग्रामीण तसेच शहरी समुदायातही सामाजिक स्तरीकरण आढळते. तथापि ग्रामीण समुदायातील विविध सामाजिक स्तरांमध्ये किंवा वर्गांमध्ये लक्षणीय असा फरक जाणवत नाही. कारण ग्रामीण लोकांचे एकूणच राहणीमान निम्न (हलक्या) दर्जाचे आहे. दुसरे म्हणजे ग्रामीण लोक मूलतः साधी राहणी पसंत करतात. त्यामुळे तेथील उच्च व कनिष्ठ स्तरातील लोकांच्या राहणीमानात विशेष फरक नसतो. गरीब, मध्यम, श्रीमंत यांचे राहणीमान, सवयी, आचार, विचार, श्रद्धामूल्ये व एकंदर जीवनपद्धती यांच्यात विशेष तफावत नसते. याउलट शहरी समुदायातील विविध सामाजिक स्तरांमध्ये किंवा वर्गांमध्ये लक्षणीय फरक जाणवतो. शहरातील स्तरीकरण म्हणजे वर्गव्यवस्था ही आर्थिक स्थितीवर आधारलेली असते. शहरात अतिउच्चभ्रू व विलासी जीवन जगणारे गर्भश्रीमंत असतात. खाऊन पिऊन सुखी असणारे मध्यम लोकही असतात तसेच अत्यंत निकृष्ट राहणीमान असणारे कनिष्ठ स्तरातील गरीब लोकही असतात. आणि या तिन्ही वर्गाच्या आर्थिक तसेच सामाजिक-सांस्कृतिक जीवनात कमालीची तफावत असते. त्यामुळे शहरातील स्तरीकरण प्रकर्षाने लक्षात येते.

९) **सामाजिक आंतरक्रियेच्या स्वरूपातील भिन्नता :** ग्रामीण लोकांत प्रत्यक्ष स्वरूपाची सामाजिक आंतरक्रिया घडून येते. कारण खेड्याचा लहान आकार, कमी लोकसंख्या, समान व्यवसाय व संदेशवहनाच्या प्रगत साधनांची कमतरता इ. मुळे खेड्यातील लोकांचा परस्परांशी घनिष्ठ असा समोरासमोरचा नित्य संपर्क येतो. त्यामुळे त्यांच्या आत्मियतेचे, जिव्हाळ्याचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित होतात. याउलट शहरी लोकांत अप्रत्यक्ष स्वरूपाची सामाजिक आंतरक्रिया घडून येते. कारण शहराचा मोठा आकार, जास्त लोकसंख्या, विभिन्न व्यवसाय, संदेशवहनाच्या प्रगत साधनांची विपुलता इ. मुळे शहरी लोकांचा परस्परांशी घनिष्ठ असा समोरासमोरचा नित्य संपर्क येत नाही. त्यामुळे त्यांच्यात होणारी सामाजिक आंतरक्रिया ही अप्रत्यक्ष वा सांकेतिक स्वरूपाची असते. शहरी लोक एकाच समुदायात रहात असूनही ते परस्परांशी आंतरक्रिया करण्यासाठी टपाल, वृत्तपत्रे, दूरध्वनी, आकाशवाणी, दूरदर्शन, इंटरनेट, ई-मेल अशा साधनांचा अधिक वापर करतात. त्यामुळे त्यांच्या संबंधात फारसी आत्मियता, जिव्हाळा व सहकार्य भावना नसते.

१०) **सामाजिक नियंत्रण व्यवस्थेतील भिन्नता :** ग्रामीण समुदायातील सामाजिक नियंत्रण व्यवस्था अनौपचारिक (Informal) स्वरूपाची असते. लहान आकार व कमी लोकसंख्या यामुळे खेड्यातील लोकांचे परस्परांशी अत्यंत घनिष्ठ, समोरासमोरचे, आत्मियतेचे, सहकार्याचे व व्यक्तिगत स्वरूपाचे संबंध असतात. अशा संबंधांना प्राथमिक संबंध म्हणतात आणि ग्रामीण लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण अशा प्राथमिक संबंधाद्वारे अनौपचारिकपणे पण प्रभावीरित्या होत असते. कुटुंब, शेजारी, आप्तसंबंधी (नातलग), मित्रपरिवार इ. प्राथमिक समूह व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण करतात. त्यासाठी लोकमत, लोकरूढी, लोकनीती, धर्मकल्पना, सामाजिक व नैतिक मूल्ये इ. अनौपचारिक साधनांचा (सामाजिक नियमांचा) वापर करतात. याउलट शहरातील सामाजिक नियंत्रण व्यवस्था ही औपचारिक

(Formal) असते. मोठा आकार व जास्त लोकसंख्येमुळे शहरी लोकांचे परस्परसंबंध हे अत्यंत औपचारिक, अप्रत्यक्ष, कामचलाऊ, करारात्मक व व्यक्तीनिरपेक्ष असतात. त्या संबंधात जिव्हाळा, घनिष्ठता, निकटता नसते. अशा संबंधास दुय्यम संबंध म्हणतात. शहरी लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण अशा दुय्यम संबंधाद्वारे औपचारिकपणे केले जाते. शहरात सामाजिक नियंत्रण करण्यासाठी कुटुंब, शेजारी, मित्र, नातलग इ. प्राथमिक समूह अपुरे व असमर्थ ठरतात. तसेच शहरी लोकसंख्या विजातीय असल्याने लोकमत, लोकरूढी, लोकनीती, धर्मकल्पना, मूल्ये इ. साधनेही नियंत्रण ठेवण्यास कुचकामी ठरतात. म्हणून शहरात सामाजिक नियंत्रणासाठी कायदा, पोलीस, न्यायालय, तुरुंग अशी औपचारिक साधनेच वापरली जातात.

### २.२.४ ग्रामीण–नागर सातत्य (Rural-Urban Continuum)

**प्रस्तावना :** ''ग्रामीण–नागर सातत्य (निरंतरता किंवा अखंडत्व)'' ही ग्रामीण व नागर समाजाच्या अभ्यासातील एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. या संकल्पनेचे मूळ **सोरोकिनच्या** लिखाणात आढळते. तथापि ती सर्वप्रथम स्पष्ट स्वरूपात **रॉबर्ट रेडफिल्ड** याने त्याच्या 'कृषक समाज व संस्कृती' या ग्रंथात मांडली व तिला एक निश्चित अर्थ व संदर्भ प्राप्त करून दिला.

ग्रामीण–नागर सातत्य म्हणजे काय? ग्रामीण व नागर समुदाय हे परस्परांपासून पूर्णतः भिन्न नाहीत. या दोन्ही समुदायांची वैशिष्ट्ये एकमेकांत मिसळलेली आढळतात. दोन्हींचे अस्तित्व एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. दोन्ही समुदायात स्पष्ट सीमारेषा आखता येत नाही. एका टोकाला ग्रामीण व दुसऱ्या टोकाला नागर समुदाय आहे असे मानले तरी या दोन्हींच्यामध्ये येणाऱ्या समुदायात, मग त्यांना ग्रामीण म्हणा किंवा नागर, एवढी समानता असते की त्यांना एकमेकांपासून पूर्णतः अलक किंवा पृथक करता येत नाही. या दोन्ही समुदायामध्ये समाजरचना, सामाजिक मूल्ये, धर्मश्रद्धा, जीवनविषयक दृष्टिकोन इत्यादींच्या बाबतीत एकप्रकारची निरंतरता किंवा अखंडत्व दिसून येते. यालाच ग्रामीण–नागर सातत्य असे म्हणतात. ग्रामीण समुदाय (खेडे) व नागर समुदाय (शहर) हे दोन्ही परस्परसंबंधित, परस्परावलंबी व परस्परांना प्रभावित करणारे असून त्यांच्यात समानतेचे अनेक दुवे आहेत. या मुद्यावर ही संकल्पना भर देते.

**ग्रामीण–नागर सातत्याचे स्वरूप :**

पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**१) ग्रामीण–नागर भिन्नतेच्या विरोधी :** ग्रामीण–नागर सातत्य ही संकल्पना ग्रामीण–नागर भिन्नता (Rural-urban contrast or differences) या संकल्पनेच्या विरोधी अशी संकल्पना आहे. ग्रामीण व नागर हे अखिल मानव समुदायाचे दोन विभाग असून त्यांची वैशिष्ट्ये परस्परांपासून वेगळी किंवा भिन्न आहेत. म्हणून त्यांचा अभ्यास पृथकपणे झाला पाहिजे असे मत सोराकिन, झिम्मरमन, स्पेन्सर, टोनीज, वेबर, टी.एल. स्मिथ इ. नी. मांडले. लुईस वर्थ, त्याच्या 'नगरवाद एक जीवनशैली' या शोधनिबंधात म्हणतो की, ग्रामीण व नागर हे समुदाय सामाजिक बंधनाचे स्वरूप, मनोवृत्ती आणि जीवनस्तर इ. बाबतीत भिन्न आहेत. म्हणून त्यांचा अभ्यास दोन ध्रूव म्हणजे दोन टोके समजून केला पाहिजे. सोरोकिन व झिम्मरमन तसेच टी. एल. स्मिथ यांनीही ग्रामीण व नागर समुदायात व्यवसाय, पर्यावरण, लोकसंख्येची घनता, सामाजिक स्तरीकरण, सामाजिक गतिशीलता, सामाजिक आंतरक्रिया

इ. बाबतीत भेद किंवा भिन्नता असते; म्हणून या दोन्हीचा अभ्यास या भेदांच्या स्वरूपातच केला पाहिजे असे मत मांडलेले आहे.

ग्रामीण-नागर सातत्य ही संकल्पना वरील मतास विरोध करणारी आहे. या संकल्पनेनुसार दोन्ही समुदाय परस्पराहून पूर्णतः भिन्न असणारे दोन ध्रूव आहेत असे समजणे प्रत्यक्षात अत्यंत कठीण आहे. म्हणून ही संकल्पना ग्रामीण व नागर समुदायातील भिन्नता नाकारते व या दोन्हीत अनेक बाबतीत समानता आहे, दोन्ही समुदायास जोडणारे अनेक दुवे (linkagess) आहेत या मताचा पुरस्कार करते.

२) **विविध अभ्यासकांची मते :** ग्रामीण-नागर सातत्य ही संकल्पना अधिक स्पष्टपणे समजण्यासाठी विविध अभ्यासकांची मते अभ्यासणे उचित ठरेल.

अ) **बर्ट्रांड व सहकारी** यांच्या मते एक प्रतिमान (Model) म्हणून ग्रामीण व नागर समुदायातील भिन्नतेची व्यापक व्याख्या करता येते. तथापि या दोन्हीतील अंतर किंवा भिन्नता ही तुलनात्मक अंशातच होऊ शकते. या दोन ध्रुवात एक अशी शृंखला (साखळी) आहे की जी त्यांना एकमेकांशी जोडते.

ब) **रिस्समन** म्हणतो की ग्रामीण-नगर भिन्नतेचे सिद्धांत केवळ पाठ्यपुस्तकात असून ते फक्त परीक्षेच्या दृष्टीनेच महत्त्वाचे आहेत. संशोधन पद्धतीच्या रूपात ते कधीच प्रमाणित झालेले नाहीत. ग्रामीण व नागर समुदायातील भिन्नता भौगोलिक व भौतिक स्थितीच्या आधारे दाखवून देणे योग्य नाही. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करता या दोन्ही समुदायाचे विवेचन हे समाजरचना व सामाजिक संबंध यांच्या आधारे केले पाहिजे. तसे केल्यास आपणास ग्रामीण व नागर समुदायात एकप्रकारे सातत्य दिसून येईल.

क) **आर. इ. पौल** म्हणतात की ग्रामीण-नागर सातत्य ही संकल्पना पूर्वी नागरीकरणाच्या प्रक्रियेच्या रूपात समजावून दिली जात असे. या प्रक्रियेच्या विश्लेषणात 'सीमा' तत्त्वास महत्त्व दिलेले नाही. वास्तविक पाहता सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत घराची भौतिक रचना व व्यवसाय यांच्यातील बदलापेक्षा समाजरचनेतील बदलास महत्त्व असते. आज जेथे कोठे ग्रामीण व नागर असा भेद आहे त्याचा आधार लोकसंख्यात्मक किंवा भौतिक स्वरूपाचा नाही तर तो भेद एका सामाजिक प्रक्रियेच्या रुपात दिसून येतो. आज सर्वात मोठे तथ्य हे आहे की जगात सर्वत्रच भांडवलशाही समाजाचा विकास होत आहे आणि अशा समाजात नागरी तसेच ग्रामीण जीवनातील वैशिष्ट्यांचा संयुक्त प्रभाव दिसून येतो.

वरील विविध अभ्यासकांच्या विचारावरून हे स्पष्ट होते की ग्रामीण व नागर समुदायातील भिन्नता स्पष्टपणे दाखवून देता येत नाही. दोन्हीची वैशिष्ट्ये एकमेकांत मिसळलेली आढळतात. त्यामुळे त्यांच्यात सातत्य दिसून येते.

३) **औद्योगिकीकरण व नागरीकरण यांचा प्रभाव :** मानव समाजात प्राचीन काळापासून खेडे व नगर म्हणजेच ग्रामीण व नागर समुदाय आहेत. पूर्वी खेड्यांपेक्षा नगरांची संख्या खूपच कमी होती. तरीही या दोन्हीमध्ये समुदाय जीवनासाठी आवश्यक असणारी कांही सामाईक वैशिष्ट्ये आहेत. कालांतराने या दोन्ही समुदायात परिवर्तन होऊ लागले. त्यांचा परस्परांवर प्रभाव पडू लागला. दोन्ही

समुदाय परस्परात सामील होण्याचा प्रयत्न करू लागले. सोरोकिन म्हणतो त्याप्रमाणे गाव व शहर हे दोन्ही विभाग एकरूप होण्याची जी प्रवृत्ती आहे त्यामुळे दोन्हीची लक्षणे एकमेकांत मिसळत आहेत. तथापि दोन्हीचीही विशेष लक्षणे नष्ट न होता सुरक्षित राहतात. आज ही प्रवृत्ती फक्त कांही देशात प्रकट होत आहे पण ती अधिकाधिक वाढत जाणे अपरिहार्य आहे. ह्यामुळे जगात सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात एक नवे रूप, एक नवी सृष्टी निर्माण होईल. सारोकिनच्या या विचारातच ग्रामीण नागर सातत्याची बिजे आढळतात.

औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगिकीकरण व नागरीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. सुरुवातीस मोठे उद्योगधंदे शहरातच निघाले. खेड्यातील कुटिरोद्योग बंद पडले. त्यामुळे बेकार खेडूत रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करू लागले. शहरे ही उद्योगाची, व्यापाराची, शिक्षणाची व चैनीच्या जीवनाची केंद्रे बनली. परिणामी खेड्यातील लोक शहराकडे अधिकच आकर्षित होऊ लागले. तथापि खेड्यातील लोकांनी शहरात येताना आपली ग्रामीण जीवनपद्धतीची व संस्कृतीची अनेक वैशिष्ट्ये आणली. त्यामुळे शहरात ग्रामीण वैशिष्ट्यांचा शिरकाव झाला. शहरातील कामगार वस्ती व झोपडपट्ट्या यांच्यामध्ये ग्रामीण जीवनशैलीची झलक मोठ्या प्रमाणावर दिसून येते. याउलट दुसऱ्या बाजूने नगरांचा विस्तार वाढत जाऊन त्यांची सीमा शेजारच्या खेड्यांना जाऊन भिडली. नगरांनी सभोवतालच्या खेड्यांना आपल्या पोटात घेतले. शहरालगतच्या खेड्यात शहरी जीवनातील नागरी सुविधा (पक्के रस्ते, वीज, नळयोजना, वृत्तपत्रे, शाळा, बँका, दवाखाने इ.) निर्माण होऊ लागल्या. ग्रामीण लोक शहरी लोकांच्या जीवनपद्धतीचे (पोषाख, केशभूषा, अभिवादन पद्धती, फॅशन, चैनीच्या वस्तू वापरणे इ.) अनुकरण करू लागले. अशाप्रकारे ग्रामीण जीवनात शहरी संस्कृतीतील घटकांचा शिरकाव होऊ लागला. थोडक्यात औद्योगिकीकरण व नागरीकरण या प्रक्रियांचा प्रभाव पडून ग्रामीण व नागरी समुदायात एक प्रकारची समानता दिसून येऊ लागली. एकमेकांची वैशिष्ट्ये एकमेकांत मिसळू लागली आणि ग्रामीण व नागर सातत्य निर्माण झाले.

**४) परस्पर संपर्काचे वाढते प्रमाण :** प्राचीन काळापासून खेडी व शहरे आहेत. पण पूर्वी त्यांचा परस्परांशी फारसा घनिष्ठ संपर्क नसे. आधुनिक काळात मात्र दळणवळणाची प्रगत साधने उपलब्ध झाल्याने त्यांचा घनिष्ठ व नित्य संपर्क येऊ लागला. हे दोन्ही समुदाय आपल्या गरजापूर्तीसाठी एकमेकांवर अवलंबून आहेत. शहर हे पाणी, दूध, भाजीपाला, फळे, अन्नधान्य व उद्योगासाठी लागणारा कच्चा माल यासाठी खेड्यावर अवलंबून आहे. तर खेडे हे पक्का माल, उत्तम शिक्षण व आरोग्य सुविधा, व्यापार, चैनीच्या वस्तू इ. साठी शहरावर अवलंबून आहे. अशा या परस्परावलंबनामुळे या दोन्ही समुदायांचा घनिष्ठ संपर्क येऊन त्यांची वैशिष्ट्ये एकमेकांत मिसळत आहेत. परिणामी ग्रामीण-नागर सातत्य दिसून येते.

**५) ग्रामीण विकासाचे कार्यक्रम :** आज जगात सर्वत्रच ग्रामीण विकास कार्यक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पक्के रस्ते, बंदिस्त गटारी, स्वच्छता, शिक्षण संस्था, आरोग्य केंद्रे, बँका, हॉटेल, सिनेमा दळणवळणाची व वाहतुकीची प्रगत साधने, घरगुती वापराची यंत्रे व अवजारे इ. नागरी जीवनातील गोष्टी खेड्यात पोहचल्या आहेत. नवी मूल्ये, नवे ज्ञान, नव्या कल्पना शहराकडून खेड्याकडे हळूहळू संक्रमीत होत आहेत. त्यामुळे खेड्याचे पारंपारिक रूप बदलून त्याला नगराचा तोंडावळा प्राप्त होत आहे.

**६) नागरी समस्या :** अलिकडील काळात नगरामध्ये राहत्या जागेची टंचाई, झोपडपट्ट्या, प्रदूषण, वाहतुकीची कोंडी, गुन्हेगारी, मानसिक ताणतणाव, धकाधकीचे जीवन इ. समस्या तीव्र झाल्या आहेत. त्यामुळे शहरातील धनाढ्य लोक, सेवानिवृत्त व शांतताप्रिय लोक शहरापासून जवळ असलेल्या खेड्यात वास्तव्य करू लागले आहेत. ते खेड्यात येताना नागरी जीवनाची लक्षणे घेऊन येत आहेत. त्यामुळेही खेड्यामध्ये नगराची तत्त्वे वाढत आहेत. आणि म्हणून ग्रामीण-नागर सातत्यास चालना मिळत आहे.

अशाप्रकारे ग्रामीण व नागर ही दोन टोके मानली जात असली तरी प्रत्यक्षात मात्र दोन्हीची वैशिष्ट्ये एकमेकांत आढळतात. शुद्ध ग्रामीण व शुद्ध नागर समुदाय कोठेही अस्तित्वात नाहीत. त्यांच्यात स्पष्ट व निश्चित सीमारेषा घालता येत नाही. दोन्हीचीही सुस्पष्ट व्याख्या उपलब्ध नाही. मॅकायव्हर म्हणतात त्याप्रमाणे खेडे कोठे संपते व शहर कोठून सुरू होते हे ठरविणे कठीण आहे. त्यामुळे त्यांच्यात टोकाची भिन्नता आहे असे मानणे ही केवळ कल्पना असून प्रत्यक्षात मात्र त्यांच्यात सातत्य आढळते.

**★ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) ग्रामीण समाजातील जीवन ................. प्रधान असते.

अ) उद्योग   ब) शेती   क) सेवा   ड) कुटिरोद्योग

२) शेतकरी समाज हा .............. शेतकऱ्यांचा समाज असतो.

अ) लहान   ब) मोठ्या   क) बागाईतदार   ड) श्रीमंत

३) ग्रामीण समुदायात लोकसंख्येची .............. आढळते.

अ) विजातियता   ब) सजातियता   क) अनेकविधता   ड) बहुविधता

४) ग्रामीण-नागर सातत्य या संकल्पनेचे मूळ .................. च्या लिखाणात आढळते.

अ) बर्ट्रांड   ब) रेडफिल्ड   क) सोरीकीन   ड) रिस्समन

## २.३ सारांश

या दुसऱ्या घटकात तुम्ही ग्रामीण समाजशास्त्रातील प्रमुख ४ संकल्पना समजावून घेतलेल्या आहात. सर्वप्रथम तुम्ही ग्रामीण समाजाचा अर्थ व वैशिष्ट्ये अभ्यासलेली आहेत. स्थुलमानाने खेड्यांत राहणाऱ्या लोकांच्या समाजास ग्रामीण समाज म्हणतात. हा समाज सजातीय स्वरूपाचा असून तेथील जीवन हे शेतीप्रधान असते. या समाजातील लोकांचे परस्परसंबंध हे अनौपचारिक स्वरूपाचे असतात. तसेच त्यांची जीवनपद्धती ही पारंपरिक (परंपरागत) स्वरूपाची असते. स्त्रियांचा दर्जा निम्न स्वरूपाचा असतो. तुलनेने ग्रामीण समाज हा मागासलेला (अप्रगत) असा असतो. यानंतर तुम्ही शेतकरी समाज ही संकल्पना समजावून घेतलेली आहे. ज्या समाजात सापेक्षतः साध्या उत्पादनतंत्राने व आपल्या कुटुंबियांच्या मदतीने प्रामुख्याने निर्वाह चालविण्यासाठी जमिनीच्या लहान लहान तुकड्यावर शेती व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती बहुसंख्यांक असतात आणि त्यांचे तेथील

सामाजिक संबंधात प्रभुत्त्व असते त्या समाजास शेतकरी समाज असे म्हणतात. शेतकरी समाज हा अल्पभूधारक म्हणजेच लहान शेतकऱ्यांचा समाज असतो. तेथील मुख्य व्यवसाय शेती असतो. तसेच या समाजाची संस्कृती ही पारंपरिक/परंपरागत असते. उच्च अभिजनांच्या तुलनेत शेतकरी समाजाच्या सदस्यांचा दर्जा दुय्यम असतो. या समाजाचे सामाजिक संघटन हे कुटुंब, विवाह व आप्तसंबंध यावर आधारलेले असते. ग्रामीण समाजाप्रमाणेच शेतकरी समाजातही स्त्रियांचा दर्जा दुय्यम स्वरूपाचा असतो. यानंतर तुम्ही ग्रामीण-नागर भेद करण्यामध्ये येणाऱ्या अडचणी समजावून घेतल्या आहात. या दोन्ही समाजात व्यवसाय, पर्यावरण, आकार, लोकसंख्येची घनता, गतिशीलता, स्थलांतर, सामाजिक स्तरीकरण, सामाजिक आंतरक्रिया, सामाजिक नियंत्रण व्यवस्था इत्यादीबाबत असलेली भिन्नता समजावून घेतलेली आहे. सर्वात शेवटी ग्रामीण-नागर सातत्य ही संकल्पना स्पष्ट केलेली आहे. ही संकल्पना ग्रामीण व नागर समुदायातील भिन्नता नाकारते व दोन्हीतील समानतेवर भर देते.

## २.४ स्मरणार्थ संज्ञा

- **सजातीय समाज :** आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक एकविधिता असणारा समाज.
- **गौण स्थान :** दुय्यम किंवा कनिष्ठ स्वरूपाचे स्थाान.
- **अल्पभूधारक :** शेतजमिनीचे लहान लहान तुकडे धारण करणाऱ्या व्यक्ती.
- **विजातीयता :** आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बहुविधता
- **आत्मियता :** आपलेपणाची भावना
- **स्थलांतर :** एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे
- **सामाजिक स्तरीकरण :** समाजातील लोकांचे श्रेष्ठ-कनिष्ठ स्तरात होणारे विभाजन
- **सामाजिक आंतरक्रिया :** व्यक्तीव्यक्तीत किंवा समूहासमूहात होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांची प्रक्रिया
- **सामाजिक नियंत्रण व्यवस्था :** आपल्या सदस्यांना सामाजिक नियमनांनुसार वर्तन करण्यास भाग पाडण्यासाठी समाजाकडून किंवा समूहाकडून वापरल्या जाणाऱ्या साधनांची व प्रक्रियांची व्यवस्था.
- **औद्योगिकीकरण :** मोठमोठे उद्योगधंदे उभारण्याची प्रक्रिया.
- **नागरीकरण :** ग्रामीण लोकसंख्येचे नगराकडे होणारे स्थलांतर.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) ब   २) अ   ३) ब   ४) क

## २.६ स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) ग्रामीण समाजाचा अर्थ सांगून त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) शेतकरी समाज ही संकल्पना विशद करा.

३) ग्रामीण-नागर भिन्नतेची चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१) ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये

२) शेतकरी समाजाची वैशिष्ट्ये

३) ग्रामीण-नागर भेद स्पष्ट करण्यात येणाऱ्या अडचणी

४) ग्रामीण-नागर सातत्य

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- प्रा. चंद्रकांत खंडागळे : ग्रामीण समाजशास्त्र - प्रकाशिका सौ मायादेवी खंडागळे (२०१५)
- डॉ. गुरूनाथ नाडगोंडे : ग्रामीण समाजशास्त्र - कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.
- शशी के. जैन : नगरीय समाजशास्त्र - रिसर्च पब्लिकेशन -जयपूर (१९९६)


❑❑❑

# घटक ३

# ग्रामीण समुदाय

## (Rural Community)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये

    ३.२.२ खेड्यांची वर्गीकरणे

        अ) केंद्रीत खेडे, विखुरलेले खेडे व रेषात्मक खेडे

        ब) स्थलांतरीत खेडे, अंशतः स्थायी खेडे व स्थायी खेडे

३.३ सारांश

३.४ स्मरणार्थ संज्ञा

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ३.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास–

- ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये सांगता येतील.
- खेड्याची वर्गीकरणे स्पष्ट करता येतील.

## ३.१ प्रास्ताविक

या घटकात तुम्ही ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये व खेड्यांची वर्गीकरणे अभ्यासणार आहात. ग्रामीण समुदाय ही ग्रामीण समाजशास्त्राच्या अध्ययनातील केंद्रस्थानी असलेली संकल्पना आहे. त्यामुळे या शास्त्रात ग्रामीण समुदायाचा अर्थ व वैशिष्ट्ये अभ्यासणे आवश्यक ठरते. ग्रामीण समुदाय म्हणजे खेडे होय. अगदी प्रारंभीच्या काळात मानव अन्न शोधण्यासाठी एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सतत भटकत असे. शेतीचा शोध लागल्यानंतर मात्र त्याची अन्नाची चिंता संपली व तो

समूह करून एका ठिकाणी स्थायी स्वरूपाची वसाहत करून राहू लागला. यातून खेडे म्हणजेच ग्रामीण समुदाय उदयास आला. अर्थात जगाच्या विविध भागात वसलेली ही खेडी एकसारखी नसून ती वेगवेगळ्या प्रकारची आहेत. ग्रामीण समाजशास्त्रज्ञांनी विविध निकषांच्या आधारे खेड्यांची वेगवेगळी वर्गीकरणे केलेली आहेत. त्यापैकी भौतिक रचनेनुसार केलेले खेड्यांचे वर्गीकरण आणि वसाहतीची स्थिरता या आधारे केलेले वर्गीकरण अशी दोन वर्गीकरणे याठिकाणी तुम्ही अभ्यासणार आहात.

## ३.२ विषय विवेचन

विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे दोन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात ग्रामीण समुदायाची व्याख्या व वैशिष्ट्ये स्पष्ट केली जातील. इतर दुसऱ्या विभागात प्रथम भौतिक रचनेनुसार केलेले खेड्यांचे केंद्रीत खेडे, विखुरलेले खेडे व रेषात्मक खेडे हे वर्गीकरण स्पष्ट केले जाईल. व त्यानंतर वसाहतीची स्थिरता हा निकष विचारात घेऊन केलेले स्थलांतरीत खेडे, अंशतः स्थायी खेडे व स्थायी खेडे हे वर्गीकरण स्पष्ट केले जाईल.

### ३.२.१ ग्रामीण समुदायाची व्याख्या व वैशिष्ट्ये

ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये समजावून घेण्यासाठी प्रथम तुम्ही त्याच्या कांही व्याख्या समजावून घेणार आहात. साधारणपणे जे शहर किंवा नगर नाही त्यास खेडे म्हणजेच ग्रामीण समुदाय असे म्हणतात. या समुदायात लोकसंख्या कमी असून शेती हा प्रमुख व्यवसाय असतो. अर्थात एवढ्यावरून ग्रामीण समुदायाचा अर्थ स्पष्ट होत नाही. म्हणून ग्रामीण समुदाराच्या व्याख्या विचारात घेऊ.

१) **प्रा. चंद्रकांत खंडागळे :** ग्रामीण समुदाय म्हणजे सापेक्षतः लघु आकाराच्या भूप्रदेशातील अशी मानवी वसाहत की, जिच्यामध्ये लोकसंख्येची घनता कमी असून प्राथमिक संबंधाचे प्राबल्य असते आणि मुख्यतः कृषीप्रधान असे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन आढळते.

२) **हॅराल्ड पीक :** ग्रामीण समुदायात अशा परस्परसंबंधित किंवा असंबंधित व्यक्तींच्या समुहाचा अंतर्भाव होतो की, जो एका मोठ्या कुटुंबापेक्षा मोठा आहे व त्या व्यक्तींची घरे अगदी जवळजवळ किंवा अनियमितपणे वसलेली असतात. या समुदायाच्या कृषीयोग्य जमिनीवर शेती केली जाते व सभोवतालच्या पडीक जमीनीवर गुरे चारली जातात. शेजारच्या सीमेपर्यंत पसरलेल्या कृषीयोग्य व पडीक जमिनीवर त्या समुदायाची मालकीहक्काची भावना असते.

३) **राधाकमल मुखर्जी :** खेडे म्हणजे असा मानवी समूह की, ज्याच्या ठिकाणी सापेक्ष अशी सांस्कृतिक व सामाजिक साम्ये आढळतात, ज्याचे स्वरूप अनौपचारिक व प्राथमिक समूहासारखे असते. तेथे लोकसंख्येची घनता कमी असून शेती हा प्रमुख व्यवसाय असतो.

**ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये**

वरील विविध व्याख्यांच्या आधारे ग्रामीण समुदायाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) **कृषीप्रधान समुदाय**ः ग्रामीण समुदाय हा कृषीप्रधान म्हणजे शेतीप्रधान समुदाय असतो. कारण त्यातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती वा कृषी असतो. इतर जे बिगरशेती व्यवसाय तेथे

चालतात (उदा. पशुपालन, दुग्धव्यवसाय, सुतारकाम, विणकाम इत्यादी) ते शेतीशी संलग्न असतात. शेतीला पूरक असे असतात. त्यामुळे बऱ्याच वेळा ग्रामीण समुदाय व कृषक समुदाय हे दोन शब्द समान अर्थाने वापरले जातात. या समुदायात शेती व्यवसायामुळे जमिनीस महत्वाचे स्थान असते व जमिनधारक व्यक्तींना तेथे उच्च स्थान, दर्जा व प्रतिष्ठा असते. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती जमिनधारक बनण्याची आकांक्षा बाळगून असते. कृषी व्यवसायाचा या समुदायाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर मोठा प्रभाव असतो. लोकांचे परस्परसंबंध, त्यांचे वर्तन, आचारविचार, श्रध्दा, मूल्ये, सणसमारंभ, वेशभूषा, आहार, निवासस्थान इत्यादीवर कृषी व्यवसायाचा मोठा पगडा पडलेला दिसून येतो. याशिवाय लोकांच्या मानसिक व बौद्धिक जीवनावरही या व्यवसायाची छाप असते. थोडक्यात ग्रामीण समुदायातील व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची व सामाजिक जीवनाची जडणघडण ही कृषी व्यवसायाद्वारे झालेली असते व त्यामुळे हा समुदाय कृषीप्रधान समुदाय असतो.

२) **लघुआकारः** नागर समुदायापेक्षा ग्रामीण समुदायाचा आकार हा लहान असतो. कृषी व्यवसायासाठी खूप विस्तृत जमिनीची आवश्यकता असते. त्यामुळे वसाहत करण्यासाठी म्हणजेच घरे बांधून राहण्यासाठी कमी जमीन वापरली जाते. महत्वाचे म्हणजे ग्रामीण समुदायाची लोकसंख्या देखील कमी असते व लोकसंख्येची घनताही कमीच असते. त्यामुळेही या समुदायास वसाहतीसाठी कमी जागा लागत असते. याचा परिणाम म्हणून हा समुदाय लघुआकाराचा असतो.

३) **विशेषीकरणाचा अभावः** ग्रामीण समुदायात विशेषीकरणाचा अभाव आढळतो. कारण येथील व्यक्ती कोणतातरी एकच एक व्यवसाय करून आपला निर्वाह चालवित नसतात. शेती व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीस शेती व्यवसायातील बहुतेक सर्वच क्रियाप्रक्रियांचे (उदा. नांगरणी, पेरणी, कोळपणी, भांगलणी, कापणी, मळणी इ.) ज्ञान असते व ती त्या पार पाडीत असते. याशिवाय शेतीशी सलंग्न असलेल्या कांही व्यवसायाबाबतचेही (उदा. सुतारकाम, लोहारकाम, दोरदोरखंड बनविणे इ.) थोडेफार ज्ञान असते. आज शेतीचे यांत्रिकीकरण होऊ लागल्याने आधुनिक यंत्राचे व तंत्राचे ज्ञानही व्यक्तीस असते. शेतकरी कुटुंबातील मुले व महिला यांनाही शेती व्यवसायातील कामांचे बरेचसे ज्ञान असते व ते शेतीच्या कामात आपल्या परीने योगदान देत असतात. त्यामुळे ग्रामीण समुदायात विशेषीकरण फारसे दिसून येत नाही.

४) **नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभावः** ग्रामीण समुदायावर नैसर्गिक पर्यावरणाचा मोठा प्रभाव असतो. कृषी व्यवसायामुळे या समुदायातील लोकांचा निसर्गातील जमीन, पाणी, हवा, ऊन, वारा पशुपक्षी, वृक्षवेली इत्यादी घटकांशी सतत संबंध येत असतो. हे लोक आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गशक्तींचा वापर करीत असतात. पण या शक्तींच्या स्वरूपाचे सत्य ज्ञान त्यांना नसते. त्यामुळे या शक्तींवर ते हवे तेवढे नियंत्रण ठेवू शकत नाहीत. म्हणून ते निसर्गशक्तींना शरण जाऊन त्यांना देवदेवता मानून त्यांची कृपा संपादन करण्यासाठी प्रयत्न करतात. यातूनच ते निसर्गाची पूजा करतात. आपले जीवन निसर्गावर अवलंबून आहे या भावनेतून ते निसर्गाधिन राहतात. त्यातूनच ते अंधश्रद्ध, दैववादी बनलेले दिसतात. थोडक्यात ग्रामीण समुदायावर निसर्गाचा मोठा प्रभाव असतो.

५) **कुटुंबाचा प्रभावः** ग्रामीण समुदायावर कुटुंबाचाही मोठा प्रभाव असतो. शहरी समुदायातल्याप्रमाणे ग्रामीण समुदायात ऐच्छिक मंडळे मोठ्या प्रमाणावर नसतात. त्यामुळे व्यक्ती या आपल्या गरजापूर्तीसाठी कुटुंब या समूहावरच अवलंबून असतात. ग्रामीण व्यक्तीचे संपूर्ण जीवन हे

तिच्या कुटुंबातच व्यतीत होत असते. कुटुंब सदस्य सतत एकमेकाच्या घनिष्ठ संपर्कात असतात. त्यांचात समोरासमोरचा व प्रत्यक्ष असा संपर्क असतो. त्यामुळे त्यांच्यात प्रेम, निकटता, आपुलकी, सहकार्य, सहानुभूती मोठया प्रमाणावर असते. व्यक्तीच्या वर्तनावर कुटुंबाचेच नियंत्रण असते. व्यक्तीचा सामाजिक दर्जा तिच्या कुटुंबावरूनच ठरत असतो. मालमत्ता ही देखील कुटुंबाच्याच मालकीची असते. कुटुंब हाच उत्पादन, वितरण, उपभोग यांचा घटक असतो. कुटुंबाचे रीतीरिवाज, कुलाचार, प्रथापरंपरा इत्यादीचे पालन व्यक्ती मोठया श्रद्धेने व निष्ठेने करीत असतात. अशाप्रकारे ग्रामीण समुदायावर कुटुंबाचा मोठा प्रभाव असतो.

**६) प्राथमिक संबंधांचे वर्चस्वः** ग्रामीण समुदाय हा प्राथमिक समूह असतो. त्यातील सदस्यांतील संबंध हे प्राथमिक स्वरूपाचे असतात. लहान आकार व कमी लोकसंख्या यामुळे या समुदायातील सर्व सदस्य एकमेकांच्या पूर्ण परिचयाचे असतात. व्यक्तीचा बहुतांशी वेळ आपल्या समुदायातच व्यतीत होत असतो. त्यामुळे सहाजिकच त्यांच्यात घनिष्ठतेचे व सहकार्याचे संबंध निर्माण होतात. त्यामुळे त्यांच्या वर्तनावंर व जीवनावर प्राथमिक संबंधाचे वर्चस्व निर्माण झालेले असतात. ग्रामीण समुदायातील व्यक्तीस प्राथमिक संबंधाचे वर्चस्व व नियंत्रण मान्य करावेच लागते. त्याशिवाय ती ग्रामीण समुदायात सामावली जाऊ शकत नाही.

**७) साधे जीवनः** ग्रामीण समुदायातील जीवन साधे असते. बहुतेक व्यक्ती शेती व्यवसाय करतात. मात्र ते अल्पभूधारक वा छोटे शेतकरी असतात. अनेकजन परंपरागत पद्धतीने शेती करतात. त्यामुळे त्यांची शेती तितकीशी किफायतशीर नसते. शेती व्यवसायाद्वारे त्यांच्या गरजांची पूर्तता व्यवस्थितपणे होत नाही. त्यामुळे अनेकांना कर्ज काढावे लागते. जे लोक भूमिहीन असतात ते इतराच्या शेतात मजूरी करून निर्वाह चालवितात. मात्र त्यांना केवळ शेती हंगामातच काम मिळते व इतर वेळी त्यांना बेकारीस तोंड द्यावे लागते. याचा परिणाम म्हणून शेतकरी व शेतमजूर यांना अत्यंत काटकसरीने जीवन जगावे लागते. शहरी लोकांप्रमाणे त्यांना चैनीचे जीवन जगणे परवडणारे नसते. म्हणून ते साधे जीवन जगणे अधिक पसंत करतात. अपुऱ्या उत्पन्नामुळे ते मूलभूत गरजा पूर्ण करण्यावर भर देतात व चैनीच्या गरजांकडे लक्ष देत नाहीत. महत्वाचे म्हणजे ग्रामीण समुदायातही कांही थोडया व्यक्ती ह्या सधन असतात. तथापि, त्यांचे राहणीमान देखील इतर सर्वसामान्य व्यक्तीपेक्षा फारसे वेगळे नसतात. समुदायातील सर्वच गरीब-श्रीमंत व्यक्ती या परस्पराच्या परिचयाच्या असल्याने त्यांना दिखाऊपणा करण्याची गरज भासत नाही त्यामुळे सधन लोकदेखील साधे जीवनच अनुसरताना दिसतात.

अशाप्रकारे कृषीप्रधान जीवन, लघुआकार, नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव, विशेषीकरणाचा अभाव, कुटुंबवादाचा प्रभाव, प्राथमिक संबंधाचे वर्चस्व व साधे जीवन इत्यादी ग्रामीण समुदायाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

### ३.२.२ खेड्यांची वर्गीकरणे (Classifications of Villages)

ग्रामीण समुदायाचा अर्थ व वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर आता तुम्ही खेड्यांची वर्गीकरणे अभ्यासणार आहात. जगात सर्वत्र खेडी आहेत पण ती सर्व एकसारखी नसून भौतिक रचना, जमिनीवरील मालकी, आकार वसाहतीची स्थिरता, जीवनपद्धती इत्यादीबाबतीत त्यांच्यामध्ये मोठी भिन्नता आढळते. ही भिन्नता समजण्यासाठी खेड्यांची विविध निकषांच्या आधारे केलेली वर्गीकरणे

आपणास अभ्यासावी लागतात. या ठिकाणी तुम्ही भौतिक रचना व वसाहतीच्या स्थिरता या दोन निकषांच्या आधारे खेड्यांची केलेली वर्गीकरणे तुम्ही समजावून घेणार आहात.

अ) भौतिक रचना या निकषाच्या आधारे खेड्यांचे **केंद्रीत खेडे, विखूरलेले खेडे, रेषात्मक खेडे** असे तीन प्रकार पडतात. या तीन प्रकारांचे स्वरूप थोडक्यात पुढीलप्रमाणे–

**१. केंद्रीत खेडे :**

खेडे हा समुदाय असल्याने त्यास निश्चित भूप्रदेश असतो. ज्या खेड्यातील निवासस्थाने (घरे) त्याच्या भूप्रदेशातील एका विशिष्ट ठिकाणी केंद्रित झालेली असतात त्यास केंद्रित खेडे असे म्हणतात. या खेड्यातील घरे एकमेकांना लागून बांधलेली असतात. बऱ्याच ठिकाणी दोन घरांच्यामधील भिंती सामाईक असते. त्यामुळे घरांचा एक समूह तयार झालेला असतो. म्हणून अशा खेड्यात 'समूह खेडे' असेही म्हणतात. अशा खेड्यांची भौगोलिक एकता सहजपणे नजरेत भरते. भारतातील बहुसंख्य खेडी या प्रकारचीच आहेत. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, उत्तरांचल, गुजरात, ओरिसा, कर्नाटक, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यांत केंद्रित खेडी आढळतात.

**केंद्रीत खेड्याची वैशिष्ट्ये :**

**१) भूप्रदेशाचे दोन भाग :** केंद्रीत खेड्याच्या भूप्रदेशाचे मनुष्य वस्तीची जागा व शेती करण्याची जागा असे दोन भाग पडलेले असतात. त्यांनाच अनुक्रमे गावठाण व शिवार असे म्हणतात. कांही खेड्यात गावठाणाभोवती एक संरक्षक भिंत (तटबंदी वा कोट) बांधलेली असते. तिला वेस म्हणतात. गावठाणाच्या सभोवताली विस्तृत शिवार म्हणजेच शेतजमिन पसरलेली असते. एका खेड्याचे शिवार शेजारच्या खेड्यांच्या शिवारापर्यंत पसरलेले असते. त्यामुळे दोन खेड्यातील सीमा नवख्या व्यक्तीस सहजपणे लक्षात येत नाही. म्हणून मोठमोठे खूणेचे दगड रोवून किंवा आडवा रस्ता काढून सीमा निश्चित केलेल्या असतात. कांही ठिकाणी मात्र नदी, ओढा, नाला, टेकडी, अशा नैसर्गिक सीमा आढळतात.

**२) जातीच्या आधारे घरांची विभागणी :** भारतातील केंद्रीत खेड्यातील घरे ही जातीच्या आधारे विभागलेली असतात. म्हणजे खेड्यातील एका विशिष्ट भागात विशिष्ट जातीच्या लोकांची घरे बांधलेली असतात. ब्राह्मण गल्ली, सोनार आळी, महारवाडा हे शब्द घरांची जातवार विभागणीच सूचवितात. अशा खेड्यात वेगवेगळ्या जातीचे पाणवठे, स्मशानभूमी, मंदिरे वेगवेगळ्या ठिकाणी असलेली आढळतात.

**३) दोन प्रकारचे रस्ते :** केंद्रीत खेड्यात वाहतुकीसाठी बहिर्गत व अंतर्गत असे दोन प्रकारचे रस्ते असतात. शेजारच्या खेड्यांशी संपर्क साधण्यासाठी जो मोठा व रुंद रस्ता असतो त्यास बहिर्गत रस्ता म्हणतात. याउलट खेड्यातील विविध भागांना जोडणाऱ्या रस्त्यास अंतर्गत रस्ता म्हणतात. या रस्त्यांना गल्ली, आळी, बोळ इ. नावांनी ओळखले जाते. एकाच जातीच्या किंवा व्यवसायाच्या लोकांचा घरांच्या ओळींना गल्ली, आळी, बोळ असे म्हणतात. उदा. ब्राह्मण गल्ली, सुतार आळी.

**४) वाड्या :** कांही मोठ्या आकाराच्या केंद्रित खेड्यांना लागून वाड्या असतात. गावठाण्यापासून थोड्या दूर अंतरावर १०-२० घरांचा जो समूह असतो त्यास वाडी म्हणतात. या

वाड्यांना कुल, आडनाव, जात इत्यादीच्या नावानी ओळखले जाते. उदा. लांडगेवाडी, शिंदेवाडी, धनगरवाडी इत्यादी वाडीमध्ये जीवनावश्यक वस्तूंची केंद्रे (दुकाने) नसल्याने वाडी ही आपल्या गरजापूर्तीसाठी खेड्यावर अवलंबून असते. साधारणतः गावठाण्यातील जागा अपुरी पडू लागल्याने लोक खेड्यापासून थोड्या अंतरावर घरे बांधतात व वाडी अस्तित्वात येते.

५) **सामूहिक जीवनाचा विकास :** केंद्रित खेड्यातील घरे जवळजवळ असल्याने लोकांमध्ये घनिष्ठ असा संपर्क असतो. त्यामुळे त्यांच्यात सहकार्याची भावना वाढीस लागून स्थानिक कारभाराची यंत्रणा अस्तित्वात येते. त्यामुळे सामूहिक जीवनाचा विकास होण्यास मोठा वाव मिळतो.

२. **विखूरलेले खेडे** :

ज्या खेड्यातील घरे त्याच्या भूप्रदेशातील एका विशिष्ट जागेवर केंद्रीत न होता ती त्या भूप्रदेशात सर्वत्र विखूरलेली असतात त्यास विखूरलेले खेडे असे म्हणतात. या खेड्यातील घरे परस्परांपासून विलग किंवा पृथक असतात. त्यामुळे या खेड्यास विलग किंवा पृथक वस्तीचे खेडे असे म्हणतात. विलग वस्तीमुळे अशा खेड्याची भौगोलिक एकता सहजपणे लक्षात येत नाही. भारतात हिमालयाच्या पायथ्याचा प्रदेश, आसामातील जंगलमय प्रदेश, ब्रह्मपुत्रेचे खोरे, तसेच मध्य प्रदेश, मणिपूर, मिझोराम इत्यादी राज्यातील डोंगराळ भागात या प्रकारची खेडी आढळतात. अमेरिकेतही अशी खेडी आहेत.

**विखूरलेल्या खेड्याची वैशिष्ट्ये :**

१) **भूप्रदेशाचे दोन भाग नसतात :** या खेड्याच्या भूप्रदेशाचे गावठाण व शिवार असे दोन भाग पडलेले नसतात. कारण लोक आपल्या मालकीच्या शिवारात म्हणजेच शेतात घरे बांधून राहतात. त्यामुळे मानवी वस्तीची जागा व शेतजमीन परस्परात मिसळलेल्या नसतात. त्यांच्यात स्पष्ट विभाजनरेषा नसते.

२) **शेतजमिनीच्या आधारे घरांची विभागणी :** या खेड्यातील लोकांची घरे ही शेतजमिनीच्या मालकीच्या आधारे एकमेकांपासून वेगळी झालेली असतात. प्रत्येकजण आपल्या मालकीच्या शेतात सोयीनुसार घर बांधतो. त्यामुळे दोन घरातील अंतर बरेच मोठे असते. कधी कधी एखाद्याचे घर आपल्याच खेड्यातील घरांपेक्षा शेजारच्या खेड्यातील घरांना अधिक जवळचे असते.

३) **रस्त्यांचे प्रकार :** अशा खेड्यात बहिर्गत व अंतर्गत वाहतुकीसाठी वेगवेगळे रस्ते नसतात. मात्र दोन घरांना जोडणाऱ्या पायवाटा असतात. अशा अनेक पायवाटा एकत्र मिळून त्यातून एक मोठा रस्ता तयार होतो व तो शेजारच्या खेड्यांकडे जातो.

४) **घरांचा समूह :** अशा खेड्यात कांही ठिकाणी मात्र चारपाच घरांचा समूह आढळतो. संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन अनेक विभक्त कुटुंबे अस्तित्वात येऊन असा समूह तयार झालेला असतो. म्हणजेच वडिलांच्या पश्चात अनेक भाऊ आपापल्या वाटणीच्या शेतात घरे बांधून राहतात.

५) **सामूहिक जीवनाच्या विकासास कमी वाव :** या खेड्यातील घरे परस्परांपासून दूर असल्याने तेथील लोकांचा एकमेकांशी घनिष्ठ संपर्क येत नाही. त्यामुळे त्यांच्यात सहकार्य भावनेचा तितकासा विकास होत नाही. परिणामी सामूहिक जीवनाच्या विकासासही फारसा वाव मिळत नाही.

### ३. रेषात्मक खेडे :

ज्या खेड्यात एका रस्त्याच्या दोन्ही बाजूस पद्धतशीरपणे ओळीने घरे बांधलेली असतात त्यास रेषात्मक खेडे म्हणतात. असा रस्ता सरळ दिशेने कित्येक कि.मी. पर्यंत पसरलेला असतो व त्याच्या दोन्ही बाजूस अनेक खेडी कांही अंतर ठेवून वसलेली असतात. या खेड्यांच्या रेषात्मक वसाहतीवरून त्यांना 'गुंफलेली खेडी' असेही म्हणतात. महाराष्ट्रात कोकण किनारपट्टीवर तसेच आंध्र प्रदेश, ओरिसा, गुजरात यांच्या किनारपट्टीवरही अशी खेडी आहेत. फ्रान्स व अमेरिकेतही अशी पुष्कळ खेडी आहेत.

**रेषात्मक खेड्याची वैशिष्ट्ये**

**१) शेतातच घरे :** या खेड्यातील लोकांची घरे रस्त्याच्या दोन्ही बाजूस आपापल्या शेतात बांधलेली असतात. कोकणातील अशा खेड्यात प्रत्येक घराभोवती कुंपण असते व त्या कुंपणाच्या आत नारळी-पोफळीच्या बागा, विहीर, भातशेती असते. दोन घरातील अंतर बहुधा समान असते. अरबी समुद्रास मिळणाऱ्या नद्यानाल्यांनी दोन खेड्यातील सीमा निश्चित झालेल्या आहेत. आंध्रप्रदेश व ओरिसातील घरे मात्र एकमेकांच्या जवळ असतात. तामिळनाडूच्या किनाऱ्यावरील अशा खेड्यातील घरे मात्र अशी एकमेकांच्या जवळ नसतात.

**२) रस्ते :** या खेड्यातही अंतर्गत व बहिर्गत अशा दोन प्रकारचे रस्ते नसतात. ज्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस घरे वसलेली असतात तोच रस्ता मुख्य रस्ता असतो. या रस्त्यावर वसलेल्या अनेक खेड्यासाठी तो एकच रस्ता असतो.

ब) वसाहतीची स्थिरता या निकषाच्या आधारे खेड्यांचे **स्थलांतरीत खेडी, अंशतः स्थायी खेडी व स्थायी खेडी** असे तीन प्रकार पडतात.

**१) स्थलांतरीत खेडी** (Migratory Villages) कांही लोकसमूहाची वसाहत किंवा वस्ती ही स्थिर नसते. ते सतत स्थलांतर करीत असतात. अशा स्थलांतर करणाऱ्या लोकसमूहाच्या वस्तीला स्थलांतरीत खेडे असे म्हणतात. उदा. अनेक आदिवासी जमाती (उदा. मलेशियातील पिग्मी, आफ्रिकेतील, बुशमेन, श्रीलंकेतील वेद्दा, भारतातील कादर, चेंचू, बेगा, जुआंग, खडिया इत्यादी) या अन्नसंकलन करून निर्वाह चालवितात. एका भूप्रदेशात जोपर्यंत अन्नपदार्थ उपलब्ध आहेत तोपर्यंतच तेथे या जमाती वस्ती करून राहतात आणि तेथील अन्नपदार्थ संपले की, जेथे अन्नपदार्थ उपलब्ध होतील त्या भूप्रदेशात त्या स्थलांतर करतात. ते अन्नपदार्थ असेपर्यंत वस्ती करून राहतात. त्यांच्या या स्थलांतरामुळे त्यांची वस्ती एखाद्या ठिकाणी कांही काळच असते. त्यामुळे त्यांच्या या वस्तीला स्थलांतरीत खेडे असे म्हणतात. कांही वेळा स्थलांतरीत खेड्यास अस्थायी (Temporary) खेडे असेही म्हणतात. मानव जेंव्हा अन्नसंकलन व शिकार या आर्थिक क्रिया करून निर्वाह चालवित होता तेंव्हा त्याची वस्तीही स्थलांतरीत खेडे या प्रकारचीच होती. आजदेखील उपरोक्त आदिम जमातीची खेडी ही याच प्रकारची आहेत.

**स्थलांतरीत खेड्यांची पुढील वैशिष्ट्ये आहेत.**

१) अशी खेडी सतत स्थलांतरीत होत असली तरी त्यांचे स्थलांतर हे एका निश्चित भूप्रदेशाच्या अंतर्गतच होत असते. त्या भूप्रदेशाच्या बाहेर जाऊन ही खेडी स्थलांतरीत होत नाहीत.

२) स्थलांतरीत खेड्यांची लोकसंख्या खूपच कमी असते व ती देखील एकाच ठिकाणी केंद्रीत न होता समूहासमूहाने विखूरलेली असते.

३) स्थलांतरीत खेड्यातील लोकांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवन हे समतेच्या तत्वावर आधारलेले असते.

४) या खेड्यातील संघटन हे लोकशाही स्वरूपाचे असते.

५) स्थलांतरीत खेडे हे अस्थायी स्वरूपाचे असल्याने तेथील घरे ही पक्क्या स्वरूपाची नसतात. तर ती तंबू स्वरूपाची असतात.

६) या खेड्यातील जीवन हे खूपच अप्रगत स्वरूपाचे असते.

आज जगात सर्वत्र स्थायी प्रकारची खेडी अधिक असून त्यांच्या तुलनेत स्थलांतरीत खेड्यांचे प्रमाणे हे अत्यल्प आहे.

**२) अंशतः स्थायी खेडी** (Semi- Permanant Villages) कांही खेडी ही अंशतः स्थायी प्रकारची खेडी आहेत. पशुपालन व स्थानांतरीत शेती या आर्थिक क्रिया करणाऱ्या लोकसमूहाची वस्ती ही या प्रकारचे खेडे असते. पशुपालन व स्थानांतरीत शेती करणाऱ्या आदिवासी जमाती (उदा. आफ्रिकेतील शेळयामेंढ्या पाळणारी किरगीझ जमात अरबस्थानातील उंटपालन करणारी बदाऊन जमात तसेच भारतातील स्थलांतरीत शेती करणाऱ्या नागा, बैगा, भूईया यासारख्या जमाती) एखाद्या भूप्रदेशात दीर्घकाळपर्यंत स्थिर वस्ती करून राहतात. पण त्यांची ही स्थिरता कायम स्वरूपाची नसते. त्या प्रदेशातील चारा संपला व जमीन नापीक झाली की तेथील वस्ती उठते व ज्याठिकाणी चारा व पिकाऊ जमीन उपलब्ध असेल तेथे जाऊन वस्ती केली जाते. तेथे कांही काळ वास्तव्य केल्यानंतर पुन्हा वेगळया ठिकाणी जाऊन वस्ती उभारली जाते. अशाप्रकारे पशुपालन व स्थानांतरीत शेती करणाऱ्या जमाती ह्या अन्नसंकलन करणाऱ्या जमातीपेक्षा अधिक काळ एका ठिकाणी स्थिर वस्ती करून राहतात. परंतू ही स्थिरता कायमची नसते तर अंशतः स्वरूपाची असते. म्हणून या वस्तीस अंशतः स्थायी खेडे असे म्हणतात.

स्थानांतरीत शेती हा मागासलेला असा शेतीचा प्रकार आहे. या प्रकारात डोंगर उतारावरील झाडे तोडून ती सपाट भूप्रदेशात आणून जाळली जाता. नंतर त्या राखेत बिया डोबल्या जातात. फारशी मशागत न करता स्वाभाविकपणे जे उत्पादन निघेल ते घेतले जाते. जमीन नांगरणे म्हणजे भूमातेची छाती फाडणे असे समजून नांगरणी केली जात नाही. मशागत व नांगरणी नसल्याने जमीन कांही वर्षानंतर नापीक होते. मग दुसरा जमिनीचा तुकडा शोधण्यासाठी स्थलांतर केले जाते. व जेथे पिकाऊ जमीन उपलब्ध होईल तेथे वस्ती केली जाते. अशाप्रकारे शेतीचे स्थान सतत बदलत राहाते. म्हणून या शेतीस स्थान परिवर्तीत किंवा स्थानांतरीत (Shifting Cultivation) शेती असे म्हणतात. या शेतीस भारतातील भूई या जमात दाही, बैगा जमात बेवार तर नागा जमात झूम शेती असे म्हणतात. अशी स्थानांतरीत शेती करणाऱ्या जमातीची वस्ती ही अंशतः स्थायी खेडे या प्रकारात मोडते.

**अंशतः स्थायी खेड्याची पुढील वैशिष्ट्ये आहेत.**

१) स्थलांतरीत खेड्यापेक्षा हे खेडे अधिक स्थिर स्वरूपाची वसाहत असते.

२) या खेड्यातील निवासाची जमीन व शेतजमीन यावर लोकांची मालकी कायमची नसते.

३) या खेड्यातील घरेदेखील पक्की नसतात तर झोपडीवजा कच्च्या स्वरूपाची असतात.

४) स्थलांतरीत खेड्यापेक्षा या खेड्यातील लोकांचे जीवन हे अधिक प्रगत स्वरूपाचे असते.

**३) स्थायी खेडी** (Permanant Villages)

ज्या खेड्यातील लोक एकाच जागी पिढ्यानपिढ्या स्थिर स्वरूपाची वस्ती करून राहातात त्या खेड्यास स्थायी खेडे असे म्हणतात. स्थायी खेडी हा मानवाच्या सामाजिक उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील अत्यंत प्रगत असा टप्पा आहे. जगातील तसेच भारतातील बहुसंख्य खेडी ही याच प्रकारची आहेत. सर्व स्थायी खेडी ही एकसारखी नाहीत. त्यांची भौतिक रचना व जीवन पद्धती ही वेगवेगळी आहे. तथापि, कायम स्वरूपाची म्हणजे स्थायी स्वरूपाची वस्ती हे त्यांचे सामान्य वेशिष्ट्ये आहे.

स्थायी खेड्यांची पुढील वैशिष्ट्ये आहेत.

१) स्थायी खेड्यांचा मुख्य व्यवसाय शेती असून त्यांची शेती ही प्रगत स्वरूपाची असते.

२) या खेड्यातील शेतजमिनीवर व निवासाच्या जागेवर लोकांची कायम स्वरूपाची मालकी असते व ही मालकी वंशपरंपरेने हस्तांतरीत होत असते.

३) या खेड्यातील लोकांचे परस्परांशी तसेच सभोवतालच्या खेड्यांशी घनिष्ट असे संबंध प्रस्थापित झालेले असतात.

४) या खेड्यातील स्थानिक कारभार पाहाण्यासाठी खास यंत्रणा उभारलेली असते.

५) स्थलांतरीत खेडी व अंशतः स्थायी खेडी यापेक्षा स्थायी खेड्यातील जीवन हे अधिक प्रगत असते. जीवन स्थिर स्वरूपाचे असल्याने लोकांना परस्परसहकार्याने प्रगती करण्यास भरपूर वाव मिळत असतो.

**★ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) ग्रामीण समुदायाचा …………… हा मुख्य व्यवसाय असतो.

अ) पशुपालन ब) उद्योग

क) कृषी ड) अन्नसंकलन

२) ग्रामीण समुदायात ………… संबंधांचे वर्चस्व असते.

अ) प्राथमिक ब) दुय्यम

क) औपचारिक ड) करारात्मक

३) ………… आर्थिक क्रिया करणाऱ्या आदिम जमातीत स्थलांतरीत खेडी आढळतात.

अ) उद्योग　　　　　　　　　　ब) शेती

क) पशुपालन　　　　　　　　　　ड) अन्नसंकलन

४) स्थानांतरीत शेती करणाऱ्या आदिम जमातीत ................ प्रकारचे खेडे आढळते.

अ) स्थायी　　　　　　　　　　ब) स्थलांतरीत

क) अंशतः स्थायी　　　　　　　　　　ड) केंद्रीत

५) जगात ............... प्रकारची खेडी मोठ्या प्रमाणावर आहेत.

अ) विखूरलेली　　　　　　　　　　ब) रेषात्मक

क) केंद्रीत　　　　　　　　　　ड) वर्तुळाकार

## ३.४ सारांश

या तिसऱ्या घटकात तुम्ही ग्रामीण समुदायाचा अर्थ व वैशिष्ट्ये आणि खेड्यांची दोन वर्गीकरणे समजावून घेतलेली आहेत. ग्रामीण समुदाय म्हणजे लघुआकाराच्या भूप्रदेशातील अशी मानवी वसाहत की, जिच्यामध्ये लोकसंख्येची घनता कमी असून प्राथमिक संबंधांचे प्राबल्य असते आणि मुख्यत: कृषीप्रधान असे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन आढळते. ग्रामीण समुदायाची पुढील वैशिष्ट्ये आहेत. ग्रामीण समुदाय हा कृषीप्रधान समुदाय असतो. त्याचा आकार लहान असतो. त्यावर नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव असतो. या समुदायात विशेषीकरणाचा अभाव आढळतो. या समुदायावर कुटुंबवादाचा प्रभाव असतो आणि तेथील जीवन हे साधे असते. यानंतर तुम्ही भौतिक रचनेनुसार पडणारे खेड्यांचे तीन प्रकार १) केंद्रीत खेडी, २) विखूरलेली खेडी व ३) रेषात्मक खेडी यांचा अर्थ व वैशिष्ट्ये अभ्यासलेली आहेत. केंद्रीत खेड्यातील घरे ही एकाच ठिकाणी केंद्रीत झालेली असतात. शेतजमीन व निवासाची जागा असे दोन भाग असतात. तसेच अंतर्गत व बहिर्गत वाहतुकीसाठी दोन वेगवेगळे रस्ते असतात. येथे सामूहिक जीवनाचा बराच विकास झालेला असतो. विखूरलेल्या खेड्यातील घरे एका ठिकाणी केंद्रीत न होता भूप्रदेशात सर्वत्र विखूरलेली असतात. या खेड्यातील भूप्रदेशाचे दोन भाग नसतात. साधारणपणे लोक आपल्याच शेतात घरे बांधून राहतात. तेथे अंतर्गत व बहिर्गत वाहतुकीसाठी वेगवेगळे रस्ते नसतात. महत्त्वाचे म्हणजे सामूहिक जीवनाच्या विकासास तेथे फारसा वाव नसतो. रेषात्मक खेड्यात एका लांबवर गेलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस ओळीने घरे बांधलेली असतात. या खेड्यात लोक शेतात घरे बांधून राहतात. तसेच ज्या रस्त्यावर खेडे वसलेले असते तोच रस्ता अंतर्गत व बहिर्गत वाहतुकीसाठी वापरला जातो. यानंतर तुम्ही वसाहतीची स्थिरता या निकषाच्या आधारे पडणारे खेड्याची तीन प्रकार १) स्थलांतरीत खेडे, २) अंशतः स्थायी खेडे व ३) स्थायी खेडे हे तीन प्रकार अभ्यासलेले आहेत. अन्नसंकलन व शिकार करणाऱ्या आदिम जमाती अन्नाच्या शोधात सतत स्थलांतर करतात. त्यामुळे त्यांच्या या वस्तीस स्थलांतरीत खेडे म्हणतात. पशुपालन व स्थानांतरीत शेती करणाऱ्या जमाती एका ठिकाणी दीर्घकाळ वस्ती करून राहतात. त्यांच्या वस्तीस अंशतः स्थायी खेडे म्हणतात. जी खेडी एका ठिकाणी कायम स्वरूपात वसलेली असतात त्यांना स्थायी खेडे असे म्हणतात.

## ३.४ स्मरणार्थ संज्ञा

- **समुदाय :** विशिष्ट भूप्रदेशावर आपलेपणाच्या भावनेने राहणारा सामाजिक समूह
- **विशेषीकरण :** कोणत्या तरी एका कार्यातील कुशलता वा तज्ज्ञता
- **प्राथमिक संबंध :** कुटुंब, जिवलग मित्र, खेडे इत्याद लहान समूहांच्या-सदस्यातील प्रत्यक्ष व घनिष्ठ संबंध.
- **निसर्गशक्ती :** ऊन, वारा, पाऊस इत्यादी निसर्ग घटकांना निसर्गशक्ती असे म्हणतात.
- **आदिम जमाती :** भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर व दुर्गम भागात राहणारे आदिवासी समूह.
- **लोकसंख्येची घनता :** दर चौ. कि.मी. मध्ये राहणारी लोकसंख्या

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) क   २) अ   ३) ड   ४) क   ५) क

## ३.६ स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) ग्रामीण समुदायाची व्याख्या व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) भौतिक रचनेनुसार पडणारे खेड्यांचे प्रकार विशद करा.

३) वसाहतीची स्थिरता या आधारे खेड्यांचे वर्गीकरण स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये

२) केंद्रीत खेडी

३) विखूरलेली व रेषात्मक खेडी

४) स्थलांतरीत खेडी

५) अंशतः स्थायी खेडी व स्थायी खेडी

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- प्रा. चंद्रकांत खंडागळे – ग्रामीण समाजशास्त्र, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, २००५.
- डॉ. गुरूनाथ नाडगोंडे – ग्रामीण समाजशास्त्र, काँटिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६.
- A. E. Punit – Social Systems in Rural India – Sterling Publishers Pvt. Ltd., New-Delhi, 1978
- N. Jaypalan – Rural Sociology – Atalantic Publishers & Distributer, New Delhi, 2002.


❑❑❑

# घटक ४

# ग्रामीण विकास

## (Rural Development)

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ ग्रामीण विकासाची संकल्पना
- ४.२.२ ग्रामीण विकासाची उद्दिष्टे
- ४.२.३ ग्रामीण विकासाचे दृष्टिकोन
- ४.२.४ ग्रामीण विकासातील अडथळे

४.३ सारांश

४.४ स्मरणार्थ संज्ञा

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## ४.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास-

- ग्रामीण विकास ही संकल्पना स्पष्ट करता येईल.
- ग्रामीण विकासाचे उद्दिष्टे सांगता येतील.
- ग्रामीण विकासाचे दृष्टिकोन विशद करता येतील.
- ग्रामीण विकासातील अडथळे स्पष्ट करता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना ग्रामीण समाजाचे स्वरूप अभ्यासावे लागते. तथापि, ग्रामीण समाज स्थिर नसतो. त्यामध्ये बदल होत असतात. या बदलाची कारणे व स्वरूप आपणास अभ्यासावे लागते. ग्रामीण समाजातील बदलास अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यापैकी ग्रामीण विकासासाठी राबविले जाणारे विविध कार्यक्रम हा एक प्रमुख घटक आहे. आज जगातील सर्वच देशात ग्रामीण विकासाची प्रक्रिया सुरू केलेली आहे. ग्रामीण समाजातील सर्व समस्यांचे निराकरण करून ग्रामीण विकासाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी विविध योजना, कार्यक्रम, प्रकल्प राबविले जात आहेत. या सर्वांचा प्रभाव पडून ग्रामीण समाजात मोठे बदल घडून येत आहेत. त्यामुळे ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप समजावून घेण्यासाठी ग्रामीण विकासाची प्रक्रिया समजावून घ्यावी लागते. म्हणून या चौथ्या घटकात तुम्ही ग्रामीण विकासाचा अर्थ, उद्दिष्टे, दृष्टिकोन, अडथळे इत्यादी बाबी अभ्यासणार आहात.

## ४.२ विषय विवेचन

विवेचनाच्या दृष्टिने या घटकाचे ४ विभाग पाडले आहेत. पहिल्या घटकात ग्रामीण विकासाची संकल्पना स्पष्ट केलेली आहे. दुसऱ्या विभागात ग्रामीण विकासाची उद्दिष्टे स्पष्ट केलेली आहेत. तिसऱ्या विभागात ग्रामीण विकासाचे दृष्टिकोन विशद केलेले आहेत. तर चौथ्या विभागात ग्रामीण विकासाच्या मार्गातील अडथळ्यांची चर्चा केलेली आहे.

### ४.२.१ ग्रामीण विकासाची संकल्पना

ग्रामीण विकासाची संकल्पना स्पष्टपणे समजण्यासाठी प्रथम आपण ग्रामीण विकासाच्या कांही मान्यवर विचारवंतानी केलेल्या व्याख्या अभ्यासू.

**१) प्रा. चंद्रकांत खंडागळे :** ग्रामीण समाजात उपलब्ध असलेल्या भौतिक व मानवी साधनसंपत्तीचा पुरेपूर उपयोग करून शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, आहार, निवास, संस्था व संघटना इत्यादी क्षेत्रात सुधारणा घडवून आणणे व त्याद्वारे ग्रामीण लोकांचे विशेषतः दुर्बल घटकांचे जीवनमान त्यांच्या सक्रिय सहभागाद्वारे उंचावणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

**२) जी. पार्थसारथी :** ग्रामीण भागातील गरीब लोकांना त्यांच्या भौतिक व मानवी साधनसंपत्तीचा अधिक चांगला उपयोग करण्याच्या संधी देऊन त्यांचे जीवनमान उंचावणे हे ग्रामीण विकासातील निर्णायक घटकतत्व आहे. याशिवाय ग्रामीण साधनसंपत्तीच्या उपयोगास कार्यात्मक महत्त्व असत नाही.

**३) जेम्स एच्. कॉप्प :** ग्रामीण विकास ही सामूहिक प्रयत्नांची अशी प्रक्रिया आहे, की जिच्याद्वारे नागरी क्षेत्राबाहेर राहणाऱ्या लोकांच्या कल्याणात आणि आत्मसाक्षात्कारात सुधारणा करण्याचे ध्येय बाळगले जाते.

**४) मायकेल टॉडरो :** ग्रामीण विकासात पुढील तीन गोष्टींचा समावेश होतो. १) जीवनाच्या विविध स्तरांमध्ये सुधारणा करणे. ज्यामध्ये रोजगार, शिक्षण, आरोग्य, आहार, निवास व सामाजिक सेवांची विविधता यांचा समावेश आहे, २) ग्रामीण उत्पन्नाच्या वितरणातील असमानता आणि उत्पन्न व आर्थिक संधी यासंदर्भातील ग्रामीण - नागर समतोलातील असमानता कमी करणे.३) या सुधारणांची गती टिकविण्याची व वाढविण्याची ग्रामीण क्षेत्राची क्षमता वाढविणे.

**५) जागतिक बँक ग्रामीण विकास क्षेत्रीय धोरण प्रबंध :** विशिष्ट लोकसमूहाच्या-ग्रामीण भागातील गरीब लोकांच्या-आर्थिक व सामाजिक जीवनात सुधारणा करण्यासाठी तयार केलेली व्यूहरचना म्हणजे ग्रामीण विकास होय. ग्रामीण भागात उपनिर्वाहाची साधने मिळविण्यासाठी धडपणणाऱ्या लोकांमध्ये जे सर्वात अधिक गरीब आहेत त्यांच्यापर्यंत विकासाची फळे पोहचवण्याचा त्या व्यूहरचनेत समावेश होतो. अशा समूहामध्ये लहान शेतकरी, कूळे व भूमिहीन लोकांचा समावेश आहे.

६) आशियातील ग्रामीण विकासाविषयीचे दृष्टिकोन या विषयावरील चर्चासत्रात पुढीलप्रमाणे व्याख्या केली गेली. ''ग्रामीण विकास ही आपल्या पर्यावरणाचे नियंत्रण करण्याच्या ग्रामीण लोकांच्या क्षमतेत सतत वाढ करणारी प्रक्रिया असून अशा नियंत्रणामुळे फायद्यांचे विस्तृत वितरण घडून येते.''

वरील व्याख्यांच्या आधारे ग्रामीण विकास या संकल्पनेचा अर्थ आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१) ग्रामीण भागातील उपलब्ध असलेल्या भौतिक व मानवी साधनसंपत्तीचा पुरेपूर उपयोग करून ग्रामीण जीवनाच्या विविध क्षेत्रात सुधारणा घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

२) ग्रामीण लोकांचे विशेषत: दुर्बल किंवा गरीब लोकांचे जीवनमान त्यांच्या सक्रिय सहभागाद्वारे उंचावणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

३) ग्रामीण लोकांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक राजकीय इत्यादी सर्व क्षेत्रात सुधारणा घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

४) ग्रामीण भागातील गरीब लोकांपर्यंत विकासाची फळे (लाभ) पोहचविण्यासाठी तयार केलेली व्यूहरचना म्हणजे ग्रामीण विकास होय.

५) ग्रामीण विकास ही ग्रामीण लोकांची त्यांचे पर्यावरण नियंत्रित करण्याची क्षमता सतत वाढविणारी प्रक्रिया आहे. त्याचबरोबर अशा नियंत्रणामुळे निर्माण होणाऱ्या फायद्यांचे विस्तृत वितरण करणारीही प्रक्रिया आहे.

## ग्रामीण विकासाची वैशिष्ट्ये (Characteristics of Rural Development) :

वरील व्याख्यांच्या आधारे आपणास ग्रामीण विकास या संकल्पनेचे स्वरूप लक्षात येते. ग्रामीण विकासाच्या संकल्पनेच्या स्वरूपाचे अधिक यथार्थ आकलन होण्यासाठी ग्रामीण विकास प्रक्रियेची वैशिष्ट्ये अभ्यासणे उचित ठरेल. ग्रामीण विकासाची खालील वैशिष्ट्ये सांगता येतात.

**१) सार्वत्रिक प्रक्रिया :** ग्रामीण विकास ही ग्रामीण समाजात अपेक्षित परिवर्तन किंवा सुधारणा घडवून आणणारी प्रक्रिया असून ती सार्वत्रिक स्वरूपाची आहे. कारण कांही थोड्या समाजांचा अपवाद वगळता जगातील बहुतेक सर्वच समाजात ग्रामीण विकासाचे प्रयत्न केले जात आहेत. मानव समाजात ग्रामीण व नागर असे दोन विभाग आढळतात. नागर विभागाच्या तुलनेत ग्रामीण विभाग मागासलेले आहेत. कारण औद्योगिकीकरण, नागरीकरण, भांडवलशाही अर्थव्यवस्था इत्यादींमुळे ग्रामीण विभागात दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा, दैववादीवृत्ती, अनारोग्य, अस्वच्छता इत्यादी अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. या समस्यांचे निर्मूलन करून ग्रामीण विभागातील लोकांच्या जीवनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम, प्रकल्प, कार्यक्रम, योजना राबविल्या जात आहेत. त्यामुळे ग्रामीण विकास ही सार्वत्रिक स्वरूपाची प्रक्रिया आहे असे म्हणता येते.

**२) सर्वांगिण विकासाची प्रक्रिया :** ग्रामीण विकास ही ग्रामीण समाजाचा सर्वांगिण विकास घडवून आणणारी प्रक्रिया आहे. ग्रामीण जीवनाच्या सर्व क्षेत्रात (आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी) सुधारणा किंवा प्रगती घडवून आणणे ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत अभिप्रेत आहे. सुरुवातीस ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण लोकांच्या आर्थिक जीवनात सुधारणा करणे असा अर्थ घेतला जाई. त्यादृष्टीने शेती व शेतीशी संलग्न असणारे व्यवसाय (उदा. पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय इ.) ग्रामोद्योग व  हस्तोद्योग इत्यादींचा विकास करून लोकांना पुरेसा रोजगार उपलब्ध करून देणे. त्याद्वारे त्यांचे उत्पादन वाढविणे व अशा प्रकारे त्यांच्या आर्थिक जीवनात सुधारणा करणे या बाबींचा ग्रामीण विकासात समावेश केला जाई. परंतू अलिकडे ग्रामीण विकासाचा हा मर्यादित अर्थ अमान्य केला जातो. आज ग्रामीण लोकांच्या आर्थिक जीवनाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनांमध्ये सुधारणा करणे असा ग्रामीण विकासाचा व्यापक अर्थ स्वीकालेला आहे. त्यादृष्टीने ग्रामीण लोकांना शैक्षणिक व आरोग्य सुविधा, सकस आहार, उत्तम निवास व्यवस्था (घरे), वाहतुकीची व दळणवळणाची प्रगत साधने, शुद्ध पाणी, वीज इत्यादी आवश्यक व पायाभूत सुविधा पुरवून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे या बाबींचाही ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत समावेश केलेला आहे. केवळ एवढेच नव्हे तर ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत आज सांस्कृतिक व मानसिक विकासाचाही अंतर्भाव केला जातो. लोकांचे आचार-विचार, रुढी-परंपरा, श्रद्धा-मूल्ये, यंत्रे-तंत्रे, कल्पना-दृष्टिकोन, कला-कौशल्ये, सामाजिक संस्था-संघटना इत्यादींचा संस्कृतीत समावेश होतो. त्यादृष्टीने ग्रामीण भागातील बुरसटलेले व कालबाह्य झालेले आचार-विचार, अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रद्धा व देवभोळ्या कल्पना, परंपरागत व अप्रगत यंत्रतंत्रे व कलाकौशल्ये इत्यादींचे उच्चाटन करून ग्रामीण लोकांना नवे ज्ञान, नवे विचार, नव्या कल्पना, नवीन दृष्टिकोन आधुनिक यंत्रे व तंत्रे इत्यादींची ओळख करून देणे, त्यांचा स्वीकार करावयास लावणे आणि त्यांना परिवर्तनशील विकासाभिमूख प्रगतीशील व सुधारणावादी बनविणे. म्हणजेच ग्रामीण लोकांची परंपरागत संस्कृती व मनोवृत्ती बदलणे याचाही ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत समावेश केला जातो. अशाप्रकारे ग्रामीण विकास ही ग्रामीण जीवनाच्या सर्व पैलूंचा

एकात्मिक विकास घडवून आणणारी प्रक्रिया आहे. भारतातील समुदाय विकास कार्यक्रम (CDP) किंवा एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) हे सर्वांगिण विकासाचे कार्यक्रम होते.

**३) विशिष्ट समूहाच्या विकासावर भर** : ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत ग्रामीण समाजाचा आणि त्यामधील सर्व लोकांचा विकास घडवून आणणे अभिप्रेत आहे हे खरे. तथापि, ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत ग्रामीण भागातील विशिष्ट समूहाच्या विकासावर विशेष भर दिला जातो आणि तो समूह म्हणजे ग्रामीण भागातील दुर्बल किंवा गरीब लोकांचा समूह होय. ग्रामीण भागातील लहान शेतकरी, कुळे, भूमिहीन लोक इ. दुर्बल असून त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. भारतीय समाजात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग (SC, ST, OBC) यांच्यावर शतकानुशतके अनेक अनिष्ट निर्बंध व अपात्रता लादलेल्या होत्या. त्यामुळे ते मागास (Backward) व दुर्बल (Weaker) बनले. त्यामुळे त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी अनेक विशेष घटक योजना राबविल्या जातात. अलिकडे स्त्रिया व वृद्ध यांनाही दुर्बल मानून त्यांच्या विकासाकडे खास लक्ष दिले जाऊ लागले आहे.

**४) लोकसहभाग :** ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत ''लोकांच्या सक्रिय सहभागातून'' त्यांचा व ग्रामीण भागाचा विकास साधणे अभिप्रेत आहे. ग्रामीण विकासाची धोरणे व्यूहरचना, कार्यक्रम , योजना इत्यादींचे निर्धारण, नियंत्रण व अंमलबजावणी करण्याच्या कामात ग्रामीण लोकांचा उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग आवश्यक असतो. त्याशिवाय ग्रामीण विकासाची उद्दिष्टे सफल होऊ शकत नाहीत. म्हणून ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत जास्तीत जास्त लोकांना सहभागी करून घेण्यावर भर दिला जातो. भारतात ग्रामीण पुनर्रचनेसाठी १९५२ पासून सुरू केलेल्या समुदाय विकास कार्यक्रमांत लोकांनी अपेक्षित सहभाग न दिल्यामुळेच हा कार्यक्रम अपयशी ठरला. त्यामुळेच विकास कार्यक्रमात लोकांचा सहभाग वाढावा म्हणून त्रिस्तरीय पंचायत राज्यव्यवस्था निर्माण करून ग्रामीण लोकांना उत्पन्नाची साधने व अधिकार किंवा सत्ता देण्यात आली आहे. ग्रामीण विकासात लोकसहभाग वाढावा म्हणून ग्रामीण भागातील उपलब्ध असलेल्या मानवी साधनसंपत्तीचा पर्याप्त उपयोग करण्यावर तसेच तिची (मनुष्यबळाची) गुणवत्ता वाढविण्यावर भर दिला जातो. तसेच लोकांमध्ये विकासाची प्रेरणा निर्माण करणे, त्यांचे प्रबोधन करणे, त्यांच्यातूनच विकासाभिमूख नेतृत्वाचा उदय होणे आवश्यक असते. म्हणूनच जेम्स एच्. कॉप्प म्हणतात की, ''ग्रामीण विकासाचे अंतिम उद्दिष्ट हे पायाभूत संरचना (Infrastructure) नसून लोक (People) आहेत. आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लोकांचा सहभाग अनिवार्य ठरतो.

**५) निरंतर प्रक्रिया :** ग्रामीण विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. कारण इतर समाजाप्रमाणेच ग्रामीण समाज देखील पूर्णत: स्थितीशील नाही. त्यामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार बदल होत असतात. या बदलांमुळे ग्रामीण समाजात नवीन गरजा, नवे प्रश्न व समस्या उद्‌भवत असतात. या गरजांची पूर्तता करण्यासाठी व या प्रश्नांच्या व समस्यांच्या निर्मूलनासाठी वेगवेगळे कार्यक्रम, उपक्रम व योजना राबवाव्या लागतात. ग्रामीण लोकांची पर्यावरणावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता निरंतरपणे वाढवत रहावे लागते. परिणामी, ग्रामीण विकासाची प्रक्रिया निरंतरपणे चालू रहाते. फक्त तिची गती कमीजास्त असू शकते.

**६) देशाच्या विकासाचे अविभाज्य अंग :** ग्रामीण विकास हा संपूर्ण समाजाच्या किंवा देशाच्या विकासाचे एक अविभाज्य अंग आहे. आशिया-आफ्रिका खंडातील बहुसंख्य देश हे खेड्यांचे देश म्हणून ओळखले जातात. कारण या देशांमध्ये नागरीकरणाची गती मंद आहे. शहरांच्या तुलनेत खेड्यांची संख्या अधिक आहे. बहुसंख्य लोक खेड्यांत म्हणजेच ग्रामीण भागात रहातात. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भातातील सुमारे ८०% लोक खेड्यात रहात होते. म्हणूनच महात्मा गांधी खरा भारत खेड्यात राहतो असे म्हणत. स्वातंत्र्यानंतरची ६० वर्षे पूर्ण होऊनही गांधीजींचे हे विधान खरेच ठरते. कारण आजही लोकसंख्या ६० हजार पेक्षा अधिक खेड्यात वास्तव्य करते. त्यामुळे देशाचा विकास म्हणजे खेड्यांचा विकास हे विधान आजही यथार्थ ठरते. म्हणून विकसनशील देशांच्या दृष्टीने ग्रामीण विकास हे देशाच्या विकासाचे अविभाज्य अंग ठरते.

**७) शासनाचा पुढाकार :** ग्रामीण विकास हे देशाच्या विकासाचे अविभाज्य अंग असल्याने ग्रामीण विकासात शासनाची भूमिका महत्त्वाची ठरते. ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास घडविण्यासाठी शासनाला पुढाकार घ्यावा लागतो. त्यादृष्टीने ग्रामीण विकासाची उद्दिष्टे, व्यूहरचना, धोरणे ठरविणे, त्यादृष्टीने कार्यक्रमांची व योजनांची आखणी व अंमलबजावणी करणे, त्यासाठी लागणारी प्रशासकीय यंत्रणा उभारणे व आर्थिक तरतूद करणे, लोकांचा विकास कार्यक्रमातील सहभाग वाढविण्यासाठी लोकजागृती किंवा समाजप्रबोधन करणे, विकास कार्यक्रमांचा आढावा घेणे, त्यांचे मूल्यमापन करणे, त्यानुसार त्यामध्ये अवाश्यक ते फेरफार किंवा दुरुस्त्या करणे इत्यादी प्रमुख जबाबदाऱ्या शासनालाच पार पाडाव्या लागतात. त्यामुळे ग्रामीण विकासात शासनाचा पुढाकार असतो. अर्थात या कामी शासन राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील बिगरशासकीय संघटना, विचारवंत, तज्ज्ञ, समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते इत्यादींचे मार्गदर्शन, सल्ला व सहकार्य घेत असते. थोडक्यात ग्रामीण विकासात अनेक संस्था व व्यक्तींचा सहभाग व सहकार्य आवश्यक असते. तरीही शासनाची भूमिका ही अग्रक्रमाची व निर्णायक असते.

### ४.२.२ ग्रामीण विकासाची उद्दिष्टे (Objectives of Rural Development) :

ग्रामीण विकास या संकल्पनेचा अर्थ, स्वरूप व वैशिष्ट्ये समजावून घेतल्यानंतर आता आपण ग्रामीण विकासाची उद्दिष्टे अभ्यासणार आहोत. ग्रामीण समाजाचा सर्वांगिण विकास साधणे हे ग्रामीण विकासाचे ध्येय आहे. या ध्येयाच्या पूर्तीसाठी ग्रामीण विकासाची कांही निश्चित उद्दिष्टे निर्धारित करता येतात. सर्वसाधारणपणे सांगावयाचे झाल्यास ग्रामीण विकासाची उद्दिष्टे मुख्यत: दोन स्वरूपाची आहते. १) ग्रामीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा पुरविणे आणि २) ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पन्नात वाढ करणे.

Economic and Social Commission for Asia and Pacific (ESCAP) या संस्थेने ग्रामीण विकासाची पुढील उद्दिष्टे सांगितलेली आहेत.

१) ग्रामीण भागातील श्रमशक्तीला आर्थिक क्रियांच्या मुख्य प्रवाहात सामील करणे.

२) ग्रामीण लोकांच्या विधायक शक्तीला आविष्कृत करणे.

३) ग्रामीण लोकसंख्येचे शहराकडे होणारे स्थलांतर रोखणे.

४) ग्रामीण स्त्रिया आणि तरूण यांचा विकास प्रक्रियेतील सहभाग वाढविणे.

५) विकास आणि पर्यावरण यांच्या एकात्मिकरणाद्वारे ग्रामीण जीवनाची गुणवत्ता सुधारणे.

६) विपूल प्रमाणात असलेल्या मानवी शक्तीचा सर्वांगिण विकास साधणे.

आता आपण ग्रामीण विकासाच्या उद्दिष्टांची अधिक तपशिलाने चर्चा करू या. ग्रामीण विकासाची पुढील उद्दिष्टे सांगता येतील.

**१) दारिद्र्य निर्मूलन :** दारिद्र्य ही ग्रामीण समाजाची प्रमुख समस्या आहे. त्यामुळे ग्रामीण दारिद्र्याचे निर्मूलन करून ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावणे हे ग्रामीण विकासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. शेती हा ग्रामीण लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. तथापि, तो हंगामी व मागासलेला आहे. त्यामुळे शेती व्यवसायात सुधारणा करणे आवश्यक ठरते. त्यासाठी शेतकऱ्यांना शेती व्यवसायातील आधुनिक उत्पादन तंत्र (सुधारित शेती अवजारे, खते, जंतुनाशके, कृत्रिम पाणी पुरवठ्याच्या सुविधा इ.) पुरविणे व त्याद्वारे शेती उत्पादन वाढविणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट ठरते. त्यामुळे शेतकऱ्यांना वर्षभर रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल व त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावेल. शेतकऱ्यांप्रमाणेच ग्रामीण भागात बिगरशेती व्यवसाय करणारे कारागिर आहेत. औद्योगिककरणामुळे त्यांचे हस्तोद्योग व ग्रामोद्योग मोडकळीस आल्याने ते बेकार व दरिद्री बनले आहेत. त्यांना रोजगार पुरवून त्यंची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ग्रामीण हस्तोद्योगांचा व ग्रामोद्योगांचा विकास करणे हे ही ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट ठरते. ग्रामीण रोजगारात वाढ करण्यासाठी शेतीशी संलग्न असणऱ्या पशूपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, मत्स्योत्पादन, रेशमी किड्यांची पैदास इत्यादी जोडधंद्यांचा विकास करणे हे ही एक उद्दिष्ट आहे. थोडक्यात शेती, ग्रामोद्योग, पूरक व्यवसाय इत्यादींचा विकास करून ग्रामीण रोजगारात वाढ करणे व त्याद्वारे लोकांचे उत्पन्न वाढविणे व दारिद्र्याचे निर्मूलन करणे हे ग्रामीण विकासाचे एक उद्दिष्ट आहे.

**२) शिक्षण प्रसार :** ग्रामीण विकासात लोकांचा सहभाग आवश्यक ठरतो. त्यासाठी लोक हे सुशिक्षित, सुजाण, जागृत, डोळसवृत्तीचे असावे लागतात. तथापि, ग्रामीण भागात शैक्षणिक सुविधांची कमतरता असल्याने बहुसंख्य ग्रामीण लोक अडाणी, निरक्षर, अंधश्रद्धा आहेत. त्यामुळे ग्रामीण लोकांना साक्षर बनविण्यासाठी ग्रामीण भागात बालवाड्या, शाळा, हायस्कूल, महाविद्यालये सुरू करून तेथे शिक्षण प्रसार करणे हे ग्रामीण विकासाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण प्रौढांना साक्षर करण्यासाठी साधारणता साक्षरता प्रसार केंद्रे, प्रौढ शिक्षण केंद्रे,.रात्रशाळा, समाजशिक्षण केंद्रे सुरू करणे, ग्रामीण लोकांसाठी व्यासायिक शिक्षण-प्रशिक्षणाची केंद्रे सुरू करून त्यांच्या अंगच्या कलाकौशल्यांचा विकास करणे अशाप्रकारे शिक्षणप्रसाराद्वारे लोकांची गुणवत्ता वाढविणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

**३) आरोग्य सेवा पुरविणे :** दारिद्र्य, बेकारी, कुपोषण, अज्ञान, अंधश्रद्धा, आरोग्य सुविधांचा व स्वच्छतेच्या सवयींचा अभाव इत्यादी कारणामुळे ग्रामीण लोकांच्या आरोग्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट

आहे. त्यामुळे ग्रामीण लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी ग्रामीण भागात आरोग्य सुविधा (आरोग्य केंद्रे, लसीकरण केंद्रे, कुटुंब कल्याण केंद्रे, प्रशिक्षित डॉक्टर व नर्स, औषधे इ.) पुरविणे. तसेच संडास व गटारी बांधणे, पिण्याचे शुद्ध पाणी पुरविणे, लोकांना स्वच्छतेच्या सवयी लावणे, कुपोषण थांबविणे, आणि त्याद्वारे शारीरिक व मानसिक दृष्ट्या निरोगी व धडधाकट असे मनुष्यबळ उपलब्ध करणे, लोकसंख्येची गुणवत्ता वाढविणे हे ही ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

**४) पायाभूत सुविधा निर्माण करणे :** ग्रामीण समाजात रस्ते, वीज, पाणी, इंधन इत्यादी पायाभूत सुविधा निर्माण करणे हे ही एक ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने ग्रामीण भागात रस्ते, पूल, लोहमार्ग, जलवाहतूक अशा वाहतूक सुविधा निर्माण करून त्याद्वारे ग्रामीण लोकांना बाह्य जगाशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करणे, ग्रामीण भागाचे विद्युतीकरण करणे, पाण्यासाठी विहीरी व तळी खोदणे, नळाद्वारे पिण्याचे शुद्ध पाणी पुरविणे, वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादी संप्रेषणाची साधने पुरवून ग्रामीण लोकांपर्यंत बाह्य जगातील घडामोडींची माहिती अणि ज्ञान पोहचविणे.

**५) पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन :** शेती व्यसायामुळे ग्रामीण लोकांचा नैसर्गिक पर्यावरणाशी घनिष्ठ संबंध येतो. त्यांच्या बहुतांशी गरजांची पूर्तता पर्यावरणाद्वारेच होते. त्यमुळे पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे हे ही ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने मृदासंधारण, पाणलोट क्षेत्राचा विकास, सामाजिक वनीकरण, गुरांसाठी चारा लागवड, इंधनासाठी जलद गतीने वाढणाऱ्या वृक्षांची लागवड, जंगलांचे संरक्षण व संवर्धन इत्यादी उपक्रम राबविणे आवश्यक ठरते.

**६) सामाजिक न्याय** : ग्रामीण समाजात असलेली आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट करून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व या लोकशाही मूल्यांवर आधालेली न्याय समाजव्यवस्था प्रस्थापित करणे हे एक ग्रामीण विकासाचे एक उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने ग्रामीण भागातील श्रीमंत व गरीब वर्गातील दरी कमी करणे, विकास कार्यक्रमांचे फायदे अगदी तळागाळातील गरीब व दुर्बल घटकांपर्यंत पोहचविणे, धर्मभेद, जातीभेद, लिंगभेद, अस्पृश्यतापालन इत्यादी अनिष्ट प्रथांना पायबंद घालून ग्रामीण भागात सामाजिक सहिष्णुतेचे व समतेचे वातावरण निर्माण करणे, दलित व महिलांच्या न्याय हक्कांचे व हितसंबंधांचे संरक्षण करणे गरजेचे मानले जाते.

**७) विज्ञान–तंत्रज्ञानाचा वापर :** परंपरागत ग्रामीण समाजाचे आधुनिक समाजात रुपांतर घडवून आणणे व त्यासाठी वैज्ञानिक व तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून घेणे हे देखील ग्रामीण समाजाचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने ग्रामीण लोकांना नैसर्गिक व सामाजिक घडामोडीमागील शास्त्रीय कारणकार्यभावाची माहित करून देणे, शास्त्रशुद्ध विचारांची सवय लावणे, उत्पादन प्रक्रियेत व दैनंदिन जीवनात विज्ञान तंत्रज्ञानाचा अधिकाधिक उपयोग करणे उदा. शेतीमध्ये सुधारित बीबियाणो व खते वापरणे, लागवडीच्या शास्त्रीय पद्धती वापरणे, आजारात डॉक्टरकडून (मांत्रिकाकडून नव्हे) औषधोपचार घेणे, स्वयंपाकासाठी गॅस किंवा किमान सूर्यचूल वापरणे, शौचालयाचा वापर करणे, नेहमी ताजे, स्वच्छ व सकस अन्न घेणे, जेवणापूर्वी हात साबणाने स्वच्छ करणे इत्यादी. थोडक्यात पारंपारिक भोळ्या समजूतीऐवजी शास्त्रीय ज्ञानावर ग्रामीण जीवनाची उभारणी करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

**८) संस्था-संघटनांची स्थापना :** ग्रामीण भागातील स्पर्धा व संघर्ष या भावना नष्ट करून त्याजागी सहकार्याची भावना निर्माण करणे आणि परस्पर सहकार्याने आपला व आपल्या समुदायाचा विकास करणे हे ही ग्रामीण विकासाचे एक उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने ग्रामीण भागात वाचनालय, व्यायाम शाळा, तरूण मंडळ, महिला मंडळ, क्रीडा मंडळ, शेतकरी मंडळ, विविध प्रकारच्या सहकारी संस्था (उदा. दूध केंद्रे, खरेदी-विक्री केंद्रे, पत संस्था, बँका, उत्पादन केंद्रे इ.) इत्यादी संस्था-संघटना स्थापन करणे आवश्यक ठरते. संघटीत शक्तीद्वारे विकास हा ग्रामीण विकासाचा आत्मा आहे.

अशाप्रकारे ग्रामीण लोकांतील शक्तीचा व क्षमतांचा विकास करून त्यांच्या सहभागाद्वारे त्यांच्या जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक अशा सर्व पैलूंचा समतोल विकास साधून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे हे ग्रामीण विकासाचे मध्यवर्ती उद्दिष्ट आहे.

### ४.२.३ ग्रामीण विकासाचे दृष्टिकोन (Approaches to the Rural Development)

ग्रामीण विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ग्रामीण जीवनातील सर्व समस्यांची सोडवणूक करून ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावणे हे ग्रामीण विकासाचे मुख्य उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनेक कार्यक्रम, प्रकल्प व योजना राबविल्या गेल्या आहेत. यातून ग्रामीण विकासाविषयीचे कांही दृष्टिकोन रूढ झालेले आहेत. त्यापैकी कांही प्रमुख दृष्टिकोन तुम्ही या ठिकाणी अभ्यासणार आहात. ते दृष्टिकोन पुढीलप्रमाणे आहेत.

१) बहुउद्देशीय दृष्टिकोन

२) किमान पॅकेज दृष्टिकोन

३) लक्ष्य समूह दृष्टिकोन

४) क्षेत्र विकास दृष्टिकोन

५) एकात्मिक विकास दृष्टिकोन

या प्रत्येक दृष्टिकोनाचे स्वरूप आता तुम्ही थोडक्यात समजावून घेणार आहात.

#### १) बहुउद्देशीय दृष्टिकोन (Multi-purpose Approach)

ग्रामीण विकासाचा हा एक प्रमुख व महत्त्वाचा दृष्टिकोन आहे.

**अर्थ :** ज्या दृष्टिकोनात एकाच वेळी एकापेक्षा अधिक उद्दिष्टे साध्य करण्यावर लक्ष केंद्रीत केले जाते त्यास बहुउद्देशीय दृष्टिकोन असे म्हणतात.

या दृष्टिकोनानुसार कृषी विकास, ग्रामोद्योगांचा विकास, शिक्षणप्रसार, आरोग्य सेवांचा विस्तार, अभिवृत्तीत बदल, संस्था व संघटनांच्या रचनेत बदल, पायाभूत सेवासुविधांची निर्मिती इत्यादी उद्दिष्टे एकाचवेळी साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. ग्रामीण जीवनाची विविध क्षेत्रे ही परस्परावलंबी असल्याने त्यांचा एकाचवेळी विकास करणे हे सोयीचे व फायदेशीर ठरते असे या दृष्टिकोनात मानले जाते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात ग्रामीण विकासासाठी हाच दृष्टिकोन स्वीकारला आणि २ ऑक्टोबर

१९५२ रोजी समुदाय विकास कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम बहुउद्देशीय दृष्टिकोनावरच आधारलेला होता. या कार्यक्रमात कृषी विकास, ग्रामोद्योगांची स्थापना, साक्षरता प्रसार, आरोग्य सुविधांचा विस्तार, संस्था, संघटना व मंडळांची स्थापना, लोकांच्या मनोवृत्तीत किंवा अभिवृत्तीत बदल करणे इत्यादी विविध उद्दिष्टे साध्य करण्यावर भर देण्यात आला.

**या दृष्टिकोनाचे फायदे :** हा दृष्टिकोन एकाचवेळी अनेक उद्दिष्टे साध्य करण्यावर भर देत असल्याने -

१) वेळ, श्रम, पैसा इत्यादींची बचत होण्यास मदत होते.

२) तसेच ग्रामीण जीवनाच्या विविध क्षेत्रांत विकासाविषयीचा समतोल निर्माण होऊ शकतो.

३) शिवाय लोकांमध्ये विकासाविषयी समग्र अशी जाणीवजागृती निर्माण होऊ शकते. हे तीन फायदे या दृष्टिकोनाचे आहेत.

**या दृष्टिकोनाच्या मर्यादा :** या दृष्टिकोनाच्या पुढील मर्यादा आहेत.

१) बहुउद्देशीय दृष्टिकोनातून विकास घडवून आणण्यासाठी प्रचंड भांडवल लागते. पुरेशा भांडवलाअभावी या दृष्टिकोनानुसार आखलेल्या विकास योजना पूर्ण होऊ शकलेल्या नाहीत.

२) या दृष्टिकोनातून सुरू केलेल्या योजना अत्यंत विस्तृत (व्यापक) स्वरूपाच्या असल्याने त्यांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे करणे अवघड जाते. सर्व क्षेत्रात एकाचवेळी सुरू केलेल्या योजनांवर नीट लक्ष देणे कठीण जाते. त्यामुळे अपेक्षित परिणाम मिळत नाहीत.

### २) किमान पॅकेज दृष्टिकोन (Minimum Package Approach)

बहुउद्देशी दृष्टिकोनाच्या मर्यादा विचारात घेऊन त्यातून मार्ग काढण्यासाठी किमान पॅकेज दृष्टिकोन स्वीकारण्यात आला. किमान पॅकेज दृष्टिकोन हा संकुचित स्वरूपाचा आहे.

**अर्थ :** ज्या दृष्टिकोनात ग्रामीण जीवनाच्या कोणत्या तरी एकाच विशिष्ट पैलूवर किंवा क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करून त्याचा सखोल विकास घडवून आणला जातो त्यास किमान पॅकेज दृष्टिकोन म्हणतात. उदाहरण - कृषी क्षेत्राचा विकास हा ग्रामीण विकासाचा एक पैलू आहे. किमान पॅकेज दृष्टिकोनानुसार कृषी विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा (उदा. खते, बियाणे, पाणीपुरवठा, जंतुनाशके, शेती अवजारे, विक्री व्यवस्था इत्यादी) एक गठ्ठा स्वरूपात म्हणजेच पॅकेज स्वरूपात शेतकऱ्यांना पुरविली जातात व त्यांच्या शेतीचा विकास घडवून आणला जातो.

१९६०-६१ मध्ये भारतात 'प्रकर्षित कृषी जिल्हा कार्यक्रम' (Intensive Agricultural District Programme – IADP) हा जो कार्यक्रम सुरू केला होता तो या दृष्टिकोनावरच आधारलेला होता. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी या कार्यक्रमात निवडक क्षेत्रावर लक्ष केंद्रीत केले गेले. पुढे विशिष्ट पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठीही प्रयत्न केले गेले.

**फायदे:** या दृष्टिकोनावर आधारलेल्या विकास कार्यक्रमाचा फायदा असा की त्यामध्ये एकाच क्षेत्रावर लक्ष केंद्रीत केले जात असल्याने त्या क्षेत्राचा पर्याप्त विकास होऊ शकतो. उदा. कापूस किंवा

ऊस अशा एखाद्याच पिकाचे उत्पादन वाढविण्यावर पुरेपूर लक्ष केंद्रीत केल्याने त्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन वाढले.

**मर्यादा**: या दृष्टिकोनाची मर्यादा अशी की त्यामध्ये केवळ एकाच क्षेत्राच्या विकासावर लक्ष दिल्याने इतर क्षेत्रांकडे दुर्लक्ष होते. परिणामी विविध क्षेत्रात विकासाचा असमतोल निर्माण होतो. उदा. कापूस वा ऊस उत्पादनाकडे लक्ष दिल्याने तेलबिया व द्विदल धान्यांच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष होते व बाजारात त्यांची टंचाई निर्माण होऊन किंमती वाढतात व लोकांना त्याबाबत महागाईस तोंड द्यावे लागते.

### ३) लक्ष्य समूह दृष्टिकोन (The Target Group Approach)

हा एक विशेष असा दृष्टिकोन आहे.

**अर्थ**: ज्या दृष्टिकोनात ग्रामीण समाजातील एखाद्या विशिष्ट समूहाचा (गटाचा) विकास घडवून आणण्यावर भर दिला जातो त्यास लक्ष्य समूह दृष्टिकोन असे म्हणतात.

या दृष्टिकोनात एखाद्या समूहास विकासाचे लक्ष्य (टार्गेट) बनवून त्याचा विकास करण्यावर भर दिला जातो. उदा. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, छोटे शेतकरी, महिला, बालके, शेतमजूर यापैकी एखादा समूह निवडून त्याच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम वा योजना सुरू केली जाते.

**उदाहरणे**: उदा. भारतात १९७०-७१ मध्ये सीमांत शेतकरी व शेतमजूर या समूहासाठी ''सीमांत शेतकरी व शेतमजूर विकास अभिकरण'' (Marginal farmers and Agricultural Labourers Development Agency- MFAL) ही योजना सुरू केली. लहान शेतकऱ्यांसाठी ''लहान शेतकरी विकास अभिकरण'' (Small Farmers Development Agency- SFDA) ही योजना सुरू केली. १८ ते ३५ वयोगटातील ग्रामीण युवकांसाठी सुरू केलेली TRYSEM ही योजना तसेच ''ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम RLEGP'' हा कार्यक्रम इत्यादी कार्यक्रम हे याच दृष्टिकोनावर आधारित होते.

**फायदे**: या दृष्टिकोनावर आधारलेल्या विकास कार्यक्रमाचा फायदा असा की त्यामुळे विकासाच्यादृष्टीने मागास असलेल्या समूहाचा विकास होऊन त्यांना इतर घटकांच्या बरोबरीने आणण्यास मदत होते. त्यामुळे सामाजिक समता व न्याय प्रस्थापित होण्यास मदत होते.

**मर्यादा**: या दृष्टिकोनाची मर्यादा असा की एकाच समूहावर लक्ष केंद्रीत केल्याने इतर समूहांकडे दूर्लक्ष होऊ शकते. त्यामुळे त्यांच्या मनात वंचिततेची भावना निर्माण होऊ शकते.

### ४) क्षेत्र विकास दृष्टिकोन (Area Development Approach)

**अर्थ**: ज्या दृष्टिकोनात अविकसित क्षेत्राचा विकास घडवून आणण्यावर भर दिला जातो त्यास क्षेत्र विकास दृष्टिकोन असे म्हणतात.

या दृष्टिकोनात असे गृहीत धरले जाते की, एखाद्या क्षेत्राचा विकास झाला की त्याचे फायदे किंवा लाभ हे कांही काळानंतर त्या क्षेत्रातील खालच्या स्तरांपर्यंत पाझरत (झिरपत) जातात.

**उदाहरणे**: अवर्षण प्रवण क्षेत्रातील शेतकऱ्यांना दृष्काळातही पुरेसे उत्पन्न मिळावे म्हणून भारत सरकारने १९७९ मध्ये **''अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम''**(Drought Prone Area Programme-DPAP) हा या दृष्टिकोनावर आधारलेला होता. तसेच आदिवासांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी सुरू केलेला **''आदिवासी क्षेत्र उपयोजना''** (Tribal Area Subplan) हा कार्यक्रमही याच दृष्टिकोनावर आधारित होता.

**फायदे**: या दृष्टिकोनामुळे विशिष्ट क्षेत्राचा सखोल विकास होऊ शकतो. कारण त्यासाठी सर्वप्रकारच्या सेवासुविधा पर्याप्त स्वरूपात उपलब्ध करून दिल्या जातात. वित्तपुरवठा, संप्रेषण, वाहतूक, विपणन, सहकार्य, तपशिलवार कृती इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्याने हे शक्य होते.

**मर्यादा**: या दृष्टिकोनाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत.

१) या दृष्टिकोनातून विकास घडवून आणताना देशातील एकूण अविकसित क्षेत्राच्या तुलनेत फार लहान क्षेत्रावर जास्त साधनसंपत्ती खर्च केली जाऊ शकते.

२) या दृष्टिकोनावर आधारलेला विकासाचा आराखडा हा अत्यंत संकीर्ण व महत्त्वाकांक्षी असू शकतो व त्याच्या अंमलबजावणीसाठी अत्यंत थोर नेतृत्वाची गरज भासते मात्र तसे नेतृत्व उपलब्ध होण्याची शक्यता कमी असते.

३) या दृष्टिकोनानुसार तयार केलेल्या विकास कार्यक्रमाच्या विविध विभागात साधनसंपत्तीचे वाटप करताना प्राधान्यक्रम बदलण्याचा धोका असतो.

### ५) एकात्मिक विकास दृष्टिकोन (Integrated Development Approach)

हा ग्रामीण विकासाचा एक अभिनव असा दृष्टिकोन आहे.

**अर्थ** : ज्या दृष्टिकोनात विकासासंबंधीच्या विविध योजना, कार्यक्रम, प्रकल्प इत्यादींचे एकीकरण करण्यात येते त्यास एकात्मिक विकास दृष्टिकोन असे म्हणतात.

या दृष्टिकोनात विकासाच्या सर्व पैलूंवर एकत्रितपणे लक्ष केंद्रीत केली जाते. त्यामध्ये एक कृती आराखडा (Plan of Action) तयार केला जातो, ज्यामध्ये पुढील ४ प्रकारच्या कृतींचा समावेश होतो.

अ) कृषी व कृषीसंलग्न व्यवसायांचे उत्पादन वाढविणे.

ब) ग्रामोद्योग, कुटिरोद्योग, हस्तोद्योग यांच्या विकासावर भर देणे.

क) ग्रामीण सेवा क्षेत्रातील घटकांचा विकास करणे.

ड) ग्रामीण भागातील श्रमिकांना कुशल बनवून त्यांची गतिशीलता वाढविणे.

या दृष्टिकोनानुसार विकास घडवून आणताना पुढील गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक असते.

अ) साधनसंपत्तीची यादी बनविणे.

ब) लाभार्थी कुटुंबाचे सर्वेक्षण करणे.

क) मनुष्यबळाचे अंदाजपत्रक तयार करणे.

ड) विकास कार्यक्रमात लोकांना सहभागी करून घेणे.

या दृष्टिकोनावर आधारलेल्या विकास कार्यक्रमात ग्रामीण भागातील स्थानिक परिस्थिती व तेथील अग्रक्रम यांच्याशी सुसंगत ठरणाऱ्या कृतींचे एकात्मिकरण (एकीकरण) केले जाते. त्यामुळे हा दृष्टिकोन ग्रामीण विकासाच्या सर्व पैलूंशी संबंधित असा आहे.

**उदाहरण:** १९७८ मध्ये भारतात केंद्र शासनाचे या दृष्टिकोनावर आधारलेला ''**एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम**'' (Integrated Rural Development Programme- IRDP) हा कार्यक्रम सुरू केला होता. या कार्यक्रमात विशिष्ट क्षेत्र, पायाभूत सुविधा, विशिष्ट समूह, मनुष्यबळ, शिक्षण–प्रशिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, निवारा, आहार वित्तपुरवठा इत्यादी संदर्भातील विकास योजनांचे एकीकरण करण्यात आले होते. ग्रामीण जनतेस अनुदानासह वित्तपुरवठा करून त्यांना रोजगार विशेषतः स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे व त्याआधारे त्यांचे उत्पन्न वाढविणे व त्यांना दारिद्र्यरेषेच्या वर आणणे हा IRDP या कार्यक्रमाचा हेतू होता.

**फायदा:** या दृष्टिकोनावर आधारलेल्या विकास कार्यक्रम हा अत्यंत व्यापक असतो. कारण त्यामध्ये ग्रामीण विकासाच्या सर्व पैलूंवर एकात्मिक स्वरूपात लक्ष दिले जाते. त्यामुळे विकास साध्य करणे शक्य होते.

**मर्यादा:** या दृष्टिकोनाची मर्यादा अशी की त्यामध्ये एकात्मिक या संज्ञेच्या अर्थाबाबत संभ्रम आहे. एकात्मिकरण (Integrated) हे विकास कार्यक्रमांचे की, विकासाविषयीच्या प्रशासकीय यंत्रणेचे असा संभ्रम पडतो. हा दृष्टिकोन ग्रामीण लोकांच्या विकासापेक्षा शहरी लोकांच्या गरजापूर्तीवर अधिक भर देणारा आहे अशी ही टीका केली जाते. भारतातील IRDP कार्यक्रमाचे मूल्यमापन करताना कांही अभ्यासकांनी एकात्मिक दृष्टिकोन हा शहरातील लोकांसाठी अधिक भाजीपाला, फळे, अंडी, दूध यांचे उत्पादन करण्यावर भर देतो. तसेच तो सहकारी शेती व सर्वसमावेश क्षेत्र विकास योजना या विकासाच्या मार्गांवरून राज्यकर्त्यांचे व विचारवंतांचे लक्ष इतरत्र वळवितो अशीही टीका केलेली आहे.

### ४.२.४ ग्रामीण विकासातील अडथळे (Obstacles to Rural Development)

ग्रामीण विकासाचे दृष्टिकोन अभ्यासल्यानंतर आता तुम्ही ग्रामीण विकासाच्या मार्गातील अडथळे समजावून घेणार आहात. औद्योगिकीकरण, नागरीकरण, भांडवलशाही इत्यादी घटकांच्या प्रभावामुळे ग्रामीण समाजाचे विघटन होऊन त्यामध्ये अनेक समस्या उद्‌भवल्या. या समस्यांचे निराकरण करून ग्रामीण समाजाचा विकास करण्याचे प्रयत्न सर्वच देशात सुरू झाले. ग्रामीण विकास कार्यक्रमांवर आजपर्यंत प्रचंड रक्कम खर्च झाली आहे. तथापि, अपेक्षेप्रमाणे ग्रामीण विकास घडून आलेला नाही. कारण ग्रामीण विकासाच्या अनेक अडथळे आणणारे अनेक घटक आहेत. या घटकांचे तीन प्रकार पाडता येतील.

अ) आर्थिक   ब) राजकी-प्रशासकीय  क) सामाजिक- सांस्कृतिक

**अ) आर्थिक घटकः (Economic Factors)**

ग्रामीण विकासात अडथळा आणणारे आर्थिक घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**१) अपुरे भांडवलः** ग्रामीण विकासात कृषी विकास करणे, ग्रामोद्योगास प्रोत्साहन देणे, ग्रामीण भागात पायाभूत सुविधा उभारणे, शिक्षण व आरोग्य सुविधा पुरविणे इत्यादी उपक्रम राबवावे लागतात आणि त्यासाठी प्रचंड भांडवल लागते. तथापि, अनेक राष्ट्रांकडे विशेषतः विकसनशील राष्ट्रांकडे पुरेसे भांडवल नाही. त्यामुळे ग्रामीण विकासात अडथळे येतात. कारणे भांडवला अभावी विकास कार्यक्रम पूर्ण करणे शक्य होत नाही.

**२) नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपूरा वापरः** ग्रामीण भागात जमीन, पाणी, वने, खनीजे, पर्वत, समुद्रकिनारा, जीवसृष्टी इत्यादी नैसर्गिक साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. पण या साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर केला जात नाही. कांहीवेळा या साधनसंपत्तीचा आंधळेपणाने दुरूपयोगही केला जातो. अनेक देशात हजारो हेक्टर्स जमीन पडीक आहे, अनेक ठिकाणी पावसाचे पाणी अडवून न ठेवल्याने वाहून जाते. विनाकारण जंगलतोड केली जाते. सूर्यशक्तीचा वापर वीजनिर्मितीसाठी केला जात नाही. अशाप्रकारे नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेसा वापर न केल्याने ग्रामीण विकासात अडथळे येतात.

**३) विकासेत्तर कामावर अधिक खर्चः** ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत विकास कामापेक्षा विकासेत्तर कामावर म्हणजे सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, इमारती, वाहने, कर्जावरील व्याज, अनुदान, ऑडीट खर्च इत्यादीवर अधिक खर्च केला जातो. त्यामुळे विकास कामासाठी पुरेसा पैसा मिळत नाही व विकासात अडथळे येतात.

**ब) राजकीय-प्रशासकीय घटक (Political- Administrative Factors)**

कांही राजकीय-प्रशासकीय घटकही ग्रामीण विकासात अडथळे आणतात.

**१) सरकारी यंत्रणेची उदासिनताः** ग्रामीण विकास घडवून आणण्यामध्ये शासनाचा म्हणजेच सरकारचा पुढाकार आवश्यक आहे. ग्रामीण विकासाची धोरणे ठरवून त्यांची अंमलबजावणी करण्याची प्रमुख जबाबदारी सरकारची आहे. तथापि, सरकारी यंत्रणाही ग्रामीण विकासाविषयी उदासिन असल्याचे दिसते. सरकारी कर्मचाऱ्यांकडे ग्रामीण विकासाची तळमळ नाही. निष्ठा, त्याग, प्रामाणिकपणा, बांधिलकी इत्यादी गोष्टी त्यांच्याकडे नसल्याने ग्रामीण विकासाचे कार्यक्रम अयशस्वी होतात.

**२) भ्रष्टाचारः** ग्रामीण विकास कार्यक्रमात मोठा भ्रष्टाचार होताना दिसतो. राजकीय विकास पदाधिकारी व सरकारी नोकर हे कधी स्वतंत्रपणे तर कधी परसपरसहकार्याने ग्रामीण विकासासाठी असलेला निधी हडप करतात. विकास कामावर खर्च झाला असे खोटेच कागदोपत्री दाखवितात व तो पैसा स्वतःच्या खिशात घालतात. ग्रामीण विकासाची कांही कामे सरकार स्वयंसेवी संस्था व बिगरशासकीय संघटना यांच्यावर सोपविते. मात्र फार थोड्या संस्था हे काम प्रामाणिकपणे करतात.

बाकीच्या बहुसंख्य संस्था व संघटना ह्या ग्रामीण विकासासाठी दिलेला निधी स्वतःच हडप करतात. एकंदरीत भ्रष्टाचार हा ग्रामीण विकासातील मोठा अडथळा आहे.

**३) राजकारण :** आज राजकारणाने जीवनाच्या सर्व क्षेत्रास ग्रासलेले आहे. राजकारणी मंडळी ही विकास कामाचेही राजकारण करतात. सरकारने आखलेल्या चांगल्या विकास योजनांनाही विरोधी राजकीय मंडळी केवळ विरोधासाठी विरोध करतात. ग्रामीण भागात राजकीय गटतट असून ते परस्परांच्या विरोधात सतत उभे असतात. धर्म, जात, प्रांत, भाषा इत्यादीवर आधारलेले राजकारण त्यांच्याकडून केले जाते. ग्रामीण नेतृत्वदेखील विकासाकडे दुर्लक्ष करून केवळ सत्ता व संपत्ती मिळविण्याच्या उद्देशाने प्रयत्न करताना दिसते. असे हे संकुचित व स्वार्थी नेतृत्व ग्रामीण विकासातील मोठाच अडथळा ठरत आहे.

**क) सामाजिक–सांस्कृतिक घटक (Socio-Cultural Factors)**

आर्थिक, राजकीय व प्रशासकीय घटकांप्रमाणेच कांही सामाजिक व सांस्कृतिक घटकही ग्रामीण विकासात अडथळा ठरतात. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**१) लोकसंख्या वृद्धी :** सतत होणारी लोकसंख्यावृद्धी हा ग्रामीण विकासातील मोठा अडथळा आहे. बहुसंख्य विकसनशील देशांची लोकसंख्या सतत वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे विकासाची गती मंद राहाते. कारण वाढत्या लोकसंख्येच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी सरकारला सतत धडपडावे लागते. त्यामुळे विकास कामासाठी पुरेसा पैसा शिल्लक राहात नाही. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा यासंदर्भात कितीही योजना राबविल्या तरी वाढत्या लोकसंख्येमुळे त्या अपुऱ्याच पडतात. त्यामुळे विकास प्रक्रिया 'जैसे थे' या अवस्थेत राहाते. कितीही विकास केला तरी त्याची फळे वाढत्या लोकसंख्येच्या पदरात पडत नाहीत. थोडक्यात वाढत्या लोकसंख्येमुळे विकासाची प्रक्रिया गतिमान होत नाही.

**२) निम्न दर्जाची मानवी साधनसंपत्ती :** विकास घडवून आणण्यासाठी भांडवल व नैसर्गिक साधनसंपत्ती जसी आवश्यक आहे तशीच उच्च दर्जाची मानवी साधनसंपत्ती (मनुष्यबळ) ही आवश्यक आहे. तथापि, ग्रामीण भागातील मनुष्यबळ वा मानवी साधनसंपत्ती ही अत्यंत निम्न दर्जाची (गुणवत्तेची) आहे. बहुसंख्य ग्रामीण लोक हे अडाणी, अंधश्रद्ध, रुढीप्रिय, दैववादी, आळसी, दरिद्री, आहेत. त्यांच्याकडे वैज्ञानिक–तांत्रिक ज्ञान व कौशल्ये नाहीत. त्यांच्याकडे सुधारणावादी वा प्रगतीशील असा दृष्टिकोन नाही. हे लोक परंपरागत जीवनपद्धती सोडण्यास नाखूष आहेत. स्वतः पुढाकार घेऊन आपला व आपल्या समाजाचा विकास घडवून आणावा अशी दृष्टी त्यांच्याकडे नाही. त्यामुळे ग्रामीण विकासात अडथळे येतात.

**३) लोकसहभागाचा अभाव :** ग्रामीण विकासात लोकांचा सहभाग असावा लागतो. तरच विकास घडून येतो. दुर्दैवाने बहुसंख्य ग्रामीण लोक हे विकास प्रक्रियेत सहभाग घेत नाहीत. विकास करणे ही शासनाची जबाबदारी आहे असे मानून ते विकास कार्यक्रमापासून दूर राहतात १९५२ मध्ये भारतात सुरू केलेला समुदाय विकास कार्यक्रम हा केवळ लोकांनी अपेक्षित सहभाग न दिल्याने अपयशी ठरला. थोडक्यात विकासात लोकांचा सहभाग नसणे हा एक मोठा अडथळा आहे.

**४) समाजसेवकांचा अभाव** : ग्रामीण विकासात सरकारबरोबर समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते, सेवाभावी संस्था व संघटना इत्यादींचाही सहभाग असावा लागतो. तळमळीने व निष्ठेने कार्य करणाऱ्या सेवकांची व संस्थांची एक फळीच असावी लागते. पण आज अशा सेवकांचा व संस्थांचा मोठा अभाव जाणवतो. ग्रामीण विकासासाठी कार्य करणारे सेवक व संस्था यांची संख्या मोठी आहे. पण त्यातील बहुसंख्य स्वार्थी आहेत. ग्रामीण विकासाची तळमळ व निष्ठा त्यांच्याकडे नाही. समाजसेवा हा त्यांच्यासाठी स्वार्थ साधण्याचा धंदा बनला आहे. त्यामुळे विकासाचा निधी विकासावर खर्च न करता हडप करण्याचेच काम त्या करताना दिसतात.

**५) परिवर्तन विरोधी मनोवृत्ती :** विकास होण्यासाठी लोक हे परिवर्तनशील व विकासाभिमुख असावे लागतात. परंतु बहुसंख्य ग्रामीण लोक हे तसे नाहीत. ते रूढीप्रिय व परंपरावादी आहेत. जुने ते सोने मानून ते जीवन जगू इच्छितात. त्यामुळे आपल्या परंपरागत जीवनात परिवर्तन करण्यास त्यांचा विरोध असतो. जुन्या रूढी व परंपरांना ते चिकटून राहतात व नवीन ज्ञान, मूल्ये, कल्पना, विचार यांना विरोध करतात. लोकांची ही परिवर्तन विरोधी मनोवृत्ती ग्रामीण विकासातील मोठाच अडथळा आहे.

**★ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

प्रश्न – योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

१) ग्रामीण विकासात ............. सहभाग आवश्यक ठरतो.

अ) लोकांचा  ब) राजकारण्यांचा  क) तज्ज्ञांचा  ड) प्रशासकांचा

२) ग्रामीण विकासात ................ पुढाकार घ्यावा लागतो.

अ) तज्ज्ञाला  ब) लोकांना  क) ठेकेदारांना  ड) शासनाला

३) ग्रामीण विकासाचे अंतिम उद्दिष्ट .............. आहेत.

अ) पायाभूत सुविधा  ब) सरकार  क) लोक  ड) प्रशासक

४) समुदाय विकास कार्यक्रम ............. साली सुरू केला.

अ) १९५०  ब) १९५२  क) १९५५  ड) १९६०

५) ............... हा कार्यक्रम क्षेत्र विकास दृष्टिकोनाचे उदाहरण आहे.

अ) MFLA  ब) IRDP  क) DPAP  ड) CDP

## ४.३ सारांश

या घटकात तुम्ही सर्वप्रथम ग्रामीण विकासाची संकल्पना समजावून घेतलेली आहे. त्यासाठी तुम्ही प्रथम ग्रामीण विकासाचा अर्थ व कांही व्याख्या अभ्यासलेल्या आहेत. तसेच ग्रामीण विकासाची वैशिष्ट्येही अभ्यासलेली आहेत. १) ग्रामीण विकास ही सार्वत्रिक प्रक्रिया आहे. २) या प्रक्रियेत ग्रामीण समाजाचा सर्वांगिण विकास अभिप्रेत आहे. ३) या प्रक्रियेत विशिष्ट समूहांच्या

विकासावर विशेष भर दिला जातो. ४) या प्रक्रियेत लोकांचा सहभाग अपेक्षित आहे. ५) ग्रामीण विकास निरंतरपणे चालणारी प्रक्रिया आहे. ६) या प्रक्रियेत शासनाचा पुढाकार अभिप्रेत आहे. यानंतर तुम्ही ग्रामीण विकासाची पुढील उद्दिष्टे अभ्यासली आहेत. १) दारिद्र्य निर्मूलन, २) शिक्षण प्रसार, ३) आरोग्य सेवा पुरविणे, ४) पायाभूत सुविधा निर्माण करणे, ५) पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे, ६) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, ७) विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर करणे, ६) संस्था-संघटना स्थापन करणे इत्यादी. यानंतर तुम्ही ग्रामीण विकासाचे ५ दृष्टिकोन समजावून घेतलेले आहेत. १) बहुउद्देशीय दृष्टिकोन, २) किमान पॅकेज दृष्टिकोन, ३) लक्ष्य समूह दृष्टिकोन, ४) क्षेत्र विकास दृष्टिकोन, ५) एकात्मिक दृष्टिकोन. सर्वात शेवटी तुम्ही ग्रामीण विकासातील पुढील अडथळे समफजावून घेतलेले आहेत. हे घटक आर्थिक, सामाजिक-सांस्कृतिक, राजकीय-प्रशासकीय अशा तीन प्रकारचे आहेत.

## ४.४ स्मरणार्थ संज्ञा

- **विकास :** मानवी कल्याणाच्या दृष्टिने जीवनाच्या सर्व क्षेत्रात अपेक्षित परिवर्तन घडून येणे.
- **ग्रामीण विकास :** ग्रामीण लोकांच्या कल्याणाच्या दृष्टिने त्यांच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रात अपेक्षित परिवर्तन घडून येणे.
- **जीवनमान उंचावणे :** राहणीमान सुधारणे
- **निरंतर प्रक्रिया :** सतत चालणारी प्रक्रिया
- **सार्वत्रिक :** जगात सर्वत्र अस्तित्वात असणे.
- **पायाभूत सुविधा :** रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य, संप्रेषण इत्यादीविषयक सुविधा
- **बहुउद्देशीय दृष्टिकोन :** अनेक उद्देश एकाच वेळी साध्य करण्याचा दृष्टिकोन
- **किमान पॅकेज :** कमीत कमी पॅकेज
- **एकात्मिक :** एकीकरणात्मक
- **जलसिंचन :** शेतीला कृत्रिमरित्या पाणी पुरवठा करणे
- **मधुमक्षिका पालन :** मधमाशा पालन
- **वराहपालन :** डुक्करपालन
- **अपर्याप्त भांडवल :** अपुरे भांडवल
- **दुर्बल घटक :** आर्थिक-सामाजिकदृष्ट्या कमकुवत (वंचित) लोक/समूह.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) अ  २) ड  ३) क  ४) ब  ५) क

## ४.६ स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या.**

१) ग्रामीण विकासाची संकल्पना स्पष्ट करा.

२) ग्रामीण विकासाची व्याख्या देऊन त्याची उद्दिष्टे विशद करा.

३) ग्रामीण विकासाच्या विविध दृष्टिकोनांची चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१) ग्रामीण विकासाचा अर्थ

२) ग्रामीण विकासाची उद्दिष्टे

३) ग्रामीण विकासातील अडथळे

४) ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


- ग्रामीण समाजशास्त्र (२०१५), प्रा. चंद्रकांत खंडागळे, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.
- Management and Planning of Rural Development in India (1989), Chamanlal Kashyap, Ashish Publishing House, New Delhi.
- Rural Development in India (1998), K. Venkata Reddy, Himalaya Publishing, House.


❑❑❑

## सत्र ६ : घटक १

# भारतातील ग्रामीण समाजशास्त्र

**(Rural Sociology in India)**

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ भारतातील ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास

१.२.२ भारतात ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व

१.२.३ भारतातील खेड्यांचा अभ्यास : एम. एन. श्रीनिवास, एस. सी. दुबे आणि आंद्रे बेताई

१.३ सारांश

१.४ स्मरणार्थ संज्ञा

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## **१.० उद्दिष्टे** (Objectives):

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास-

- भारतातील ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास स्पष्ट करता येईल.
- भारतात ग्रामीण समाजशास्त्राचे काय महत्त्व आहे हे सांगता येईल.
- एम. एन. श्रीनिवास, एस. सी. दुबे व आंद्रे बेताई यांनी केलेला खेड्यांचा अभ्यास समजावून घेता येईल.

## **१.१ प्रास्ताविक**

मागील सत्रात ग्रामीण समाजशास्त्र या समाजशास्त्राच्या शाखेचे स्वरूप तुम्ही समजावून घेतलेले आहे. आता या सत्रात तुम्ही भारतातील ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप समजावून घेणार आहात. भारत हा खेड्याचा देश आहे. कारण आजही सुमारे ६८% लोकसंख्या खेड्यात म्हणजेच ग्रामीण समाजात वास्तव्य करीत आहे. त्यामुळे भारतीय समाजाचा अभ्यास म्हणजे ग्रामीण समाजाचा

अभ्यास असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही. भारतीय समाजाचे यथार्थ स्वरूप समजावून घेण्यासाठी येथील ग्रामीण समाजाची संरचना व त्यामध्ये होणारे परिवर्तन अभ्यासणे अनिवार्य ठरते. म्हणूनच भारतात ग्रामीण समाजाचा सर्वांगिण अभ्यास करणाऱ्या ग्रामीण समाजशास्त्राची नितांत गरज आहे. त्यादृष्टीने या पहिल्या घटकात तुम्ही भारतातील ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास, त्याचे महत्त्व, तसेच कांही मान्यवर समाजशास्त्रज्ञांनी केलेला खेड्याचा अभ्यास इत्यादी बाबी अभ्यासणार आहात.

## १.२ विषय विवेचन

प्रास्ताविकेत नमूद केल्याप्रमाणे या पहिल्या घटकात तुम्ही भारतातील ग्रामीण समाजशास्त्र समजावून घेणार आहात. विवेचनाच्यादृष्टीने या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात तुम्ही भारतातील ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास, दुसऱ्या विभागात भारतात ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व आणि तिसऱ्या विभागात एम. एन. श्रीनिवास, एस. सी. दुबे व आंद्रे बेताई या तीन समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या खेड्यांचा अभ्यास समजावून घेणार आहात.

### १.२.१ भारतात ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास (Origion and Development of Rural Sociology in India)

भारत हा खेड्यांचा देश आहे. प्राचीन काळापासून भारतात खेडी आढळतात. आजदेखील सुमारे ६८ टक्के भारतीय लोकसंख्या खेड्यात राहते. त्यामुळे भारतीय समाज म्हणजे खेड्यांतील समाज म्हणजे ग्रामीण समाज असे मानले जाते. भारतातील खेड्यांच्या किंवा ग्रामीण समाजाच्या अभ्यासाची सुरुवात मात्र अलिकडील काळात म्हणजे भारतात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर झाली. तथापि, एक विज्ञान म्हणून ग्रामीण समाजशास्त्राचा उदय मात्र भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर झाला व ग्रामीण समाजाच्या अभ्यासास खऱ्या अर्थाने गती मिळाली. भारतातील ग्रामीण समाजाच्या अभ्यासाचे स्थूलमानाने दोन विभाग पाडता येतात.

अ) ब्रिटिश कालखंड ब) स्वातंत्र्योत्तर कालखंड.

**अ) ब्रिटिश कालखंड :**

पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याने भारताकडे येणारा जलमार्ग शोधून काढल्यानंतर पोर्तुगीज, डच, फ्रेंच, ब्रिटिश हे युरोपियन लोक भारतात व्यापाराच्या निमित्ताने आले. इ.स. १६०० मध्ये इंग्लंडमध्ये स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीने भारतात व्यापाराच्या निमित्ताने प्रवेश केला व पुढे येथे आपली राजकीय सत्ता प्रस्थापित केली. या सत्तेस कंपनी सरकारची राजवट म्हणून ओळखले जाते. पुढे १८५७ च्या उठावानंतर कंपनी सरकार बरखास्त होऊन भारतावर इंग्लंडच्या राणीची सत्ता प्रस्थापित झाली. १९४७ पर्यंत ही सत्ता टिकून होती. या परकीय सत्तेच्या कालखंडात भारतात खेड्यांच्या अभ्यासास प्रारंभ झाला. या अभ्यासाचे स्वरूप पुढील मुद्यांच्या आधारे समजावून घेता येईल.

**१) राजकीय उद्दिष्ट :** आपले राजकीय उद्दिष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने ईस्ट इंडिया कंपनीने १६८९ पासून भारतातील ग्रामीण समाजाचे म्हणजे खेड्यांचे अध्ययन करण्यास प्रारंभ केला. व्यापार वाढीबरोबरच भारतीय लोक व भारतीय भूमीवर वर्चस्व प्रस्थापित करणे, जमीन महसूल (शेतसारा)

वाढविणे या उद्देशाने कंपनी सरकारमधील कांही इंग्रज अधिकाऱ्यांनी भारतीय खेड्यातील समाजजीवन व शेतजमीनविषयक संबंध जाणून घेण्यास सुरुवात केली.

२) **ग्रामीण जीवनाविषयी जिज्ञासा :** कांही काळानंतर परकीय असलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांना व विद्वानांना भारतीय ग्रामीण समाजातील जीवन जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली. या जिज्ञासेपोटी त्यांनी येथील खेड्यांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. इ.स. १८०० मध्ये **डॉ. फ्रान्सिस बुखानन** या विद्वानाने तत्कालीन मद्रास, म्हैसूर, बंगाल व बिहार या प्रांतातील खेड्यांची पाहणी केली व खेड्यातील जीवनाविषयीचा एक अहवाल तयार केला. **सर हेन्री मेन** यांनी १८८१ मध्ये 'व्हिलेज कम्युनिटीज इन दि ईस्ट अँड वेस्ट' हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथात भारताबरोबरच इतर पौर्वात्य व पाश्चिमात्त्य समाजातील खेड्यांचा तुलनात्मक अभ्यास अंतर्भूत आहे. १८९६ मध्ये **बादेन पॉवेल बी. एच.** यांनी 'दि इंडियन व्हिलेज कम्युनिटी' हा ग्रंथ लिहून त्यामध्ये भारतातील ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकला.

३) **आर्थिक दृष्टिकोन :** विसाव्या शतकापासून अनेक ब्रिटिश विद्वानांनी आर्थिक दृष्टिकोनातून भारतातील ग्रामीण समाजाचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. या अभ्यासात ग्रामीण भागातील कृषी व्यवसाय, जमिनविषयक संबंध, कृषीक्षेत्रातील समस्या व अडचणी यांचे विवेचन केलेले आढळते. पहिल्या महायुद्धाचे भारतीय खेड्यांवरही अनेक दुष्परिणाम झाले. खेड्यांचे विघटन होऊ लागले. ग्रामीण लोक शहरांकडे स्थलांतर करू लागले. लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला. परिणामी ब्रिटिश सरकारला खेड्यातील स्थितीकडे लक्ष देणे भाग पडले. १९२६ मध्ये ब्रिटिश सरकारने या आपत्तीचा अभ्यास करण्यासाठी पहिली रॉयल समिती स्थापन केली. या समितीने ग्रामीण लोकांच्या दुरावस्थेचे अध्ययन केले.

४) **स्वातंत्र्य चळवळ :** १८८५ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेने हळूहळू स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ सुरू केली. १९२० नंतर या चळवळीची सूत्रे महात्मा गांधींकडे आली. त्यांनी या चळवळीत ग्रामीण जनतेसही सहभागी करून घेतले. त्यानिमित्ताने ग्रामीण जनतेच्या प्रश्नांकडे सुशिक्षित वर्गाचे लक्ष गेले. आणि अनेक विचारवंतांनी खेड्यातील जीवनावर अभ्यासपूर्ण लेख लिहिले. याच काळात शेतकऱ्यांची अनेक आंदोलने (चंपारण्य चळवळ, खेडा सत्याग्रह, बार्डोली सत्याग्रह इ.) सुरू झाली. परिणामी अनेक विद्वानांनी शेतकऱ्यांचे व शेतीव्यवसायाचे प्रश्न यावर अभ्यासपूर्ण लेखन केले. यातून ग्रामीण समाजाच्या अभ्यासास मोठी चालना मिळाली.

५) **खेड्यांच्या पाहण्या :** १९३० नंतर अनेक अभ्यासक व संस्थांनी भारतातील खेड्यांच्या पाहण्या (survey) करण्यास सुरुवात केली. उदा. १९३५ मध्ये बंगालमधील आर्थिक संशोधन मंडळाने अनेक खेड्यांच्या पाहण्या केल्या. विश्वभारती ग्रामीण पुनर्रचना समितीने बंगालमधील शांतिनिकेतनच्या जवळपास असलेल्या कांही खेड्यांच्या पाहण्या केल्या. १९३२ मध्ये **प्रा. भट्टाचार्य व प्रा. नाटेसन** यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने बंगालमधील ग्रामीण जीवनाची माहिती संकलीत करून ती प्रसिद्ध केली. मद्रास विद्यापीठातील प्राध्यापक थॉमस व प्राध्यापक रामकृष्ण यांनी दक्षिण भारतातील खेड्यांच्या जीवनाचा आढावा घेतला. **श्री. टी. के. शंकर मेनन** या लेखकाने खेड्यांची माहिती गोळा केली व ती कोचीन सरकारने प्रसिद्ध केली. गुजरात विद्यापीठातील **प्रा. जे. सी. कुमारप्पा** यांनी गुजरातमधील मातर तालुक्याची आर्थिक पाहाणी केली. पुण्यातील गोखले

राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संशोधन संस्थेने महाराष्ट्रातील खेड्यांच्या पाहण्या केल्या. कलकत्त्यातील भारतीय संख्याशास्त्र या संस्थेने १९४३ मध्ये पडलेल्या दुष्काळाचा बंगालमधील खेड्यांवर पडलेला प्रभाव अभ्यासला.

अशाप्रकारे ब्रिटिश राजवटीच्या कालखंडात भारतात ग्रामीण समाजाच्या अभ्यासास सुरुवात झाली. तथापि, हा अभ्यास एकांगी स्वरूपाचा होता. कारण त्यामध्ये आर्थिक अंगावरच जास्त भर दिलेला आढळतो. दुसरी गोष्ट म्हणजे हा अभ्यास वैज्ञानिक स्वरूपाचा नव्हता. कारण विशिष्ट हेतूने हा अभ्यास केला गेला. अभ्यासकांनी वैज्ञानिक पद्धती व तंत्रे यांचा फारसा वापर या अभ्यासामध्ये केलेला नव्हता. असे असले तरी ग्रामीण समाजाच्या अभ्यासाची मुहूर्तमेढ या अभ्यासाद्वारे रोवली गेली हे नाकारता येत नाही.

**ब) स्वातंत्र्योत्तर कालखंड**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात खऱ्या अर्थाने ग्रामीण समाजाच्या वैज्ञानिक अभ्यासास सुरुवात झाली. या कालखंडातील ग्रामीण समाजशास्त्राच्या विकासाचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१) सामाजिक दृष्टिकोनावर भर :** स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण समाजाचा बहुतांशी अभ्यास हा आर्थिक दृष्टिकोनातून झालेला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र अनेक अभ्यासकांनी विशेषतः समाजशास्त्रज्ञांनी भारतातील ग्रामीण समाजाचा अभ्यास सामाजिक दृष्टिकोनातून करण्यास सुरुवात केली. ग्रामीण समाज, ग्रामीण सामाजिक संबंध, ग्रामीण सामाजिक संस्था व संघटना, ग्रामीण सामाजिक समस्या, नागरीकरणाचा ग्रामीण समाजावर पडणारा प्रभाव इत्यादी सामाजिक बाबींचे मोठ्या प्रमाणावर अध्ययन करण्यास प्रारंभ झाला.

**२) सामाजिक मानवशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातील बदल :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सामाजिक मानवशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनात मोठा बदल झाला. पूर्वी सामाजिक मानवशास्त्रज्ञ हे केवळ आदिम समाजाचा अभ्यास करीत होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र ते ग्रामीण व नागर समाजाच्या अभ्यासाकडे वळले. अनेक सामाजिक मानवशास्त्रज्ञांनी विविध खेड्यांचा अभ्यास करून तेथील समाज जीवनाविषयीची वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध करून दिली. यामध्ये डॉ. एस. सी. दुबे, रामकृष्ण मुखर्जी, डॉ. एम. एन. श्रीनिवास, डी. एन. मजुमदार, डॉ. इरावती कर्वे इत्यादींचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. भारतातील ग्रामीण समाजशास्त्रज्ञ व सामाजिक मानवशास्त्रज्ञ यांनी ग्रामीण समाजाच्या अभ्यासाकडे लक्ष दिल्याने ग्रामीण समाजाच्या संदर्भातील सामाजिक संशोधनास मोठी चालना मिळाली. आणि ग्रामीण समाजशास्त्राच्या विकासास गती मिळाली.

**३) विपूल ग्रंथलेखन :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातील ग्रामीण समाजावरील ग्रंथ मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध झाले. त्यापैकी कांही प्रमुख ग्रंथ पुढलप्रमाणे आहेत–

- **डॉ. एस. सी. दुबे** यांनी शमीरपेठ या खेड्याचा अभ्यास करून १९५५ मध्ये 'इंडियन व्हिलेज' हा ग्रंथ प्रकाशित केला.

- **डॉ. एस. सी. दुबे** यांनी समुदाय विकास कार्यक्रमाचा ग्रामीण समाजावर पडलेला प्रभाव अभ्यासून १९५८ मध्ये 'इंडियाज चेंजिंग व्हिलेजेस' हा ग्रंथ प्रकाशित केला.
- **डॉ. एम. एन. श्रीनिवास** यांनी म्हैसूर जवळील खेड्यातील 'रामपूरा' या खेड्याचा अभ्यास करून त्यावर आधारित 'दि रिमेंबर्ड व्हिलेज' हा ग्रंथ १९७६ मध्ये प्रकाशित केला.

तसेच १९६६ मध्ये 'सोशियल चेंज इन मॉडर्न इंडिया' हा ग्रंथ त्यांनी प्रकाशित करून त्यामध्ये ग्रामीण सामाजिक परिवर्तनाची चर्चा केलेली आहे.

- **रामकृष्ण मुखर्जी** यांनी बंगालमधील सहा खेड्यांचा अभ्यास करून 'सिक्स व्हिलेजेस इन बेंगाल' हा ग्रंथ प्रसिद्ध केला.
- **एफ. जी. बेली** यांनी 'कास्ट अँड इकॉनॉमिक फ्रंटायर्स' हा ग्रंथ प्रकाशित करून त्यामध्ये जातीचे खेड्यात कसे प्राबल्य आहे हे विशद केले.
- **डॉ. डी. एन. मजुमदार** यांनी लखनौजवळील 'मोहन' नावाच्या खेड्याची पाहणी करून 'कास्ट अँड कम्युनिकेशन इन ॲन इंडियन व्हिलेज' हा ग्रंथ प्रकाशित केला.
- **डॉ. बी. आर. चौहान** यांनी 'ए व्हिलेज इन राजस्थान' हा ग्रंथ प्रकाशित केला.
- **डॉ. जी. चटोपाध्याय** यांनी पश्चिम बंगालमधील 'रंजना' या खेड्याचे अध्ययन करून 'रंजना : ए व्हिलेज इन वेस्ट बेंगाल' हा ग्रंथ १९६४ मध्ये प्रकाशित केला.
- **डॉ. के. ईश्वरन** यांनी 'शिवापूर' या खेड्याचा अभ्यास करून 'शिवापूर : ए साऊथ इंडियन व्हिलेज' हा ग्रंथ प्रकाशित केला.
- **डॉ. एम. एस. ए. राव** यांनी दिल्ली सभोवतालच्या खेड्यांचा अभ्यास करून १९७० मध्ये 'अर्बनायझेशन अँड सोशियल चेंज' हा ग्रंथ लिहिला.
- **डॉ. ए. आर. देसाई** यांनी 'रुरल सोशियॉलॉजी इन इंडिया' हा संपादीत ग्रंथ १९६९ मध्ये प्रकाशित केला. या ग्रंथात दुबे, श्रीनिवास, अट्टल, रामकृष्ण मुखर्जी इत्यादींचे ग्रामीण जीवनावरील लेख समाविष्ट आहेत.
- **डॉ. जी. एस. घुर्ये** यांनी पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील ११० खेड्यांचा अभ्यास करून 'अफ्टर ए सेंच्युरी अँड ए क्वार्टर' हा ग्रंथ प्रकाशित केला. तसेच ग्रामीण व नागर समाजाचा तुलनात्मक अभ्यास करणारा 'ॲनाटॉमी ऑफ ए रुर्अर्बन कम्युनिटी' हा ग्रंथ १९६३ मध्ये प्रकाशित केला.
- **आंद्रे बेताई** यांनी 'श्रीपूरम' (तामिळनाडू) या खेड्याचा अभ्यास करून १९६६ मध्ये 'कास्ट, क्लास अँड पावर' हा ग्रंथ प्रसिद्ध केला.

वरील प्रमुख ग्रंथांशिवाय विविध अभ्यासकांनी ग्रामीण जीवनाच्या विविध अंगांवर प्रकाश टाकणारे लेख लिहून ग्रामीण समाजशास्त्राच्या विकासात मोलाचे योगदान दिले.

**४) संकल्पनांचे विश्लेषण :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय ग्रामीण समाजाच्या अध्ययनासंदर्भात कांही नवीन संकल्पना मांडून त्यांचे विश्लेषण करणे सुरू झाले. उदा. डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी संस्कृतीकरण, पाश्चिमात्त्यकरण व प्रभुत्त्वशाली जात या तीन संकल्पना मांडल्या. या तीन संकल्पनांचे विश्लेषण करण्याचे कार्य इतर अनेक समाजशास्त्रज्ञांनी केले. त्यातून ग्रामीण समाजशास्त्राच्या विकासास मोठा हातभार लागला. तसेच डॉ. डी. एन. मजुमदार यांनी ब्राह्मण जात इतर जातीशी कशी तादात्म्य पावत आहे हे स्पष्ट करण्यासाठी वि-संस्कृतीकरण (De-Sanskritization) ही संकल्पना मांडली.

**★ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. ............... उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीने खेड्यांच्या अभ्यासास सुरुवात केली.

अ) आर्थिक ब) सामाजिक क) शैक्षणिक ड) राजकीय

२. ब्रिटिश सरकारने पहिली रॉयल समिती ........... साली स्थापन केली.

अ) १९२० ब) १९२२ क) १९२६ ड) १९३०

३. पुण्यातील ................ राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेने महाराष्ट्रातील खेड्यांच्या पाहण्या केल्या.

अ) टिळक ब) गोखले क) आगरकर ड) भांडारकर

४. मोहन खेड्याची पाहणी ............. यांनी केली.

अ) श्रीनिवास ब) दुबे क) के. ईश्वरन ड) डी. एन. मुजुमदार

५. डॉ. के. ईश्वरन यांनी ............ खेड्याचा अभ्यास केला.

अ) शिवापूर ब) शमीरपेठ क) रामपूरा ड) श्रीपूरम

### **१.२.२ भारतात ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व** (Importance of Rural Sociology in India)

भारतातील ग्रामीण समाजाचा उदय व विकास कसा झाला हे अभ्यासल्यानंतर आता तुम्ही भारतात ग्रामीण समाजाच्या (खेड्यांच्या) अभ्यासाचे म्हणजेच ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व किंवा उपयुक्तता काय आहे अथवा अशा अभ्यासाची गरज किंवा आवश्यकता काय आहे हे समजून घेणार आहात. भारतातील ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) ग्रामीण समाज** (Rural Society) : भारतात ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे तसेच तो आवश्यकही आहे. कारण भारतीय समाज हा ग्रामीण समाज म्हणून ओळखला जातो. कारण भारतात २०११ च्या जनगणनेनुसार ६३८५९६ इतकी खेडी असून त्यांमध्ये भारतीय लोकसंख्येच्या सुमारे ६८ टक्के इतकी लोकसंख्या राहाते. अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया इत्यादी विकसित राष्ट्रांच्या तुलनेत भारतात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण खूपच मोठे आहे. स्वातंत्र्य

लढ्याच्या वेळी महात्मा गांधी म्हणत की खरा भारत हा खेड्यांमध्ये राहातो. त्यामुळे भारतीय समाजाचे वास्तविक स्वरूप समजावून घ्यावयाचे असेल तर आपणास ग्रामीण समाजाचा अभ्यास करणे आवश्यकच ठरते. थोडक्यात भारतातील बहुसंख्यांक लोक ग्रामीण समाजात वास्तव्य करीत असल्याने ग्रामीण समाजाच्या अभ्यासास आपोआपच महत्त्व प्राप्त होते.

**२) ग्रामीण समाजातील विविधता** (Diversity in Rural Society) : भारतात ग्रामीण समाजाच्या अभ्यासास महत्त्व असण्याचे दुसरे कारण म्हणजे या समाजात मोठी विविधता आहे. ही विविधता जीवनाच्या सर्वच क्षेत्रात (जसे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक इत्यादी) आहे. आज ग्रामीण समाजात स्थिर शेती, बागायती शेती, व्यापार, उद्योग करणारे प्रगत अवस्थेतील लोक जसे आहेत तसेच अन्नसंकलन, शिकार, पशुपालन, स्थानांतरीत शेती, हस्तव्यवसाय करणारे अप्रगत अवस्थेतील लोकही आहेत. भारतीय खेड्यांमध्ये हिंदुधर्माचे लोक बहुसंख्यांक आहेत तर इस्लाम, ख्रिस्ती, जैन, बौद्ध, शीख इत्यादी धर्माचे लोक अल्पसंख्यांक आहेत. याशिवाय या प्रत्येक धर्मात अनेक पंथ-उपपंथ, संप्रदाय-उपसंप्रदाय आहेत आणि त्या प्रत्येकाच्या धार्मिक श्रद्धा आणि विधी वेगवेगळ्या आहेत. हिंदुधर्मीय लोक हे अनेक जाती व पोटजातीत विभागले असून प्रत्येक जातीची व पोटजातीची जीवनपद्धती किंवा जीवनशैली ही वेगवेगळी आहे. हिंदुंच्या संपर्कने इतर धर्मांच्या लोकातही जातीसदृश्य स्तररचना निर्माण झालेली आहे. याबरोबरच ग्रामीण भागात भाषा भिन्नताही मोठ्या प्रमाणावर आहे. वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या भाषा व बोली (dialects) बोलल्या जातात. अशाप्रकारे भारतीय ग्रामीण समाजात आर्थिक, धार्मिक, जातीय भाषिक, सांस्कृतिक विविधता मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे भारतीय ग्रामीण समाजाचे स्वरूप अत्यंत संमिश्र असे आहे. ही विविधता किंवा संमिश्रता अभ्यासल्याशिवाय भारतीय समाजाचे वास्तविक स्वरूप समजूच शकत नाही. त्यामुळे ग्रामीण समाजाचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

**३) भारतीय संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन :** भारतातील ग्रामीण समाजाच्या अभ्यासाचे आणखीन एक महत्त्वाचे कारण म्हणजे या समाजाने भारतीय संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन करण्यात मोठे योगदान दिलेले आहे. भारतीय समाजाच्या इतिहासाचे अवलोकन करता आपल्या हे लक्षात येते की, या समाजावर अनेक परकीय लोकांनी (ग्रीक, हुण, मंगोलियन, मोगल, इंग्रज इ.) आक्रमणे केली. येथे वेगवेगळ्या घराण्यांची राजकीय सत्ता आली आणि गेली. या दरम्यान भारतीय समाजात मोठी उलथापालथ झाली. तरीही भारतीय समाजाची संस्कृती या उलथापालथीत नष्ट न होता टिकून राहिली. याचे फार मोठे श्रेय भारतातील ग्रामीण समाजास व त्यातील सामाजिक संस्थांना (उदा. जाती, ग्रामपंचायती, एकत्र कुटुंबपद्धती) आहे. ग्रामीण समाजातील जातीव्यवस्थेवर आधारलेल्या बलुतेदारी पद्धतीने विभिन्न जातीसमूहांना एका सूत्रात बांधून ठेवले. तसेच श्रमविभाजनाची गरजही पूर्ण केली व ग्रामीण समाजास आर्थिक स्वयंपूर्णता प्राप्त करून दिली. ग्रामीण समाजात असलेल्या ग्रामपंचायतींनी गावकारभार समर्थपणे सांभाळून ग्रामीण समाजास राजकीय स्वायत्तता मिळवून दिली. संयुक्त कुटुंब पद्धती ग्रामीण व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या गरजांची पूर्तता करीत असे. अशाप्रकारे ग्रामीण समाजातील जात, ग्रामपंचायत, संयुक्त कुटुंब व या सामाजिक संस्थांनी भारतीय समाज व संस्कृती यांचे अस्तित्व व सातत्य हे आपत्तीकाळातही टिकवून ठेवले. अशा या संस्थांचे स्वरूप, रचना, कार्ये, त्यांच्यातील परिवर्तन समजावून घेण्यासाठी ग्रामीण समाजशास्त्राची गरज आहे.

**४) शेतीप्रधान व्यवस्था :** भारतीय ग्रामीण समाजातील अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था या दोन्ही व्यवस्था या शेती व्यवसायावर आधारलेल्या आहेत. आजही सुमारे ६५ टक्के लोक शेती व शेतीसंलग्न व्यवसायावरच आपला निर्वाह चालवितात. एवढेच नव्हे तर त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनही शेती व्यवसायावरच आधारलेले आहे. ग्रामीण संस्था, संघटना, समूह, रीतीरिवाज, सणउत्सव, वेशभूषा, खाण्यापिण्याच्या सवयी, श्रद्धा, मूल्ये, ध्येये, मनोवृत्ती इत्यादीवरही शेती व्यवसायाची मोठी छाप पडलेली आहे. महत्त्वाचे म्हणजे शेती व्यवसाय मात्र अप्रगत अवस्थेत आहे व त्यातूनच ग्रामीण समाजात अनेक समस्या उद्‌भवलेल्या आहेत. या समस्यांची सोडवणूक करून ग्रामीण समाजाचा विकास साध्य करण्यासाठी येथील शेतीप्रधान अर्थव्यवस्थेचा व समाजव्यवस्थेचा अभ्यास होणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी ग्रामीण समाजशास्त्राची नितांत गरज आहे.

**५) ग्रामीण समाजाचे विघटन** (Disorganization of Rural Society) : ग्रामीण समाजाच्या अभ्यासाची गरज असण्याचे आणखीन एक महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रामीण समाजाचे होणारे विघटन हे होय. ब्रिटिशपूर्वकाळात स्वयंपूर्ण व स्वायत्त असलेल्या ग्रामीण समाजाचे ब्रिटिशकाळात विघटन सुरू झाले. ब्रिटिशांनी शेतीविकासाकडे पूर्ण दुर्लक्ष केले. परिणामी शेतकरी गरीब व कर्जबाजारी बनले. ब्रिटिशांनी उभारलेल्या अवजड उद्योगांमुळे ग्रामोद्योग बंद पडून ग्रामीण कारागीर बेकार झाले. परिणामी, बेकार लोक खेडी सोडून शहरांकडे स्थलांतर करू लागले. याचा विपरित परिणाम एकत्र कुटुंबपद्धती व बलुतेदारी पद्धती यांच्यावर झाला. महत्त्वाचे म्हणजे ब्रिटिशांनी परंपरागत ग्रामपंचायतीतील अधिकार व सत्ता काढून घेतल्याने ग्रामीण समाजाची राजकीय स्वायत्तता नष्ट झाली. यातून ग्रामीण जीवनात अनेक समस्या उद्‌भवल्या. त्यामुळे या समस्यांचे निर्मूलन करणे जरूरीचे झाले आणि त्यासाठी ग्रामीण समस्यांचा वैज्ञानिक अभ्यास करून त्यावर उपाय शोधण्यासाठी ग्रामीण समाजशास्त्राची आवश्यकता भासते. म्हणून हे विज्ञान महत्त्वाचे ठरते.

**६) ग्रामीण पुनर्रचना :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या प्रगतीचे प्रयत्न सुरू झाले. भारत हा खेड्यांचा देश असल्याने खेड्यांची प्रगती झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही. याची जाणीव राज्यकर्त्यांना व समाजसुधारकांना झाली. परिणामी ग्रामीण समाजाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी अनेक योजना व कार्यक्रम सुरू करण्यात आले. ग्रामीण समाजाची पुनर्रचना करण्याचे प्रयत्न सुरू झाले. परंतु या पुनर्रचनेच्या कार्यात अज्ञान, अंधश्रद्धा, दैववादी वृत्ती, रूढीपरंपरांचा प्रभाव, धर्मांधता, जातीवाद, प्रांतवाद असे अनेक अडथळे आहेत. या अडथळ्यांचे निर्मूलन करून प्रगतीचे वारे खेड्यापाड्यांपर्यंत पोहचविणे हे एक मोठे आव्हान आहे. हे आव्हान पेलण्यासाठी ग्रामीण समाजजीवन व त्यातील प्रश्न व समस्या यांचे शास्त्रशुद्ध ज्ञान असणे गरजेचे ठरते आणि असे ज्ञान ग्रामीण समाजशास्त्र उपलब्ध करून देते. त्यामुळे या शास्त्राची नितांत गरज आहे.

**७) जागतिकीकरणाचा प्रभाव** : १९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरण जाहीर करून त्यामध्ये जागतिकीकरणाचा स्वीकार केला. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था ही जगाच्या अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. भारतीय शेतकऱ्यांना आपला शेतीमाल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विकून नफा कमाविण्याची संधी उपलब्ध झाली. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारातील स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी शेतीमालाची गुणवत्ता विकसित करणे गरजेचे आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जागतिक बँक,

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थांनी भारत सरकारवर शेतीस दिले जाणारे अनुदान बंद करण्याबाबत दबाव टाकला आहे. परिणामी लहान शेतकरी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत टिकून राहू शकत नाही. आज अनेक शेतकरी कर्जबाजारीपणास कंटाळून आत्महत्त्या करू लागले आहेत. विरोधकांच्या मते या आत्महत्त्यांना जागतिकीकरणाचे धोरण जबाबदार आहे. एकंदरीत जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर चांगला वाईट प्रभाव पडत आहे. या प्रभावाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी ग्रामीण समाजशास्त्राची गरज आहे.

**★ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) भारतात सुमारे ............... टक्के लोकसंख्या खेड्यात राहाते.

अ) ७५ ब) ६८ क) ६५ ड) ६०

२) भारतात ............. धर्माचे लोक बहुसंख्यांक आहेत.

अ) इस्लाम ब) ख्रिस्ती क) शीख ड) हिंदू

३) .............. पद्धतीने विभिन्न जातीसमूहांना एका सूत्रात बांधून ठेवले.

अ) कृषी ब) जाती क) बलुता ड) औद्योगिक

४) भारतीय ग्रामीण समाजातील अर्थव्यवस्था ................ व्यवसायावर आधारलेली आहे.

अ) कृषी ब) सेवा क) उद्योग ड) पशुपालन

५) ................ साली भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केला.

अ) १९९० ब) १९९१ क) १९९५ ड) १९९९

## १.२.३ भारतातील खेड्यांचा अभ्यास (Village Studies in India)

भारतातील ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास आणि या शास्त्राचे महत्त्व यांचा अभ्यास केल्यानंतर आता तुम्ही भारतातील खेड्यांचा अभ्यास समजावून घेणार आहात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक समाजशास्त्रज्ञांनी भारतातील वेगवेगळ्या खेड्यांचा अभ्यास केला. त्यापैकी कांही समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या खेड्यांच्या अभ्यासांचा निर्देश मागील १.२.२ या विभागात आपण केलेला आहेच. आता या ठिकाणी तुम्ही त्यापैकी तीन समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या खेड्यांचा अभ्यास सविस्तरपणे समजावून घेणार आहात. ते समाजशास्त्रज्ञ पुढीलप्रमाणे:–

१) डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी केलेला 'रामपूरा' खेड्याचा अभ्यास

२) डॉ. एस. सी. दुबे यांनी केलेला 'शमीरपेठ' खेड्याचा अभ्यास

३) आंद्रे बेताई यांनी केलेला 'श्रीपूरम' खेड्याचा अभ्यास.

हे तीन अभ्यास वरील क्रमाने तुम्ही समजावून घेणार आहात.

## १) डॉ. एम. एन. श्रीनिवास यांचा 'रामपूरा' खेड्याचा अभ्यास

भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. मैसूर दृसिंगाचार्य श्रीनिवास अर्थात एम. ए. श्रीनिवास (१९१६-१९९९) यांनी भारतातील ग्रामीण जीवनाचा अभ्यास करण्यासाठी तत्कालीन म्हैसूर राज्यातील (आजचे कर्नाटक राज्य) हमरस्त्यापासून दूर असलेल्या 'रामपूरा' नावाच्या खेड्याची निवड केली. ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या मदतीने १९४८ मध्ये १० महिने आणि एम. एस. विद्यापीठ बडोदाच्या मदतीने १९५२ मध्ये २ महिने असे एकूण १२ महिने (एक वर्ष) रामपूरा खेड्यात वास्तव्य केले. क्षेत्र-कार्य पद्धतीचा वापर करून त्या खेड्यातील जीवनाची माहिती संकलीत केली आणि त्या खेड्यातील समाजव्यवस्था संरचनात्मक-कार्यात्मक दृष्टिकोनातून अभ्यासली. दुर्दैवाने त्यांनी काढलेल्या टिपण्णांची (नोट्स) कागदपत्रे जळाली. तथापि, फोर्ड संस्थेच्या अनुदानातून व पार्थसारथी यांच्या मदतीने त्यांनी आधुनिक तंत्राच्या साह्याने जळीत कागदपत्रातील मजकूर मिळविला व त्याआधारे १९७६ मध्ये रामपूरा खेड्याच्या अभ्यासावर आधारलेले "A Remembered Village" हे पुस्तक प्रकाशित केले.

'रामपूरा' खेड्याचा श्रीनिवास यांचा अभ्यास पुढील मुद्यांच्या आधारे समजावून घेऊ या.

**रामपूराची संरचना :** रामपूरा ह्या खेड्याची संरचना संकीर्ण आहे. कारण त्यामध्ये १९ हिंदू जाती व मुस्लिम लोक राहातात. १९४८ मध्ये या खेड्याची लोकसंख्या १५२३ होती. त्यापैकी १२७४ इतकी लोकसंख्या ही ४ प्रमुख जातींची होती. इतर जाती अत्यल्प प्रमाणात होत्या. बहुसंख्य जाती आपला परंपरागत व्यवसाय करतात. मात्र कांही जाती परंपरागत व्यवसाय सोडून आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असणारे व्यवसाय करतात. उदा. मेंढपाळ व मासेमारी करणाऱ्या जाती शेती करताना दिसतात. शेती करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण ५०% होते. इतर व्यक्ती या ना त्या प्रकारे शेतीशी संबंधित होत्या. सुमारे १०० व्यक्ती शेतीशी संबंधित नव्हत्या. एकंदरीत कृषीप्रधानता होती.

**बलुता पद्धती :** सुतार, लोहार, धोबी, न्हावी, कुंभार या जाती शेतकरी कुटुंबाची बलुत्यात सेवा करीत व त्या मोबदल्यात शेतकरी त्यांना सुगीच्या वेळी धान्य देतात. मात्र वराहपालन करणाऱ्या जाती, तेली, मच्छिमार, टोपल्या बनविणारे, व्यापारी, अस्पृश्य व मुस्लिम हे शेतकऱ्यांची नियमित सेवा करीत नसून शेतकरी त्यांना धान्य देत नाहीत.

१९४८ मध्ये शेतकरी कुटुंबाशिवाय ३ व्यापारी कुटुंबे, ३० अस्पृश्य कुटुंबे (त्यापैकी १५ शेती करीत तर १५ हमाली करीत), ३६ मुस्लिम कुटुंबे (त्यापैकी १३ शेती करीत, ७ व्यापार करीत तर १५ कामगार होते) २ कुटुंबे शिलाई काम करीत. हिंदुंच्या आमराई असल्या तरी आंब्याचा व्यापार मात्र मुस्लिमांच्या होती होता. उन्हाळ्यात रामपूरामध्ये लाकूडतोडे, नांगरट करणारे, मेंढपाळ, विहिर खुदाई करणारे, शिकारी, मनोरंजन करणारे (उदा. गारूडी, जादूगार, बासरीवाद इ.) इत्यादी लोक बाहेरून येऊन कांही काळ वास्तव्य करतात. ब्राह्मण व लिंगायत पुरोहित (पुजारी) म्हणून काम करतात. मात्र आपापल्या जातीचेच पौरोहित्य करतात. एकमेकांच्या मंदिरात जात नाहीत.

**वस्तुविनिमय पद्धती :** रामपूरात मोठ्या प्रमाणावर पूर्वी वस्तुविनिमय पद्धती होती. आजही थोड्या फार प्रमाणात ही पद्धती टिकून असल्याचे दिसून आले. शेतकरी कुटुंबातील स्त्रिया धान्य देऊन भाजीपाला, फळे, मासे, विड्याची पाने खरेदी करीत. गावाचा सेवक व पुजारी यांना ते जोपर्यंत

त्या पदावर आहेत तोपर्यंत सेवेचा मोबदला म्हणून जमीन दिली जाते. त्या पदावरून दूर झाले की जमीन त्यांच्याकडून काढून घेतली जाते. अस्पृश्य जातींचे सेवक (नोकर) हे गावप्रमुखास व लेखपालास मदत करतो व त्या मोबदल्यात त्यास जमिनीचा तुकडा दिला जातो. धोबी, कुंभार, सुतार, लोहार, न्हावी इत्यादी बलुतेदार गावातील शेतकरी कुटुंबे आपसात वाटून घेऊन त्यांची सेवा करतात व त्याचा मोबदला म्हणून शेतकरी त्यांना धान्य व गरजेच्या इतर वस्तू देतो. शेतकरी व बलुतेदार यांच्यात घनिष्ठ व सहकार्याचे संबंध असल्याचे आढळते.

**मालक–नोकर संबंध :** रामपुरात शेतकरी व कांही व्यक्तीत मालक–नोकर संबंध होते. शेतकरी हा अशा व्यक्तीशी १ ते ३ वर्षाचा करार करून आपल्याकडे कामावर ठेवीत. त्यासाठी शेतकरी आपल्या नोकरास ॲडव्हान्सही देई. कराराचा भंग केल्यास व्याजासह ॲडव्हान्स नोकरास परत करावा लागे. १९४८ मध्ये असे ५८ नोकर होते. त्यापैकी १४ अस्पृश्य व बाकीचे इतर जातीचे होते. ब्राह्मण व लिंगायत मात्र नोकर नव्हते. मालक–नोकर संबंधात निकटता, आत्मियता होती. एखादा नोकर दीर्घकाळ सेवा करीत असेल तर शेतकरी त्यास कुटुंब सदस्यासारखेच वागवित. कांही शेतकरी स्वतः शेती न करता कुळांकडून शेती कसून घेत. शेतकरी व कुळातही निकटतेचे नाते असे.

**श्रेणीरचना :** रामपूरात विविध जातींचे लोक असून त्यांच्यात जातीप्रथेवर आधारलेली (श्रेष्ठ–कनिष्ठ भावनेवर) श्रेणी रचना दिसून आली. ब्राह्मण, लिंगायत, कुणबी (शेतकरी), गडरिये या जाती श्रेष्ठ तर इतर जाती कनिष्ठ मानल्या जात. प्रत्येक जात अंतर्विवाहाच्या नियमाचे पालन करीत होती. खाण्यापिण्याच्या नियमांच्या आधारेही श्रेष्ठ–कनिष्ठत्त्व निर्धारीत होत असे. ब्राह्मण व लिंगायत मांसाहार व मद्यपान निषिद्ध मानतात व त्याआधारे मांसाहार व मद्यपान करणाऱ्या जातींना कनिष्ठ लेखतात. गोमांस व वराहमांस खाणे निषिद्ध मानले जाते. त्यामुळे कसाई, अस्पृश्य, वराहपालन करणारे, चर्मकार, मच्छिमार यांना कनिष्ठ लेखले जाते. इतर जाती (न्हावी, धोबी, सुतार इ.) ब्राह्मणांचे व लिंगायतांचे अनुकरण करतात व अस्पृश्यांना कनिष्ठ मानून त्यांना आपल्या व्यावसायिक सेवा देणे नाकारतात. कांही जाती पुराणकथा व जातीपरंपरा याआधारे स्वतःस श्रेष्ठ मानतात. लिंगायत ब्राह्मणाच्या श्रेष्ठत्त्वास आव्हान देऊन स्वतःस श्रेष्ठ मानतात. ते शिवपूजा, शाकाहार, मद्यपान निषेध इत्यादीच्या आधारे स्वतःचे श्रेष्ठत्व दाखवून देतात. ब्राह्मण पुजाऱ्यास मोलावित नाहीत. ब्राह्मणाच्या हातून अन्नपाणी घेत नाहीत. आपल्यापेक्षा कनिष्ठ जातीशी सहभोजन घेतले जात नाही. अस्पृश्यांना नदीच्या खालच्या बाजूला पाणी भरावे लागते. ब्राह्मण, लिंगायत, कुणबी इत्यादी जाती सोडून ऊर्वरीत जाती ह्या परस्परांपासून श्रेष्ठ असल्याचा दावा करतात.

**परंपरागत राजकीय संघटन :** रामपूरामध्ये प्रभावशाली किंवा प्रबळ जात न्यायदानाचे कार्य करते. प्रबळ जातीतील सुज्ञ लोकांचे एक मंडळ असून ते गावातील भांडणतंटा सोडविते. भांडणातील दोन्ही पक्ष जे कायदेकानून मानतात त्याआधारेच न्यायदान केले जाते. म्हणून लोकदेखील न्यायालयात जाण्यापेक्षा गावातच भांडणे सोडविणे पसंत करीत. कांही भांडणे ही संबंधित जातीच्या पंचायतीकडे सोपविली जातात. जाती पंचायतीत वेगवेगळ्या गावांतील सदस्य असून ते आपल्या जातीच्या नियमानुसार न्यायदान करतात. मुस्लिम व्यक्तीदेखील गावातील प्रबळ जातीच्या सुज्ञ मंडळीकडेच आपले वाद सोडविण्यासाठी जातात.

**गावातील संरचनात्मक एकता :** गावात विविध जातीचे लोक असून त्यांच्यात श्रेष्ठ–कनिष्ठ भावनेवर आधारीत श्रेणीरचना आहे. प्रत्येक जातीत आपल्या जातीबांधवाविषयी आत्मियता आढळते. जातीजातीत संघर्षही उद्‌भवत असला तरी त्या गावातील लोकांमध्ये एकता आहे. आपल्या गावाविषयी आत्मियता आहे. त्यांच्यातील ऐक्य हे भावनिक स्वरूपाचे आहे. आपले गाव चांगले मानून इतर गावांवर टीका केली जाते. एकदा सरकारने गावातील तलावातील मासे पकडण्याचा ठेका देण्यासाठी लिलाव पुकारण्याचे ठरविले. यावेळी गावातील लोकांनी लिलावात भाग घेतला नाही व बाहेर गावच्या लोकांनाही भाग घेऊ दिला नाही. त्यामुळे सरकारला आपला निर्णय मागे घ्यावा लागला. यातून ऐक्यभावना प्रबळ असल्याचे लक्षात येते. या भावनिक ऐक्यामुळेच गावातील एखाद्या व्यक्तीने गावाबाहेर गुन्हा केला असल्यास तिला संरक्षण देण्याचे काम गाव करीत असे. जोपर्यंत फार मोठे संकट ओढावत नसे तोपर्यंत अशा गुन्हेगारास गाव लपवून ठेवीत असे. गावची ही एकता संस्कार रूपातही दिसून आली. संसर्गजन्य रोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी सर्व गाव सामूहिकपणे मारी देवीची पूजा करते. पुजाऱ्याने वाईट वर्तन केल्यास देव मंदिर सोडून जातो अशी श्रद्धा बाळगतात. गावात वंशपरंपरागत गावप्रमुख (मुखिया), लेखापाल, अस्पृश्य जातीतील गावाचा नोकर, चौकीदार हे संपूर्ण गावाचे कार्य करतात. ब्राह्मणेतरांच्या ग्रामोत्सवात ब्राह्मण, अस्पृश्य, मुसलमान असे सर्वजन सहभागी होऊन महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

**निष्कर्ष :** रामपूरा खेड्याच्या अभ्यासाच्या आधारे श्रीनिवास यांनी ग्रामीण समाजजीवनाविषयी कांही निष्कर्ष काढलेले आहेत.

१) ग्रामीण जीवनातील विविध घटकतत्त्वे उदा. अंतर्विवाहाचा नियम, खाण्यापिण्यावरील निर्बंध, विशिष्ट सांस्कृतिक परंपरा, जाती पंचायती, स्पृश्यास्पृश्यतेची कल्पना इत्यादी विविध जातींना एकमेकापासून अलग करतात. असे असले तरी या विविध जातींना एका सुत्रात बांधणारीही कांही घटकतत्त्वे विद्यमान आहेत. उदा. बलुता पद्धतीत सर्व जातींना एकत्र येण्याची संधी मिळते. जातिव्यवस्थेतील व्यावसायिक विशेषीकरण विविध जातीत परस्परावलंबन व परस्परसहकार्य निर्माण करते. सर्व जातींना शेती व्यवसाय खुला असणे ही बाब व्यावसायिक विशेषीकरण कमी करते. तसेच बिगरशेती व्यवसायातील अतिरिक्त लोकसंख्येची सोय शेती व्यवसायामुळे होते. शेतजमिनीची प्राप्ती झाल्याने गतिशीलता शक्य होते. व्यावसायिक विशेषीकरण हे प्रत्येक जातीस संपूर्ण व्यवस्थेत एक निहित स्वार्थ प्रदान करते. कारण प्रत्येक जात आपल्या व्यवसायाची कौशल्ये व गुपिते आपल्यापुरतीच मर्यादित ठेवते व ही गोष्ट प्रत्येक कुटुंबास जातीबाहेरील व्यक्तिंशी स्नेहसंबंध ठेवण्यास बाध्य करते. शेतकरी व बलुतेदार, मालक व नोकर, शेतकरी व कुळे, महाजन व कर्जदार इत्यादी व्यवस्थादेखील विविध जातींना एकत्र आणतात.

२) प्रभावी जातीतील सुज्ञ व्यक्ती ह्या गावातील संघर्ष निवारण्याचे कार्य करतात. त्या अल्पसंख्यांक जातीवर आर्थिक व राजकीय नियंत्रण ठेवतात. या सुज्ञ व्यक्ती गावातील सामाजिक व नैतिक आचारसंहितेचे संरक्षक म्हणून काम करतात. ते जातीच्या अलगतावादाचे प्रतिनिधित्व न करता गावाच्या उर्ध्वगामी एकतेचे प्रतिनिधित्व करतात.

३) खेडे/गाव हा असा समुदाय आहे की ज्यामध्ये स्वजातीनिष्ठा असली तरीही लोकांच्या मनात आपल्या समुदायाविषयीही निष्ठा असते. ग्रामसमुदायात कांही प्रथम श्रेणीचे तर कांही द्वितीय श्रेणीचे सदस्य असले तरी ते सर्व एकाच समुदायाचे सदस्य असतात.

**२) डॉ. एस. सी. दुबे यांचा खेड्याचा अभ्यास**

एम. एन. श्रीनिवास प्रमाणेच डॉ. श्याम चरण दुबे अर्थात एस. सी. दुबे (१९२२-१९९६) यांनीही भारतातील खेड्याच्या अभ्यासात महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. त्यांनी आंध्रप्रदेशातील तेलंगणा भागातील 'शमीरपेठ' या खेड्याचा अभ्यास करून त्याआधारे १९५५ मध्ये Indian Village हे पुस्तक प्रकाशित केले. पाच संशोधकांनी शमीरपेठ खेड्यातील गोळा केलेल्या तथ्यांवर हे पुस्तक आधारलेले आहे. तसेच या कार्यात दुबे यांना समाजकार्य करणाऱ्या व तांत्रिक कौशल्य असलेल्या पाच शैक्षणिक घटकांचेही सहकार्य मिळाले होते. या अभ्यासास उस्मानिया विद्यापीठातील सामाजिक सेवा विस्तार प्रकल्पाकडून अर्थसाहाय्य मिळालेले होते.

शमीरपेठ हे खेडे हैद्राबादपासून सुमारे २५ मैल अंतरावर असून त्याची त्याचेही लोकसंख्या २४९४ होती. त्यामध्ये १९ हिंदू जातीसमूह व ३४० मुस्लिम व्यक्ती होत्या. क्षेत्रीय तथ्यांच्या प्रकाशात शमीरपेठ खेड्याचे एकात्म चित्रण या पुस्तकात दुबेनी रेखाटले आहे. अर्थात या खेड्याचा अभ्यास करताना दुबेनी कोणतीही एक विशिष्ट पद्धती वापरली नाही. तथापि, या अभ्यासात त्यांनी शमीरपेठ खेडे केंव्हा वसले? ते कसे विकसित झाले? त्यामध्ये बाहेरून कोणकोणते लोक केंव्हा व का आले? इत्यादी प्रश्नांचे विवेचन करण्यासाठी ऐतिहासिक घटकांचा वापर केलेला आहे. या पुस्तकात त्यांनी ऐतिहासिक, भौगोलिक व समाजशास्त्रीय दृष्टिकोनांचा पर्याप्त वापर केलेला आहे. यासंदर्भात या पुस्तकाला प्रस्तावना लिहिणारे मॉरिस ई. ऑप्लर (Morris E Opler) म्हणतात की, जगातील विविध भागात जे कांही उत्तम समुदाय अभ्यास झालेले आहेत त्यांमध्ये दुबेंच्या या अभ्यासास मानाचे स्थान आहे. ते पुढे म्हणतात, दुबेचा हा अभ्यास मौल्यवान व आव्हानात्मक असून तो आजच्या भारतीय खेड्यांच्या संशोधनात्मक अभ्यासास निश्चितपणे मार्गदर्शक ठरणारा आहे.

डॉ. दुबेच्या या पुस्तकात भारतातील खेड्याची ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय रचना तसेच सामाजिक, आर्थिक, धार्मिक व्यवहार यांचा पर्याप्त स्वरूपात परिचय करून दिलेला आहे. रॉबर्ट रेडफिल्ड यांना १९३० मध्ये सर्वप्रथम मॅक्सिकोतील खेड्याचा अभ्यास केल्याचे जसे श्रेय दिले जाते तसेच श्रेय डॉ. दुबेना भारतातील खेड्याच्या अभ्यासाच्या संदर्भात द्यावे लागते. दुबेनी या पुस्तकात जे निष्कर्ष काढलेले आहेत ते भारतीय खेड्यातील संकीर्ण जीवनाचे अंतरंग उलघडून दाखविणारे आहेत. ते म्हणतात, ''भारतातील कोणतेही खेडे हे पूर्णतः स्वायत्त व स्वतंत्र नाही. प्रत्येक खेडे हे नेहमीच विस्तृत समाजव्यवस्थेतील एक घटक (Unit) म्हणून राहिलेले आहे. तसेच ते सुसंघटीत राजकीय समाजाचा एक भाग आहे. व्यक्ती ही केवळ ग्राम समुदायाची सदस्य नसते तर ती जात किंवा जमात यांचीही सदस्य असते. या सर्व समूहाना स्वतःची संघटना, सत्ता व मान्यता असते. डॉ. दुबेचा हा ग्रंथ भारतीय खेड्यांच्या प्रारंभीच्या अभ्यासापैकी एक असला तरी त्यामध्ये खेड्यातील संस्थांच्या कार्याचे सर्वसमावेशक चित्रण केलेले आढळते. दुबे म्हणतात, ग्रामीण भारतातील अर्थव्यवस्था ही जातिव्यवस्थेतील कार्यात्मक विशेषीकरण, परस्परावलंबन व व्यावसायिक

गतिशिलता याआधारे प्रस्थापित झालेली आहे. त्यांनी असे नमूद केले आहे की, अभिजात हिंदुधर्माची जी घटकतत्त्वे भारतभर पसरलेली आहेत ती दख्खनच्या पठारावरील हिंदुंच्या धार्मिक श्रद्धा व विधीमध्ये मिसळलेली आढळतात. ते म्हणतात खेड्यामध्ये तीन प्रकारचे धार्मिक उत्सव व सेवा आढळतात. १) कौटुंबिक समारंभ, २) ग्रामसमुदायाचे (खेड्याचे) समारंभ व ३) जातीचे समारंभ. भारतीय खेड्यातील मुस्लिमांचे स्वतःचे असे कौटुंबिक व धार्मिक समारंभ व उत्सव आहेत.

आपल्या ग्रंथात दुबेनी खेड्याच्या अभ्यासाबाबतचे जागतिक स्तरावरील विचार, समूहासमूहातील आंतरसंबंध, आंतरजातीय अभिवृत्ती व रूढीबद्धता यांचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. तसेच सामान्य जीवन चरित्रातील बाल्यावस्था, युवावस्था व वृद्धावस्था या तीन महत्त्वपूर्ण अवस्थांचीही चर्चा केलेली आहे.

**खेड्याच्या अभ्यासावरील लेख :** शमीरपेठ खेड्याच्या अभ्यासावर आधारलेल्या Indian Villiage या विस्तृत ग्रंथाशिवाय डॉ. दुबेनी खेड्याच्या अभ्यासावर अनेक लेख लिहिलेले आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचा लेख हा ''तेलंगणातील खेड्यातील जातींची श्रेणी (Ranking of Castes in Telangana Village)" हा आहे. हा लेख डॉ. डी. एन. मजुमदार यांनी संपादीत केलेल्या Rural Profiles of India या ग्रंथात (१९५५) प्रकाशित केलेला आहे. दुबेंच्या मते जातींच्या श्रेणीचे प्रमुख तत्त्व हे कर्मकांडविषयक शुद्धतेची व अशुद्धतेची संकल्पना (Concept of ritual purity and pollution) ही आहे. जात ही अर्पित दर्जाच्या व्यवस्थेवर आधारलेली असली तरी शमीरपेठ खेड्यातील जातीची श्रेणी ही परंपरा व पुराणकथा यांच्याद्वारेही निर्धारीत झालेली आहे. दुबेनी असेही प्रतिपादन केलेले आहे की, घालून दिलेल्या दैनंदीन कर्मकांडाचे पालन, खाण्यापिण्याविषयीच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पना, ठरवून दिलेले व केले जाणारे व्यवसाय, जीवनचक्रातील कर्मकांडाशी संबंधित असणाऱ्या नियमांचे पालन, इत्यादी घटकदेखील जातीची श्रेणी निर्धारित करतात. खेड्यात जातीची श्रेणी निश्चित करण्यामध्ये आर्थिक निकष हा प्रमुख नसून कर्मकांडविषयक निकष प्रमुख आहे असे दुबे वारंवार सांगताना दिसतात. तथापि, कांही ठिकाणी उदा. एम. एन. श्रीनिवासनी अभ्यासलेल्या दक्षिण भारतातील कूर्ग लोकांमध्ये आर्थिक प्रभुत्व हा निकष जातीची श्रेणी निर्धारीत करताना दिसतो. मॅरिअट हे सुद्धा असे म्हणतात, की जातीची श्रेणी ही गुणांच्याऐवजी जातीजातीतील आंतरसंबंधावर निश्चित झाली आहे.

**खेड्याच्या अभ्यासावरील शोधनिबंध :** दुबेनी अनेक शोधनिबंध प्रकाशित केले. त्यापैकी ''प्रभावशाली जात व खेड्यातील नेतृत्व (Dominant Caste and Village Leadership)'' हा एक आहे. या निबंधात दुबेनी भारतातील ग्रामीण नेतृत्व प्रतिमानाच्या अभ्यासाच्या संकल्पना व पद्धती (Concepts and methods of study of pattern of rural leadership in India) सांगितलेल्या आहेत. श्रीनिवासनी ग्रामीण भागातील शक्तीच्या वा नेतृत्वाच्या संदर्भात प्रभावी जात ही संकल्पना मांडली आहे. दुबेनी वरील शोधनिबंधात श्रीनिवासच्या या मताशी असहमती दर्शविलेली आहे. दुबे म्हणतात राजकीय शक्ती किंवा सत्ता (Political Power) ही जातीच्या हातात नव्हे तर कांही थोड्या व्यक्तींच्या हातात केंद्रीत झालेली आढळते. प्रत्येक खेड्यात कांही थोड्या व्यक्ती प्रभावी असतात व त्या खेड्यातील सदस्यांच्या राजकीय सहभागामध्ये निर्णायक भूमिका बजावितात. ह्याच प्रभावी व्यक्ती गावातील भांडणतंटे सोडविणे, खेड्यातील एकता टिकविण्याच्या संदर्भात युवाशक्तीस

मार्गदर्शन करणे, सामूहिक सण, उत्सव, समारंभ साजरे करण्यासाठी गावकऱ्यांना संघटीत करणे इत्यादी कार्यात महत्त्वाची भूमिका बजावितात. ग्रामपंचायत विधानसभा, लोकसभा इत्यादींच्या निवडणूकीत त्यांची भूमिका महत्त्वाची असते.

**समुदाय विकास कार्यक्रम :** ग्रामीण समाजातील समस्यांचे निराकरण करून ग्रामीण समाजाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारने १९५२ पासून समुदाय विकास कार्यक्रम राबविणे सुरू केले. या कार्यक्रमाचा प्रभाव पडून भारतीय खेड्यात परिवर्तन होऊ लागले. या परिवर्तनाचा अभ्यास करून दुबेनी १९५८ मध्ये "India's Changing Villages : Human Factors in Community Development" हा ग्रंथ प्रकाशित केला. हा त्यांचा अभ्यास पश्चिम उत्तर प्रदेशातील दोन खेड्यांत केलेल्या क्षेत्र-कार्यावर (Field-work) आधारलेला आहे. डॉ. ए. आर. देसाई यांनी संपादित केलेल्या Rural Sociology in India या ग्रंथात (१९६९) डॉ. दुबेनी Community Development : A critical Review हा लेख प्रकाशित केला. या लेखात समुदाय विकास कार्यक्रमामुळे व पंचायत राज्यव्यवस्थेमुळे ग्रामीण भागात सत्तेची अनेक केंद्रे निर्माण होऊन ती आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी विविध व्यक्ती जातीच्या आधारे परस्परांशी संघर्ष करीत आहेत. त्यातून ग्रामीण जीवनात राजकीय वैमनस्य निर्माण होऊन तेथील एकजिनसीपणास धोका निर्माण झाला आहे असे मत दुबेनी व्यक्त केलेले आहे. या सत्तासंघर्षामुळे समुदाय विकास कार्यक्रमाचे लाभ सामान्य जनतेपर्यंत पोहचू शकत नाहीत असा अभिप्राय त्यांनी नोंदविला आहे.

### ३) आंद्रे बेताई यांचा खेड्याचा अभ्यास

श्रीनिवास व दुबे यांच्याप्रमाणेच आंद्रे बेताई यांनीही भारतातील खेड्याच्या अभ्यासात महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. एम. एन. श्रीनिवास यांचे शिष्य असलेल्या आंद्रे बेताईनीदेखील आपल्या गुरूप्रमाणेच खेड्याच्या अभ्यासासाठी क्षेत्रकार्य पद्धतीचा अवलंब केला. त्यांनी तामिळनाडू राज्यातील तंजावर जिल्ह्यातील 'श्रीपूर' खेड्याची निवड केली. त्या खेड्यातील एका ब्राह्मण कुटुंबात एक वर्ष वास्तव्य करून त्यांनी क्षेत्र- कार्याद्वारे तथ्ये संकलीत केली व त्याआधारे १९६६ मध्ये Caste, Class and power हा ग्रंथ प्रकाशित केला.

या ग्रंथात त्यांनी ब्राह्मण जातीचे ब्राह्मणेतर जातीबरोबर कोणत्या स्वरूपाचे व किती मर्यादेपर्यंत संबंध प्रस्थापित झालेले आहेत याबाबतचे निरीक्षण नोंदविलेले आहे. तसेच सहभागी निरीक्षण तंत्राचा वापर करून त्यांनी तेथील राजकीय व्यवहार व राजकीय वर्तन कसे आहे याचाही सूक्ष्म अभ्यास केलेला आहे. त्यांचा हा अभ्यास परिमाणात्मक (quantitative) असण्याऐवजी गुणात्मक (qualitative) स्वरूपाचा होता. कोणत्याही समाजातील वास्तव हे त्या समाजात वास्तव्य करून अभ्यासल्याशिवाय कळू शकत नाही असे मत त्यांनी नोंदविलेले आहे. तसेच आपल्या अभ्युपगमाची (hypothesis) प्रचिती घेण्यासाठी क्षेत्र-कार्य पद्धती व सहभागी नियंत्रण तंत्र अधिक उपयुक्त ठरते असेही त्यांनी म्हटले आहे. खेड्यातील विविध जाती व वर्ग यांच्या परस्परविरोधी विचारसरणीतून त्यांच्यात विशिष्ट असे संबंध विशिष्ट मर्यादेपर्यंत निर्माण होतात व या परस्परविरोधी संबंधातून परिवर्तनास चालना मिळते असे बेताई म्हणतात.

१९७७ मध्ये आंद्रे बेताई यांनी Inequality Among Men हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यामध्ये त्यांनी खेड्यातील जातीय, धार्मिक, वर्गीय व व्यावसायिक विविधतेमुळे निर्माण होणाऱ्या श्रेष्ठ-

कनिष्ठत्वाच्या संकल्पनांचे व त्यातून निर्माण होणाऱ्या विषमता (असमानता), व शोषणाचे विश्लेषण केलेले आहे. विषमता व शोषण यावर आधारलेल्या सहसंबंधाचा उपयोग करून राजकारणी मंडळी व राजकीय पक्ष सत्ताप्राप्त करण्याचा प्रयत्न करतात असा अभिप्राय त्यांनी या ग्रंथात नोंदविला आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्त्वावर आधारलेले पंचायत राज्य व सहकारी संस्थांची स्थापना यामुळे ग्रामीण समाजात अनेक सत्ताकेंद्रे निर्माण झाली आहेत. ही सत्ताकेंद्रे आपल्या ताब्यात राहवी म्हणून विविध जाती, वर्ग व समुदाय प्रयत्न करीत आहेत असे मत त्यांनी नोंदविले आहे.

कृषीप्रधान समाजातील सामाजिक संरचना अभ्यासून त्यांनी १९७४ मध्ये Studies in Agrarian Social Structure हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथात त्यांनी असे स्पष्ट केले की ग्रामीण समाजरचनेत केवळ जातिव्यवस्थेचाच समावेश होत नसून शेतीपुरक व्यवसाय करणारे कारागीर, बलुतेदार यांचाही समावेश होता. शेतकरी व बलुतेदार, शेतकरी व शेतमजूर, जमीनदार व कूळे, शेतकरी व सावकार यांच्या आर्थिक व व्यावसायिक हितसंबंधावर आधारलेल्या समाजरचनेचा अभ्यास झाला पाहिजे असे बेताईनी प्रतिपादन केलेले आहे.

**★ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) रामपूरा खेड्याचा अभ्यास ................. यांनी केला.

अ) आंद्रे बेताई  ब) श्रीनिवास  क) दुबे  ड) के. ईश्वरन

२) एस. सी. दुबे यांनी ............. खेड्याचा अभ्यास केला.

अ) मोहन  ब) रामपूरा  क) शमीरपेठ  ड) श्रीपूरम

३) श्रीपूरम खेडे .................. राज्यात आहे.

अ) कर्नाटक  ब) आंध्र प्रदेश  क) म्हैसूर  ड) तामिळनाडू

४) कास्ट, क्लास अँड पॉवर हा ग्रंथ .................... यांनी प्रकाशित केला.

अ) श्रीनिवास  ब) मजूमदार  क) आंद्रे बेताई  ड) दुबे

५) ..................... यांच्या मते जातीच्या श्रेणीचे मुख्य तत्त्व हे कर्मकांडविषयक शुद्धतेची व अशुद्धतेची संकल्पना हे आहे.

अ) दुबे  ब) श्रीनिवास  क) बेताई  ड) मॅरिअट

## १.३ सारांश

या पहिल्या घटकात तुम्ही भारतातील समाजशास्त्राचा उदय व विकास अभ्यासलेला आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी राजकीय उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी भारतीय खेड्यांच्या अभ्यासास प्रारंभ केला. नंतर कांही विद्वानांनी जिज्ञासेपोटी ग्रामीण जीवनाच्या अभ्यासाकडे लक्ष दिले. कांही अभ्यासकांनी कृषी व्यवसाय व त्यातील समस्या जाणून घेण्यासाठी खेड्यांचा अभ्यास केला. स्वातंत्र्य चळवळीत खेड्यातील लोक सामील झाल्यानंतर कांहीनी खेड्यांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास केला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अनेक समाजशास्त्रज्ञांनी खेड्यातील जीवन समजावून घेण्यासाठी संशोधनात्मक अभ्यासास चालना दिली. यातूनच भारतीय खेड्यांवर अनेक ग्रंथ लिहिले गेले. श्रीनिवास सारख्या समाजशास्त्रज्ञांनी संस्कृतीकरण, प्रभुत्वशाली जाती, पाश्चिमात्त्यीकरण तर डी. एन. मजुमदार यांनी वि-संस्कृतीकरण अशा संकल्पना मांडल्या. यानंतर तुम्ही भारतात ग्रामीण समाजशास्त्राचे असलेले महत्त्व समजावून घेतलेले आहे. भारतात सुमारे ६८ टक्के लोकसंख्या खेड्यात राहाते. ग्रामीण जीवनात मोठीच विविधता आहे. भारतीय संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन करण्यात खेड्यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. अलिकडील काळात औद्योगिकीकरण, नागरीकरण यामुळे ग्रामीण समाजाचे विघटन सुरू झाल्याने तेथे अनेक समस्या उद्भवलेल्या आहेत. या समस्यांची सोडवणूक करून ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी अनेक कार्यक्रम राबविले जात आहेत. या कार्यक्रमांमुळे व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे ग्रामीण समाजात परिवर्तन होत आहे. या सर्व गोष्टींचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास होणे गरजेचे ठरते. आणि त्यासाठी ग्रामीण समाजशास्त्रास महत्त्व प्राप्त होते. यानंतर तुम्ही एम. एन. श्रीनिवास, एस. सी. दुबे व आंद्रे बेताई यांनी भारतातील खेड्यांचा केलेला अभ्यास समजावून घेतलेला आहे. श्रीनिवास यांनी तत्कालीन म्हैसूर राज्यातील रामपूरा खेड्याचा, दुबे यांनी आंध्रप्रदेशातील शमीरपेठ खेड्याचा तर आंद्रे बेताई यांनी तामिळनाडूतील श्रीपूरम खेड्याचा अभ्यास करून ग्रामीण समाजजीवनाविषयी कांही निष्कर्ष काढलेले आहेत. हे निष्कर्ष तुम्ही याठिकाणी अभ्यासलेले आहेत.

## १.४ स्मरणार्थ संज्ञा

- **संस्कृतीकरण :** कनिष्ठ जाती व आदिवासी जमातींनी द्विज जातींच्या जीवनशैलीचे अनुकरण करणे.
- **पाश्चिमात्त्यीकरण :** पौर्वात्त्य देशातील लोकांनी पाश्चिमात्त्य लोकांच्या जीवनशैलीचे अनुकरण करणे.
- **प्रभुत्वशाली जात :** एखाद्या क्षेत्रात मोठी लोकसंख्या, आर्थिक सुस्थिती, राजकीय सत्ता हाती असणे इत्यादी वैशिष्ट्ये असलेल्या जातीस प्रभुत्वशाली जात मानले जाते.
- **वि-संस्कृतीकरण :** उच्च जातींनी कनिष्ठ जातीच्या जीवनपद्धतीतील (संस्कृतीतील) कांही घटकतत्त्वांचे अनुकरण करणे.
- **जागतिकीकरण :** जगातील विविध राष्ट्रांमध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करून संपूर्ण जगासाठी एकच व्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया
- **संरचना :** विविध घटकातील सापेक्षतः स्थिर स्वरूपाचे परस्परसंबंध
- **क्षेत्र-कार्य पद्धती :** ज्या गोष्टीचा अभ्यास करावयाचा ती गोष्ट ज्या क्षेत्रात आहे तेथे जाऊन तिचे निरीक्षण करणे व त्याआधारे तिच्याविषयी निष्कर्ष काढणे या पद्धतीस क्षेत्र-कार्य पद्धती म्हणतात. आदित जमाती, खेडेगाव, यांच्या अभ्यासासाठी ही पद्धती वापरली जाते.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक १ ची उत्तरे**

१) ड  २) क  ३) ब  ४) ड  ५) अ

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक २ ची उत्तरे**

१) ब  २) ड  ३) क  ४) अ  ५) ब

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक ३ ची उत्तरे**

१) ब  २) क  ३) ड  ४) क  ५) अ

## १.६ स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. भारतातील ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व विकास स्पष्ट करा.

२. भारतातील ग्रामीण समाजशास्त्राच्या महत्त्वाची चर्चा करा.

३. डॉ. श्रीनिवास यांचा रामपूरा खेड्याचा अभ्यास स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. ग्रामीण समाजशास्त्रास भारतात असलेले महत्त्व.

२. डॉ. एस. जी. दुबेंचा खेड्याचा अभ्यास

३. आंद्रे बेताई यांचा खेड्याचा अभ्यास

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- चंद्रकांत खंडागळे (२००५) : ग्रामीण समाजशास्त्र, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.
- गुरूनाथ नाडगोंडे : ग्रामीण समाजशास्त्र, कॉंटिनेंटल, पुणे.

  गजेंद्रगड/मारूलकर : (२०००) समकालीन भारतीय समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.


❑❑❑

# घटक २

# ग्रामीण सामाजिक संरचना

**(Rural Social Structure)**

**घटक संरचना**


२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्टे

२.३ विषय विवेचन

  २.३.१ कुटुंबसंस्था – स्वरूप आणि परिवर्तन

  २.३.३ जातीसंस्था : स्वरूप आणि परिवर्तन

  २.३.२ बलुता पद्धती : स्वरूप आणि परिवर्तन

२.४ स्वयंःअध्ययनासाठी प्रश्न

२.५ सारांश

२.६ स्वयंःअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

२.८ चिंतन आणि कार्य

२.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.१ प्रस्तावना (Introduction)

'सामाजिक संरचना' हा समाजशास्त्राच्या अभ्यासातील एक महत्त्वाचा अध्ययन घटक आहे. म्हणून कोणत्याही समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्या समाजातील सामाजिक अभ्यास करावाच लागतो. ग्रामीण समाजाच्या अभ्यासासही ही गोष्ट लागू पडते. म्हणून ह्या दुसऱ्या अध्ययन घटकात तुम्ही भारतीय ग्रामीण समाजातील सामाजिक संरचनेचा भाग असलेल्या कुटुंबसंस्था, जातीसंस्था व बलुता पद्धतीचे स्वरूप व त्यांच्यात होणारे परिवर्तन यांचा अभ्यास करणार आहात.

## २.२ उद्दिष्टे (Objectives)

या अध्ययन घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास –

- ग्रामीण कुटुंबाचे स्वरूप व त्यामध्ये होणारे परिवर्तन स्पष्ट करता येईल.
- जातीसंस्थेचे स्वरूप व तिच्यात होणारे परिवर्तन समजावून घेता येईल.
- बलुता पद्धतीचे स्वरूप व तिच्यात होत असलेले परिवर्तन यांचे आकलन होईल.

## २.३ विषय-विवेचन (Presentation of Subject Matter)

ह्या घटकात तुम्ही ग्रामीण समाजातील कुटुंबसंस्था, जातीसंस्था व बलुता पद्धती यांचा अभ्यास करणार आहात. अभ्यास विषयाच्या विवेचनाच्यादृष्टीने या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात ग्रामीण कुटुंबाचे स्वरूप व त्यातील परिवर्तनाची चर्चा केली आहे. दुसऱ्या विभागात जातीसंस्थेचे स्वरूप व तिच्यात होणारे परिवर्तन यांचे विवेचन केले आहे. तर तिसऱ्या विभागात बलुता पद्धती व तिच्यातील परिवर्तन याचा ऊहापोह केलेला आहे.

### २.३.१ ग्रामीण कुटुंबसंस्था (Rural Family)

कुटुंब ही सार्वत्रिक अशी मूलभूत सामाजिक संस्था आहे. मार्शल जोन्स यांच्या मते ''कुटुंब ही लैंगिक संबंधावर आधारलेली एक सामाजिक संस्था असून प्रजोत्पादन व अपत्यांचे संगोपन ही तिची कार्ये आहेत.'' कुटुंबसंस्था ही व्यक्तीच्या दृष्टीने कामतृप्ती, बालसंगोपन, समाजीकरण, मानसिक व सामाजिक संरक्षण देणे इत्यादी आणि समाजाच्यादृष्टीने संस्कृती संक्रमण करणे, समाज सातत्य राखणे अशी महत्त्वपूर्ण कार्ये पार पाडते. म्हणून सर्वच समाजात कुटुंबसंस्थेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्रामीण समाजात तर कुटुंबास इतर कोणत्याही संस्था व संघटनेपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. कारण ग्रामीण सामाजिक जीवनाचा मूलभूत वा आधारभूत घटक कुटुंबच असून कुटुंबाचा ग्रामीण व्यक्ती, इतर सामाजिक संस्था व संपूर्ण समाज ह्यांच्यावर मोठा प्रभाव पडलेला आहे. म्हणून ग्रामीण समाजाच्या अभ्यासात ग्रामीण कुटुंबाच्या अभ्यासास महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. या ठिकाणी आपण भारतातील ग्रामीण कुटुंबाची वैशिष्ट्ये व कार्ये यांचा ऊहापोह करणार आहोत.

**भारतातील ग्रामीण कुटुंबाचे स्वरूप**

भारतातील ग्रामीण कुटुंबाचे स्वरूप समजण्यासाठी त्याची वैशिष्ट्ये व कार्ये समजावून घ्यावी लागतात.

**१) संयुक्त कुटुंब :** कुटुंबातील सदस्यांच्या संख्येच्या आधारे कुटुंबाचे केंद्र कुटुंब व संयुक्त कुटुंब असे दोन प्रकार पडतात. पती, पत्नी व त्यांची अविवाहीत मुले-मुली एवढेच सदस्य (दोन पिढ्यांचे) एकत्र राहात असलेल्या कुटुंबास केंद्र कुटुंब असे म्हणतात. याउलट ज्या कुटुंबात पती-पत्नी, त्यांची विवाहीत मुले व सुना, अविवाहीत मुली, विवाहीत व अविवाहीत नातवंडे आणि इतर कांही निकटवर्ती आप्त एकत्र राहतात त्यास संयुक्त कुटुंब असे म्हणतात. भारतीय ग्रामीण कुटुंब हे मुख्यतः संयुक्त कुटुंब असल्याचे आढळते. त्यामध्ये दोनपेक्षा अधिक पिढ्यांचे सदस्य एकत्र राहतात. त्यांची मालमत्ता, निवासस्थान, भोजनव्यवस्था इत्यादी गोष्टी सामूहिक म्हणजेच एकत्रित स्वरूपाच्या असतात. कुटुंबातील उत्पादन साधने सर्वांच्या मालकीची असतात व त्यांच्या साह्याने केलेल्या उत्पादनाचा सामाईकपणे उपभोग घेतला जातो. सर्व सदस्य मालमत्ता, उत्पन्न, अधिकार व कर्तव्ये इत्यादी गोष्टींनी परस्परांशी घनिष्ठपणे जोडलेले असतात. म्हणूनच संयुक्त कुटुंबाची व्याख्या डॉ. इरावती कर्वे पुढीलप्रमाणे करतात ''एकाच निवासस्थानात राहणाऱ्या, एकाच स्वयंपाकगृहातील अन्नसेवन करणाऱ्या, मालमत्तेत समान मालकीहक्क असणाऱ्या, रक्तसंबंधी असणाऱ्या व्यक्तिंचा समूह म्हणजे संयुक्त कुटुंब होय.'' भारतातील पारंपारिक ग्रामीण कुटुंब अशाप्रकारचेच संयुक्त

असल्याचे आढळते. आधुनिक काळात मात्र संयुक्त कुटुंबाचे विघटन होत असून त्याजागी केंद्र कुटुंब स्थापण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

२. **पितृसत्ताक कुटुंब :** कुटुंबातील औपचारिक सत्ता पित्याकडे आहे की मातेकडे आहे या आधारे कुटुंबाचे पितृसत्ताक कुटुंब व मातृसत्ताक कुटुंब असे दोन प्रकार पडतात. भारतीय ग्रामीण कुटुंब हे प्रामुख्याने पितृसत्ताक प्रकारचे आहे. कारण कुटुंबातील औपचारिक सत्ता ही पित्याच्या (पुरुषाच्या) हाती असते. कुटुंबाची वंशपरंपरा ही पित्याकडून मोजली जाते. मुले आपल्या नावामागे पित्याचे नाव लावतात. विवाहानंतर मुले पित्याच्याच घरी जमेल तेवढे दिवस राहतात. आणि न जमल्यास वेगळे होऊन केंद्र कुटुंब (विभक्त कुटुंब) स्थापन करतात. मुली मात्र विवाहानंतर पतीगृही राहण्यास जातात. पितृसत्ताक पद्धतीमुळे साहजिकच पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना सर्वच बाबतीत दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे ग्रामीण स्त्रीचा दर्जा अत्यंत निम्न (कनिष्ठ) आहे. नागरी कुटुंब हेही पितृसत्ताक असले तरी तेथे तुलनात्मकदृष्ट्या स्त्रीचा दर्जा थोडासा उन्नत असल्याचे आढळते.

३. **कुटुंबप्रमुखाची एकाधिकारशाही :** ग्रामीण कुटुंब पितृसत्ताक असल्याने कुटुंबप्रमुख हा पुरुष (पिता किंवा जेष्ठ भाऊ) असतो. त्याच्या हाती कुटुंबातील सर्व अधिकार एकवटलेले असतात. कुटुंबातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्यात त्याचा पुढाकार असतो. कुटुंबाच्या मालमत्तेचे व्यवस्थापन व देखरेख करणे, कुटुंबसदस्यांमध्ये कामाचे वाटत करणे, त्यांच्या विवाहाची, शिक्षणाची, आरोग्याची काळजी घेणे, त्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणे, त्यांच्या समस्या सोडविणे, इत्यादी बाबतचे सर्व अधिकार कुटुंबप्रमुखाकडे असतात व इतर सर्व सदस्य त्याच्या आज्ञेचे पालन करीत असतात. त्यामुळे कुटुंबप्रमुखाची एकाधिकारशाही निर्माण झालेली असते. एकंदरीत कुटुंबप्रमुख हा कुटुंबाचा नेता, सूत्रधार, पालक, मार्गदर्शक व नियंत्रक असतो व त्याच्या तुलनेत इतर सदस्यांचे स्थान दुय्यम असते.

४. **शेतीअधिष्ठीत कुटुंब :** बहुसंख्य ग्रामीण कुटुंबे ही शेती व्यवसायावर आधारलेली आहेत. शेती हा ग्रामीण समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. आणि संयुक्त कुटुंब हे शेती व्यवसायाशी सुसंगत ठरते. कारण शेती व्यवसायाला अधिक मनुष्यबळाची गरज भासते व ही गरज पूर्ण करण्यासाठी सर्व सदस्यांनी एकत्र राहणे गरजेचे ठरते. एकत्र राहिल्याने शेतजमिनीचे विभाजन टळते व तिचे छोटे तुकडे पाडणे टाळता येते. शिवाय उत्पादन साधने सामाईक असल्याने उत्पादन खर्चात बचत होते. परिणामी शेती फायदेशीर ठरते. कुटंबातील सर्व सदस्य आपापल्या क्षमतेप्रमाणे शेतात राबतात व सर्वजण सामाईक उपभोग घेतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडणही शेती व्यवसायाद्वारेच होते. कुटुंबाच्या सर्व व्यवहाराचा केंद्रबिंदू शेती व्यवसाय असतो.

५. **अवलंबन भावना व शिस्त :** ग्रामीण कुटुंबात अवलंबन भावना व शिस्त मोठ्या प्रमाणावर आढळते. शहरातल्याप्रमाणे खेड्यात गरजापूर्तीची विविध केंद्रे नसतात. व्यक्तीच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, मनोरंजन, आरोग्य, संरक्षण इत्यादी सर्व गरजांची पूर्तता कुटुंबातच होत असते. त्यामुळे व्यक्ती पूर्णतः कुटुंबावर अवलंबून असते. याचा परिणाम असा होतो की व्यक्ती कुटुंबाची शिस्त निमूटपणे पाळते. कुटुंबप्रमुख व इतर वयस्कर मंडळीचे इतर सदस्यांवर नियंत्रण असते. त्यांच्या आज्ञा सर्वजण पाळतात. कुटुंबाच्या आज्ञा न पाळणाऱ्यास खेड्यात राहणे कठीण जाते.

६. **सामूहिक धार्मिक व सांस्कृतिक जीवन :** ग्रामीण कुटुंबाचे केवळ आर्थिक व सामाजिकच नव्हे तर धार्मिक व सांस्कृतिक जीवन देखील सामूहिक स्वरूपाचे असते. ग्रामीण कुटुंबात देवपूजा, कुलाचार, धार्मिक विधी इ. धार्मिक कृत्ये आणि सण, समारंभ, बारसे, विवाह, श्राद्ध इत्यादी सांस्कृतिक कृत्ये एकत्रितपणे पार पाडली जातात. त्यामध्ये सर्व सदस्य सहभागी होऊन आपापली कर्तव्ये व जबाबदाऱ्या निष्ठेने पार पाडतात. असे ही सामूहिक जीवन त्यांच्यात भावनिक ऐक्य निर्माण करते.

७. **एकजिनसी स्वरूप :** ग्रामीण कुटुंबातील सदस्यांमध्ये परस्परांविषयी प्रेम, आत्मियता, सहकार्याची व कर्तव्याची भावना मोठ्या प्रमाणावर आढळते. निवासस्थान, भोजनव्यवस्था, मालमत्ता, व्यवसाय, धार्मिक व सांस्कृतिक जीवन इत्यादी गोष्टी सामाईक असल्याने सर्व सदस्य एकमेकांच्या घनिष्ठ संपर्कात असतात. त्यामुळे त्यांच्यात प्रेम, जिव्हाळा सहकार्य निर्माण होते. प्रत्येकजण स्वहितापेक्षा कुटुंबाच्या हितास अधिक प्राधान्य देतो. कुटुंबाविषयीची आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे बजावतो. प्रत्येकजण कौटुंबिक जीवनाशी पूर्ण एकरूप झालेला असतो. त्यामुळे ग्रामीण कुटुंबाचे स्वरूप खूपच एकजिनसी असते.

८. **कुटुंबाचा अभिमान :** ग्रामीण व्यक्तीला आपल्या कुटुंबाविषयी मोठा अभिमान वाटत असतो. कारण तिच्या सर्व गरजांची व आकांक्षांची पूर्तता कुटुंबातच होत असते. शिवाय तिला माया, सहकार्य व संरक्षण कुटुंबातच मिळत असते. समाजात व्यक्तीची ओळख कुटुंबाच्या नावानेच होत असते. व्यक्तीचा सामाजिक दर्जा कुटुंबाच्या दर्जावरूनच ठरत असतो. व्यक्तीच्या चांगल्यावाईट कृत्यासाठी कुटुंबालाच जबाबदार धरले जाते. थोडक्यात खेड्यात व्यक्ती नव्हे तर कुटुंब हा सामाजिक जीवनाचा घटक असतो. त्यामुळे व्यक्तीला स्वतःच्या कुटुंबाविषयी मोठा अभिमान वाटत असतो.

९. **सापेक्षता :** स्थिर कुटुंब – इतर कुटुंबांच्या तुलनेत (उदा. नागरी कुटुंब व आदिम कुटुंब) ग्रामीण कुटुंब हे अधिक स्थिर असल्याचे आढळते. ग्रामीण कुटुंबातील सर्व सदस्यांमध्ये परस्परावलंबन, सहकार्य, प्रेम, कर्तव्य भावना इत्यादी गोष्टी मोठ्या प्रमाणावर असतात. त्यामुळे कुटुंबाची ध्येये साध्य करण्यासाठी सर्वजण सामूहिकपणे झटत असतात. शिवाय कुटुंबात सदस्यांची संख्या जास्त असल्याने एखाद्या सदस्याच्या मृत्यूने, आजारपणामुळे किंवा म्हातारपणामुळे कुटुंब सहजासहजी मोडकळीस येत नाही. कुटुंबावर आलेल्या आपत्तीचा सर्वजण मिळून सामना करतात. त्यामुळे ग्रामीण कुटुंब कोणताही आघात पचवू शकते. त्यामुळे ते स्थिर राहते. याउलट नागरी कुटुंबातील सदस्यसंख्या कमी असते. तसेच त्यामध्ये व्यक्तीवादाचा प्रभाव असतो. त्यामुळे नागरी कुटुंब हे मोठा आघात पचवू शकत नाही. आदिम कुटुंबात घटस्फोट घेणे सुलभ असल्याने व मुले दत्तक देण्याघेण्याचे प्रमाण जास्त असल्याने आदिम कुटुंबही कांहीसे अस्थिर असते.

**ग्रामीण कुटुंबाची कार्ये** (Functions of Rural Family)

१. **जैविक कार्ये :** कामतृप्ती, प्रजोत्पादन व बालसंगोपन ही जैविक कार्ये ग्रामीण कुटुंब पार पाडते. कामवासनेची तृप्ती ही फक्त विवाहाद्वारे व कुटुंबातच झाली पाहिजे व त्यातून जन्मलेल्या बालकांचे संगोपन हे कुटुंबातच झाले पाहिजे यावर ग्रामीण कुटुंब भर देते.

२. **मानसिक कार्ये :** व्यक्तीला मानसिक सुखशांती व संरक्षण देण्याचे कार्य ग्रामीण कुटुंब प्रभावीपणे पार पाडले. व्यक्तीच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन इत्यादी गरजांची पूर्तता करून ग्रामीण कुटुंब व्यक्तीला आर्थिक विवंचनेतून मुक्त करते. अपंगत्व, आजारपण, वार्धक्य अशा हतबल अवस्थेत कुटुंब व्यक्तीची प्रेमाने काळजी घेते. संकटकाळात व्यक्तीला धीर देते, तिच्या पाठीशी राहाते, तिचे मनोधैर्य वाढविते. थोडक्यात ग्रामीण कुटुंबात व्यक्तीला प्रेम, माया, सहकार्य, सहानुभूती मोठ्या प्रमाणावर मिळते. त्यामुळे तिला मनःशांती व सुखसमाधान लाभते.

३. **आर्थिक कार्ये :** कुटुंबातील सदस्यांच्या भौतिक गरजा भागविण्यासाठी ग्रामीण कुटुंब कांही आर्थिक क्रिया पार पाडते. बहुतेक कुटुंबांचा शेती व्यवसाय असून त्यामध्ये सर्व सदस्य राबतात. कुटुंबाद्वारे सदस्यांत कामाचे वाटप केले जाते. कुटुंबाच्या मालमत्तेचा सर्वांना उपभोग घेता येईल अशी व्यवस्था करते. मालमत्तेचा वारसा ठरविणे, तिचे संरक्षण करणे ही कार्येही ग्रामीण कुटुंब पार पाडते. औद्योगिक क्रांतीपूर्व काळात ग्रामीण कुटुंब आर्थिक क्षेत्रातील एक स्वयंपूर्ण घटक होते. उत्पादन, वितरण, उपभोग या तीनही प्रक्रिया कुटुंबात होत असत. आज कुटुंबाची ही आर्थिक स्वयंपूर्णता संपली असली तरी ग्रामीण कुटंबाचे आर्थिक महत्त्व बऱ्याच प्रमाणात टिकून आहे.

४. **सामाजिक कार्ये :** व्यक्तीचे सामाजिकरण करणे, तिच्या वर्तनाचे नियंत्रण करणे व तिला सामाजिक संरक्षण मिळवून देणे इत्यादी सामाजिक कार्ये ग्रामीण कुटुंब पार पाडते. ग्रामीण कुटुंबातील वयोवृद्ध व अनुभवी मंडळी मुलांच्या मनावर आदर्श मूल्ये, रीतीरिवाज, आज्ञापालनाची वृत्ती, शिस्त इत्यादींचे सुसंस्कार करतात. त्यामुळे मुलांचे योग्य समाजीकरण होते. तसेच कुटुंब आपल्या सदस्यांच्या वर्तनावर देखरेख ठेवते व त्यांच्या हातून सामाजिक नियमांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेते आणि उल्लंघन केल्यास व्यक्तीला शिक्षाही करते. त्यामुळे सामाजिक नियंत्रणाचे कार्य पार पाडले जाते. तसेच आपल्या सदस्यांचा कोणी अपमान, बेअब्रू, फसवणूक, बदनामी करू नये याचीही कुटुंब काळजी घेते. सदस्यांना समाजात मानसन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्याचाही प्रयत्न करते. त्यामुळे सदस्यांना कुटुंबाद्वारे सामाजिक संरक्षण मिळते.

५. **शैक्षणिक कार्ये :** आपल्या सदस्यांना विविध प्रकारचे शिक्षण देण्याचे कार्यही ग्रामीण कुटुंब करते. कुटुंबाचा जो व्यवसाय असतो त्याचे धडे मुलांना लहानपणापासून कुटुंबातच मिळतात. म्हणजे व्यावसायिक शिक्षण देण्याचे कार्य हे कुटुंब करते. तसेच संस्कृतीच्या विविध अंगाचे ज्ञानही सदस्यांना सर्वप्रथम कुटुंबातच मिळते. समाजात कसे वागावे याचेही प्राथमिक धडे कुटुंबातच मिळतात. थोडक्यात ग्रामीण कुटुंब हे अनौपचारिक शिक्षणाची पाठशाळाच असते.

६. **धार्मिक कार्ये :** ग्रामीण कुटुंब धार्मिक कार्येही मोठी श्रद्धेने पार पाडते. कुटुंबात देवपूजा, होमहवन, प्रार्थना, व्रतवैकल्ये सणसमारंभ इत्यादी धार्मिक विधी मोठ्या उत्साहाने पार पाडले जातात. त्यामध्ये सर्व सदस्य सहभागी होऊन आपली कर्तव्ये चोखपणे बजावतात. कुलाचार, कुलप्रथा, धार्मिक परंपरा व संस्कार (उदा. गर्भाधन, उपनयन, विवाह, अंतेष्टी, श्राद्ध इ.) ग्रामदेवता व निसर्ग-देवतांची पूजा अशी कर्मकांडाची एक मालिकाच ग्रामीण कुटुंबात सतत चालू असते. त्यामुळे सदस्यांना धार्मिक शिक्षण मिळत राहाते.

७. **मनोरंजनात्मक कार्ये :** ग्रामीण संयुक्त कुटुंबात वेगवेगळ्या वयाच्या प्रवृत्तीच्या, अनुभवाच्या व्यक्ती असतात. त्या सर्वांच्या एकत्र येण्याने कुटुंबात मनोरंजनाचे कार्य अत्यंत

अनौपचारिकपणे पार पाडले जाते. मुलांचे कोडकौतुक, बाललीला, गप्पागोष्टी, थट्टामस्करी, हास्यविनोद, आजीआजोबांच्या गोष्टी इत्यादीमुळे सदस्यांचे मनोरंजन होते. तसेच कुटुंबात चालणारे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे (उदा. बारसे, विवाह, डोहाळे जेवण, देवदेवतांचे उत्सव, सण समारंभ इ.) देखील निखळ मनोरंजनाचा लाभ होतो. शहरी व्यक्तीला मात्र आज बाजारू व गल्लाभरू मनोरंजन साधनांवर अवलंबून राहावे लागते. त्यातून अनेक विकृती निर्माण होतात. ग्रामीण कुटुंबातील मनोरंजन मात्र तुलनेने स्वस्त व निकोप असते.

**ग्रामीण कुटुंबातील परिवर्तन**

परिवर्तन म्हणजे बदल होय. ग्रामीण कुंटुंब पध्दतीत आज अनेक बदल घडून आलेले आहेत. भारतीय समाजातील आजचे कुटुंब पारंपारिक संयुक्त कुटुंबापेक्षा कितीतरी बदललेले आहे. प्रामुख्याने कुटुंबाच्या रचनेमध्ये व कार्यामध्ये बदल झालेले दिसून येतात.

**अ) कुटुंबाच्या रचनेतील बदल** (Structural Changes in Family)

**१) कुटुंबाच्या आकारातील बदल** : सध्या कुटुंबाचा आकार दिवसेंदिवस लहान होत चालला आहे. पूर्वी अनेक पिढ्यांचे सदस्य एकत्र राहत असत. आजमात्र पती-पत्नी व त्यांची अविवाहित मुले एवढ्याच सदस्यांचा समावेश कुटुंबामध्ये होत आहे. विवाह झाल्यानंतर मुले आपले स्वतंत्र कुटुंब स्थापन करून राहतात. औद्योगिकरण, शहरीकरण इ. मुळे विभक्त कुटुंबे उदयास येत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केंद्रसरकारने संतती नियमनाचा कायदा सुरू केल्यामुळे कुटुंबाचा आकार दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. उच्च शिक्षण, उच्च राहणीमान, आर्थिक विकास, व्यक्तीवादी दृष्टिकोन इ.कारणामुळे तरूण पिढीला विभक्त कुटुंब सोईचे वाटू लागले आहे.

**२) पितृसत्ताक अधिकारांचा ऱ्हास :** पारंपारिक संयुक्त कुटुंब पितृसत्ताक होते त्यामुळे पित्याच्या हाती सर्व सत्ता व अधिकार एकवटलेले होते. संपत्तीविषयक अधिकार पित्याला होते स्त्रियांना व कुटुंबातील इतर सदस्यांना संयुक्त कुटुंबात कोणतेच स्थान नव्हते. आज मात्र पितृसत्ताक कुटुंबपध्दती असलीतरी स्त्रियांना कायद्याने बरेच अधिकार प्राप्त झालेले आहेत. अर्थार्जनासाठी स्त्रिया आज घराबाहेर पडलेल्या आहेत. त्यामुळे त्या स्वावलंबी बनलेल्या आहेत. कुटुंबातील इतर सदस्यसुद्धा स्वावंलबी बनलेले आहेत. त्यामुळे पित्याला कोणताही निर्णय घेताना पत्नीचे व इतर सदस्यांचे मत विचारात घ्यावे लागते. शिक्षण नोकरी,विवाह इ. च्या बाबतीत कुटुंबातील प्रत्येक सदस्य स्वत: निर्णय घेऊ शकतात किंवा याबाबत त्यांना बरेच स्वातंत्र्य आहे.

**३) कुटुंबाच्या स्थायी स्वरूपात बदल :** आजचे कुटुंब संयुक्त कुटुंबापेक्षा अस्थिर आहे. शिक्षणाच्या, नोकरीच्या, व्यवसायाच्या निमित्ताने आधुनिक समाजात लोकांचे स्थलांतर वाढलेले आहे. याचा परिणाम कुटुंबावर होत आहे. मुळातच सदस्यसंख्या कमी असल्यामुळे कुटुंबातील एखादी व्यक्ती जरी कुटुंबातून निघून गेल्यास त्याचा दुष्परिणाम कुटुंबावर होतो. व्यक्तिगत स्वातंत्र्यामुळे कुटुंबातील व्यक्ती किरकोळ कारणास्तवसुद्धा कुटुंब सोडून जात आहेत. स्त्रियांना मिळणाऱ्या स्वातंत्र्यामुळे घटस्फोटाचे प्रमाण अधिक वाढलेले आहे. कुटुंबातील वाढत्या कलहामुळे वृध्द माता-पित्यांना वृध्दाश्रमात जावून राहावे लागत आहे. शहरातील वाढत्या महागाईमुळे व राहत्या

जागेच्या टंचाईमुळे इच्छा असूनही शहरामध्ये एकत्र कुटुंबपध्दती वाढू शकली नाही. अशा अनेक कारणामुळे आधुनिक कुटुंब दिवसेंदिवस अस्थिर बनत आहे.

४) **स्त्रियांच्या दर्जात व कार्यक्षेत्रात बदल :** पारंपारिक ग्रामीण कुटुंबात स्त्रियांना निम्न दर्जा होता. तसेच कार्यक्षेत्र केवळ घरापुरतेच मर्यादित होते. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतीक इत्यादीपैकी कोणतेच अधिकार स्त्रियांना नव्हते. केवळ 'चूल व मूल' एवढेच त्यांचे कार्यक्षेत्र बनलेले होते. आधुनिक कुटुंबात मात्र स्त्रियांना पुरूषांचा बरोबरीचा दर्जा मिळालेला आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय इ. बरोबर राजकीय क्षेत्रात सुध्दा स्त्रियांना अधिकार प्राप्त झालेले आहेत. यामुळे स्त्रियांचा दर्जा हळूहळू उंचावत आहे. शिक्षण, नोकरी व व्यवसाय यामध्ये असे कोणतेच क्षेत्र नाही, की जेथे स्त्रियांनी प्रवेश केलेला नाही. अशाप्रकारे स्त्रियांच्या दर्जात व कार्यक्षेत्रात बदल होत आहेत.

५) **नात्यातील बदल :** पारंपारिक कुटुंबात नात्यातील व्यक्तींना म्हणजेच आप्तसंबधीयांना महत्वाचे स्थान होते. 'अतिथी देवो भव.' असे माणले जात होते. कुटुंबातील नातीसुध्दा घनिष्ट संबधाची होती. आज आधुनिक कुटुंबात मात्र नात्यांचे महत्व कमी होऊ लागले आहे. कुटुंबातील नात्यामध्ये सुध्दा दुरावा निर्माण होत आहे. आई-वडिल, भाऊ-बहिण ही नाती केवळ एक दिखावा बनत चालला आहे. यामुळेच कुटुंबाच्या सामाईक संपत्तीच्या वाटपाचे बरेच दावे न्यायालयात आहेत. एकमेकांना मदत करणे यापेक्षा स्वहिताला अधिक प्राधान्य दिले जात आहे. अशाप्रकारे नात्यातील दुरावा दिवसेंदिवस वाढत आहे.

६) **कुटुंबाविषयक दृष्टिकोनात बदल :** ग्रामीण कुटुंबात सदस्याना कुटुंबाविषयी जाज्वल्य अभिमान होता व्यक्तीगत हितापेक्षा कौटुंबीक हितास अधिक प्राधान्य दिले जाई. कुटुंबातील सदस्यात परस्पराविषयी आपुलकी होती. आधुनिक कुटुंबामध्ये मात्र कुटुंबविषयक या दृष्टिकोनात बदल झाला. आहे. कौटुबीक हितापेक्षा स्वहिताला अधिक प्राधान्य दिले जात आहे. व्यक्तीवादी दृष्टिकोनामुळे कुटुंबातील सदस्यात आपुलकीची भावना कमी होत आहे. व्यक्तीगत इच्छा आकांक्षाच्या पूर्तीसाठी कर्तव्यभावनेचा विसर पडत चालला आहे. कर्तव्य व आज्ञापालनाची जागा स्वार्थाने घेतली आहे. सामुहीक, धार्मीक पूजापाठांचा विसर पडत चालला आहे.

**ब) कुटुंबाच्या कार्यातील बदल**

१) **प्रजोत्पादन कार्यातील बदल –** लैंगिक गरजपूर्ती व प्रजोत्पादन ही मानवाची दोन मुलभूत कार्ये पारंपारिक संयुक्त कुटुंबात पार पाडली जात होती. आधुनिक कुटुंबात यामध्ये बदल झालेला आहे. पारंपारिक कुटुंबात स्त्रियांची प्रसुती कुटुंबातच केली जात होती. आजमात्र प्रसूतीसाठी तज्ज्ञ डॉक्टर व दवाखान्यांचा आधार घेतला जातो. गरोदरपणात बाळाचे व मातेचे आरोग्य चांगले राहावे यासाठी स्त्रिरोगतज्ज्ञ व बालरोगतज्ज्ञ यांचे मार्गदर्शन घेतले जाते. विविध आजारापासून भविष्यात मुक्तता व्हावी यासाठी लसीकरण केले जाते. अशाप्रकारे कुटुंबाच्या प्रजोत्पादनाच्या कार्यात बदल घडून आलेले आहेत.

२) **मुलांचे पालनपोषन –** संयुक्त कुटुंबात मुलांच्या पालनपोषणाचे कार्य कुटुंबातच पार पाडले जात होते. आजमात्र आधुनिक कुटुंबात ही कार्ये शिशुमंदिरे, पाळणागृहे, संस्कारकेंद्रे इत्यादीमार्फत पार पाडले जाते.संयुक्त कुटुंबात आजी-आजोबा अगर इतर वरिष्ठ सदस्याकडून मुलांचे पालनपोषण

केले जात होते. आधुनिक कुटुंबात मात्र आई-वडिल दोघेही नोकरी किंवा व्यवसायानिमित्त दिवसभर कुटुंबाबाहेर राहतात.त्यामुळे घरात कोणीही जेष्ट व्यक्ती नसल्यामुळे मुलांच्या पालन पोषणाचे कार्य कुटुंबाबाहेर पार पाडले जाते. मुलांच्या आहारात देखील बदल झालेला आहे. विविध कंपन्याकडून तयार 'बेबी फूड' बाजारात मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिले आहे. त्याचा वापर आज मोठ्या प्रमाणावर केला जात आहे.

**३) शिक्षणाच्या कार्यात बदल :** संयुक्त कुटुंबात समाज जीवनाचे किंवा व्यावसायिक शिक्षण कुटुंबातच दिले जात होते. आजमात्र जीवनाच्या सर्व क्षेत्रात ज्ञानाचा प्रचंड विस्तार झाला आहे. हे ज्ञान विविध शाखात विभागले गेले असून ते औपचारिक पध्दतीने असल्यामुळे ते ज्ञान देणाऱ्या अनेक औपचारिक शिक्षणसंस्था समाजात उदयास आलेल्या आहेत. सध्याच्या युगात हे ज्ञान अत्यावश्यक असल्यामुळे त्यासाठी कुटुंबातील सदस्यांना कुटुंबाबाहेर जावून शिक्षण घ्यावे लागते. औद्योगीक क्रांतीनंतर अशा ज्ञानाचा खूपच विस्तार झालेला आहे. भारतात मात्र ब्रिटिशांच्या आगमणाने अशा ज्ञानाच्या प्रसारात वाढ झाली आहे. हे ज्ञान तांत्रिक स्वरूपाचे आहे. पूर्वीप्रमाणे आजही अध्यात्मिक ज्ञान कुटुंबाकडून मिळते अशाप्रकारे कुटुंबाच्या शैक्षणिक कार्यात बदल झालेला आहे.

**४) आर्थिक कार्यातील बदल :** संयुक्त कुटुंबात सर्व प्रकारची आर्थिक कार्ये पार पाडली जात होती. संयुक्त कुटुंब हे आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होते. कुटुंबातील सर्व सदस्यांच्या आर्थिक गरजा कुटुंबामार्फतच पूर्ण केल्या जात होत्या. कोणत्याही वस्तूचे उत्पादन वितरण व उपभोग ही महत्वाची आर्थिक कार्ये संयुक्त कुटुंबात पार पाडली जात होती. पण आधुनिक कुटुंब हे केवळ उपभोगाचे कार्य करते. उत्पादन व वितरण ही कार्ये समाजातील इतर संस्था करतात. हा बदल औद्योगीकरणामुळे घडून आला आहे. संयुक्त कुटुंबाचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता व व्यापारी पध्दतीने केला जात आहे. तसेच शेतीपूरक व्यवसायांची व नवीन व्यवसाय उदयास आल्यामुळे कुटुंबाच्या आर्थिक कार्यात बदल घडून आलेले आहेत.

**५) सामाजिक सुरक्षीततेच्या कार्यात बदल :** संयुक्त कुटुंबात व्यक्तीला सामाजिक सुरक्षितता मिळत होती. व्यक्तीच्या सर्व गरजा कुटुंबात पूर्ण होत असल्यामुळे प्रत्येक व्यक्ती संयुक्त कुटुंबात सुरक्षित होती. आज आधुनिक कुटुंबात मात्र व्यक्तीला सुरक्षितता वाटत नाही. म्हणून आधुनिक कुटुंबातील व्यक्ती जीवनविमा भविष्यनिर्वाह निधी निवृत्तीवेतन अशा भविष्यकालीन सुरक्षित योजनामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. तर काही व्यक्ती अनाथआश्रम वृध्दाश्रम अशा विविध ठिकाणचा आश्रय घेत आहेत. शासनाने सुध्दा व्यक्तींच्या भविष्यकाळीन सुरक्षिततेबाबत अनेक कायदे व उपाययोजना केलेल्या आहेत. यावरून आधुनिक कुटुंबातील व्यक्ती असुरक्षित असल्याचे दिसते.

**६) मनोरंजनाच्या कार्यात बदल :** संयुक्त कुटुंब पध्दतीत मनोरंजनाचे कार्य कुटुंबामार्फत पार पाडले जात होते. सण, समारंभ, उत्सव, यात्रा, भजन, किर्तन, म्हणी, कोडी, उखाने, दंतकथा इत्यादीच्या माध्यमातून कुटुंबातील सदस्यांचे मनोरंजन होत असे. या माध्यमांचा समाजावर व व्यक्तीवर नेहमी चांगलाच परिणाम घडत असे. आधुनिक समाजात मात्र मनोरंजनाच्या साधनात बदल घडून आलेले आहेत. सध्या समाजात चित्रपटगृह, नाट्यगृह, सर्कस, रेडिओ, टी.व्ही, विविध मंडळे

ही मनोरंजनाची साधने झालेली आहेत. या साधनांचे चांगले व वाईट असे दोन्ही परिणाम व्यक्ती व समाजावर दिसून येतात.

**७) सामाजिक नियंत्रणाच्या कार्यात बदल:** संयुक्त कुटुंब हे व्यक्तीच्या सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन होते.धर्म, रूढी, प्रथा,परंपरा, संस्कृती इ. चा प्रभाव संयुक्त कुटुंबावर होता. त्यामुळे सामाजिक नियमनाविरूद्ध कोणतीही व्यक्ती वर्तन करत नसे. आधुनिक समाजात नितीमूल्यांचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे कुटुंबाचा आपल्या सदस्यावरील दबाव किंवा नियंत्रण कमी झाले आहे. त्यामुळे आज अनेक व्यक्ती सहजासहजी सामाजिक नियमनांविरूद्ध वर्तन करताना दिसतात. संयुक्त कुटुंब हे संस्काराचे केंद्र मानले जात होते. त्यामुळे व्यक्तीच्या वाईट वर्तनावर आळा बसत असे आधुनिक कुटुंबात मात्र मुलांच्यावर संस्कार करण्यासाठी आईवडिलांना वेळ नाही तर काही कुटुंबांना संस्कारांचे महत्व माहीत नाहीत. संयुक्त कुटुंबात कडक शिस्त पाडली जात होती. आज आधुनिक कुटुंबातमात्र शिस्तिचा अभाव दिसून येतो.

याशिवाय कुटुंबातील व्यक्तींच्या सामाजिक दर्जात बदल घडून आलेले आहेत. कौटुंबीक पार्श्वभूमीपेक्षा शिक्षण, सत्ता, संपत्ती, व्यवसाय कला गुणांना समाजात जास्त महत्व प्राप्त झालेले आहे. त्यामुळे कुटुंबात व समाजात अर्पित दर्जापेक्षा अर्जित दर्जाला जास्त महत्व प्राप्त झालेले आहे. संयुक्त कुटुंब हे सामाजिकरणाचे महत्वाचे साधन मानले जात होते. व्यक्तीच्या संपूर्ण व्यक्तीमत्वाला विकास कुटुंबामार्फत होत असे. आधुनिक कुटुंबातमात्र मुलांच्याकडे आई-वडिल वैयक्तीक लक्ष देवू शकत नसल्यामुळे कुटुंबाच्या या कार्यातदेखील बदल घडून आलेले आहेत.

उपरोक्तप्रमाणे कुटुंबाच्या रचनेत व कार्यात बदल घडून आले असले तरी सर्व कुटुंबात असे बदल घडून आलेले नाहीत आजही संयुक्त कुटुंबाप्रमाणे आधुनिक कुटुंबातील सर्व सदस्य आपल्या मूळ कुटुंबाशी भावनिक दृष्ट्या संबधीत असलेले दिसतात. जन्म, मृत्यू, विकास, धर्म इ. प्रसंगी विभक्त कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येतात. माता पित्यांना व वृध्दांना अधिकार व सत्ता नसली तरी त्याना सुरक्षा देण्याचे कार्य कुंटुबाकडून केले जाते त्यामुळे भारतीय कुटुंब विभक्त किंवा आधुनिक कुटुंबाप्रमाणे पूर्णपणे बदललेले नाही.

## २.३.२ जातीसंस्था

कुटुंब या सामाजिक संस्थांप्रमाणेच जातीसंस्था ही भारतीय समाजातील एक महत्त्वाची सामाजिक संस्था असून तिचा भारतीय समाजाच्या विशेषतः ग्रामीण समाजाच्या सर्व अंगावर मोठा प्रभाव आहे. म्हणून ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना जातीसंस्थेचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते. म्हणून तुम्ही या ठिकाणी जातीसंस्थेचे स्वरूप व तिच्यात होणारे परिवर्तन यांचा अभ्यास करणार आहात. जातीसंस्थेचे स्वरूप समजण्यासाठी तिची व्याख्या व वैशिष्ट्ये थोडक्यात अभ्यासू.

### जातीचा अर्थ (Meaning of Caste)

जात हा शब्द 'जत' या धातूपासून बनला असून त्याचा अर्थ 'जन्म घेणे' असा आहे. यावरून जात हा जन्माच्या आधारे निर्माण होणारा सामाजिक समूह ठरतो. उरींश हा इंग्रजी शब्द उरींर या पोर्तुगीज शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ 'वंशशुद्धता' असा आहे. पोर्तुगीज लोकांनी याच अर्थाने हा शब्द वापरला. या अर्थानुसार जात हा वंशशुद्धतेच्या कल्पनेवर आधारलेला समूह ठरतो.

पण जात हा समूह वंशशुद्धतेचा निदर्शक नाही हे अनेक अभ्यासकांनी सिद्ध केलेले आहे. शिवाय जातसंस्था ही अत्यंत गुंतागुंतीची संस्था असून तिला अनेक वैशिष्ट्ये वा पैलू आहेत. त्या सर्वांचे परिपूर्ण आकलन जात किंवा उरींश या शब्दावरून होऊ शकत नाही. म्हणून जातीचा अर्थ समजण्यासाठी समाजशास्त्रज्ञानी जातीच्या केलेल्या व्याख्या अभ्यासणे उचित ठरते.

**जातीची व्याख्या** (Definition of Caste)

१. **मजूमदार व मदन** - जात हा एक बंद वर्ग आहे.

२. **चार्लस् कूले** - जेव्हा एखादा वर्ग पूर्णपणे आनुवंशिकतेवर आधारलेला असतो तेव्हा त्यास आपण जात म्हणू शकतो.

३. **डॉ. व्यंकटेश केतकर** यांच्या मते जातीची दोन वैशिष्ट्ये आहेत. अ) विशिष्ट जातीतील सदस्यांच्या पोटी जन्मलेल्या व्यक्तींनाच त्या जातीचे सदस्यत्व प्राप्त होते. ब) आपल्या सदस्यांना आपल्या जातीबाहेरील व्यक्तींशी विवाह करण्यास कडक सामाजिक नियमाद्वारे प्रतिबंध केला जातो.

४. **प्रो. मुखर्जी** - जात ही प्रामुख्याने जन्मावर आधारलेली, समाजाचे विविध विभागात विभाजन करणारी गतिशील व्यवस्था असून ती आपल्या सदस्यांवर खाणेपिणे, विवाह, व्यवसाय व सामाजिक व्यवहार याबाबतीत कमीजास्त प्रमाणात निर्बंध घालते.

५. **ई, ए. ब्लंट** - जात हा अंतर्विवाही समूह आहे किंवा अंतर्विवाही समूहाचे संकलन आहे. जिला एक सामान्य नाव असते, जिचे सदस्यत्व आनुवंशिक असते; जी आपल्या सदसयांच्या सामाजिक संपर्कावर कांही निर्बंध घालते. एका सामान्य परंपरागत व्यवसायाचा अवलंब करते आणि समान उत्पत्तीचा दावा करते किंवा साधारणपणे एक सजातीय समुदाय आकारास आणणारी मानली जाते.

६. **ग्रीन** - जात ही सामाजिक स्तरीकरणाची अशी व्यवस्था आहे की जिच्यामध्ये तत्त्वतः तरी व्यक्तीस आपला सामाजिक दर्जा बदलणे शक्य नसते. व्यक्तीस जन्माने प्राप्त होणारा दर्जा मरेपर्यंत कायम राहतो. व्यक्तीचा व्यवसाय, निवासस्थान, जीवनपद्धती, व्यक्तिगत संपर्क, विवाहाचा जोडीदार निवडण्याचे क्षेत्र, मित्रपरिवार इत्यादी बाबी जन्माने निश्चित होतात. तसेच उच्च जातीच्या व्यक्तींनी कनिष्ठ जातीतील व्यक्तींशी शारीरिक व सामाजिक संपर्क ठेवणे कमीपणाचे मानले जाते. जातिव्यवस्थेचे कायद्याने संरक्षण केले असून तिला धर्माची संमती आहे.

**जातीची वैशिष्ट्ये** (Characteristics of Caste)

वरीलपैकी कोणतीही व्याख्या जातीचे परिपूर्ण स्पष्टीकरण देत नाही. प्रत्येक व्याख्येत कांही उणिवा आहेत. जातीच्या सर्व वैशिष्ट्यांना सामावून घेणारी समाधानकारक व्याख्या करणे कठीण असल्याने डॉ. हटन, एन. के. दत्त आणि डॉ. घुर्ये यांनी जातीची व्याख्या न करता तिची वैशिष्ट्ये स्पष्ट करून तिचे स्वरूप समजावून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणून आपणही जातीची कांही वैशिष्ट्ये अभ्यासून तिचे स्वरूप समजावून घेऊ. ती वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

**१. जातीचा आधार जन्म :** व्यक्तिची जात जन्माने ठरते व ती मरेपर्यंत कायम राहते. जातीच्या आधारे व्यक्तीचे सामाजिक स्थान (दर्जा व भूमिका) ठरते व त्यामध्ये बदल करता येत नाही. तसेच

जन्मावरून म्हणजेच जातीवरून व्यक्तीचा व्यवसाय, विवाहाचा जोडीदार, जीवनशैली, सामाजिक संपर्काचे क्षेत्र या बाबीही निर्धारित होतात. याबाबतचे जातीचे निश्चित नियम असून त्याचे पालन होते की नाही हे पाहण्यासाठी पूर्वी प्रत्येक जातीची नियामक मंडळे म्हणजेच जातीपंचायती होत्या. जातीनियमांचे पालन न करणाऱ्यास ह्या पंचायती शासन करीत. साहजिकच व्यक्ती समुदायाच्या नियंत्रणापेक्षा जातीच्या नियंत्रणास अधिक महत्त्व देत. त्यामुळे व्यक्तीच्या मनात समुदायनिष्ठा निर्माण होण्याऐवजी संकुचित जातीनिष्ठा निर्माण झाली. या जातीनिष्ठेमुळेच प्रत्येक जात इतर जातीहून स्वतंत्र व वेगळी ठरली. आणि जातींच्या आधारे भारतीय समाज अनेक खंडात (गटात) विभागला गेला. यालाच डॉ. घुर्ये यांनी समाजाचे खंडात्मक विभाजन असे म्हटले आहे.

२. **अधिक्रमी रचना :** जातिव्यवस्था ही सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था असल्याने तिच्यात श्रेष्ठकनिष्ठतेच्या भावनेवर आधारलेली अधिक्रमी रचना किंवा सोपानपरंपरा (कळशीरीलहू) निर्माण झालेली आहे. म्हणजेच कांही जातीचा दर्जा श्रेष्ठ, कांहीचा कनिष्ठ तर कांहीचा मध्यम मानला आहे. जातिव्यवस्थेचा मूलाधार असलेल्या वर्णव्यवस्थेत ब्राह्मणाचा दर्जा सर्वश्रेष्ठ, त्यानंतर क्षत्रियाचा, त्याच्या खालोखाल वैश्याचा तर सर्वात कनिष्ठ दर्जा शूद्र वर्णाचा मानला गेला. जातिव्यवस्थेतही ब्राह्मणाचा दर्जा सर्वश्रेष्ठ व शूद्राचा सर्वात कनिष्ठच मानला गेला. तथापि इतर जातींच्या दर्जाबाबत मात्र निश्चितता आढळत नाही. यापैकी कांही जाती इतरांपेक्षा आपला दर्जा श्रेष्ठ असल्याचा दावा करतात. उदा. महाराष्ट्रात कुणबी, सोनार, तेली, कोष्टी ह्यासारख्या जातींमध्ये आणि उत्तर भारतातील ठाकूर, यादव, पटेल, राजपूत, जाट इत्यादी जातीमध्ये श्रेष्ठकनिष्ठत्वाबाबत मतभेद आढळतात. दक्षिण भारतात 'कम्मलन' जात आपला दर्जा ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठ मानते. जातीप्रमाणेच उपजातीत किंवा पोटजातीतही श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना आढळते. उदा. ब्राह्मण जात सर्वश्रेष्ठ आहे पण तिच्यातही कांही पोटजाती असून 'किरवंत' या पोटजातीस सर्वात कनिष्ठ मानले जाते. सुतार जातीतील 'पांचाळ' ही पोटजात इतर पोटजातीपेक्षा स्वतःस श्रेष्ठ मानते. अस्पृश्य जातीतील चांभार जात महारापेक्षा स्वतःस श्रेष्ठ मानते तर महार जात मांगापेक्षा स्वतःस श्रेष्ठ मानते. अशाप्रकारे प्रत्येक जातीत व पोटजातीत श्रेष्ठकनिष्ठत्वाच्या भावनेवर आधारलेली अधिक्रमी रचना आढळते.

३. **विशेषाधिकार आणि अपात्रता :** जातीच्या रचनेत श्रेष्ठ जातींना विशेषतः ब्राह्मण जातीस अनेक विशेष अधिकार व सवलती बहाल केल्या तर कनिष्ठ जातींवर विशेषतः अस्पृश्य जातींवर अनेक अपात्रता लादल्या आहेत. ब्राह्मण हा सर्वश्रेष्ठ, वंदनिय व अपिडनिय मानला. ब्राह्मणास 'भूदेव' मानून ब्राह्मण हत्या महापातक ठरविले. इतरांच्या नमस्कारास प्रतिनमस्कार न करता ब्राह्मण केवळ आशिर्वाद देई. अध्ययन, अध्यापन, पौरोहित्य, वेदमंत्र इत्यादीबाबतचे अधिकार प्राधान्याने ब्राह्मणास दिले गेले. त्याखालोखाल इतर श्रेष्ठ जातींना कांही खास अधिकार व सवलती दिल्या. याउलट अस्पृश्य जातींना जीवनावश्यक अधिकार नाकारून त्यांच्यावर अनेक अपात्रता लादल्या. उदा. अस्पृश्यांना उच्च जातीच्या वस्तीत घर बांधणे, त्यांच्या पाणवठ्यावर, मंदिरात, स्मशानभूमीत प्रवेश करणे, वेदमंत्र ऐकणे व उच्चारणे, शिक्षण घेणे, उंची वस्त्रे, पादत्राणे, छत्री, सुवर्णालंकार इत्यादी वापरणे, इत्यादी गोष्टींस मनाई केली. अस्पृश्यांच्या सावलीचाही विटाळ मानला गेला. म्हणूनच पुण्यात पेशवाईच्या काळात अस्पृश्यांना सावली ज्यावेळी लांब पडते त्यावेळी महामार्गावरून फिरण्यास मनाई केली. तसेच त्यांनी रस्त्यावर थुंकू नये म्हणून त्यांच्या गळ्यात थुंकण्यासाठी मडके

बांधण्याची सक्ती केली. गुजरातमध्ये अस्पृश्यांना आपण अस्पृश्य आहोत हे दर्शविण्यासाठी जनावराची शिंगे जवळ बाळगावी लागत. तर पंजाबात भंग्याला आपण येत असल्याची वर्दी ओरडून द्यावी लागे. अशाप्रकारे विशेषाधिकार व अपात्रता यांच्यामुळे भारतीय समाजात प्रचंड सामाजिक विषमता निर्माण झाली.

४. **व्यवसाय स्वातंत्र्याचा अभाव :** जातिव्यवस्थेत प्रत्येक जातीचा एक परंपरागत व्यवसाय निर्धारित करून व्यक्तीला आपल्या जातीचाच व्यवसाय करण्याचे बंधन घातले. आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय निवडण्याचे किंवा बदलण्याचे स्वातंत्र्य नाकारले गेले. विविध व्यवसायांशी श्रेष्ठकनिष्ठत्वाची व पवित्र-अपवित्रतेची भावना जोडली गेली. श्रेष्ठ जातींचे व्यवसाय उच्च व पवित्र मानले तर कनिष्ठ जातींचे व्यवसाय नीच व अपवित्र मानले. कनिष्ठ जातींना उच्च जातीचे व्यवसाय करण्यास मनाई केली. प्रत्येक जातीचा एक ठराविक व्यवसाय असला तरी एकच व्यवसाय अनेक जाती करताना आढळतात. उदा. शेती, व्यापार, लष्करी सेवा इत्यादी व्यवसाय विविध जाती करताना आढळत.

५. **विवाहावरील निर्बंध :** जात हा अंतर्विवाही समूह आहे. व्यक्तीला आपल्या जातीतूनच विवाहाचा जोडीदार निवडण्याचा कडक निर्बंध घातलेला आढळतो. परजातीतील व्यक्तिशी विवाह करणे निषिद्ध ठरविले. एकाच जातीतील पोटजातीही अंतर्विवाहाचा नियम पाळतात. जातीचे सदस्यत्व जन्माने मिळते या तत्त्वाशी हा नियम सुसंगत ठरतो. वंशशुद्धता टिकविण्याची भावना या नियमामागे असल्याचे दिसते. अर्थात अनुलोम विवाह (उच्च जातीतील पुरुष व कनिष्ठ जातीतील स्त्री यांचा विवाह) आणि प्रतिलोम विवाह (उच्च जातीतील स्त्री व कनिष्ठ जातीतील पुरुष यांचा विवाह) अंतर्विवाहाच्या नियमास अपवाद ठरविले. तथापि अनुलोम विवाह कनिष्ठ दर्जाचा तर प्रतिलोम विवाह निषिद्ध मानला. त्यामुळे अंतर्विवाहाचे पालन जवळपास अनिवार्यच बनले. आज आंतरजातीय विवाह कायदेशीर मानला असला तरी बहुसंख्य लोक स्वजातीतील व्यक्तीशीच विवाह करताना दिसतात.

६. **खाणेपिणे आणि सामाजिक संपर्काबाबतचे निर्बंध :** व्यक्तीने कोणत्या जातीतील लोकांकडून अन्नपाणी स्वीकारावे, कोणाच्या पंगतीला बसून भोजन घ्यावे याबाबतचेही जातीचे कांही निर्बंध आहेत. साधारणतः उच्च जाती कनिष्ठ जातीच्या हातचे अन्नपाणी स्वीकारणे व त्यांच्या पंगतीला बसून भोजन घेणे निषिद्ध मानतात. यासंदर्भात प्रदेशपरत्वे भिन्नता आढळते. उदा. उत्तर भारतातील कांही उच्च जाती कनिष्ठ जातीकडून पक्के अन्न (दुधातुपातून बनविलेले खाद्यपदार्थ) स्वीकारतात. मात्र कच्चे अन्न (पाण्यात बनविलेले खाद्यपदार्थ) स्वीकारत नाहीत. महाराष्ट्रात उच्च जाती कनिष्ठ जातीनी बनविलेले खाद्यपदार्थ (भात, भाकरी, पोळी इत्यादी) स्वीकारत नाहीत मात्र तांदुळ, डाळी पीठ स्वीकारतात. यास कोरडा शिधा असे म्हणतात. कनिष्ठ जाती मात्र उच्च जातीकडून कोणत्याही प्रकारचे अन्न आनंदाने स्वीकारतात.

खाण्यापिण्याप्रमाणेच सामाजिक संपर्काबाबतचे निर्बंध आढळतात. उच्च जाती कनिष्ठ जातीशी घनिष्ठ असा शारीरिक व सामाजिक संपर्क ठेवणे, त्यांच्यात उठबस करणे निषिद्ध व कमीपणाचे मानतात. कनिष्ठ जातीतील व्यक्तीने उच्च जातीतील व्यक्तीशी नेहमी अदबीने वागावे, त्याच्यापासून ठराविक अंतर ठेवून संभाषण करावे असेही नियम आढळतात. उदा. दक्षिण भारतात 'तिया' या

अस्पृश्य जातीच्या व्यक्तीने १२ पावले दूर राहून तर 'इलायन वाशानारायण' या जातीने २४ पावले दूर राहून उच्च जातीशी व्यवहार करावा असा नियम होता. यालाच 'आपल्या पायरीने वागणे' असे म्हणतात. जातीजातीतील सामाजिक संपर्काबाबतची ही पायरी म्हणजेच मर्यादा पाळणे व्यक्तीला अनिवार्य असे.

७. **धर्माचा आधार :** जातिव्यवस्थेला हिंदू धर्माचा आधार दिलेला असतो. जातिव्यवस्थेचे वरील सर्व नियम हे धर्माच्या आधारे लोकांच्या मनावर बिंबविण्यात आले. जाती नियमांचे पालन हे धर्मपालन ठरविले. हिंदूधर्मातील कर्म व पुनर्जन्म सिद्धांताचा आधार जातीच्या नियमांना दिला गेला. गतजन्मातील शुभाशुभ कर्मांचा परिणाम (फळ) म्हणून सांप्रत (सध्याच्या) जीवनात अनुक्रमे उच्च व नीच जातीत जन्म मिळतो. सांप्रत जीवनात जी व्यक्ती स्वजातीचे नियम निष्ठेने पाळते तिला पुढील जन्मी उच्च जात प्राप्त होते असे तत्त्वज्ञान समाजात रुजविले. त्यामुळे लोकांच्या मनावर जातिनियमांचा पगडा बसला व ते शतकानुशतके जातीनियम निष्ठेने पाळीत आले.

जातीची वरील वैशिष्ट्ये ही पारंपारिक भारतीय समाजातील आहेत. आधुनिक काळात, पाश्चात्त्य संकृती व शिक्षण, औद्योगिकीकरण, नागरीकरण, भांडवलशाही अर्थव्यवस्था, दळणवळणाची प्रगत साधने, सामाजिक सुधारणा चळवळी, लोकशाही मूल्ये, राज्यघटनेतील तरतुदी व पुरोगामी कायदे इ. घटांचा प्रभाव पडून जातीची वरील वैशिष्ट्ये बदलू लागली आहेत. जातीचे कांही नियम नष्ट झाले असून कांही नियम खूपच शिथील झाले आहेत. त्यामुळे जातिव्यवस्थेचा भारतीय समाजावरील विशेषतः औद्योगिक-नागरी समाजावरील प्रभाव खूपच कमी झाला आहे. तथापि ग्रामीण समाजावरील जातीचा प्रभाव अद्यापही बऱ्याच प्रमाणात टिकून आहे.

**जातीसंस्थेतील परिवर्तन :**

या घटकात आपण जातीव्यवस्थेत घडून आलेल्या परिवर्तनाचा म्हणजेच बदलांचा अभ्यास करणार आहोत. आज मानवी जीवनाच्या सर्व भागात बदल घडून आलेले आहेत. त्याचप्रमाणे जातीसंस्थेत देखील बदल घडून आले आहेत. हजारो वर्षे हिंदू समाजजीवनाचे प्रभेदक वैशिष्ट्य असलेले जातीव्यवस्था आज पूर्ण नष्ट झाली नसली तरी ती कमकुवत झाली आहे. जातीच्या वैशिष्ट्यात व कार्यात होणारे बदल पाहता भविष्यात जातीव्यवस्था पूर्ण नष्ट होईल असे वाटते.ब्रिटिश कालावधीपासून जातीच्या परिवर्तनाला वेग प्राप्त झाला. औद्योगिकरण, नागरीकरण, पाश्चात्यशिक्षण, नवीन कायदे, नवीन व्यवसाय, समाज सुधारकांचा प्रभाव, विज्ञानाचा प्रसार इ.कारणामुळे जातीव्यवस्थेत वेगाने बदल घडून येत आहे. त्या बदलांची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे.

**१) खंडात्मक विभाजनात झालेला बदल :**

पूर्वी भारतीय समाजात जातीमुळे खंडात्मक विभाजन झालेले होते. प्रत्येक जातीचा स्वतंत्र व्यवसाय विशिष्ट जीवनपध्दती यामुळे प्रत्येक जात स्वत:ला एकमेकापासून अलग समजत असे. पण आज मोठमोठे उद्योगधंदे सरकारी. सहकारी व खाजगी कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे इ. ठिकाणी व्यक्तीतील सामाजिक संपर्काचे प्रमाण वाढत चालले आहे. जाती-जातीतील अंतर कमी होत आहे. व्यक्तीला समाजात मिळणारा दर्जा जातीवर अवलंबून राहिलेला नाही. आज कोणतीही व्यक्ती आपल्या कलागुण कौशल्यावर आपले समाजातील स्थान निश्चित करू शकते. पूर्वीप्रमाणे जातीतील

सदस्य सामाजिक व धार्मिक कार्यक्रमासाठी एकत्र आले तरी परस्परांना मदत करत नाहीत. विज्ञानाच्या प्रसारामुळे धर्माचे महत्व कमी झाले आहे. त्यामुळे धर्माचा जातीवरील प्रभाव कमी झालेला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये जातीजातीतील लोकांच्यामध्ये संपर्काचे प्रमाण सतत वाढत आहे. या सर्व कारणामुळे जातीनुसार समाजाचे खंडात्मक विभाजनात परिवर्तन झाल्याचे दिसून येते.

**२) ब्राह्मणांचे महत्व कमी झाले :**

जातीप्रथेनुसार ब्राह्मणांना समाजात उच्च स्थान होते ब्राह्मणांना अनेक सामाजिक व धार्मिक विशेषाधिकार होते. हिंदू समाजात मानाचे व प्रतिष्ठेचे स्थान ब्राह्मणांना होते. पण औद्योगीकरण, शहरीकरण, लोकशाही शासन व्यवस्था व विज्ञानाचा वाढता प्रभाव यामुळे ब्राह्मणांच्या प्रतिष्ठेला हादरा बसला. पाश्चात्य शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे ब्राह्मणेत्तर जातींना ब्राह्मणांच्या बरोबरीने प्रतिष्ठा मिळू लागली आहे. सर्व जाती धर्मातील व्यक्ती एकाच ठिकाणी काम करू लागल्या. समान काम, समान पगार व समान अधिकार यामुळे सर्व जातीतील व्यक्तींच्यामध्ये समानता निर्माण झाली. जातीपेक्षा व्यक्तिगत गुणांना महत्व प्राप्त झाले. शिक्षणामुळे ब्राह्मणांनी केलेल्या अत्याचाराची ओळख सर्वसामान्याना झाली आहे. त्यामुळे ब्राह्मणांच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला एकंदरीत ब्राह्मणांचे महत्व कमी झाले.

**३) अर्जित दर्जाला महत्व :**

जातीव्यवस्थेत अर्पित दर्जाला महत्व होते. अर्पित दर्जा म्हणजे जन्माबरोबर आपोआप मिळालेला दर्जा होय. जन्मावरून जात व जातीवरून दर्जा व्यक्तीला एकदा मिळाल्यानंतर त्यामध्ये कोणताच बदल करता येत नसे. पण आज समाजात अर्जित दर्जाला महत्व प्राप्त झाले आहे. अर्जित दर्जा म्हणजे व्यक्तीने स्वकर्तुत्वावर मिळवलेला दर्जा. कोणत्याही जातीतील व्यक्ती आपल्या स्वकर्तुत्वावर उच्च दर्जा मिळवू शकते तर कर्तुत्वशुन्य व्यक्ती उच्च जातीत जन्माला आली तरी तिचा दर्जा कनिष्ठ होवू शकतो. कारण आज समाजात अर्पित दर्जापेक्षा अर्जित दर्जाला महत्व प्राप्त झाले आहे.

**४) खाणेपिणे व सामाजीक संपर्काबाबतच्या निर्बंधात बदल:**

जातीव्यवस्थेने खानपानासंबधी व सामाजिक संपर्कासंबधी अनेक निर्बंध लादले होते. पण आज त्या निर्बंधात शिथिलता आलेली आहे. उपहारगृहे, खाणावळी, चहाची दुकाने इ. ठिकाणे सध्या खानपानासंबधी कोणतेच निर्बंध पाळले जात नाहीत. तसेच विवाह बारसे, यात्रा अशा सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाच्या वेळी जातीपातीचा कोणताच विचार न करता सर्व व्यक्ती एकमेकाशेजारी बसून भोजन व चहापान करतात. पवित्र-अपवित्र, शुभ-अशुभ किंवा स्पृश्य-अस्पृश्य अशी कोणतीच भावना आज लोकांच्या मनात दिसून येत नाही. सामाजिक संपर्काच्या निर्बंधात सुध्दा आज शिथीलता आलेली आहे. पूर्वी अस्पृश्यांना स्पर्श करणे किंवा त्यांची सावली आपल्या अंगावर पडणे. हे विटाळ समजले जाई. अस्पृश्याने स्पृश्य व्यक्तीशी बोलताना ठराविक अंतरावर उभे राहून बोलावे किंवा खाली मान घालून बोलावे असे अनेक निर्बंध आज शिथील झालेले आहेत.

**५) सामाजिक व धार्मिक अपात्रता यातील बदल :**

जातीप्रथेनुसार अनेक अपात्रता अस्पृश्यांच्यावर लादल्या होत्या. तर अनेक विशेष अधिकार ब्राम्हणांना बहाल केले होते. त्यामध्ये आज परिवर्तन झालेले आहे. पूर्वी अस्पृश्यांना मंदिरप्रवेश नव्हता, तीर्थांच्या ठिकाणी स्नान करण्यास बंदी होती. होमहवन पूजा आर्चा करण्याचा अधिकार नव्हता गावात कोठेही फिरता येत नव्हते. सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरता येत नव्हते, रेषमी वस्त्रे वापरता येत नव्हती, दागदागिणे वापरता येत नव्हती.पण आज वरील सर्व निर्बंधात परिवर्तन झालेले आहे. कायद्याने सर्व व्यक्ती समान असल्यामुळे वरील सर्व हक्क अस्पृश्यांना मिळाले आहेत. अस्पृश्यांना गावात कधीही व कोठेही फिरता येते, शिक्षण घेता येते, मंदिरात प्रवेश करता येतो, रेषमी वस्त्रे व दागदागिने वापरू शकतात. अस्पृश्यता पाळणे हे कायद्याने गुन्हा आहे, अशाप्रकारे सामाजिक व धार्मिक अपात्रतेमध्ये परिवर्तन घडून आले आहे.

**६) विवाहाच्या निर्बंधात बदल :**

जातीप्रथेनुसार विवाहासंबधी अनेक निर्बंध घातलेले होते. पण आज विवाहाविषयक निर्बंधात बदल झालेले आहेत. उदा. पूर्वी आंतर्विवाह केलाच पाहिजे असा कडक नियम होता पण आज आंतरजातीय विवाह होत आहेत. १९५५ च्या कायद्यानुसार आंतरजातीय विवाहास मान्यता दिलेली आहे. याच कायद्याने विधवा विवाहांनादेखील मान्यता दिलेली आहे. व बहुविवाहाला विरोध केलेला आहे. बालविवाहाची सुध्दा प्रथा नष्ट झालेली आहे. गोत्र, प्रवर, सपिंड विवाह यांचाही विचार मागे पडला आहे. तसेच जातीचे विवाहाविषयक आंतरविवाह व बहिर्विवाह वरील गोष्टींना प्रतिबंध केला असला तरी विवाहाच्या बाबतीत आजही जाती विषयक काही निर्बंध पाळले जातात पण त्यांची तिव्रता मात्र कमी झालेली आहे.

**७) व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य:**

जातीप्रथेनुसार प्रत्येक व्यक्तीने आपल्या जातीचाच व्यवसाय केला पाहिजे असा कडक नियम होता. पण आज प्रत्येक व्यक्तीला व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य आहे. कोणत्याही जातीतील व्यक्ती कोणताही व्यवसाय करू शकते. औद्योगीकरणामुळे व शहरीकरणामुळे अनेक नवीन व्यवसाय उदयास आले आहेत.हे व्यवसाय कोणत्याच जातीचे नसल्यामुळे कोणत्याही जातीतील व्यक्ती हे व्यवसाय करू लागले. व हळूहळू पारंपारिक व्यवसाय सुध्दा कोणतीही व्यक्ती करू लागली आहे. कोणत्याही व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार आवडीनुसार व्यवसाय निवडण्याची संधी आज आहे. काही व्यक्ती परंपरागत व्यवसायाशी चिकटून राहिल्या पण हे व्यवसाय औद्योगीकरणामुळे बंद पडत आहेत. त्यामुळे समाजाचा व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला गेला. नवीन व्यवसाय स्वीकारण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय शिल्लक नव्हता. तसेच जातीप्रथेनुसार व्यवसायासंबधीची उच्च नीच भावना कधीच लोप पावली आहे. त्यामुळेच आज समाजात काही वरिष्ट जातीसुध्दा कनिष्ठ जातींचे व्यवसाय करू लागले आहेत. उदा. अभ्यंकर शू. मार्ट, चितळे दूध डेअरी, पाटील दूध डेअरी इ. तसेच असे व्यवसाय करू इच्छिनाऱ्या व्यक्तीना शासनाकडून प्रशिक्षणाबरोबर अनुदानही दिले जात आहे.

**८) जातीपंचायतींचा ऱ्हास :**

पूर्वी प्रत्येक जातीची स्वतंत्र जात पंचायत होती जातीअंतर्गत भांडणतंटे सोडवणे जातीविषयक नियमांचे पालन न करणाऱ्यांना शिक्षा करणे इ. कामे जातीपंचायतीला करावी लागत. पण आज जातीपंचायतीचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. कारण त्यांचे सर्व अधिकार राज्यसंस्थेकडे संक्रमीत झालेले आहेत. त्यामुळे जातीचा वचक जातीच्या सदस्यावर नाही. जातीतील सदस्यांच्या वर्तनाचे नियंत्रण होत नाही. त्यामुळे समाजात नियमबाह्य करणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढली आहे. तरीसुद्धा आपले हक्क व मागणीसाठी विविध जातींच्या संघटना आज उदयास आलेल्या आहेत. अशाप्रकारे जातीसंस्थेत परिवर्तन घडत आहे. तरीसुध्दा जातीव्यवस्था पूर्णपणे नामशेष झालेली नाही. पण जातीविषयक तीव्र भावना कमी झालेली आहे. जातीविषयक सदस्यात आपलेपणा आजही आहे. म्हणून जातीयवाद दिवसेंदिवस वाढत आहे. सामाजिक, सांस्कृतीक, राजकीय, आर्थिक, धार्मिक इ. सर्वच क्षेत्रात कमी जास्त प्रमाणात जातीविषयक भावना दिसून येतात. नोकरी, व्यवसाय, शिक्षण, राजकारण, विवाह करताना आज या घटकास प्राधान्य दिले जात आहे. रोज नवीन जातीसंघटना उदयास येत आहे. ग्रामीण भागातून आजही अस्पृश्यावरील होणारे अत्याचार थांबलेले नाहीत जातीव्यवस्था समतेच्या तत्वाच्या व लोकशाहीच्या मार्गातील मोठा अडथळा आहे. त्यामुळे तिचे समूळ उच्चाटन होणे गरजेचे आहे.

## २.३.२ बलुता पद्धती

बलुता पद्धती हे पारंपारिक ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. दळणवळणाच्या प्रगत साधनांच्या अभावी पारंपारिक खेडी ही बाह्य जगापासून अलग होती. त्यामुळे खेड्यांनी आपल्या गरजापूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण खेड्यातच होईल अशी व्यवस्था निर्माण केली. शेतकरी वर्ग शेती कसून धान्योत्पादन करू लागले तर बिगरशेती व्यवसाय करणारे कारागीर हे शेतकऱ्यांच्या शेतीच्या व प्रपंचाच्या गरजा भागवू लागले. आणि त्याचा मोबदला म्हणून शेतकरी या कारागीरांना सुगीच्या वेळी धान्य व सणसमारंभाच्या वेळी भेटवस्तू देऊ लागले. अशा प्रकारे शेतकरी व बिगरशेती व्यावसायिक परस्परांची सेवा करून आपल्या गरजांची पूर्तता करू लागले. या व्यवस्थेलाच बलुता पद्धती असे म्हणतात. उत्तर भारतात तिला जजमानी पद्धती असे म्हणतात.

**बलुता पद्धतीची व्याख्या**

१. **प्रा. चंद्रकांत खंडागळे –** पारंपारिक भारतीय खेड्यातील विविध जातीचे लोक आपला परंपरागत व्यवसाय करून शेतकऱ्यांची वंशपरंपरेने सेवा करतात आणि त्याचा मोबदला शेतकऱ्यांकडून सुगीच्यावेळी धान्यरूपाने मिळवितात; या व्यवस्थेलाच बलुता पद्धती असे म्हणतात.

२. **ऑस्कर लेविस –** या पद्धतीत एकाच खेड्यातील प्रत्येक जातीने दुसऱ्या जातीतील कुटुंबासाठी निश्चित स्वरूपाच्या प्रमाणभूत सेवा प्रदान कराव्यात अशी अपेक्षा असते. उदा. एखादा सुतार अवजारे दुरुस्त करतो व न्हावी केस कापतो. परंतु ते या सेवा अत्यावश्यकपणे प्रत्येकास प्रदान करीत नाहीत. प्रत्येकजण अशा विशिष्ट कुटुंबासाठी किंवा कुटुंबाच्या समूहासाठी काम करतो, ज्यांच्याशी तो वंशपरंपरेने बांधलेला असतो.

३. **के. ईश्वरन** – जजमानी पद्धती ही अशी व्यवस्था आहे की जिच्यामध्ये संपूर्ण सामुदायिक जीवनात प्रत्येक जातीस एक भूमिका पार पाडावी लागते. या भूमिकेत आर्थिक, सामाजिक व नैतिक कार्ये समाविष्ट असतात.

**बलुतापद्धतीचे स्वरूप**

बलुता पद्धतीचे स्वरूप समजण्यासाठी पुढील मुद्दे विचारात घ्यावे लागतात.

**अ) बलुतेदार – अलुतेदार जाती**

बलुता पद्धतीत शेतकरी व बिगरशेती व्यवसाय करणारे लोक हे दोन घटक समाविष्ट आहेत. सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, कुंभार, परीट, न्हावी, कोळी, सोनार, गुरव, ग्रामजोशी ह्या १२ जातींचे लोक आणि साळी, माळी, तेली, तांबोळी, सनगर, धनगर, कोष्टी, गोंधळी, कोल्हाटी, डोंबारी, डवरी, भाट, मुलाणी, रामोशी, भुई इत्यादी १८ जातींचे लोक आपापल्या जातीचा व्यवसाय करून शेतकऱ्यांची सेवा करतात व त्या मोबदल्यात शेतकरी त्यांना धान्य व इतर भेटवस्तू देऊन त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था करतो. पहिल्या १२ जातींना मिळणाऱ्या मोबदल्यास 'बलुतं' तर नंतरच्या १८ जातींना मिळणाऱ्या मोबदल्यास 'अलुतं' असे म्हणतात. ज्यांना बलुतं मिळते त्यांना बलत्या, बलुतेदार किंवा कारू असे म्हणतात. तर ज्यांना अलुतं मिळते त्यांना अलुत्या, अलुतदार किंवा नारू असे म्हणतात. म्हणून बलुता पद्धतीस **'बलुता–अलुता पद्धती'**, **'बलुतेदारी–अलुतेदारी' पद्धती, कारू–नारू पद्धती** असेही म्हटले जाते. उत्तर भारतात तिला ''**जजमानी किंवा यजमानी**'' पद्धती असे म्हणतात. पूर्वी यज्ञ करणाऱ्या गृहस्थास यजमान किंवा जजमान म्हणत, जो ब्राह्मणाची सेवा घेई, पुढे बलुतेदार-अलुतेदारांची सेवा घेणाऱ्या शेतकऱ्यासही यजमान वा जजमान म्हटले जाऊ लागले. त्यावरून जजमानी पद्धती हे नाव रूढ झाले. बलुतेदार-अलुतेदारांना प्रजा, कमीन, पुरजन, परधान इत्यादी नावानेही ओळखले जाते. महाराष्ट्रात १२ बलुतेदार व १८ अलुतेदार प्रसिद्ध आहेत. त्याशिवाय इतरही कांही जाती बलुता-अलुता पद्धतीत समाविष्ट आहेत. साधारणपणे मोठ्या खेड्यात सर्व प्रमुख बलुतेदार आढळतात. मात्र सर्व अलुतेदार आढळत नाही. बऱ्याच अलुतेदार जाती भटके जीवन जगतात.

**ब) बलुतेदारांची कामे :**

१२ बलुतेदारांची कामे पुढीलप्रमाणे :

**१) सुतार :** हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाचा बलुतेदार असून तो बहुतेक खेड्यात असतो. तो औत वा कुळव, तिफण, डुबे, मोटेचे चाक, गाडी इ. लाकडी अवजारे आणि कुऱ्हाड, खोरे, कुदळ इ. चे दांडे बनवितो व त्यांची दुरुस्तीही करतो. नविन अवजारे बनविण्यासाठी सुतारास लाकूड व मदतीसाठी गडी द्यावा लागतो. तसेच त्याचा मोबदला वेगळा द्यावा लागतो. बाकीची कामे बलुत्यात करतो.

**२) लोहार :** हा ही शेतीस उपयुक्त असा बलुतेदार असून तो प्रत्येक खेड्यात असतोच असे नाही. तो बहुधा बाजाराच्या गावी असतो. तो नांगराचे फाळ, कुळवाचे वसू, मोटेचे कडे, कुऱ्हाड, खुरपे, विळा, उलथने, विळी, पार, टिकाव, कुदळ, गाडीची धाव इ. लोखंडी वस्तू बनवितो व

दुरुस्तही करतो. मोठ्या व नवीन वस्तू बनविण्यासाठी त्याला लोखंड, गोवऱ्या व मदतनीस पुरवावा लागतो.

३) **चांभार :** हा बहुतेक गावात असतो. तो मोट, चप्पला, जोडे, आसूड इ. चामड्याच्या वस्तू बनवितो व दुरुस्तही करतो.

४) **मांग :** हा शेतकऱ्यास लागणारे दोर, दोरखंड, मुसकी, कासरे, मोटेचा नाडा व सोडदोर, गोफण, चाबूक इ. बनवून देतो. तसेच खाटा व पाळणे विणून देतो. कांही ठिकाणी मांग वाजंत्री म्हणूनही काम करतात.

५) **महार :** महाराष्ट्रात प्रत्येक गावात महार असून बलुतेदारात महार कुटुंबे बहुसंख्यांक आहेत. महार बलुतेदाराचे गावकीचा महार व राबणारा महार असे दोन प्रकार होते. गावकीचा महार हा पाटील, पटवारी, कुलकर्णी इ. ना सरकारी कामात मदत करी. सरकारी कागदपत्रे तालुक्यास पोहोचविणे, दवंडी देऊन सरकारी आदेश गावकऱ्यांना कळविणे, त्यांना चावडीपुढे बोलाविणे, चावडी स्वच्छ ठेवणे, संदेश पोहोचविणे, मेलेली जनावरे ओढणे, गावाच्या सीमेची माहिती ठेवणे इ. कामे करी. या कामासाठी महारांना वतनी जमिनी दिल्या होत्या. डॉ. आंबेडकरांनी ही वतने गुलामगिरी मानून नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. परिणामी १९५८ मध्ये कायद्याने ही वतने नष्ट केली गेली. गावात महार कुटुंबांची संख्या जादा असल्याने त्यापैकी एक वा दोन कुटुंबे आळीपाळीने वर्षभर गावकीची कामे करीत. उरलेली महार कुटुंबे गावातील शेतकरी कुटुंबाकडे राबता महार म्हणून त्यांची जनावरे सांभाळणे, अवजारे शेतात पोहोचविणे, गुरांचे गोठे स्वच्छ ठेवणे, लाकडे फोडणे इ. कामे करीत व शेतकरी त्यांना बलुते व मानपान देई. महारास निश्चित उत्पन्न देणारा कोणताही व्यवसाय नव्हता. त्यांना पडेल ते काम अहोरात्र करावे लागे. आज महारांनी बौद्ध धर्म स्वीकारून हिंदू धर्माचा व बलुत्याचाही त्याग केलेला आहे.

६) **न्हावी (वारीक) :** हा गावातील पुरुषांची दाढी व हजामत करणे, लहान मुलांचे जावळ काढणे, म्हशी भादरणे ही कामे बलुत्यात करतो. शिवाय यात्रेत घोडा नाचविणे, देवाची पालखी वाहणे, दिवाळीत बड्या शेतकऱ्यांना उटणे लावून मालीश करणे इ. कामेही करतो.

७) **कोळी :** गावातील शेतकरी कुटुंबाकडे पाणी भरणे, चावडी शेणाने सारविणे, सरकारी अधिकाऱ्याची गावात बडदास्त ठेवणे, गावकऱ्यांना चुना पुरविणे इ. कामे बलुत्यात करीत असे.

८) **परीट (धोबी) :** शेतकरी कुटुंबाचे कपडे धुणे, लग्नात पायघड्या घालणे ही कामे करतो.

९) **कुंभार :** मातीचे रांजण, मडकी, लहान गाडगी, पोळ्याला मातीचे बैल, संक्रांतीस सुगड, दसऱ्यास घट इ. बलुत्यात बनवून देतो. तर विटा कौले बनवून रोखीने विकतो.

१०) **सोनार :** पूर्वी शेतसारा नाण्यात द्यावा लागे. त्यामुळे सोनार बलुत्यात नाण्याची पारख करून देई. आज त्याचे बलुते संपुष्टात आले आहे. मात्र सोन्या चांदीचे दागिने बनवून रोखीने विकण्याचे व दुरुस्तीचे काम तो करतो. सुताराप्रमाणेच सोनारही स्वतःस इतर बलुतेदारापेक्षा श्रेष्ठ मानतो.

**११) गुरव :** गावातील ग्रामदेवतेच्या देवालयाची झाडलोट करणे, देवपूजा करणे, भजन-किर्तनाचे आयोजन करून त्यात मृदंग वाजविणे, लग्न व सणाच्या वेळी पत्रावळ्या पुरविणे इ. कामे बलुत्यात करतो. देवापुढील नैवेद्य नवस म्हणून वाहिलेल्या वस्तू, दक्षिणा त्यालाच मिळते.

**१२) ग्रामजोशी :** हा बहुधा ब्राह्मण असतो. धार्मिक विधी व लग्नविधी करणे, मुहूर्त काढून देणे, ज्योतीष सांगणे, गावकऱ्यांची पत्रे वाचणे व लिहिणे इ. कामे करतो.

**इतर बलुतेदार :** वरील प्रमुख बलुतेदारांशिवाय बांगड्या भरणारा **कासार**, वेस राखणारा **वेसकर**, सरकारी अधिकाऱ्यांच्या तैनातीस असणारा **चौगुला**, कणगी, कुडवे बनविणारा **कैकाडी**, बांबूच्या वस्तू बनविणारा **बुरुड**, बकरी, कोंबडी कापून देणारा **मुलाणी**, नाव हाकणारा **नावाडी**, कापूस पिंजून गाद्या, उशा बनविणारा **पिंजारी** इ. बलुतेदारही गावकऱ्यांची बलुत्यात सेवा करीत.

**अलुतेदारांची कामे :**

१८ अलुतेदारही शेतकऱ्यांची व गावकऱ्यांची अलुत्यात सेवा करीत असत. त्यापैकी प्रमुख अलुतेदारांची कामे पुढीलप्रमाणे : **१) माळी :** फुलांचे हार, तुरे पुरविणे. **२) तेली :** तेल गाळून गावकऱ्यांना विकणे. **३) कोष्टी :** कापड विणणे. **४) शिंपी :** कपडे शिवून देणे. **५) गोंधळी :** लग्नात व देवकार्यात देवाचा गोंधळ घालणे. **७) रामोशी :** गावात रात्री गस्त घालून गावाची राखण करणे. **८) डोंबारी व कोल्हाटी :** शारीरिक कसरती व नाचगाणे करून मनोरंजन करणे. **९) नंदीवाला :** नंदीबैलाचा खेळ करून मनोरंजन करणे इ.

**क) बलुतेदार - अलुतेदारांचा मोबदला :**

सर्व बलुतेदार, अलुतेदारांना त्यांच्या सेवेचा मोबदला समान प्रमाणात मिळत नसे. अलुतेदारांपेक्षा बलुतेदारांना जास्त मोबदला दिला जाई. तथापि सर्व बलुतेदारांनाही समान मोबदला मिळत नसे. त्यांच्या सेवेच्या महत्त्वानुसार कमी-जास्त मोबदला मिळे. यासंदर्भात बलुतेदारांचे तीन स्तर किंवा ओळी पडतात.

१) ज्यांच्या सेवेवाचून शेतकऱ्यांचे हरघडी नडते त्या सुतार, लोहार, चांभार (कांही ठिकाणी मांगही) या बलुतेदारांचा पहिल्या ओळीत समावेश होतो व त्यांना सर्वाधिक बलुते दिले जाई. त्यामुळे ते मानाचे बलुतेदार मानले जात.

२) प्रपंचाच्या कामासाठी उपयुक्त असणारे परीट, कुंभार, कोळी व न्हावी हे दुसऱ्या ओळीत मोडणारे असून त्यांना पहिल्या ओळीतल्यापेक्षा कमी बलुतं मिळे.

३) सोनार, मुलाणी, गुरव, जोशी यांची सेवा शेतकऱ्यांना कांही मोजक्या प्रसंगीच घ्यावी लागत असल्याने त्यांना सर्वात कमी बलुतं मिळे. अर्थात बलुतेदारीतील ही स्तररचना सर्वत्र समान नव्हती. एका प्रदेशात दुसऱ्या ओळीत मोडणारा बलुतेदार दुसऱ्या प्रदेशात तिसऱ्या ओळीतला मानला जाई. म्हणजे प्रदेशपरत्वे भिन्नता होती. साधारणपणे शेतकऱ्यांना किती पोती किंवा मण धान्य होते व बलुतेदारास किती काम पडते या दोन्हीचा मेळ घालून किती पायल्या किंवा शेर धान्य बलुतेदारास द्यावयाचे हे ठरविले जाई.

बलुतेदार जाती परस्परांचीही सेवा करीत आणि त्या सेवांचा मोबदला वस्तुविनिमय पद्धतीने घेत किंवा सेवेच्या बदल्यात सेवा देत असत. उदा. सुताराने परीटास एखादी लाकडी वस्तू बनवून दिल्यास त्या मोबदल्यात परीट सुताराचे कपडे धुवून देई. कुंभाराने न्हाव्यास मडकी पुरविल्यास न्हावी कुंभाराचे व त्याच्या मुलाबाळांचे केस कापून देई.

अलुतेदारांच्या सेवेवाचून शेतकऱ्यांचे फारसे कांही नडत नसे. त्यामुळे शेतकरी त्यांना केवळ दयेपोटी किंवा दानधर्म म्हणून आपल्या इच्छेप्रमाणे अलुतं देत असे. बलुतं मिळणे हा जसा बलुतेदारांचा हक्क मानला जाई तसे अलुतं मिळणं हा हक्क नव्हता. अलुतं देण्यात हक्कापेक्षा शेतकऱ्यांच्या मर्जीचा भाग अधिक होता.

**ड) बलुतापद्धतीची वैशिष्ट्ये :**

**१) जातिव्यवस्थेवर आधारलेली :** बलुता पद्धती जातिव्यवस्थेवर आधारलेली होती. बलुतेदारांना आपल्या जातीचाच व्यवसाय करणे बंधनकारक होते. व्यवसाय बदलण्याचे स्वातंत्र्य नव्हते. तथापि एखाद्या गावास एखाद्या बलुतेदाराची सेवा उपलब्ध होऊ शकत नसेल तर अशावेळी परजातीतील एखाद्या व्यक्तीस त्या बलुतेदाराचा व्यवसाय करण्याची मुभा दिली जाई. उदा. एखाद्या खेड्यात सुतार नसेल तर इतर जातीच्या व्यक्तीस सुतारकीचा व्यवसाय करू दिला जाई. अर्थात असे उदाहरण अपवादात्मक असे. जातिव्यवस्थेतील श्रेष्ठ-कनिष्ठतेची भावना बलुतापद्धतीतही दिसून येते. बलुता पद्धतीत शेतकरी कुटुंब श्रेष्ठ व बलुतेदार कुटुंब कनिष्ठ मानले जाई. सुतार, सोनार, गुरव हे बलुतेदार इतर बलुतेदारांमध्ये स्वतःस श्रेष्ठ मानतात. न्हावी, परीट हे महार-मांगांपेक्षा स्वतःस श्रेष्ठ मानून त्यांचे केस कापत नाहीत व कपडे धूत नाहीत. चांभार स्वतः अस्पृश्य असूनही कातडे कमावणाऱ्या ढोर जातीस कनिष्ठ मानतो.

**२) वंशपरंपरागत पद्धती :** विशिष्ट यजमान कुटुंबाची बलुत्यात सेवा करण्याचे अधिकार वंशपरंपरेने बापाकडून मुलांकडे संक्रमीत होत असत. बलुतेदारांच्या पश्चात ह्या अधिकारांचे वाटप त्याच्या मुलांमध्ये होई. जर त्यास मुलगा नसेल तर त्याचा बलुत्याचा अधिकार त्याच्या जवळच्या नातेवाईकास (उदा. पुतण्या, जावई, भाचा इ.) दिले जात. थोडक्यात बलुत्यात काम करण्याचे अधिकार वंशपरंपरेने पिढ्यानपिढ्या चालत येत असत.

**३) स्थायी संबंध :** यजमान शेतकरी कुटुंब व त्याचे बलुतेदार यांच्यातील संबंध बहुतांशी स्थायी (स्थिर) स्वरूपाचे असत. हे संबंध कोणासही सहजासहजी तोडता येत नसत. बलुतेदार पोटासाठी यजमानावर अवलंबून असल्याने हे संबंध तोडणे त्याला परवडणारे नव्हते. म्हणूनच आपल्या गैरहजेरीत तो यजमानाच्या सेवेसाठी बदली व्यक्ती नेमून यजमानाची अडचण होणार नाही याची काळजी घेई. यजमानासही आपला बलुतेदार सहजासहजी बदलता येत नसे. अगदीच नाईलाज झाला तरच यजमान बलुतेदारातील संबंध तोडले जात. तथापि असे करणे अयोग्य मानले जाई.

**४) घनिष्ट साहचर्य :** बलुता पद्धतीत यजमान व बलुतेदार यांच्यातील संबंध हे घनिष्ट साहचर्यावर आधारलेले होते. आधुनिक अर्थव्यवस्थेप्रमाणे ते संबंध मालक-नोकर अशा स्वरूपाचे नव्हते. त्या संबंधात वेतनाचे तत्त्व नव्हते. तसेच ते करारावरही आधारलेले नव्हते. परस्पर सहकार्याने एकमेकांच्या गरजा भागविणे, 'सेवा द्यावी, सेवा घ्यावी' या तत्त्वावर आधारलेले होते. त्यामुळे

दोघेही एकमेकांच्या अडचणीच्या वेळी मदतीला धावून येत. एखाद्या वर्षी कमी धान्य पिकल्यास बलुतेदारास कमी बलुते मिळे तरीही तो नाराज होत नसे आणि शेतकरीही जेव्हा भरपूर धान्य पिके तेव्हा बलुतेदारास जादा बलुतं देण्यास कचरत नसे.

**बलुता पद्धतीचे गुण किंवा फायदे**

**१) आर्थिक स्वयंपूर्णता :** बलुता पद्धतीमुळे खेड्यांना आर्थिक स्वयंपूर्णता लाभली. खेड्याच्या सर्व गरजांची पूर्तता खेड्यातच होऊ लागली. शेतकरी धान्योत्पादन करून सर्वांच्या निर्वाहाची सोय करी. तर बलुतेदार-अलुतेदार बिगरशेती व्यवसाय करून इतर गरजांची पूर्तता करीत. त्यामुळे खेड्यांना बाह्य जगावर फारसे अवलंबून रहावे लागत नसे.

**२) सामाजिक ऐक्यास उपयुक्त :** बलुता पद्धती खेड्यात सामाजिक ऐक्य निर्माण करण्यास उपयुक्त ठरली. जातीच्या आधारे लोक वेगवेगळ्या गटात विभागले गेले होते. तरीही त्या सर्व गटांना बलुता-पद्धतीने एका सूत्रात बांधले, वेगवेगळ्या जातींमध्ये परस्परावलंबन निर्माण केले. सर्व जाती आपापले व्यवसाय करून एकमेकांच्या गरजा भागवित असल्याने त्यांच्यात सहकार्य भावना, अवलंबन भावना वाढीस लागली. त्यामुळे जातीच्या आधारे आजच्यासारखे जातीय ताणतणाव उद्‌भवले नाहीत. थोडक्यात बलुता-पद्धतीमुळे सर्व श्रेष्ठ-कनिष्ठ जातींना एकत्र येण्याची संधी मिळाल्याने ऐक्यभावना निर्माण होऊन ती दीर्घकाळ जोपासली गेली.

**३) व्यवसायाची निश्चिती :** बलुता पद्धतीमुळे व्यक्तीला व्यवसायाची निश्चिती मिळाली. जन्माने जात व जातीवरून व्यवसाय ठरत असल्याने कोणता व्यवसाय करावा याची चिंता नसे. त्यामुळे व्यक्ती निश्चिंत असे. आजच्या सारखे व्यवसाय शोधत फिरण्याची पाळी व्यक्तीवर येत नसे.

**४) व्यावसायिक शिक्षणाची सोय :** बलुता पद्धतीमुळे व्यक्तीला व्यावसायिक शिक्षण कुटुंबातच मिळण्याची सोय झाली. जातीचाच व्यवसाय करावयाचा असल्याने मुले लहानपणापासूनच कुटुंबात वडिलधाऱ्या मंडळींच्या हाताखाली व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करीत असत. त्यासाठी आजच्या सारखा शिक्षण-प्रशिक्षणावर खर्च करावा लागत नसे.

**५) आर्थिक संरक्षण :** बलुता पद्धतीत व्यक्तीला आर्थिक संरक्षण मिळत असे. जातीचाच व्यवसाय करण्याचे बंधन असल्याने समाजात व्यावसायिक स्पर्धा नव्हती. एकाच व्यवसायातील बलुतेदारांची संख्या गावात जास्त असल्यास गावातील शेतकरी कुटुंबांची वाटणी बलुतेदारांमध्ये केली जाई आणि आपल्या वाट्याच्या कुटुंबांची सेवा करून बलुते मिळविले जाई. तसेच बलुत्याचे अधिकार बापाकडून मुलांकडे वंशपरंपरेने संक्रमीत होत असत. त्यामुळे व्यक्तीला आर्थिक संरक्षण प्राप्त होई. यजमान शेतकरी कुटुंब आपल्या बलुतेदारास केवळ धान्यच देत नसे तर गरजेनुसार घर बांधण्यासाठी दगड, माती, लाकूडफाटा, सरपण, एखादे दुभते जनावर, त्यासाठी चारा, सणावारास भोजन, पोषाख, मुलाबाळांच्या विवाहप्रसंगी आजारपणात मदत इ. गोष्टी पुरवित असे. थोडक्यात बलुता पद्धतीत बलुतेदारास आर्थिक संरक्षण मिळत असे.

**६) सामाजिक संरक्षण :** बलुता पद्धतीत व्यक्तीस सामाजिक संरक्षणही मिळत असे. यजमान कुटुंब व बलुतेदार हे परस्परांच्या सुखदुःखात सहभागी होत. संकटकाळात एकमेकांच्या मदतीसाठी धावून जात. यजमान कुटुंबात जर बारसे, मुंज, डोहाळे जेवण, विवाह, देवकार्य असेल तर

बलुतेदारास भोजन, पोषाख, भेटवस्तू देऊन त्याचा मानसन्मान केला जाई. बलुतेदाराची कोणतीही अडचण यजमान शेतकऱ्याच्या सल्ल्याने सोडविली जाई. बलुतेदारास कोणी त्रास देत असेल तर यजमान बलुतेदाराच्या बाजूने उभा राही, त्याला धीर देई. अशाप्रकारे बलुतापद्धतीमुळे व्यक्तीस सामाजिक संरक्षणही मिळत असे.

**बलुतापद्धतीचे दोष किंवा तोटे**

वरीलप्रमाणे बलुता पद्धती व्यक्ती व समुदायाच्या दृष्टीने फायदेशीर असली तरी कालांतराने तिच्यात कांही दोष व अपप्रवृत्ती उदयास आल्या. त्यामुळे ती तोटयाची ठरली. बलुता पद्धतीचे प्रमुख दोष किंवा तोटे पुढीलप्रमाणे:

**१) व्यक्तिस्वातंत्र्यास मारक :** बलुता पद्धती व्यक्तिस्वातंत्र्यास मारक ठरली. व्यक्तीचा व्यवसाय जातीवरून ठरत असल्याने तिला आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते. बलुता पद्धती जातीसंस्थेवर आधारलेली असल्याने बलुतेदारांना जातीचे निर्बंध पाळावे लागत. यजमान कुटुंबाकडून पुरेसे बलुते मिळत नसले किंवा कांही त्रास होत असला तरीही बलुतेदारास यजमान कुटुंबाची सेवा करीत रहावे लागे. त्याला यजमान बदलता येत नसे. रूढी परंपरा व जाती पंचायतीचे निर्बंध यांच्या दडपणाखालीच व्यक्तीला वावरावे लागे, जगावे लागे. स्वतंत्र जीवन जगता येत नसे. त्यामुळे एखादा नवा उद्योग धंदा सुरू करावा, आपल्या अंगच्या कलागुणांचा विकास करावा अशी प्रेरणा व्यक्तीला मिळू शकली नाही.

**२) आर्थिक विकासास मारक :** बलुता पद्धती ही व्यक्तिविकासाप्रमाणेच आर्थिक विकासासही मारक ठरली. आर्थिक विकासासाठी समाजात स्पर्धात्मक वातावरण असावे लागते. बलुता पद्धतीत व्यक्तीला जातीचाच व्यवसाय करावा लागत असल्याने समाजात व्यावसायिक स्पर्धा निर्माण होऊ शकली नाही. अशी स्पर्धा नसल्याने व्यक्तीला आर्थिक संरक्षण मिळाले हे जरी खरे असले तरी स्पर्धा नसल्याने विशिष्ट जातीची मक्तेदारी निर्माण झाली. बलुतेदार आपले व्यवसाय परंपरागत तंत्रानेच करू लागले. आपल्या व्यवसायात सुधारणा करण्याची त्यांना प्रेरणा मिळाली नाही व गरजही भासली नाही. विशिष्ट व्यवसाय विशिष्ट पद्धतीनेच बलुतेदार जाती पिढ्यानपिढ्या करीत आल्या. परिणामी ग्रामीण आर्थिक विकासास चालना मिळू शकली नाही.

**३) अपुरे उत्पन्न :** बलुता पद्धतीत बलुतेदारांना वर्षभर रोजगार उपलब्ध होत नसे. कारण शेती व्यवसाय हा हंगामी असल्याने केवळ हंगामातच शेताशी संबंधित असणाऱ्या बलुतेदारांना यजमान शेतकऱ्याकडे काम मिळत असे. तर प्रापंचिक गरजा भागविणाऱ्या बलुतेदारांनाही वर्षातून कांही ठराविक दिवसच काम मिळत असे. ऊर्वरीत दिवसात त्यांना रोजगार मिळण्याची खात्री नसे. परिणामी बलुतेदारांचे वार्षिक उत्पन्न अत्यंत तुटपुंजे असे. एखाद्या वर्षी चांगले पिकपाणी न आल्यास वर्षभर यजमानाची सेवा करूनही पूर्वनिर्धारीत बलुत यजमान देऊ शकत नसे. त्यामुळे बलुतेदारांना निर्वाह चालविणे अवघड होई. अशा स्थितीत त्यांना सावकाराकडून भरमसाठ व्याजदराने कर्ज घ्यावे लागे.

**४) शोषणाची व्यवस्था :** बलुता पद्धती ही यजमान शेतकरी व बलुतेदार जाती यांच्यातील साहचर्यावर व सहकार्यावर आधारलेली होती. कालांतराने मात्र बलुता पद्धतीत शेतकऱ्यांचे वर्चस्व निर्माण झाले. बलुतेदार हे निर्वाहासाठी पूर्णपणे शेतकऱ्यांवर अवलंबून होते व बहुसंख्य शेतकरी उच्च

जातीचे असल्याने त्यांचे सामाजिक स्थान व दर्जा उच्च होता. या दोन गोष्टींचा शेतकऱ्यांनी गैरफायदा घेतला व आपल्यावर आश्रित असलेल्या कनिष्ठ बलुतेदार जातींचे शोषण सुरू केले. त्यांना अल्प मोबदल्यात किंवा विना मोबदल्यात गुलामासारखे राबवून घेण्यास सुरुवात केली. परिणामी उच्च जातींची विनातक्रार सेवा करणे हे बलुतेदारांचे आद्य कर्तव्य ठरले तर बलुतेदारांकडून सेवा घेणे हा उच्च जातींचा अधिकार मानला गेला. त्यामुळे उच्च जाती ह्या शोषक व बलुतेदार जाती शोषित बनल्या आणि बलुता पद्धती ही शोषणाची व्यवस्था बनली. यासंदर्भात **बीडलमॅन** म्हणतात की बलुता पद्धती ही कनिष्ठ जातींवर दबाव व नियंत्रण टाकण्याचे, त्यांना घाबरविण्याचे व धमकावण्याचे उच्च जातीतील शेतकऱ्यांचे प्रमुख साधन बनले.

**५) अनिष्ट प्रथांना बळकटी :** बलुता पद्धतीमुळे ग्रामीण समाजातील कांही अनिष्ट प्रथा व परंपरा अधिकच बळकट झाल्या. जातीचे व्यवसायासंबंधीचे निर्बंध व श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना अधिक भक्कम बनली. बलुतेदारांचे व्यवसाय केवळ कनिष्ठच नव्हे तर तुच्छ व अपवित्र मानण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. महार, मांग, चांभार, ढोर इ. अस्पृश्य बलुतेदारांना वेठीस धरून राबविण्याची प्रथा सुरू झाली. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करणे हे उच्च जातींना वावगे वाटेनासे झाले. परिणामी उच्च जातीविषयी अस्पृश्य जातींच्या मनात कटुतेची भावना निर्माण झाली आणि जातीय तेढ निर्माण होण्यास मदत झाली.

### बलुतापद्धतीतील परिवर्तन

**प्रास्ताविक :** प्राचीन काळापासून भारतीय समाजात बलुता पद्धतीने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. परंपरागत कृषी अर्थव्यवस्थेशी ही पद्धती सुसंगत ठरली. तथापि आधुनिक काळात मात्र बलुता पद्धती अनेक कारणांमुळे मोडकळीस आली आहे. ब्रिटिश राजवटीत भारतीय समाजात औद्योगिकीकरण, नागरीकरण या प्रक्रिया सुरू झाल्या. तसेच भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा उदय झाला. त्यामुळे वस्तूविनिमय पद्धतीच्या जागी मुद्राप्रधान व्यवस्था आली. शिक्ष प्रसारास सुरुवात झाली. सामाजिक व राजकीय सुधारणांच्या चळवळी सुरू झाल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या सर्व प्रक्रियांची गती दिवसेंदिवस वाढतच गेली. त्यामुळे बलुता पद्धतीवर आघात होऊन ती आज कोलमडून पडली आहे. तिच्यामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आले आहे. या परिवर्तनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे:

**१) व्यवसाय स्वातंत्र्य :** बलुता पद्धतीत व्यवसाय स्वातंत्र्याचा अभाव होता. व्यक्तीला स्वजातीचा व्यवसाय करणे बंधनकारक होते. इतर जातीचा व्यवसाय करणाऱ्यास जातीपंचायती शिक्षा करीत. आज मात्र भारतीय राज्यघटनेने सर्वांनाच व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य दिल्याने कोणत्याही जातीची व्यक्ती आवश्यक ती पात्रता धारण करून आपल्या आवडीचा व्यवसाय निवडू शकते. जातीचाच व्यवसाय करण्याची सक्ती आज राहिली नाही.

**२) रोख मोबदला :** आज जातीचाच व्यवसाय करण्याची सक्ती राहिली नसली तरी खेड्यात अनेक बलुतेदार आपल्या जातीचा व्यवसाय करताना दिसतात. तथापि मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव वाढल्याने ते श्रमाचा मोबदला धान्याऐवजी पैशात घेण्यावर भर देत आहेत.

**३) व्यवसायांचे आधुनिकीकरण :** आज अनेक बलुतेदारांच्या परंपरागत व्यवसायांचे मोठ्या प्रमाणावर आधुनिकीकरण झाले आहे. त्यामुळे त्या व्यवसायाद्वारे पैसा व प्रतिष्ठाही मिळवता येऊ लागली आहे. त्यामुळे सुतार, लोहार, चांभार, न्हावी, परीट असे बलुतेदार खेड्यात राहून बलुत्यात सेवा देण्याऐवजी शहरात जाऊन आपापले व्यवसाय आधुनिक पद्धतीने करू लागले आहेत. उदा. खेड्यातील सुतार शहरात येऊन फर्निचर बनवितो, परीट लॉंड्री काढतो, न्हावी सलून काढतो, शिंपी टेलरिंगचे दुकान काढतो. त्यामुळे त्यांना कामाचा रोख मोबदला मिळतो. आज पैशाला प्रचंड महत्त्व आल्याने उच्चजाती देखील कनिष्ठ जातीचे व्यवसाय करू लागल्या आहेत.

**४) सामाजिक जागृती :** आज कनिष्ठ बलुतेदार जातीतही शिक्षण प्रसार झाल्याने त्यांच्यात वैचारिक व सामाजिक जागृती घडून आली आहे. सुशिक्षित तरुणांना बलुता पद्धती ही गुलामगिरी वाटत आहे. जातीवर आधारलेली उच्चनीचता त्यांना मान्य नाही. त्यामुळे उच्च जातीची सेवा करणे हे त्यांना आपले कर्तव्य वाटत नाही. त्यामुळे त्यांनी बलुतापद्धतीकडे पाठ फिरविली असून आधुनिक अर्थव्यवस्थेत उपलब्ध झालेल्या नवनवीन व्यवसायांचा ते स्वीकार करू इच्छितात. अशाप्रकारे बलुतेदार जातीत झालेल्या जागृतीमुळे बलुतापद्धतीचे अधिष्ठान किंवा पाया उखडला गेला. त्यामुळे ती कोलमडून पडली.

**५) शेतीचे आधुनिकीकरण :** परंपरागत समाजात शेती व्यवसाय केंद्रस्थानी ठेवून बलुतापद्धतीची उभारणी केली होती. तथापि त्यावेळी शेती व्यवसायातील उत्पादनतंत्रे व साधने मागासलेली होती. त्यामुळे परंपरागत पद्धतीने आपले व्यवसाय करणारे सुतार, लोहार, चांभार, मांग इ. बलुतेदार उपयुक्त ठरत होते. आज मात्र शेतीचे आधुनिकीकरण होऊ लागले आहे. नवनवीन व प्रगत उत्पादन तंत्रे व अवजारे उदयास आली आहेत. त्यांची निर्मिती व दुरुस्ती करणे हे परंपरागत बलुतेदारांना शक्य नाही. ट्रॅक्टर, डिझेल इंजिन, विजेचे पंप, पाईप लाईन व कूपनलिकांचे साहित्य इ. ची निर्मिती व दुरुस्तीसाठी कारखाना पद्धती व प्रशिक्षित तंत्रज्ञांची गरज भासते. त्यामुळे साहजिकच पारंपारिक बलुतेदार आधुनिक शेती व्यवसायाबाहेर फेकले गेले आहेत. थोडक्यात जेथे शेतीचे आधुनिकीकरण झाले आहे तेथे बलुता पद्धतीचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

**बलुतापद्धतीतील परिवर्तनाची कारणे**

**१) औद्योगिकीकरण :** ब्रिटिश राजवटीत सुरू झालेल्या औद्योगिकीकरणाची गती स्वातंत्र्यानंतर वाढत गेली. मोठमोठे उद्योगधंदे निघाले. उद्योगधंद्यात कामगार भरती ही व्यक्तीच्या जातीऐवजी गुणकौशल्याच्या आधारे होऊ लागली. त्यामुळे बलुतेदार बलुत्याचा त्याग करून उद्योगधंद्यात कामगार म्हणून भरती होऊ लागले. त्यामुळे बलुता पद्धतीस खिंडार पडले.

**२) नागरीकरण :** औद्योगिकीकरणाबरोबरच नागरीकरणाचीही गती वाढली. शहरे ही उद्योग, व्यापार, शिक्षण यांची केंद्रे बनली. शहरात बाजारपेठा, बँका, शिक्षणसंस्था, शासकीय-निमशासकीय कार्यालये इ. मोठ्या प्रमाणावर निघाली. म्हणजेच शहरात रोजगाराच्या नवनवीन संधी विपुल प्रमाणात उपलब्ध झाल्या. महत्त्वाचे म्हणजे शहरातील ह्या रोजगारात किंवा व्यवसायात अधिक मानसन्मान, प्रतिष्ठा, वेतन व सोयी सुविधा मिळू लागल्या. त्यामुळे खेड्यातील बलुतेदार-अलुतेदार शहरी व्यवसायाकडे आकर्षित झाले. परिणामी बलुत्याचा त्याग करून शहराकडे ते नविन व्यवसायाच्या शोधार्थ स्थलांतर करू लागले. शहरात जातीचाच व्यवसाय करण्याचे बंधन नसल्याने त्यांना नवे

व्यवसाय मिळविण्यात रुढी परंपरांचा अडथळा येईनासा झाला. कांही बलुतेदार (उदा. न्हावी, परीट, सुतार, चांभार) हे शहरात येऊनही आपल्या जातीचा व्यवसाय बलुत्याऐवजी रोख मोबदल्यात करू लागले. अशाप्रकारे नागरीकरणामुळे बलुता पद्धतीवर मोठा आघात झाला.

**३) दळणवळणाची प्रगत साधने :** पूर्वी दळणवळणाची प्रगत व पुरेशी साधने नसल्याने खेड्यांचा बाहेरील जगाशी फारसा संपर्क येत नव्हता. ग्रामीण व्यक्तीला तिची इच्छा असो वा नसो जातीचाच व्यवसाय बलुत्यात करीत खेड्यातच जीवन कंठावे लागे. खेडे सोडून तिला बाहेर जाता येत नसे व नवा व्यवसायही करता येत नसे. म्हणजेच भौगोलिक व व्यावसायिक गतिशीलतेस वाव नसल्याने बलुता पद्धती व्यक्तीला स्वीकारावीच लागे. आधुनिक काळात दळणवळणाची प्रगत साधने अस्तित्वात आल्याने खेड्यांचा बाह्य जगाशी नित्य व घनिष्ठ संपर्क येऊ लागला. वृत्तपत्रे, मासिके, आकाशवाणी, दूरदर्शन या साधनांमुळे नवीन ज्ञान, विचार, कल्पना, मूल्ये यांची ओळख बलुतेदार जातींना होऊन लागली. त्यामुळे जातिप्रथा व बलुतापद्धती अन्यायकारक आहेत याची जाणीव त्यांना झाली. परिणामी त्यांचा त्याग करून खेड्याबाहेर ते स्थलांतर करू लागले. मोटार, रेल्वे इ. वाहतूक साधनांमुळे हे स्थलांतर सुलभ व शक्य झाले. थोडक्यात दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे भौगोलिक व व्यावसायिक गतिशीलतेस चालना मिळाली. परिणामी बलुता पद्धती कोलमडून पडली.

**४) शिक्षण प्रसार :** ब्रिटिश राजवटीत स्त्रीशूद्रासह सर्वांना शिक्षण खुले झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खेड्यापाड्यातही शिक्षणसंस्था सुरू झाल्या. बलुतेदार-अलुतेदारांची मुले शिकू लागली. शिक्षणामुळे त्यांना समता, बंधुत्व, न्याय, मानवता या मूल्यांची ओळख होऊ लागली. त्यामुळे त्यांची अस्मिता जागृत झाली. जातिव्यवस्था व बलुतापद्धती त्यांना अन्यायकारक व गुलामगिरीसारखी वाटू लागली. त्यामुळे शिक्षण घेऊन अधिक सन्मानाचे व्यवसाय मिळविण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले. राखीव जागांच्या तरतुदीमुळे त्यांचे हे प्रयत्न यशस्वी होऊ लागले. थोडक्यात बलुतेदार जातीत झालेल्या शिक्षण प्रसारामुळे बलुता पद्धतीची पिछेहाट झाली.

**५) सुधारणा चळवळी :** ब्रिटिश राजवटीत म. फुले, राजर्षि शाहू, डॉ. आंबेडकर, महर्षि शिंदे इ. समाजसुधारकांनी कनिष्ठ जातींच्या उद्धाराच्या चळवळी सुरू केल्या. त्यामुळे त्यांना आपल्या न्याय्य हक्कांची जाणीव झाली. त्या हक्कांच्या प्राप्तीसाठी त्यांनी संस्था व संघटना स्थापन करून चळवळी सुरू केल्या. त्यामुळे बलुतेदार-अलुतेदार जातींच्या ठिकाणी आत्मतेज, आत्मविश्वास, लढाऊ वृत्ती निर्माण झाली. परिणामी बलुता पद्धतीचे जोखड त्यांना झुगारून देणे शक्य झाले.

**६) लोकसंख्या वाढ :** भारतातील वाढत्या लोकसंख्येचा भार शेती व्यवसायावर पडत गेल्याने शेती व्यवसायात सर्वांनाच रोजगार मिळेनासा झाला. बलुतेदारांची संख्या ही वाढल्याने त्यांनाही बलुता पद्धतीत रोजगार मिळणे अवघड झाले. त्यामुळे बेकार झालेले बलुतेदार-अलुतेदार नव्या रोजगाराच्या शोधार्थ गावाबाहेर पडू लागले. परिणामी बलुता पद्धतीचा ऱ्हास होणे अपरिहार्य ठरले.

**७) लोकशाही व्यवस्था :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने लोकशाही राज्यपद्धती स्वीकारली. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता या मूल्यांवर आधारलेली समाजव्यवस्था उभरण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तरतुदी राज्यघटनेत केल्या. सर्व भारतीयांना समान लेखून, धर्मभेद, जातिभेद, लिंगभेद, अस्पृश्यतापालन, वेठबिगार प्रथा इ. अनिष्ट प्रथांचे कायद्याने उच्चाटन केले. तसेच सर्व भारतीयांना व्यवसाय स्वातंत्र्य व देशात कोठेही भ्रमण करण्याचे व वास्तव्य करण्याचे

स्वातंत्र्य राज्यघटनेने दिले. त्यामुळे बलुतेदारांना परंपरागत व्यवसायाचा त्याग करून हव्या त्या ठिकाणी जाऊन हवा तो व्यवसाय करणे शक्य झाले. अशाप्रकारे बलुतापद्धतीतील सक्ती, जबरदस्ती व उच्चनीचता कायद्याने संपुष्टात आणल्याने तिचे अधिष्ठान कोसळले.

**८) मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव :** आधुनिक काळात मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव सर्वत्र वाढत चालला आहे. उत्पादीत माल बाजारपेठेत विकून जास्तीत जास्त नफा मिळविणे हे या अर्थव्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे केवळ पोटासाठी बलुत्यात राबणे हे बलुतेदारांना नकोसे वाटणे स्वाभाविक आहे. म्हणून आपल्या आवडीचा व्यवसाय करून पैसा कमावणे व आपली आर्थिक प्रगती साधणे हे त्यांचेही उद्दिष्ट बनले आहे. सारांश मुद्राप्रधान अर्थव्यस्थेच्या प्रभावामुळे वस्तुविनिमयावर आधारलेली बलुता पद्धती टिकून राहणे अशक्य आहे.

## २.४ स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

★ **एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. कुटुंबाची व्याख्या द्या.

२. ग्रामीण कुटुंबाची कोणतीही तीन वैशिष्ट्ये सांगा.

३. जात शब्दाचा अर्थ सांगा.

४. जातीचे कोणतेही तीन निर्बंध सांगा.

५. शेतीशी संबंधीत असलेल्या बलुतेदारांची नावे सांगा.

## २.५ सारांश (Let us sum up)

या अध्ययन घटकात तुम्ही भारतीय ग्रामीण समाजातील कुटुंब, जात व बलुता पद्धती यांचे अध्ययन केलेले आहे. सर्वप्रथम ग्रामीण कुटुंबाची पुढील वैशिष्ट्ये अभ्यासलेली आहेत. १) ग्रामीण कुटुंब हे संयुक्त प्रकारचे आहे. २) ग्रामीण कुटुंब पितृसत्ताक आहे. ३) ग्रामीण कुटुंबात कुटुंब प्रमुखाची एकाधिकारशाही आहे. ४) ग्रामीण कुटुंब शेती व्यवसायावर आधारलेले आहे. ५) ग्रामीण कुटुंबाचे स्वरूप एकजिनसी आहे. ६) ग्रामीण कुटुंबात अवलंबन भावना व शिस्त आढळते. ७) ग्रामीण कुटुंबाचे धार्मिक व सांस्कृतिक जीवन सामूहिक स्वरूपाचे असते. ८) ग्रामीण व्यक्तीला आपल्या कुटुंबाविषयी मोठा अभिमान वाटतो. ९) ग्रामीण कुटुंब सापेक्षतः स्थिर असते. यानंतर तुम्ही ग्रामीण कुटुंबात होत असलेल्या रचनात्मक व कार्यात्मक परिवर्तनाची चर्चा केली आहे. कुटुंबसंस्थेनंतर जातीसंस्थेची व्याख्या, वैशिष्ट्ये व तिचा ग्रामीण समाजावरील प्रभाव यांची चर्चा केलेली आहे. जातीचा अर्थ समजण्यासाठी आपण कांही मान्यवर समाजशास्त्रज्ञांनी जातीच्या केलेल्या व्याख्या अभ्यासल्या आहेत. त्यानंतर जातीची पुढील वैशिष्ट्ये समजाऊन घेतलेली आहेत. १) जातीचा आधार जन्म आहे. २) जातिव्यवस्थेत श्रेष्ठकनिष्ठतेच्या भावनेवर आधारलेली अधिक्रमी रचना आढळते. ३) जातिव्यवस्थेत उच्च जातींना विशेषाधिकार दिले आहेत तर कनिष्ठ जातींवर अनेक अपात्रता लादल्या आहेत. ४) जातिव्यवस्थेत व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नाही. ५) जात

हा अंतर्विवाही समूह आहे. ६) जातिव्यवस्थेत खाणेपिणे व सामाजिक संपर्कावर कांही निर्बंध घातले आहेत. ७) जातिव्यवस्थेस हिंदुधर्माचा आधार दिलेला आहे. यानंतर जातिव्यवस्थेचा ग्रामीण समाज जीवनाच्या विविध अंगांवर-आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय पडलेल्या प्रभावाचे स्वरूप समाजावून घेतले आहे. जातीसंस्थेनंतर तुम्ही बलुता पद्धतीचा अर्थ, स्वरूप, तिचे गुणदोष व तिच्यात होत असलेल्या परिवर्तनाची व त्या परिवर्तनाच्या कारणांची चर्चा केलेली आहे.

## २.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

★ **एका वाक्यात उत्तरे**

१. मार्शल जोन्सच्या मते कुटुंब हा लैंगिक संबंधावर आधारलेली सामाजिक संस्था असून प्रजोत्पादन व अपत्यांचे संगोपन ही तिची कार्ये आहेत.

२. संयुक्त कुटुंब, पितृसत्ताक कुटुंब आणि कुटुंबप्रमुखाची एकाधिकारशाही ही तीन ग्रामीण कुटुंबाची वैशिष्ट्ये आहेत.

३. जात म्हणजे जन्माच्या आधारे निर्माण झालेला सामाजिक समूह होय.

४. जातीसंस्थेने तीन निर्बंध पुढीलप्रमाणे आहेत.

१) जातीचाच व्यवसाय करणे, २) आपल्या जातीतील व्यक्तीशीच विवाह करणे, ३) आपल्यापेक्षा कनिष्ठ जातीतील लोकांशी घनिष्ठ सामाजिक व शारीरिक संपर्क न ठेवणे.

५. सुतार, लोहार, चांभार, मांग हे शेतीशी संबंधीत असणारे बलुतेदार आहेत.

## २.७ स्वाध्याय / गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. कुटुंबाची व्याख्या देऊन ग्रामीण कुटुंबाची वैशिष्ट्ये विशद करा.

२. जातीसंस्थेची व्याख्या व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३. बलुता पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. ग्रामीण कुटुंबाची कार्ये

२. जातीसंस्थेतील परिवर्तन

३. बलुता पद्धतीतील परिवर्तन

४. बलुता पद्धतीतील परिवर्तनाची कारणे.

## २.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- तुमच्या जवळपासच्या एखाद्या खेड्यास भेट द्या आणि तेथील कुटुंबसंस्थेत होत असलेले परिवर्तन समजावून घ्या व त्या आधारे एक टिपण तयार करा.
- एखाद्या खेड्यातील विविध जातीच्या लोकांतील परस्परसंबंधाचे निरीक्षण करा आणि त्यामध्ये होत असलेल्या बदलांची नोंद करा.
- एखाद्या खेड्यातील बलुता पद्धतीची सद्यःस्थिती समजावून घ्या.

## २.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Reading)


१. ग्रामीण समाजशास्त्र - प्रा. चंद्रकांत खंडागळे, प्रकाशिका - सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, २००५.

२. Rural Society in India, Dr. A. R. Desai.

३. Social Systems in Rural India, A. E. Punit, Sterling Publishers Pvt. Ltd., New Delhi-1978.


❑❑❑

## घटक ३

# ग्रामीण पुनर्रचना

**(Rural Reconstruction)**

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

   ३.२.१ ग्रामीण पुनर्रचना : अर्थ आणि उद्दिष्टे

   ३.२.२ ग्रामीण पुनर्रचनेची साधने

      १) समुदाय विकास कार्यक्रम

      २) ग्रामीण पुनर्रचना व सहकार चळवळ

३.३ सारांश

३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ स्वाध्याय

३.६ चिंतन आणि कार्य

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


**३.० उद्दिष्टे** (Objectives)**:**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला–

- ग्रामीण पुनर्रचनेचा अर्थ स्पष्ट करता येईल.
- ग्रामीण पुनर्रचनेची उद्दिष्टे सांगता येतील.
- ग्रामीण पुनर्रचनेत समुदाय विकास कार्यक्रमाचे योगदान सांगता येईल.
- ग्रामीण पुनर्रचनेत सहकार चळवळीचे योगदान सांगता येईल.

**३.१ प्रास्ताविक** (Introduction) :

भारतातील ग्रामीण समाजाचा अभ्यास करीत असताना, आपणास वेगवेगळ्या पैलूवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. पारंपारिक ग्रामीण समाज हा शांत आणि सुव्यवस्थित होता. अलगता, स्वयंपूर्णता, स्वायत्तता, बलुतेदारी पद्धत, संयुक्त कुटुंब पद्धती, जातिव्यवस्था, प्रतिकूल काळातही टिकून राहण्याची क्षमता इ. वैशिष्ट्यांनी युक्त होता. गावचा कारभार गाव पातळीवरच चालत होता.

राजाचा हस्तक्षेप क्वचित होत असे. पण ब्रिटिशांच्या काळात ग्रामीण समाजाला धक्के बसू लागले. ब्रिटिशांनी महसूल गोळा करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली. पारंपरिक ग्रामपंचायतीचे अधिकार काढून घेतले. त्यामुळे ग्रामीण समाजात अस्वस्थता निर्माण होऊ लागली. प्राचीन भारतात असणाऱ्या सामूहिक जीवनाला एकप्रकारे सुरुंगच लागला. यासंदर्भात धनंजयराव गाडगीळ म्हणतात, 'खरोखर ब्रिटिश राज्याबद्दल घृणा (तिरस्कार) करण्यासारखी कोणती गोष्ट त्यांनी केली असेल तर ते हे की, आमचा समाज त्यायोगे दुर्बल झाला, विभागला गेला. स्वतःच्या सोयीसाठी जमीनदारी पद्धतीला प्रोत्साहन दिल्यामुळे गरीब आणि श्रीमंत यामधील दरी वाढत गेली. त्यामुळे ग्रामीण समाज उध्वस्त झाला. १९४७ नंतर स्वतंत्र भारतातील जनतेला आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्व अर्थाने सक्षम करण्याचे एक मोठे आव्हान उभे राहिले. भारताचा आत्मा खेड्यात राहतो हे जाणून साऱ्या देशाची बांधणी खेड्यांच्या पुनर्रचनेवर अवलंबून आहे ही वस्तुस्थिती नजरेआड करून चालणार नाही. म्हणूनच ग्रामीण पुनर्रचना अटळ आहे.

## ३.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

### ३.२.१ ग्रामीण पुनर्रचना : अर्थ आणि उद्दिष्टे

पुनर्रचना किंवा पुनर्निमाण या शब्दाचा अर्थ एखाद्या गोष्टीची नव्याने रचना करणे होय. याचा शब्दशः दुसरा अर्थ असाही होतो की, पुन्हा बांधणे. मूळच्या आराखड्याप्रमाणे किंवा नमुन्याप्रमाणे मूळच्या सामग्री व्यतिरिक्त किंवा आहे तीच सामग्री वापरून पुनर्बांधणी करणे. यात वास्तू व वस्तू ह्यांच्या पुनर्बांधणीचा अंतर्भाव होतो. जी गोष्ट वास्तूची तीच गोष्ट एखाद्या समाजाची. पारंपरिक भारतीय समाज हा स्वयंपूर्ण व स्वायत्त होता. बलुतेदारी पद्धतीमुळे बऱ्याच वस्तू गावपातळीवरच उपलब्ध होत होत्या. मूळात लोकांच्या गरजाच मर्यादित होत्या. त्यामुळे एकेकाळी ग्रामीण जीवनात शांतता होती. कालांतराने ब्रिटिशांचे राज्य भारतात सुरू झाले. त्यांनी सत्तेचे केंद्रिकरण (Contralization of Power) केले. त्यांच्या राज्यकारभारामुळे संपूर्ण ग्रामीण समाज ढवळून निघाला. ब्रिटिशकाळात एक गोष्ट मात्र चांगली झाली ती म्हणजे, खेड्यांची पुनर्रचना करण्यासंबंधी विचार सुरू झाला. कांही कार्यक्रम सुरू झाले. जसे रविंद्रनाथ टागोर यांचा शांतीनिकेतन प्रयोग, गुरगाव प्रयोग, सर डॅनियल हॅमिल्टन यांची ग्रामीण पुनर्रचनेची योजना, निलोखेरी प्रयोग इ. या वरील सर्व प्रयोगांना फार मोठे यश मिळाले असे नाही. पण ग्रामीण पुनर्रचनेसाठी एक आवश्यक असणारी पार्श्वभूमी तयार झाली. यामुळे ग्रामीण समाजातील समस्या उजेडात आल्या. समस्यांचे गांभीर्य लक्षात येऊ लागले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण समाजाच्या पुनर्रचनेसाठी कार्यक्रम तयार करीत असताना त्यांचा उपयोग झाला.

ग्रामीण पुनर्रचना याचा अर्थ खेडयांची पुनर्बांधणी करणे होय. ग्रामीण लोकांच्या कल्याणाचा (Wellbeing) विचार करणे. म्हणजेच त्यांच्या सामजिक, आर्थिक व राजकीय विकासासाठी प्रयत्न करणे होय.

ग्रामीण पुनर्रचनेची संकल्पना विशद करणारे तीन विचार प्रवाह आहेत.

१) मानवतावादी समूह (Philantropic Group)

२) सुधारणावादी समूह (Reformist Group)

३) क्रांतीकारी समूह (Revolutionary Group)

### १) मानवतावादी समूह

या विचारवंताचा समूह हा अधिक व्यवहारवादी दृष्टिकोणाचा (Pragmatic approach) स्वीकार करतो. सध्या अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेतूनच ग्रामवासियांच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यावर भर दयावा असे या विचारवंताचे मत आहे. ग्रामीण भागातील शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करणे, गरिब ग्रामवासियांच्या गरजा पूर्तीसाठी निधीची निर्मिती करणे आणि जमीनदार व सावकार यांचा गरिब शेतकरी आणि शेतमजूर यांच्यावरील दबाव कमी करण्यासाठी त्यांना नैतिक आव्हान करणे.

### २) सुधारणावादी समूह

सध्या अस्तित्वात असलेल्या सामजिक संस्थाच्या चुकीच्या कार्यामुळे ग्रामवासियांमध्ये आर्थिक-सामाजिक आणि सांस्कृतिक मागासलेपण निर्माण झालेले आहे. त्यामुळे सामाजिक संस्थाच्या कार्यामध्ये बदल करणे गरजेचे आहे. असे कार्यात्मक बदल घडवून आणले तरच ग्रामीण समाजाचा सर्वांगिण (Holistic) विकास घडून येऊ शकेल असे सुधारणावादी विचारवंताचे मत आहे.

### ३) क्रांतीकारी समूह

या विचारवंताच्या मते संपूर्ण ग्रामीण समाजाची मूस (Malrix) च मुळातून बदलली पाहिजे. सध्याचे ग्रामवासियांचे मागासलेपण हे केवळ सामाजिक संस्थाच्या चुकीच्या कार्यामुळे निर्माण झालेले नाहीतर मूळ समाजव्यवस्थेत (Social System) दोष आहेत. म्हणून संपूर्ण समाजव्यवस्थाच बदलली पाहिजे.

तिन्ही विचारपंरपरा या आपापल्या मतांशी चिकटून आहेत. पण प्रत्यक्षात पुनर्रचना करीत असताना या तिन्हीमध्ये समन्वय प्रस्थापित करणे गरजेचे आहे.

**ग्रामीण पुनर्रचनेची तीन अंगे** (Three aspects of Rural Reconstruction)

ग्रीमीण पुनर्रचनेची तीन अंगे (पैलू) आहेत.

**१) भौतिक अंग** (Pysical Aspect): यामध्ये ग्रामवासियांचे आरोग्य सुधारणे व त्यांचे जीवनमान (Standard of living) उंचावणे यावर भर दिला जातो. यासाठी चांगल्या आरोग्यविषयक सुविधा व वैद्यकिय मदत पुरविणे गरजेचे आहे.

**२) बौद्धिक अंग** (Intellectual Aspect): यामध्ये खेडयातील मुलांना मुलींना व प्रौढाना उत्तमप्रतिचे शिक्षण देण्यावर भर दिला जातो. यासाठी रेडीओ, वृत्तपत्रे, दूरदर्शन, चित्रपट, व्याख्याने आणि प्रात्यक्षिके यांचा वापर केला पाहिजे.

**३) नैतिक अंग** (Moral Aspect): यामध्ये वर्षानुवर्षे अंधश्रद्धा, धर्मभोळया समजूती, रूढी परंपरा याच्या जोखडात अडकलेल्या ग्रामवासियांना मुक्त करण्यासाठी त्यांच्यामध्ये जाणीव जागृती करण्यावर भर दिला जातो. ज्यामुळे तो स्वतः आपल्या अंगी असलेली मरगळ झटकून टाकेल व आपले जीवन अधिक चांगले बनविण्यासाठी शासनाला सहकार्य करेल.

**ग्रामीण पुनर्रचनेची उद्दिष्टे** (Objectives of Rural Reconstruction)

पारंपारिक ग्रामीण समाज हा रूढीप्रिय होता. त्याच्या गरजा मर्यादित होत्या. आजही ग्रामीण भागात रहाणारी लोकसंख्या मोठी आहे. सन १९०१ साली खेड्यामध्ये/ग्रामीण भागात रहाणाऱ्यांचे प्रमाण ८९% होते १९५१ साली ८३% होते २००१ साली ते ७२% इतके होते. याचाअर्थ आजही ७४ कोटीच्या आसपास लोक खेड्यात राहतात. त्यामुळे विकासाची कोणतीही योजना ग्रामीण समाज वगळून होऊच शकत नाही. ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्व विशद करताना ४ एप्रिल १९३६ च्या हरिजन या अंकात म. गांधी म्हणतात, भारताची खरी ओळख काही शहरावरून नाही तर ती सात लाख खेड्यांमध्ये आहे. पण आम्हा शहरवासियांचे असे मत आहे की, भारत शहरात आहे, आणि आमच्या गरजा पूर्ण करण्यासाठी गावांची निर्मिती झाली आहे. पण आपण कधी क्षणभर थांबून हा विचार केला का की, या गरीब खेडूतांकडे खाण्यासाठी काही आहे किंवा घालण्यासाठी कपडे आहेत किंवा उन वारा पाऊस यापासून वाचण्यासाठी छप्पर आहे? पुढे २९ ऑगस्ट १९३६ मध्ये गांधीजी म्हणतात, 'जर गाव संपल तर भारत संपला म्हणून समजा. जगातून भारताचे अस्तित्वच संपून जाईल. गावाचा विकास तेंव्हाच शक्य आहे जेव्हा ग्रामवासियांचे कमीत कमी शोषण होईल.' म. गांधीनीच्या या विचारावरून ग्रामीण पुनर्रचनेचे महत्व लक्षात येईल.

ग्रामीण पुनर्रचनेची उद्दिष्टे पुढीलप्रमणे सांगता येतील.

**१) दारिद्र्य निर्मूलन**

ब्रिटिशांनी सावकारी व जमिनदारी पद्धतीला प्रोत्साहन दिल्यामुळे जमिनदारांचा एक मोठा वर्ग भारतात तयार झाला. परिणामी प्रचंड जमिनीची मालकी असणारा एक वर्ग आणि काम करण्याची क्षमता आहे पण कसण्यासाठी जमिन नसणारा एक मोठा वर्ग अशी विषमता समाजात निर्माण झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतातील ६१% लोकांचे दरडोई उत्पन्न फक्त दीड आणे (नऊ पैसे) होते. यामध्ये त्याना एकवेळचे जेवण ही घेता येत नव्हते. समाजातील हे दारिद्र्य दूर करण्यासाठी ग्रामीण समाजाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे.

**२) शिक्षणाचा प्रसार करणे**

पारंपरिक ग्रामीण समाजात रूढी, प्रथा, परंपरा व अंधश्रद्धा यांचे प्राबल्य मोठया प्रमाणात होते. त्यामुळे समाजाची प्रगती होऊ शकली नाही. महात्मा फुले यांनी सांगितल्याप्रमाणे विद्येविनामती गेली ...... इतके अनर्थ एका अविद्येने केले. १९५१ साली पुरुष साक्षरतेचे प्रमाण २७.१६% तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ८.८६% इतके होते. निरक्षरता हा विकासातील मोठा अडथळा आहे. ग्रामवासियांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्याना शिक्षीत करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय त्यांच्या जाणीवांच्या कक्षा रूंदावणार नाहीत. संपूर्ण जग झपाटयाने बदलते आहे. या बदलत्या जगाची आव्हाने स्वीकारायची असतील तर ग्रामवासियांना शिक्षण देणे नितांत गरजेचे आहे.

**३) आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे**

जीवनात आरोग्याला अनन्यसाधारण असे महत्व आहे. आरोग्य हे दोन प्रकारचे आहे व्यक्तिगत आरोग्य व सार्वजनिक आरोग्य. व्यक्तिगत आरोग्य व्यक्तीच्या शरीरांशी निगडीत आहे. तर सार्वजनिक आरोग्य हे सार्वजनिक स्वच्छता, सांडपाण्याची व्यवस्था इ.शी निगडीत आहे. हे दोन्ही भिन्न असले

तरी ते एकमेकांशी निगडीत आहेत. आज ग्रामीण भागात अस्वच्छतेमुळे डेंगू, पितज्वर, हिवताप यासारखे आजार पसरतात. अस्वच्छ पाण्यामुळे कावीळ, पटकी यासारखे आजार होतात. ग्रामवासियांचे आरोग्य उत्तम रहाण्यासाठी त्यांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे व त्यासंदर्भात चित्रे, पोस्टर, वृत्तपत्रे, मासिके, फिल्म इ. माध्यमातून प्रबोधन करणे महत्वाचे आहे. ग्रामीण पुनर्रचनेचे हे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे.

**४) कृषीसंबंधीत जाणीव जागृती करणे**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. बहुसंख्य लोक आजही शेतीवर व शेतीसंबंधीत व्यवसायावरच अवलंबून आहेत. भारतात आजही काही ठिकाणी स्थानांतरित शेती केली जाते. तर काही शेतकरी आज ही पारंपरिक पद्धतीनेच शेती करतात त्यामुळे एकरी उत्पादन फारच मर्यादित राहाते. त्यामुळे ग्रामीण पुनर्रचनेत कृषी सुधारणेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. उत्तम बी बियाणे, रासायनिक खते, यंत्रशक्तीचा वापर, किटकनाशकांचा वापर, सिंचन व्यवस्था, पशुपालन, पशुसंवर्धन इ. घटकांचा पुनर्रचनेत समावेश होतो.

**५) राजकीय जागृती निर्माण करणे**

भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचा स्वीकार केला. ही लोकशाही तळापर्यंत पोहचविण्यासाठी पंचायत राज्यव्यवस्था निर्माण केली. या पंचायत राज्यव्यवस्थेच्या माध्यमातून योग्य व कर्तृत्ववान नेतृत्व निर्माण व्हावे अशी अपेक्षा आहे. सर्वसामान्य लोकांना सत्तेची दारे खुली करणे, मतदारामध्ये जागृती निर्माण करणे, पंचायत राज्य व्यवस्थेच माध्यमातून ग्रामीण परिवर्तन घडवून आणणे हे ग्रामीण पुनर्रचनेचे उद्दिष्ट आहे.

**★ स्वंय अध्ययनासाठीचे प्रश्न–१**

१) ग्रामीण समाजाला कोणत्या कालखंडात धक्के बसू लागले?

२) ग्रामीण समाजाला कोणत्या व्यवस्थेमुळे स्वंयपूर्णता प्राप्त झाली होती?

३) ग्रामवासियांचे मागासलेपण दूर करण्यासाठी संपूर्ण समाजव्यवस्थाच बदलली पाहिजे असे कोणत्या विचारप्रवाहाचे मत आहे?

४) २००१ च्या जनगणनेनुसार खेड्यात राहणाऱ्यांची संख्या किती टक्के आहे.

५) 'जर गांव संपलं तर भारत संपला' हे विधान कुणी केले आहे?

## ३.२.२ (अ) समुदाय विकास कार्यक्रम (Community Development Programme)

भारतात ग्रामीण विकासासाठी अनेक दृष्टिकोन डोळयासमोर ठेऊन प्रयोग केले गेलेले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळापासून असे प्रयोग सुरू आहेत. जसे रविद्रनाथ टागोर यांचा शांतिनिकेतन प्रयोग (१९२०), एफ. एल. ब्रेन यांचा गुरगांव प्रयोग, सर डॅनिअल हॅमिल्टन योजना, ख्रिश्चन मिशनची ग्रामविकास कामे, म. गांधी यांचे ग्रामविकास कार्यक्रम, एटावा योजना, आदर्श सेवा संघ, पोहरी इ. या सर्व कार्यक्रमांचे स्वरूप मर्यादित होते. आणि या कार्यक्रमाना सत्ता आणि संपत्ती यांचे पाठबळ फारसे नव्हते, त्यामुळे अपेक्षीत यश लाभू शकले नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय खेड्यांच्या विकासाचे गांभीर्य व महत्व सरकारने ओळखले. खेड्यांकडे दुर्लक्ष करून राष्ट्रविकास साधणे अशक्य आहे हे लक्षात येताच ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी २ आक्टो, १९५२ रोजी भारतात समाज विकास योजनेचा कार्यक्रम आखला गेला.

**पार्श्वभूमी**

सन १९४३ साली बंगाल प्रांतात पडलेल्या दूष्काळावर मात करण्यासाठी 'अधिक अन्नधान्य पिकवा' ही मोहिम हाती घेण्यात आली. अशा प्रकारची मोहिम भारतात प्रथमच सुरू करण्यात आली. या मोहिमेची दोन अंगे होती. पहिले कृषी योग्य जमिनी जी सध्या पडीक अवस्थेत होती ती कृषीयोग्य बनविणे व दुसरे म्हणजे प्रतिहेक्टर उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे. सन १९४८ साली 'अधिक अन्नधान्य पिकवा' मोहिमेचे ठाकूरदास समितीद्वारे मूल्यमापन करण्यात आले. मूल्यमापनानंतर या अभियानाचे नुतनीकरण करण्यात आले व १९५०-५१ मध्ये पंचवार्षिक योजनेचा भाग बनविण्यात आले. १९५२ मध्ये व्ही. टी. कृष्णम्माचारी समितीने 'अधिक अन्नधान्य पिकवा' या मोहिमेसाठी काही सूचना केल्या. यामधील एक महत्वाची सूचना ही होती की, अशी व्यापक मोहिम आखली पाहिजे की, जे देशातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहचेल व ग्रामीण जीवनाच्या विकासासाठी मदत करेल. याच पार्श्वभूमीवर समुदाय विकास कार्यक्रमाचा जन्म झाला.

समुदाय विकास कार्यक्रम सुरू करण्यामध्ये तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे मोठे योगदान आहे.

**समुदाय विकास कार्यक्रमाची व्याख्या**

१) **ओ. पी. दहामा**: समुदाय विकास ही एक अशी सतत चालणारी सामाजिक कृतीची प्रक्रिया आहे की ज्यायोगे त्या समाजातील लोक -

   १) आपल्या सर्वसामान्य गरजा निश्चित करतात.

   २) औपचारिकरित्या किंवा अनौपचारिकरित्या संघटन करून नियोजन व कृती ठरवितात.

   ३) उपलब्ध असणाऱ्या उत्पादन साधनांवर जास्तीत जास्त भर देऊन योजनांची अमलबजावणी करतात.

२) **कार्ल टायलर**: समुदाय विकास कार्यक्रम ही एक अशी पद्धत आहे की, ज्या पद्धतीत ग्रामवासीय आपली आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी एकमेकांना मदत करतात. ज्यामुळे समर्थपणे काम करणाऱ्या लोकांचा समूह बनून राष्ट्रीय विकास कार्यक्रमास हातभार लावतात.

३) **केंब्रिज कॉन्फरन्स**: समाजाच्या शक्य झाल्यास स्वंयप्रेरणेने सर्व समाजाला चांगले रहाणीमान मिळवून देणारी चळवळ म्हणजे समुदाय विकास कार्यक्रम होय.

४) **यु. नो.** (United Nations Organization): शासन व जनता यांच्या संघटीत प्रयत्नाने सर्व समाजाची सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक परिस्थिती उंचावणारी व राष्ट्रीय विकास

कार्यक्रमास हातभार लावण्यास शिकविणारी एक परिवर्तनाची प्रक्रिया म्हणजे समुदाय विकास कार्यक्रम होय.

५) **भारतीय नियोजन मंडळ** (Planning Commission of India)ः पंचवार्षिक योजना ज्या पद्धतीच्या सहाय्याने खेड्यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रयत्नाला सुरवात करतात ती पद्धती म्हणजे समुदाय विकास कार्यक्रम होय.

वरील सर्व व्याख्येच्या आधारे समाज समुदाय विकास म्हणजे –

अ) नव्या जीवनाचा स्वीकार करणे.

ब) स्वतःच्या विकासासंबंधीच्या गरजा निश्चित करून त्यांच्या पूर्ततेसाठी सामूहिकरित्या प्रयत्न करणे.

क) विकासासाठी उपलब्ध साधनांचा जास्तीत जास्त वापर करणे.

ड) ग्रामवासियांच्या आर्थिक–सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीत सुधारणा करून राष्ट्रीय विकास कार्यक्रमाला हातभार लावणे.

समुदाय विकास म्हणजे ग्रामीण भागात राहणाऱ्या सर्वलोकांचा विकास होय.

**समुदाय विकास कार्यक्रमाची वैशिष्ट्ये**

**१) शासन व जनता यांचा सहभागः** या कार्यक्रमात जनतेच्या सहभागाला अधिक महत्व आहे. आपल्या विकासासंबधी धोरण ठरविण्याचे अधिकार जनतेला आहेत. या धोरणांच्या अमंलबजावणीला शासन सहकार्य करणार असे याचे स्वरूप आहे.

**२) सत्तेचे विकेंद्रीकरण** (Decentralization of Power) : आजपर्यंत शासनाच्या सर्व योजनांचे केंद्रिकरण झाले होते. त्यामुळे त्यांचे सरकारीकरण झाले होते. या योजनेत मात्र जनतेचे आपल्या समस्या आपल्याच बळावर सोडवावयाच्या आहेत, अशी भूमिका आहे. स्वंयविकासाची व स्वावलंबनाची भावना निर्माण झाल्यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन ती ग्रामस्थांपर्यत पोहचेल.

**३) परस्परसहयोग आणि समाजिक न्याय** (Mutual Co-operation & Social) : ग्रामीण जनतेने परस्परसहकार्य करून आपल्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावयाचे असल्यामुळे त्यांच्यामध्ये आपोआपच सहकार्यांची वृत्ती विकसित होईल. सर्व घटकांना सामावून घेण्याच्या प्रवृत्तीमळे दुर्बल घटकांचाही विकास होईल व नैसर्गिक न्यायाच्या तत्वाला अनुसरून सामाजिक न्यायाचे तत्व अमलात येईल.

**४) ग्रामीण नेतृत्वाचा विकास** (Development of Rural Leadership) : या कार्यक्रमात लोकसहभागाला अधिक महत्व देण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामीण नेतृत्वाचा आपोआपच विकास होईल. बाहेरील नेतृत्वाची गरज भासणार नाही. ग्रामीण नेतृत्वाची बीजे या कार्यक्रमात आहेत. स्थानिक नेतृत्वामुळे ग्रामीण प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपोआपच मदत होणार आहे.

५) **क्रमाक्रमाने व योजनापूर्वक विकास** (Planned & Step by Step Development) : हा कार्यक्रम अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने तयार केलेला आहे. तो टप्याटप्याने संपूर्ण देशभर लागू केला जाणार आहे. त्यामुळे अत्यंत नियोजनबद्ध विकास हे त्याचे वैशिष्ट्य आहे.

- **समुदाय विकास कार्यक्रम** (C.D.P.)

समुदाय विकास कार्यक्रम हा प्रामुख्याने ग्रामीण जनतेच्या उद्धारासाठी सुरू झाला. जनतेने स्वंयस्फूर्तपणे यात सहभागी व्हावे अशी अपेक्षा यामधून व्यक्त करण्यात आलेली आहे. या योजनेतंर्गत विकास कामे पार पाडावयाची आहेत. त्यांचे आठ गटात विभागात वर्गीकरण करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १) कृषी | २) दळणवळण | ३) शिक्षण | ४) आरोग्य |
| ५) प्रशिक्षण | ६) समाजकल्याण | ७) रोजगार | ८) गृहनिर्माण |

**१) कृषी विकास**

हा सर्वात महत्वाचा कार्यक्रम होता. या योजनेत पडीक जमीन लागवडीखाली आणणे, दुबार पिके घेणे, शेतीसाठी पाणीपुरवठा, वीज पुरवठा, शेतकऱ्यांना अर्थसहाय्य, तांत्रिक ज्ञान, पशुसंर्वधन इ. चा समावेश होतो.

**२) दळणवळण साधनांचा विकास**

ग्रामीण भागात कच्चे व पक्क्या रस्त्यांची निर्मिती करणे, पुलांची सोय करणे, मोटार व रेल्वे वाहतुकीच्या सोयी करणे, खेडे व शहर यामधील अंतर कमी करणे. व्यापार उद्योगात वाढ करणे.

**३) शिक्षण** (Education)

खेड्यामध्ये निःशुल्क प्राथमिक शिक्षणाची सोय करणे, तांत्रिक शिक्षणाची सोय करणे, प्रौढ वर्ग चालविणे, जेणेकरून साक्षरतेचे प्रमाण वाढेल.

**४) आरोग्य**

ग्रामीण भागातील लोकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करणे, शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करणे, सांडपाणी, गटार, ग्रामसफाई, शोषखड्डे, निधूर्र चूल, कुटुंब नियोजन यासारखे उपक्रम राबविणे, आहारासंबंधी मार्गदर्शन, रोगप्रतिकारक लसीची सोय यांचाही यामध्ये समावेश होता.

**५) प्रशिक्षण** (Training)

प्रत्येक पंचायतीच्या क्षेत्रात गृहउद्योग, लघुउद्योग, शेती, सामान्य ज्ञान यांचे ग्रामवासियांना प्रशिक्षण देणे.

**६) समाजकल्याण** (Social Welfare)

बालक, युवक, प्रौढ व महिलांसाठी वेगवेगळे कार्यक्रम आखणे, प्रौढ मंडळे, महिला मंडळे स्थापन करून त्यांचे प्रबोधन करणे व त्यांच्यासाठी कार्यक्रम तयार करणे.

**७) रोजगार** (Employment)

स्थानिक कुटिरोद्योगांना प्रोत्साहन देणे, शेती व शेतीपूरक रोजगार निर्माण करणे त्यासाठी प्रशिक्षण देणे. यासाठी सहकारी संस्थांची स्थापना करून अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे बेकारी कमी करणे.

**८) गृहनिर्माण** (Housing)

झोपडीमध्ये व कच्चा घरांमध्ये रहाणाऱ्या ग्रामवासियांना पक्की घरे बांधण्यास प्रोत्साहन देणे. अर्थसहाय्य करणे, आदिवासी, अनुसूचित जाती, बेघर यांना घरे बांधण्यास मदत देणे.

**विकास कार्यक्रमाची प्रशासकीय यंत्रणा Administrative Mechnism**

हा विकास कार्यक्रम कार्यन्वित करण्यासाठी केंद्रिय पातळीपासून (Central Level) ग्रामपातळीपर्यंत (Village Level) एक यंत्रणा तयार करण्यात आली.

**१) केंद्रिय स्तर** (Central Level)ः सर्वोच्च स्तरावर एक केंद्रिय समिती स्थापन करण्यात आली. केंद्रिय योजना आयोगाचे (Planning Commission) सर्व सदस्य, कृषी व खाद्य मंत्रालयाचे मंत्री यांचा समावेश होता. पंतप्रधान हे पदसिद्ध अध्यक्ष असत.

**२) राज्यपातळीवरील स्तर** (State Level) : विकास कार्यक्रमांची प्रत्यक्ष कार्यवाही ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. यासाठी प्रादेशिक विकास समिती असते. विकास मंत्री हा समितीचा अध्यक्ष असतो. केंद्रिय समितीशी संपर्क ठेऊन त्यांच्या निर्देशानुसार कार्यक्रमाची आखणी करणे व राज्यपातळीवर सर्व विकास कार्यक्रमांवर देखरेख ठेऊन त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे हे या समितीचे काम आहे.

**३) जिल्हा पातळी** (At District Level)ः जिल्हा पातळीवर जिल्हाधिकरी हा विकास समितीचा अध्यक्ष असतो, किंवा जिल्हा विकास अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाते. (DDO) (District Development Officer). याच्या मदतीला वेगवेगळया विभागात काम करणारे अधिकारी असतात. उदा. कृषी अधिकारी, समाजकल्याण अधिकारी, शिक्षणाधिकारी इ.

**४) खंड किंवा गट पातळी** (Block Level)ः खंड किंवा गटपातळीवर पंचायत समितीद्वारा काम चालते. विकास कामासाठी गट विकास अधिकारी BDO(Block Development Officer) असतो. त्याच्या हाताखाली विस्तार आधिकारी (EO- Extension Officer) असतात. ते विशेष तज्ञ असतात.


**५) गाव पातळी** (Village Level)ः ग्रामसेवक हा गावपातळीवरील कार्याची जबाबदारी सांभाळतो. त्याचे कार्य बहुमुखी असते. त्याला सर्व क्षेत्रांची सामान्य माहिती असावी लागते. ग्रामसेवक हा शासन व जनता यामधील महत्वाचा दूवा आहे.

**विकासखंडाची स्थिती** (Position of the Development Blocks)

हा कार्यक्रम व्यवस्थितपणे राबविता यावी यासाठी भारतातील खेड्यांची विभागणी विकास गटात करण्यात आली. २ आक्टोबर, १९५२ पासून ही योजना सुरू झाली. सुरवातीलाच ५५ विकास

गट तयार करण्यात आले. एका विकास गटात ५०० चौरस मैल क्षेत्रफळ, साधारपणे ३०० खेडी, एक लाख ५० हजार एकर जमीन व दोन लाख लोकसंख्येचा समावेश करण्यात आला. या गटावर देखरेख करण्यासाठी विकास गट अधिकरी नेमला गेला. एक गटाचे पुन्हा तीन गटात विभागणी करण्यात आली. एका गटात १०० खेडी ६५००० लोकसंख्या व १५० ते १७५ चौरस मैल क्षेत्रफळाचा समावेश करण्यात आला. यावर देखरेख ठेवण्यासाठी गट विकास अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आले. या विकास गटाचे पुन्हा २० विकास गट तयार करण्यात आले. पाच खेड्यांचा एक विकास गट व त्यावर विकास अधिकारी म्हणून ग्रामसेवकाची नेमणूक करण्यात आली.

थोडक्यात




ग्रामसेवकाचे कार्यालय हे पाच खेड्यांपैकी एका खेड्यामध्ये असते.

समुदाय विकास कार्यक्रम तीन टप्प्यात कार्यान्वित होत असे.

१) राष्ट्रीय विस्तार टप्पा (National Extension Phase)

२) जोमदार सामूहिक विकास टप्पा (Intensive Community Development Project Phase)

३) जोमदार विकासोत्तर टप्पा (Post Intensive Development Phase)

पहिल्या टप्प्यात सरकारचे आर्थिक सहाय्य कमीत कमी असते. दुसऱ्या टप्प्यात सरकारचे आर्थिक सहाय्य भरपूर असते. तिसऱ्या टप्प्यात असे गृहित धरण्यात येते की योजना पूर्ण करण्यास त्या विकास गटाची क्षमता तयार झालेली आहे. त्यामूळे सरकारी आर्थिक मदत कमी होते.

पहिल्या पंचवार्षिक योजनेत या विकास योजनेला प्रत्येक गटाला तीन वर्षासाठी २२ लाख रूपयांची तरतूद करण्यात आली. १९५३-५४ या वर्षासाठी ही रक्कम १५ लाख करण्यात आली. राष्ट्रीय विस्तार योजनेला ४ लाख जोमदार सामूहिक विकास गट टप्यासाठी ८ लाख रूपयांची तरतूद करण्यात आली.

सन १९५७ साली चौथ्या मूल्यमापन अहवालानुसार समुदाय विकास कार्याची विभागणी चार गटात करण्यात आली.

**१) रचनात्मक कार्यक्रम–** रस्तेबांधणी, गटार बांधणी, शाळा इमारत बांधणी, समाज मंदीर निर्मिती, दवाखान्याची इमारत बांधणी, अस्पृश्यांसाठी घरे, नळपाणी योजना.

**२) पाणी पुरवठा–** शेतीसाठी पाणी, विहिर खुदाई, पाईपलाईन, इंधन विहीरी, तलावबांधणी.

३) **शेती विषयक कार्यक्रम**- जमीन सुधारणा, मृदासंधारण, सुधारित बी-बियाणे, खते व रासायनिक खते, किटकनाशके, नवीन पीक पद्धती.

४) **संस्थात्मक कार्यक्रम-** तरूण मंडळे, महिला संघटना, समाज केंद्रे, सहकारी संस्था, प्रसुतीगृहे, जनावरांचे दवाखाने, प्रौढ शिक्षण केंद्रे, प्राथमिक शाळा, दाई प्रशिक्षण केंद्रे, कुटिरोद्योग, उत्पादन व प्रशिक्षण केंद्रे, धूरविरहित चूल, शोषखड्डे इ.

**समुदाय विकास कार्यक्रमाचे मूल्यमापन** (Evaluation of Community Development Programme)

या योजनेचे १००% मूल्यमापन करणे थोडे कठीण आहे. कारण ग्रामीण भागात विकासाच्या अनेक योजना एकावेळी सुरू असल्याने मिळालेले यश हे केवळ समुदायविकास कार्यक्रमाचे आहे असे म्हणतात येत नाही. या योजनेचे अनेक विचारवंतानी मूल्यमापन केलेले आहे, त्यामध्ये प्रो. विल्सन, प्रो. कार्ल टेलर, प्रो. ऑस्कर लेविस, प्रा. ऑपलर, प्रा. दुबे यांचा समावेश आहे. वरील सर्व विचारवंतानी हे मान्य केले आहे की, ग्रामीण समाजाच्या पुनर्रचनेसाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयोगी आहे. याबद्दल कुणीही शंका व्यक्त केलेली नाही. यासंदर्भात प्रा. कार्ल टेलर म्हणतात की, या समुदाय विकास कार्यक्रमाच्या संकल्पना व योजनेनुसार सर्व स्थानिक स्वसहायता गट आपल्या समूहाच्या विकासासाठी व नैसर्गिक आणि मानवी संसाधनाना गतीमान करतील. यासाठी सर्व शासकीय संस्था कडून तांत्रिक मदत केली जाईल.

**समाजविकास कार्यक्रमाचे यश**

**१) ग्रामविकास कार्यक्रमाची जाणीव**

ग्रामीण विकास कार्यक्रमाची सुरवात संपूर्ण देशात टप्प्याटप्याने झाली. या कार्यक्रमात लोकसहभागाला अधिक महत्व देण्यात आले. त्यामुळे लोकांमध्ये जाणीव जागृती करण्यामध्ये या कार्यक्रमाला बऱ्यापैकी यश आलेले आहे. श्री ललीत सेन यांनी केलेल्या पाहणीत असे आढळून आले की, ८७% लोकांना या योजनेची माहिती होती.

**२) परंपरागत शेतीमध्ये सुधारणा**

भारतीय शेतकरी परंपरागत पद्धतीने शेती करीत होते. या योजनेमुळे सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, शेती तंत्रज्ञान, प्रशिक्षण, आधुनिक शेती अवजारे, आर्थिक सहाय्य इत्यादी उपलब्ध झाल्यामुळे शेतकरी पारंपरिक शेती सोडून आधुनिक पद्धतीने शेती करू लागले. यामुळे पडिक जमिन लागवडीखाली येऊ लागली. सिचंनाच्या सोयी उपलब्ध झाल्यामुळे बागायत शेतीचे प्रमाण वाढले.

**३) आरोग्य विषयक सुविधा**

रोग हे देवाच्या अवकृपेमुळे होतात हा समज ग्रामीण भागात मोठया प्रमाणात होता. ग्रामीण भागात मोठया प्रमाणात आरोग्य केंद्रे, वैद्यकिय सुविधा, वेगवेगळ्या प्रकारच्या लसी, प्रशिक्षित दाई, डॉक्टर्स यांच्या उपलब्धतेमुळे ग्रामवासियांचे आरोग्यविषयक गैरसमज दूर होऊ लागले. १९७० पर्यंत ४३९१ विकासगटांमध्ये ४८२३ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत होती. १९६९-७० या काळात १६ लाख कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने पौष्टिक

आहार कार्यक्रम हाती घेण्यात आला. बिहार, मध्य प्रदेश कर्नाटक, ओरिसा या राज्यामध्ये पौष्टीक आहार केंद्रे स्थापन करण्यात आली.

### ४) लघु व घरगुती उद्योगाना प्रोत्साहन

या योजनेतंर्गत ग्रामीण स्त्री-पुरुषांना जोड व्यवसाय उपलब्ध करून देण्यात आले. जोडव्यवसायासाठी प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली. कुटिरोद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले. उद्योगधंद्याला असणाऱ्या यंत्राची दुरूस्ती करणारी केंद्रे स्थापन करण्यात आली. ग्रामीण कारागिरांना प्रोत्साहित करण्यासाठी अल्प मुदतीची कर्जे उपलब्ध करून देण्यात आली.

### ५) शिक्षणाचा प्रसार

समुदाय विकास कार्यक्रमामुळे ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणात झाला. १९७० मध्ये प्रौढ साक्षरता केंद्रांची संख्या २१७२३ इतकी होती तर सुमारे १४ लाख प्रौढ या कार्यक्रमातंर्गत साक्षर झाले.

### ६) ग्रामवासियांच्या मनोवृत्तीत बदल

समुदाय विकास योजनेच्या सकारात्मक कार्यामुळे ग्रामवासियांच्या मनोवृत्तीत हळूहळू बदल घडून येऊ लागले. असे बदल घडवून आणण्यामध्ये शैक्षणिक कार्यक्रमांचा वाटा मोठा आहे. अंधश्रद्धा भोळ्या समजूती, दैववाद, मागासलेपणा, जातीयतेचे बंध शिथील होऊ लागले.

### ७) आदिवासींना स्थैर्य

आदिम समाजालाही राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेतल्यामूळे त्यांच्या भागातही विकासाचे कार्यक्रम राबविण्यात आले. अन्नासाठी सतत भटकंती करणाऱ्या आदिवाशींना स्थिर शेतीची गोडी वाटू लागली. झोपड्यांच्या जागी पक्की घरे झाली. मुले शाळेला जाऊ लागली. स्त्रिया प्रौढ शाळेत जाऊ लागल्या. त्यांच्यासाठी काही खास कार्यक्रम आखले गेले व भरीव आर्थिक तरतूदही करण्यात आली.

## समुदाय विकास कार्यक्रमाचे अपयश

### १) शासकीय सेवकांमध्ये सेवेचा अभाव

या योजनेत अनेक बुद्धिमान, तत्वनिष्ठ माणसे असली तरी त्यांच्यात योजना राबविण्यासाठी आवश्यक असणारी तळमळ दिसून आली नाही. ही एक संघिक कृती आहे ही भावनाच हरपून गेली. त्यामुळे शेवटच्या घटकांपर्यंत ही योजना पोहचू शकली नाही.

### २) कार्यक्रमाचे सरकारीकरण

प्रा. टेलर यांच्यामते हा कार्यक्रम पूर्णपणे सरकारी मदतीवरच सुरू होता. लोकांचा अपेक्षित सहभाग दिसून आला नाही. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या विकासाच्या दृष्टिने खेड्यात ही योजना मूळ धरू शकली नाही.

### ३) लोकांच्यातील उदासिनता

स्वतःच्या गावाचा, आपल्या भागाच्या विकासाची जबाबदारी आपली आहे ही भावना निर्माण करण्यात ही योजना यशस्वी झाली नाही. त्यामुळे लोकांच्यात विकासाबाबत अपेक्षित उत्साह निर्माण झाला नाही. लोक उदासिन राहिले.

### ४) खेड्यातील संपन्न वर्गाचे वर्चस्व

खेड्यातील सहकारी संस्था, विकासमंडळे, ग्रामपंचायती व बडे जमीनदार, बडे शेतकरी यांचे एकूणच वर्चस्व ग्रामीण भागावर आहे. त्यामुळे वेगवेगळया योजनांचा फायदा (कागदी घोडे नाचवून, प्रसंगी कायद्यातील त्रुटींचा फायदा घेत) आपल्या पदरी पाडून घेतले. सर्व सामान्यांना या योजनेचे फायदे अगदी अल्प प्रमाणात मिळाले. त्यामुळे अपेक्षित ग्रामीण परिवर्तन घडून आले नाही.

### ५) श्रम गरिबांचे पण श्रेय बड्यांना

या योजनेत लोकसहभाग व श्रमदान याला अधिक महत्व आहे. श्रमदानात गरिब वर्ग मोठया प्रमाणात सहभागी झाला. श्रमदानातून रस्ते तयार झाले. पण याचा फायदा श्रीमंत किंवा बड्या शेतकऱ्यांनाच अधिक झाला.

### ६) कागदी योजना

युवा मंडळे, महिला मंडळे, वाचनालये, प्रौढ शिक्षणाचे वर्ग यासाठी मोठया प्रमाणात तरतूद करण्यात आली होती. कागदोपत्री संस्था स्थापन झाल्या. पण प्रत्यक्षात कार्य काहींच झाले नाही असे मूल्यमापनात आढळून आले.

म्हणून प्रा. टेलर म्हणतात की, समाजकार्य कुशलता असलेले प्रशिक्षित अधिकारी हजारोंनी निर्माण केले पाहिजेत. कार्यकर्त्यांना आवश्यक असलेली तळमळ, निष्ठा, प्रामाणिकपणा या गुणांची जोड नसेल तर यंत्रणेचे हेतू कितीही उदात्त व उच्च असले तरी यंत्रणा कोसळल्यावाचून राहू शकत नाही. त्याचबरोबर लोकांचे अज्ञान व दैववाद, संघटनेच्या चुका, योजनेतील कामाची चुकीची क्रमवारी व तांत्रिक, सामाजिक ज्ञानाचा कर्मचाऱ्यांचा अभाव ही समुदाय विकास कार्यक्रमाच्या अपयशाची कारणे आहेत.

**सहकार चळवळ** (Co-operative Movement)

भारतीय ग्रामीण समाजाचा इतिहास हा सहकारावरच आधारलेला आहे. शेतकरी आणि बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार यांच्यामधील संबंध हे सहकार स्वरूपाचेच होते. त्यामुळे सहकार ही काही भारतीय समाजाच्या दृष्टिकोणातून नवी संकल्पना नाही. सहकार याचा सरळ अर्थ एकत्र येऊन काम करणे (To work together) असा होतो. ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार सहकार म्हणजे The fact of doing something together or of working together towards a shared aim. सामूहिक उद्दिष्ट साध्यासाठी एकत्रित काम करणे असा होतो. कोणत्याही कार्याच्या यशासाठी अनेकांच्या सहकार्याची गरज असते. सहकार्याशिवाय कार्य सिद्धीला जाऊच शकत नाही. जोपर्यंत बलुतेदारी पद्धत होती तोपर्यंत पैशाची गरज फारशी भासत नव्हती पण ब्रिटिश राजवटींनतर पैशाला आधिक महत्व येऊ लागले. आजकल तर 'पैसा' हेच विनिमयाचे महत्वाचे माध्यम बनलेले आहे. शेतकऱ्यांना शेतीकरण्यासाठी पैशाची नितांत आवश्यकता असते. हे पैसे पुरविण्याचे काम गाव

पातळीवर सावकार करीत असतात. पण त्यांच्याकडून शेतकऱ्यांची पिळवणूक मोठ्या प्रमाणात होते. सावकारी पाशातून शेतकरी सुटतच नाही. म्हणूनच असे म्हटले जाते की, भारतील शेतकरी कर्जात जन्माला येतो, कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो. म्हणून शेतकऱ्यांना या कर्जबाजारीपणातून बाहेर काढण्यासाठी सहकारी संस्थांची निर्मिती झाली. स्वातंत्र्यानंतर याकडे आधिक लक्ष देण्यात आले. आज गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यांमध्ये सहकाराचे जाळे निर्माण झालेले आहे. ग्रामीण पुनर्रचनेमध्ये सहकार चळवळीचा वाटा मोठा आणि महत्वपूर्ण असा आहे. म्हणूनच सहकार चळवळीचे ग्रामीण विकासामधील योगदान यानिमित्ताने आपण समजून घेणार आहोत.

**व्याख्या**

१) **प्रा. चंद्रकांत खंडागळे** – वैयक्तिक प्रयत्नानी आपली उद्दिष्टे साध्य करण्यास असमर्थ असलेल्या व्यक्तींनी स्वेच्छेने व समानतेच्या भूमिकेतून एकत्र येऊन सामूहिक प्रयत्नाने ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थापन केलेल्या व लोकशाही पद्धतीने चालविलेल्या कायदेशीर संघटनेस किंवा संस्थेस सहकारी संस्था असे म्हणतात.

२) **डॉ. इ. एम्. हघ**– ढोबळमानाने परस्परांच्या फायदयासाठी सर्वांनी स्थापिलेली ऐच्छिक संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.

(In its broadest sense, co-operation may be defined simply as a voluntary association in a joint undertaking for mutual benifit)

३) **आंतरराष्ट्रीय श्रम संघटना**– आपल्या वैयक्तिक प्रयत्नाने ज्या आर्थिक गरजा पुऱ्या करणे व्यक्तीला शक्य होत नाही, त्या समान गरजापूर्तीसाठी व सर्वांच्या भौतिक व नैतिक अभ्युदयासाठी आर्थिक दृष्टीने दुर्बल असणारे लोक समान हक्क व जबाबदारी या आधारावर स्वच्छेने एकत्र येऊन जी संघटना स्थापन करतात त्याला सहकारी संस्था असे म्हणतात.

(A Co-operative society is an association of the economically weak, who voluntarity associating on the basis of equal rights and equal responsibility transfer to an undertaking one or sevaral of their economic needs, which are common to them all, but which each of them is unable fully to satisfy by his own individual efforts, and manage and use such undertakings in mutual collaboration to their common material and moral advantage.)

४) **प्रा. पॉल लॅम्बर्ट**– स्वतःच्या उपयोगासाठी व्यक्तींच्या समुहाने स्थापन केलेली आणि दिग्दर्शित केलेली, लोकशाही नियमानुसार चालविलेली आणि आपल्या सभासदांच्या व एकूण समुदायाच्या सेवेसाठी स्थापन झालेली व्यवहार संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.

(Co-operative is an enterprise formed and directed by an association of users applying within etself the rules of democracy and directly intended to serve both its own members and community as a whole)

**५) एम्. डार्लींग-** सहकार ही एक पद्धती आहेच, पण त्याहून आधिक काही आहे. अंतःकरणाचा व मनाचा ठाव घेणारी ती शक्ती आहे. उद्योगाचा धर्म आहे. सेवा व स्वंयपूर्णता यांचे ते एक संपूर्ण सत्य आहे.

(Co-operation is something more than a system. It is a spirit which appeals to the heart and the mind- It is a religion applied to the business- It is a gospel of self sufficency and service.)

वरील सर्व व्याख्येवरून सहकाराबद्दल पुढील मुद्दे मांडता येतील.

१) सहकारात उद्दिष्ट साध्यासाठी स्वेच्छेने लोक एकत्र येऊन कार्य करतात.

२) एकत्र आलेल्या लोकांच्या दर्जा समान असतो.

३) फायद्यापेक्षा सेवेला अधिक महत्व दिले जाते.

४) उद्दिष्ट साध्य करताना लोकशाही तत्त्वास महत्व दिले जाते.

५) सहकार हे एक समाजपरिवर्तनाचे महत्वाचे साधन आहे.

**भारतातील सहकार चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी** (Historical Background of Co-operative movement in India)

सहकाराची संकल्पना ही भारतीय समाजात तशी जुनीच आहे. पण आधुनिक चळवळीचा प्रारंभ इंग्लडमध्ये झाला. इंग्लडच्या औद्योगिक क्रांतीचे जसे अनेक फायदे झाले तसेच आर्थिक व सामाजिक दुष्परिणामही झाले. भांडवलदाराकडून कामगारांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होऊ लागली. सहकाराचे जनक रॉबर्ट ओवेन यांनी गिरणी कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी न्यू हार्मन कॉलनी व इंडियाना कॉलनी या दोन सहकारी वसाहती स्थापन केल्या. जर्मनमध्ये रॉश्डेल यांनी रॉश्डेल इक्विटेबल पायोनिअर सोसायटी नावाची संस्था स्थापन केली. रॉश्डेल यांच्यामुळे पुढे इंग्लडमध्ये ग्राहक चळवळ विकसीत झाली. युरोपमध्ये सुरू झालेली ही सहकार चळवळ पुढे जगभर पसरली. साधारपणे पन्नास वर्षानंतर ही चळवळ भारतात आली. सन १९०४ साली भारतात सहकारी कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थाविषयीचा कायदा प्रथम संमत झाला. यापूर्वी बडोदयात श्री विठ्ठल लक्ष्मण उर्फ भाऊसाहेब कवठेकर यांनी अन्योन्य सहाय्यकारी मंडळ या नावाची सहकारी पतपेढी काढली होती. याच पेढीचे नंतर बँकेत रूपांतर झाले. हे एकच अपवादात्मक उदाहरण सोडल्यास खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीची सुरवात भारतात १९०४ पासून झाली. १९२५ ते १९३४ या काळात आर्थिक मंदीमुळे काही सहकारी संस्था बुडाल्या. पण १९३५ साली रिझर्व्ह बँकेची स्थापना झाल्यामुळे सहकारी चळवळीस जीवदान मिळाले. या शिवाय विविध राज्यांनी १९३५ पर्यंत थोडयाफार फरकाने सहकार विषयक कायदे संमत केले. या कायद्यांचा उद्देश सहकारी चळवळीला व संस्थांना उत्तेजन देणे हा होता.

**स्वातंत्र्योत्तर कालखंड**

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने सहकार चळवळीला प्रोत्साहन देण्याचे ठरविले. ग्रामीण भारताच्या विकासासाठी चार प्रकारच्या सहकारी संस्था सुरू केल्या.

१) शेतीकरीता कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था : या संस्था शेती करण्यासाठी कमी मुदतीचे कर्ज शेतकऱ्यांना देतात.

२) शेतीकरीता कर्जाव्यतिरिक्त इतर वस्तू उपलब्ध करून देणाऱ्या संस्था : औषधे, खते बी बियाणे, शेती अवजारे या संस्थेमार्फत दिल्या जातात.

३) शेतीव्यतिरिक्त इतर प्रकारचे उद्योगधंदे करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या संस्था : उदा. कुक्कुटपालन, मत्सपालन, व्यापार, फळप्रक्रिया उद्योग इ.

४) शेतीव्यतिरिक्त इतर उद्योगधंद्याना कर्ज सोडून इतर प्रकारची मदत करणाऱ्या सहकारी संस्था : उदा. विणकऱ्यांच्या सहकारी संस्था, गिरणी कामगार सहकारी संस्था इ.

स्वातंत्र्यानंतर १९४९ साली ग्रामीण जनतेला बँकींग सुविधा पुरविण्यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी ठाकुरदास यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण बँकींग चौकशी समिती नेमली. या समितीने प्रत्येक राज्यातील राज्य सहकारी संस्थेने शासनाचे आर्थिक सहाय्य घेऊन कृषी पुरवठ्याचे कार्य करावे आणि ग्रामीण पतपुरवठ्यासाठी सहकारी संस्थाच उपयुक्त आहेत अशी शिफारस केली. १९५१ मध्ये रिझर्व्ह बँकेने ए.डी. गोरवाला यांच्या अधिपत्याखाली अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती नेमली. या समितीने असे स्पष्ट केले की, सहकारी चळवळ जरी अपयशी ठरली असली तरी ती चळवळ यशस्वी होण्यासाठी ग्रामीण पतपुरवठ्याची एकात्मिक योजना (Integrated scheme of Rural Credit) सुरू करण्याची महत्वाची शिफारस केली. १९५८ मध्ये राष्ट्रीय विकास मंडळाने शेती उत्पादन वाढावे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारावी यासाठी सहकारी चळवळीला प्रोत्साहन दयावे असे सूचविले. पुढे श्री. एस. टी. राजा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या सहकारी कायदा समितीने विविध राज्यातील सहकारी कायद्यांचा अभ्यास केला. सर्व राज्यातील सहकारी कायद्यामध्ये एकसारखेपणा साधण्यासाठी कायदे, नियम व पोटनियम तयार केले. त्यानुसार घटकराज्यांना सहकारी कायदे, नियम, व पोटनियम करण्याचा आदेश केंद्रसरकारने दिला. त्यानुसार महाराष्ट्रात १९६० सहकारी संस्था कायदा व १९६१ मध्ये सहकारी संस्था नियम तयार केले गेले. त्यानंतर सहकारी चळवळीला योग्य दिशा देण्यासाठी मेहता समिती, मिर्धा समिती, दंतवाला समिती, कर्वे समिती, वर्दे समिती नेमल्या व त्यांच्या सुचनेनूसार सहकार चळवळीत सुधारणा करण्यात आल्या. त्यामुळे सुरवातीला असणारे सहकारी संस्थांचे वर्गीकरण पूर्णपणे बदलले आहे. काही सहकारी संस्थानी आपले कार्यक्षेत्र बहुराज्यीय (Multi State) करून घेतले आहे. त्याचप्रमाणे कृषी पुरवठा, बँका, नागरी बँका, गृहबांधणी, विपनन, ग्राहक भांडार, साखर कारखाने, सुतगिरण्या, कागद उद्योग, चर्मोद्योग, तेल गिरण्या, कुक्कुटपालन, पशुखाद्य, रेशीम उद्योग, दुग्धउद्योग इ. अनेक क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. सन १९३९ साली रिझर्व्ह बँकेने प्राथमिक सहकारी पत पुरवठा संस्था ऐवजी बहुउद्देशीय (Multi purpose) सहकारी संस्था स्थापन झाल्या पाहिजेत असे मत व्यक्त केले. सन १९५८ पर्यंत भारतात ७५००० पेक्षा अधिक बहुउद्देशीय संस्था कार्यरत होत्या. पण या संस्थेकडे अपुरे भांडवल व प्रशिक्षित सेवक वर्गांचा अभाव जाणवत होता. त्यामुळे बहुउद्देशीय संस्थांना फारसे यश मिळू शकले नाही. बहुउद्देशीय सहकारी संस्था स्थापन करण्याऐवजी सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यासंबंधीचा अहवाल वैकुंठलाल मेहता समितीने

दिला. १९५८ नंतर सेवा सहकारी संस्था किंवा कृषी सेवा सहकारी संस्थांचा मोठया प्रमाणात विकास झाला.

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाची कामगिरी**

| | तपशील | २००४-०५ | २००६-०७ | २००८-०९ |
|---|---|---|---|---|
| १ | संस्थांची संख्या | १०८७७९ | ६३२२४ | ९४६४७ |
| २ | सभासद संख्या | १२७४०६ | १४५७९२ | १२६४१९ |
| ३ | स्वनिधी (लाखात) | ९१९७०५ | ११०३८८४ | १२४७८६३ |
| ४ | एकूण ठेवी (लाखात) | १८९७६०४ | २३४८४०७ | ३५२८६०७ |
| ५ | एकूण कर्जे | ४०२४९४९ | ४३७१४४९ | ५१७६३९० |
| ६ | दिलेली कर्जे अल्प | ३१८८७०९ | ४०७९५९६ | ७४९३७५४ |
| ७ | वसूल कर्जे अल्प | २६६९७४२ | ३८३६०७३ | ५५९७२६० |
| ८ | थकबाकी अल्प कर्जे | ११६५५९४ | ११५५७९५ | ३४९५८३५ |
| ९ | कर्मचारी संख्या | ३८८११८ | २२९००७ | २१५५२९ |

संदर्भः राज्य सहकारी बँक, महासंघ.

**जिल्हा मध्यर्ती बँका**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका जिल्हापातळीवर काम करतात. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक सहकारी संस्था या बँकेचे सभासद असतात. शेतकऱ्यांच्या दृष्टिकोणातून ही बँक म्हणजे देवदूतच आहे. सर्व शेतीच्या सर्व प्रकारच्या विकासासाठी कर्ज पुरवठा केला जातो. जिल्हा बँक पत पुरवठा संस्थाचा मित्र तत्वज्ञ मार्गदर्शक म्हणून काम करतो.

१९५१ नंतरच्या काळात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाची प्रगती

| तपशील | १९५०-५१ | २००१-०२ | २००५-०६ | २००६-०७ |
|---|---|---|---|---|
| सख्या | ५०५ | ३३८ | ३६६ | ३७१ |
| ठेवी (कोटी) | ३७.३८ | ६८०९० | ८७५३७ | ९४५२९ |
| कर्जे (कोटी) | ८३ | ५९२६९ | ७३५८३ | ८२९६३ |
| थकबाकीचे प्रमाणे% | ०.९० | २० | १९.८ | NA |

१९५०-५१ मध्ये या बँकांची संख्या ५०५ इतकी होती पण नंतरच्या कालखंडात एक जिल्हा एक बँक या धोरणाचा अंगिकार केल्यामुळे अनेक बँकाचे एकत्रिकरण करण्यात आले. २००५-०६ साली या मध्यवर्ती बँकाच्या १२९९१ शाखा देशभर कार्यरत होत्या.

**सहकारी साखर कारखाने** - ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हितसंबंध सुरक्षित रहाण्यासाठी सहकारी तत्त्वावर साखर कारखाने सुरू करण्यात आले. १९८०-८१ मध्ये सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या साखर कारखान्यांची संख्या ३२० इतकी होती. १९९७-९८ मध्ये ती ४०० इतकी झाली. या कारखान्यांमध्ये ७०६२००० टन साखर निर्मिती झाली. एकूण साखर उत्पादनाचा सहकारी साखर कारखान्यांचा वाटा ५४.९% इतका होता. साखर उत्पादनाबरोबरच मळीपासून अल्कोहोल, ऊसाच्या चिपाडापासून

कागद, बगॅसपासून पार्टीकल बोर्ड, विद्युत निर्मिती इ. उपउत्पादने घेतली जातात. त्यामुळे साखर कारखान्यांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

महाराष्ट्रात सन १९५० मध्ये कै. धनंजयराव गाडगीळ व कै. विखेपाटील यांनी प्रवरानगर येथे सहकार तत्त्वावरचा पहिला सहकारी साखर कारखाना उभारला. आज महाराष्ट्रात २००४ च्या आकडेवारीनुसार १५७ सहकारी तत्त्वावरील साखर कारखाने आहेत. जगातील एकूण साखर उत्पादनापैकी सुमारे १०% साखर भारतात तयार होते. त्यापैकी ३३% साखर महाराष्ट्रात तयार होते. सहकारी साखर कारखान्यांमुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झालेला आहे. ३,५०,००० प्रत्यक्ष रोजगार आणि दरवर्षी वेतन व मजूरी या स्वरूपात १००० कोटी रुपयांचे उत्पन्न हा उद्योग मिळवून देतो. साखर कारखाने म्हणजे ग्रामीण विकासाचे केंद्रेच बनली आहेत. साखर कारखान्यामुळे अनेक पुरक व्यवसायाच्या स्थापनेला व विकासाला मदत केलेली आहे. उदा. सिमेंटचे पाईप, रस्तेबांधणी, ग्राहक भांडार, कोंबडीपालन, रासायनिक कारखाने, शेतकऱ्यांना लागणारी अवजारे पुरवठा इ. काही सहकारी साखर कारखान्यांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेने आपल्या कारखाना परिसरात शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. दवाखाने, क्रिडाविषयक सुविधा, करमणूक केंद्रे, छोट्या-मोठ्या उद्योगांना प्रोत्साहन इ.

**दुग्ध व्यवसायातील सहकाराचे योगदान**

भारतात सर्वप्रथम गुजरातमधील खेडा जिल्ह्यात १९४६ मध्ये सहकारी तत्त्वावरील दुग्धसंस्था स्थापन केली. या जिल्ह्यातील ४०० खेड्यांमध्ये प्राथमिक दुग्ध सहकारी संस्थांची स्थापना होऊन जिल्हा पातळीवर कैरा मिल्क युनियनची आणंद येथे स्थापना झाली. या डेअरीची उत्पादने 'अमूल' या नावाने बाजारपेठेत उपलब्ध आहेत.

महाराष्ट्रात सन १९५१ साली 'आरे' ही सहकारी दुग्धालय सुरू झाले. पण मुंबईतील गर्दी पहाता दुग्ध व्यवसायाचा विकास मुंबई बाहेर करणे सोईचे होईल म्हणून १९६४ साली सहकारी तत्त्वावर दुग्ध व्यवसायाला परवानगी दिली. दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी १९६७ साली राज्य स्तरावर शिखरसंस्था म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी दूध संघाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये सर्वांत जास्त दूध संस्था पुणे विभागात आहेत. सर्वात कमी मुंबई विभागात आहेत. जिल्हा स्तरावर दूध उत्पादकांचे संघ तयार करण्यात आले आहेत. या संस्थेमार्फत दुधाचे संकलन, त्यावरील प्रक्रिया आणि दुधाची विक्री केली जाते. दुग्धजन्य पदार्थांचीही मोठ्या प्रमाणात निर्मिती केली जाते. वारणा, गोकुळ, श्रीराम व दुधपंढरी या सहकारी संस्थानी स्वतःचा एक नावलौकीक निर्माण केला आहे. सर्व राज्यातील दूध महासंघाचे देशपातळीवर संघटन केलेले असून तिला राष्ट्रीय सहकारी दूध महासंघ (National Cooperative Dairy Federation) असे म्हटले जाते. ती या सर्व राज्य महासंघाची शिखरसंस्था आहे.

याप्रमाणेच सहकारी तत्त्वावर सूतगिरण्या, शेतीमाल खरेदी-विक्री संघ, सहकारी संस्था, कापूस प्रक्रिया उद्योग, फळप्रक्रिया उद्योग, कुक्कुटपालन इ. उद्योग सुरू करण्यात आले आहेत. यासाठी जिल्हा बँकेकडून ग्रामीण युवकांना कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

**सहकारी चळवळीचे मूल्यमापन**

आज भारतात सहकार चळवळीला सुरुवात होऊन १११ वर्षे पूर्ण झाली (१९०४ ते २०१५). सहकारी संस्थांमुळे ग्रामीण भागात परिवर्तन घडून आले. ग्रामीण पुनर्रचनेमध्ये सहकार चळवळीचा वाटा मोठा आहे. सहकार चळवळीने ग्रामवासियांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलण्यास भाग पाडले. गरजेपुरती शेती (needbase) हे तत्त्व जाऊन व्यावसायिक शेती/बाजारपेठेसाठी शेती अशी (Professional/Market based) सुरूवात झाली. सहकार हे ग्रामीण विकासाचे प्रमुख साधन आहे हे निःसंशय. पण सद्या सहकार चळवळीला काही प्रमाणात ग्रहण लागलेले आहे. कितीतरी सहकारी संस्था डबघाईला आलेल्या आहेत. साखर कारखाने बंद पडलेले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर सहकार चळवळीचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे.

**सहकाराचे फायदे**

**१) आर्थिक फायदे :** सहकारी संस्थामुळे शेतकऱ्यांना सहजपणे कर्ज, शेती अवजारे, किटकनाशके, बी-बियाणे, खते, पशुखाद्य, जनावरे खरेदी करण्यासाठी कर्ज उपलब्ध होऊ लागले. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हळूहळू सुधारू लागली. खाजगी सावकाराकडून कर्ज घेण्याचे प्रमाण कमी झाले. अगदी माफक व्याजदरात कर्ज उपलब्ध होऊ लागल्यामुळे शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करणे शक्य झाले. शेतकऱ्यांना शेतीमालाला चांगला व योग्य भाव मिळावा, अडाणी अशिक्षीत शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी शेतीमाल खरेदी विक्रीसंघ सहकार तत्त्वावर सुरू झाले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळू लागला. साखर कारखान्यामुळे ग्रामीण समाजाचे चित्र पालटून गेले. क्वचित कुणाकडे दिसणारी दुचाकी गाडी आता गावात प्रत्येक घरटी गाडी अशी स्थिती झाली आहे. ग्रामीण लोकांचे जीवनमान बदलले. कच्चा घरांचे पक्क्या घरामध्ये, (RCC बंगल्यामध्ये) रुपांतर झाले. शेतीमध्ये नवनवीन तंत्राचा वापर सुरू झाला. ग्रीनहाऊस तंत्रज्ञानाचा फायदा सहकारी संस्थामुळे शेतकऱ्यांना घेता येऊ लागला. यातून निर्माण होणारी उत्पादने उदा. जरबेरा, गुलाब, (फुलशेती), टोमॅटो, ढबू मिरची, (भाजीपाला शेती) यांच्या सहाय्याने अल्पभूधारक शेतकऱ्यालासुद्धा जीवन जगणे सुसह्य झाले. ग्रामीण भागात बँकांचे जाळे तयार झाले. मध्यवर्ती सहकारी बँकामुळे ग्रामीण लोकांना बचतीची सवय लागली. महिलाना स्व-सहाय्य गटामधून कर्ज उपलब्ध होऊ लागल्यामुळे स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ लागली. दुग्ध व्यवसायामुळे दुभत्या जनावरांची संख्या ग्रामीण भागात वाढू लागली. दुधाचे दर दहा दिवसांनी बील मिळू लागल्यामुळे आर्थिक उलाढाल वाढली. सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाली.

**२) सामाजिक फायदे :** सहकारी संस्थेमुळे सहकारावर उभे असलेले सामूहिक जीवन उपभोगावयास मिळते. एकता, बंधुत्त्व, सहकार या गुणांची जोपासना सहकारामुळे शक्य झाली आहे. ग्रामीण भागातील अनेक सहकारी साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शाळा, महाविद्यालये सुरू केली. इंजिनिअरिंग, मेडिकल, नर्सींग, पॉलिटेक्निक, आय.टी.आय., आर्टस, कॉमर्स, सायन्स, बी.फार्मसी अशी महाविद्यालये सुरू केल्यामुळे ग्रामीण मुलांना गावाजवळच शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्या. शहरांकडे जाणारा लोंढा थांबला. शहरांतील ताण कमी झाला काही साखर कारखान्यांनी दवाखाने सुरू केले. अगदी कमी पैशात ग्रामवासियांचे उपचार होऊ लागले. कांही

शस्त्रक्रिया तर मोफत केल्या जातात. त्यामुळे गरीब, दारिद्र्यरेषेखालील जनतेला सहजपणे वैद्यकिय सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. कोणत्याही सहकारी संस्थेचे यश हे सभासदांच्या निष्ठेवर व उत्तम चारित्र्यावर अवलंबून असते. यामुळे सभासदांच्यामध्ये कर्तव्याची जाणीव निर्माण करण्याचे कार्य सहकारी संस्था करते. समाजातील संघर्ष मिटविण्याचे कार्यही सहकारी संस्थेमुळे शक्य झाले आहे. हिंसक मार्गांचा अवलंब न करता समाजामध्ये मूलभूत स्वरूपाचे आर्थिक व सामाजिक बदल घडवून आणणे सहकारामुळेच शक्य झाले. अनेक सहकारी संस्थांनी ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन दिले आहे. त्यांना आर्थिक मदत दिल्यामुळे काही खेळाडू राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहचू शकले. मैदानी आणि मर्दानी खेळांना सहकारी संस्थांनी प्रोत्साहन दिल्यामुळेच ग्रामीण भागातून चांगले खेळाडू निर्माण होत आहेत. महाराष्ट्रातील काही सहकारी संस्था, सांस्कृतिक मंडळे, नाट्यमंडळे, भजनी मंडळे, तमाशा यांना प्रोत्साहन देतात त्यामुळे ग्रामीण कला, जोपासण्याचा प्रयत्न केला जातो. सामुदायिक विवाहांना प्रोत्साहन दिल्यामुळे ग्रामीण भागातील लग्नावर होणाऱ्या वारेमाप खर्चाला आळा बसलेला आहे. नवविवाहिताना सहकारी साखर कारखान्यामार्फत भागविकास निधीच्या माध्यमातून संसारोपयोगी भांडी दिली जातात. याशिवाय दुर्बल घटकांना मदत देणे, जनावरांची आरोग्य तपासणी, विजेची सोय, टँकरद्वारे पाणी इ. कार्ये सहकारी संस्थेमार्फत केली जातात.

**सहकारी चळवळीतील दोष व त्रुटी**

**१) सहकाराच्या सिद्धांताविषयी अज्ञान :** ग्रामीण जनतेला सहकाराचे महत्त्व फारसे कळलेच नाही असे दिसते. सहकारी संस्थांच्या कार्याकडे दुर्लक्ष केले जाते. सहकार चळवळीतील नेत्यानीही सहकाराचे महत्त्व पटवून देण्याचे फारसे प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे तळागाळातील जनतेपर्यंत योग्य त्या पद्धतीने सहकारी चळवळ पोहचली नाही. **डॉ. थॉर्नर** यानी स्पष्टपणे सांगितले आहे की, सहकारी विकास कार्यक्रमाचा सिंहाचा वाटा श्रीमंत व प्रभावी कुटुंबानाच मिळतो. **डॉ. ग्यानचंद** म्हणतात, गरिबांकरिता नव्हेच पण गरिबाविरुद्ध श्रीमंतांची योजना म्हणजे सहकार होय. (Co-operation has more & more become a combination of the strong not for the weak but against them)

**२) नेतृत्व** : बहुसंख्य सहकारी संस्थांचे नेतृत्व हे सर्वसाधारण आर्थिक स्थिती असलेल्या लोकांमधून आलेले नाही. राजकारणी, श्रीमंत, सावकार, व्यापारी व पूर्वीचे जहागीरदार/वतनदार यांच्याच हातात सहकाराची सूत्रे आहेत. आपले राजकारण साधण्यासाठीच सहकाराचा एक साधन म्हणून उपयोग केला जातो. शासनाने सहकारी संस्थेवरील संचालक मंडळाची वर्गवारी (अ.जा., अ.ज., इमाव, महिला, भविजा इ.) केलेली आहे. त्यामुळे त्या त्या गटातील व्यक्तीच घ्याव्या लागतात. पण घेताना तो संचालक आपल्या बाजूला राहिल, हो ला हो म्हणेल, असाच उमेदवार निवडला जातो. सर्व सत्तेची सूत्रे प्रभावी गटाकडे, किंवा प्रभावी नेतृत्वाकडे असतात. तज्ञ संचालक म्हणून घेत असताना आपल्याच नातेवाईकांची वर्णी लावली जाते. सहकाराचा वापर स्वहित साधण्यासाठीच केला जात असल्यामुळे राष्ट्रीय खर्चात वाढ होत आहे. तळमळीने काम करणाऱ्या नेतृत्वाची उणीव हे आजच्या सहकारी संस्थांचे खरे दुखणे आहे. सहकार चळवळीच्या सुरवातीच्या काळात नि:स्वार्थी नेत्यांनी सहकारासाठी वाहून घेतले होते. पण आज मात्र स्वार्थी, स्वतःचा फायदा पाहणारी पिढी सहकारात 'घुसल्यामुळे' सहकारी चळवळ मोडकळीस आलेली आहे.

**३) अकार्यक्षम व्यवस्थापन:** हे सहकाराच्या अपयशाचे गंभीर कारण आहे. सहकारी संस्थांत हिशोबाचा ताळमेळ नसणे, कर्जाबाबत गैरमेळ, कागदपत्रांची हेळसांड, भ्रटाचार मोठ्या प्रमाणात आढळून येतो. यामुळे कितीतरी सहकारी संस्था बंद पडलेल्या आहेत. काही अवसायनात निघालेल्या आहेत. काही सहकारी बँकांनी दिवाळखोरी जाहीर केलेली आहे. सहकारी संस्थेत प्रशासकीय कर्मचारी नेमतांना नातेवाईक, सगेसोयरे यांनाच प्राधान्य दिले जाते. काहीवेळा लाच घेऊन नेमणुका केल्या जातात. त्यामुळे सेवक वर्गही जमेल तसे व जमेल तेवढा भ्रष्टाचार करू लागतो. काहीच्या नेमणूका संस्थेत असतात पण ते काम मात्र चेअरमनच्या घरी व शेतात करीत असतात. पगार मात्र संस्थेमार्फत दिला जातो.

**४) थकबाकीत वाढ**: सहकारी संस्थेच्या माध्यमातून कर्ज देताना नातेवाईक, सगेसोयरे, गटातटाचा विचार केला जातो. त्यामुळे दीर्घ मुदतीची मोठे कर्जे पात्रता नसणाऱ्या व्यक्तींना, कागदपत्रे न पहाता दिली जातात. त्यामुळे त्या व्यक्तीची कर्ज फेडण्याची क्षमता असत नाही किंवा वसूल करण्यासाठी तितकी त्यांची संपत्ती असत नाही. कर्ज मंजूर करतानाच 'अर्थपूर्ण' व्यवहार होतात त्यामुळे कर्जाची अगदी कमी रक्कम कर्जदाराला मिळते. तो न फेडू शकल्यामुळे सहकारी संस्था अवसायनात निघतात. सहकारी संस्थांवर सावकार, व्यापारी यांचाच प्रभाव अधिक आहे. यामुळे या सहकारी संस्थांचा वापर बड्या लोकांसाठीच होतो. ग्रामीण पतपाहणी अहवालात असे म्हटले आहे की, भारतातील सामाजिक परिस्थिती सहकार्य व नियोजनापेक्षा भ्रष्टाचार व जूलूम यांनाच जास्त अनुकूल आहे.

वर उल्लेख केलेले दोष हे सर्वसाधारणपणे सगळीकडेच आढळून येतात. शंभर वर्षानंतर खरं म्हणजे सहकारी चळवळ अधिक फोफावणे अपेक्षीत होते. पण जागतिकीकरणाच्या या रेट्यात आणि सहकारातील अपप्रवृत्तीमुळे सहकारी चळवळ मागे पडत निघालेली आहे. महाराष्ट्रातील कितीतरी सहकारी साखर कारखाने आज बंद अवस्थेत आहेत. काही छोट्या बँकांना मोठ्या बँकांनी गिळंकृत करून टाकले आहे. सभासदांना वाऱ्यावर सोडण्यात आले. बंद पडलेल्या सहकारी साखर कारखाने खाजगी सावकारांनी विकत घेतले. त्यामुळे सहकारी चळवळीची अवस्था दयनिय आहे. सहकारी चळवळ वाईट नाही पण यामध्ये शिरलेल्या स्वार्थी, सत्तापिपासू ज्या प्रवृत्ती आहेत. त्या वाईट आहेत जर या उणीवा दूर झाल्या तर आजही ग्रामीण समाजाच्या विकासासाठी सहकार चळवळ उपयुक्त ठरेल.

**★ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

**अ) गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

१. अधिक अन्नधान्य पिकवा ही मोहिम ............. साली सुरू झाली.

अ) १९५०  ब) १९५२  क) १९५७  ड) १९४३

२. समुदाय विकास कार्यक्रमात........... गटात विकास कामाची विभागणी करण्यात आली.

अ) आठ  ब) चार  क) सहा  ड) नऊ

३. समुदाय विकास कार्यक्रमाची सुरुवात ............ साली झाली.

अ) १९४७ ब) १९५० क) १९५१ ड) १९५२

४. .............. यांना सहकार चळवळीचे जनक असे म्हटले जाते.

अ) रॉबर्ट ओवेन ब) रॉशेल्ड क) एम्. डार्लिंग ड) पॉल लॅम्बर्ट

५. भारतात सहकार चळवळीला ............. साली सुरुवात झाली.

अ) १९१९ ब) १९४७ क) १९०४ ड) १८८४

## ३.३ सारांश

भारतातील ग्रामीण समाजाचा अभ्यास करीत असताना आपणास विविध पैलूवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. पारंपरिक ग्रामीण समाज हा शांत आणि सुव्यवस्थित होता. अलगता, स्वयंपूर्णता, स्वायत्तता व प्रतिकूल काळातही टिकून रहाण्याची क्षमता ही त्याची वैशिष्ट्ये होती. ब्रिटिशांनी आपल्या सत्तास्थापनेनंतर सत्तेचे केंद्रिकरण करण्यास सुरुवात केली. ग्रामीण समाज ढवळून निघाला. त्यांनी आपल्या स्वार्थासाठी सगळ्या यंत्रणा तयार केल्या. हे जरी खरे असले तरी यामुळे भारतीयांना आपल्या उणीवांची जाणीव होऊ लागली. ग्रामीण पुनर्रचनेचे काही प्रयोग स्वातंत्र्यपूर्व काळात झाले. पण सत्ता आणि संपत्तीचे पाठबळ नसल्यामुळे ते फारसे यशस्वी झाले नाहीत किंवा ते देश पातळीवर पोहचू शकले नाहीत. पण स्वातंत्र्यानंतर या कार्यक्रमांची पार्श्वभूमी ग्रामीण पुनर्रचनेचे धोरण आखताना नक्कीच उपयोगी ठरली. २ ऑक्टोबर, १९५२ रोजी ग्रामीण पुनर्रचना करण्याच्या दृष्टिकोणातून समुदाय विकास कार्यक्रमास सुरुवात झाली. शासनाबरोबरच लोकसहभागाला यामध्ये महत्त्व देण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या उपक्रमांची आठ गटात वर्गवारी करण्यात आली. गटनिहाय योजना सुरू झाली. या कार्यक्रमास काही प्रमाणात यश आले. पण मोठ्या प्रमाणात अपयश आले हे लक्षात घेणे आवश्यक आहे. ही योजना सर्वसामान्यापर्यंत पोहचलीच नाही. शासकीय अधिकाऱ्यांची उदासिनता, जनतेची निष्क्रीयता, प्रभावी वर्गाचे वर्चस्व ही त्याला जबाबदार असणारी कारणे आहेत. ग्रामीण पुनर्रचना करण्याच्या उद्देशाने सहकाराला प्रोत्साहन देण्याचे ठरविले. त्याप्रमाणे भारतात सहकारी चळवळीला सन १९०४ पासून सुरुवात झाली. महाराष्ट्रात तर १९६० साली सहकारासंबंधीचा कायदा तयार करण्यात आला. आज महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, प. बंगाल या राज्यांमध्ये सहकार चळवळीचा जोर अधिक आहे. स्वातंत्र्यानंतर सहकार चळवळीला प्रोत्साहन देण्याचे काम शासन पातळीवर मोठ्या प्रमाणात झाले. त्यामुळे साखर कारखाने, सूत गिरण्या, दूध संस्था, विपनन संस्था, खरेदी विक्री संघ यास्वरूपात सहकारी संस्था उभ्या राहिल्या. सहकार चळवळीने मात्र ग्रामीण समाजात आमूलाग्र बदल घडवून आणले. ग्रामीण लोकांची अर्थव्यवस्था 'पैसा'भिमुख झाली. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बदल झाले. शेतीकडे पाहण्याचा व्यावसायिक दृष्टिकोण तयार करण्यात ही चळवळ यशस्वी झाली. पण दुर्दैवाने या सहकार चळवळीत स्वार्थी प्रवृत्तींचा शिरकाव झाला आणि या चळवळीलच घरघर लागली. आज कितीतरी साखर कारखाने, सूत गिरण्या बंद पडल्या आहेत. यामध्ये सरकारची मालमत्ता मोठ्या प्रमाणात अडकली आहे. एका अर्थाने राष्ट्रीय उत्पन्नाचा ऱ्हास झाला आहे. या अपप्रवृत्त्या जर बाजूला केल्या तर सहकार चळवळ आजही ग्रामीण समाजाच्या पुनर्रचनेसाठी उपयुक्त ठरेल.

### ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

अ) १) ब्रिटिश २) बलुतेदारी ३) क्रांतीवादी समूह ४) ७२% ५) म. गांधी

ब) १) १९४३ २) आठ ३) १९५२ ४) रॉबर्ट ओवेन ५) १९०४

### ३.५ स्वाध्याय

**अ) टीपा लिहा**

१) ग्रामीण पुनर्रचना विशद करणारे विचारप्रवाह

२) ग्रामीण पुनर्रचनेची उद्दिष्टे

३) समुदाय विकास कार्यक्रम

४) समुदाय विकास कार्यक्रमाची उद्दिष्टे

५) समुदाय विकास कार्यक्रमाचे यश

६) समुदाय विकास कार्यक्रमाचे अपयश

७) सहकार चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी

८) सहकार चळवळीचे फायदे

९) सहकार चळवळीतील दोष

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) ग्रामीण पुनर्रचनेचे सधन म्हणून समाज विकास कार्यक्रमाचे मूल्यमापन करा.

२) ग्रामीण पुनर्रचनेचे साधन म्हणून सहकार चळवळीचे मूल्यमापन करा.

## ३.६ चिंतन आणि कार्य

१. ग्रामीण पुनर्रचनेचे सध्या सुरू असलेल्या कार्यक्रमाचे एखाद्या गावी जाऊन अवलोकन करा.

२. एखाद्या गावच्या ग्रामसेवकाची मुलाखत घ्या.

३. आपल्या भागातील एखाद्या विकास सोसायटीला भेट देऊन त्यांच्या कार्याची माहिती घ्या.

४. आपल्या भागातील सहकारी साखर कारखान्याला भेट देऊन चेअरमन किंवा कार्यकारी संचालकांची मुलाखत घ्या.

५. आपल्या भागातील दूधसंस्थेला भेट द्या व चेअरमन किंवा सेक्रेटरीची मुलाखत घ्या.

६. आपल्या गावातील ऊस उत्पादक किंवा दूध उत्पादक शेतकऱ्यांची मुलाखत घेऊन त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत झालेल्या बदलांचा अभ्यास करा.

७. शासकीय विकास योजनेचा फायदा घेतलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मुलाखती घेऊन अहवाल तयार करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. Choudhary Anjana, (2004) Rural Sociology, Dominant Publishers & Distributors, New Delhi.

२. Desai A. R. (1999) Rural Sociology in India.

३. Doshi S. L. & Jain. P. C. (2002) Rural Sociology, Rawat Publication, New Delhi.

४. घाटोळे रा. ना. (१९८५) ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास, मंगेश प्रकाशन, नागपूर.

५. जोशी सी. जे. (२०१२) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. कटारसिंह (२०११) ग्रामीण विकास, सिद्धांत, नीतियाँ एव प्रबंध, रावत पब्लिकेशन, नई दिल्ली.

७. खंडागळे चंद्रकांत (२००५) ग्रामीण समाजशास्त्र, प्रकाशिका, सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

८. कोंडेकर ए. वाय. (२००९) ग्रामीण समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

९. नाडगोंडे गुरुनाथ (१९९७) ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

१०. Oxford Dictionary (2005) Oxford University Press, Oxford.

११. Shaha Rupa (2009) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१२. www.ruralreconstruction@gmail.com


❑❑❑

# घटक ४

# पंचायत राज्य व्यवस्था

## (Panchayat Raj System)

**घटक संरचना**

४.१ प्रस्तावना

४.२ उद्दिष्टे

४.३ विषय विवेचन

४.३.१ 'पंचायत राज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

४.३.२ ग्रामपंचायतीची रचना व कार्ये

४.३.३ पंचायत समितीची रचना व कार्ये

४.३.४ जिल्हा परिषदेची रचना व कार्ये

४.३.५ महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण

४.३.६ पंचायत राज्यव्यवस्थेचा ग्रामीण समाजावरील प्रभाव

४.४ स्वयंःअध्ययनासाठी प्रश्न

४.५ सारांश

४.६ स्वयंःअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ स्वाध्याय/गृहपाठ

४.८ चिंतन आणि कार्य

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.१ प्रस्तावना (Introduction)

ग्रामीण पुनर्रचनेचे तसेच ग्रामीण विकासाचे, समाज विकासाचे एक अतिशय महत्त्वाचे साधन म्हणून पंचायत राज्याकडे पाहिले जाते. भारत सरकारने पंचवार्षिक योजनांना गती प्राप्त करून देण्याकरिता आणि ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्याकरीता २ ऑक्टोबर १९५२ पासून समाज विकास योजनेला सुरुवात केली. मात्र या योजनेला अपेक्षित लोकसहभाग लाभला नाही. त्यामुळे या योजनांना समाधानकारक यश मिळाले नाही. ग्रामीण विकासासाठी कार्यक्रमाविषयी ग्रामीण जनतेत उत्साह निर्माण करणे आणि कार्यक्रमात जनतेला सहभागी करून घेणे या गोष्टींना फारसे यश आले नव्हते. म्हणून यासाठी कोणती उपाययोजना करावी, जनसहभाग कसा वाढविता येईल लोकसहभागी कार्यक्रम कसे राबविता येतील याविषयी स्थानिक प्रशासन यंत्रणा कशी असावी याचा अभ्यास

करण्यासाठी नेमलेल्या बलवंतराय मेहता समितीने सुचविलेला अहवाल सरकारला सादर केला. या समितीने सुचविलेली लोकशाही तत्त्वावरील सत्तेच्या विकेंद्रिकरणाची रचना म्हणजेच 'पंचायत राज्य' होय. या पंचायत राज्यची संरचना आणि त्यातील अधिकारी वर्गाची भूमिका व कार्ये आणि ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांची संरचना व कार्य आणि महिला व दुर्बल घटक यांचे सक्षमीकरण आणि त्या संदर्भातील सुरू असलेल्या योजना, सेवा सवलती इ. समग्र अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत.

## ४.२ उद्दिष्टे (Objectives)

- पंचायत राज्यची पार्श्वभूमी समजावून घेणे.
- पंचायत राज्यविषयक रचनेचा परिचय करून घेणे.
- पंचायत राज्यमधील ग्रामपंचायतीच्या कामकाजासंदर्भात माहिती करून घेणे.
- पंचायत राज्यमधील पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या कार्याची माहिती करून घेणे.
- पंचायत राज्यमधील पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या कार्याची माहिती करून घेणे.
- पंचायत राज्यमधील अधिकारी व पदाधिकारी यांच्या कामकाजासंदर्भात माहिती करून घेणे.
- महिलांच्या सक्षमिकरणाच्या शासकीय पातळीवरील उपायांची माहिती घेणे.
- दुर्बल घटकांच्या विकासातील शासकीय पातळीवरील उपायांची माहिती करून घेणे इ.
- पंचायत राज्यव्यवस्थेचा ग्रामीण समाजावरील प्रभाव लक्षात येईल.

## ४.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

या प्रकरणात 'पंचायत राज्य' या घटकाचा आपण सविस्तर अभ्यास करणार आहोत. पंचवार्षिक योजना. समाज विकास योजना यांच्याही पुढे जाऊन 'पंचायत राज्य'चा उदय कसा झाला. हे प्रथम समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रथम आपण 'पंचायत राज्य'ची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेऊ. त्यानंतर पंचायत राज्यातील सत्तेच्या विकेंद्रीकरणातील त्रिसुत्री शासकीय स्तर रचना जाणून घेऊ. ग्रामपंचायत पंचायत समिती व जिल्हा परिषद यांची रचना व कार्ये यांचा अभ्यास करू आणि त्यानंतर महिला व दुर्बल घटकांच्या सबलीकरणासंदर्भात सविस्तर चर्चा आपण इथे करणार आहोत.

### ४.३.१ 'पंचायत राज्याची' ऐतिहासिक पार्श्वभूमी (Historical Background of Panchayat Raj)

सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या तत्त्वावर आज पंचायत राज्य व्यवस्थेस बळकटी आली आहे. घटनात्मक वैधानिक तरतुदीसह आज पंचायत राज्य व्यवस्थेची काटेकोर रचना झाली आहे. व पंचायत राज्य व्यवस्था लोकशाही पद्धतीने ग्रामीण समाजाच्या विकासासाठी कार्यरत आहे. आज

पंचायत राज्य व्यवस्थेतील ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषदा यांचा कारभार संपूर्ण देशात सुव्यवस्थित सुरू आहे. लोकशाही मार्गाने जनता आणि शासन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या या पंचायत राज्य व्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे पंचायत राज्यचा उदय त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, वाटचाल आणि आधुनिक पंचायत राज्य व्यवस्थेचा कारभार एकत्रितपणे लक्षात येईल. सारांशाने पंचायत राज्य व्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी आपणास पुढील चार टप्प्यात समजावून घेता येईल– अ) प्राचीन ग्रामपंचायती, ब) ब्रिटिशकालीन ग्रामपंचायती, क) स्वातंत्र्यकालीन पंचायती राज्य व्यवस्था, ड) पंचायत राज्यमधील बळकट सुधारणा. अशा मार्गातून पंचायत राज्य व्यवस्था वाटचाल करत आली आहे. पंचायत राज्यच्या या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा सविस्तर अभ्यास आपणास पुढीलप्रमाणे करता येईल.

### अ) प्राचीन ग्रामपंचायती

भारतात प्राचीन काळापासून ग्रामपंचायत व्यवस्था असलेली दिसून येते. वैदिककालीन प्रारंभिक ग्रामपंचायती स्वायत्त आणि स्वयंपूर्ण होत्या. गावच्या ग्रामपंचायतीच्या प्रमुखास ग्रामिणी असे म्हटले जाई. शिवाय वृद्ध व अनुभवी पाच व्यक्तींच्या पंचायतीमध्ये प्रत्येक जातीचा एक सदस्य असे. ग्रामिणी म्हणजे गाव प्रमुख हा करवसुली व ग्रामसंरक्षणाचे कार्य करीत असे. प्राचीन ग्रामपंचायतीत ग्रामसभा देखील होत असत. ग्रामसभेत गावातील निवडक प्रतिष्ठीत सहभागी होत असत. शेती, पशुपालन, ग्रामसंरक्षण, तंटेबखेडे इ. संबंधीच्या प्रश्नांची चर्चा होई. ग्रामकल्याणाच्या योजना आखल्या जात. मनुस्मृती, जातककथा, वाल्मिकी रामायण, शुक्रनितीसार, जैन व बौद्ध साहित्य या सर्व वाङ्मयात देखील प्राचीन ग्रामपंचायती, ग्रामीण वस्त्या, ग्राम कारभाराचे वर्णन गावातील समस्यांचा सर्वानुमते विचारविनिमय, ग्रामपातळीवर न्याय निवाडा, सर्वानुमते निर्णय इ. बाबींचा प्राचीन ग्रामपंचायतीत उल्लेख आढळतो.

वैदिक काळापासून आढळणाऱ्या स्वायत्त व सुनियोजित ग्रामपंचायतीबरोबरच मौर्य कालखंडात ग्रामीण संस्थांचा सुनियोजित विकास घडून आल्याचे दिसते. चोल राज्यांच्या कालखंडातील शिलालेखावरून महाराष्ट्र, गुजरात आणि आंध्र प्रदेशातही ग्रामीण संस्थांचा विकास झाला होता. याचे उल्लेख सापडतात. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात ग्रामीण संस्थांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे. इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात भारतात आलेल्या ग्रीक प्रवासी मॅगेस्थेनिस याच्या लिखाणातही भारतातील स्थानिक शासनाविषयी माहिती आढळते. प्राचीन ग्रामपंचायतीचे कामकान अथवा स्वरूप परंतक राज्याच्या कारकिर्दीतील (इ.स. ९०७ ते ९४९) आलेखावरून कसे होते याची माहिती मिळते. ग्रामसभेच्या रचनेत दोन, तीन अथवा पाच वडीलधारी मंडळी असत. अनुभव व चारित्र्याच्या निकषानुसार ती निवडली जात. ग्रामसभा सदस्य होण्यासाठी ३५ ते ७५ वयाची पात्रता असावी लागत असे. शिवाय गावात पत, प्रतिष्ठा, घर, शेत असावे. चांगल्या मार्गाने संपत्ती कमावलेली व्यक्तीच पंचायतीच्या कारभारासाठी पात्र ठरविली जाई. शिवाय वेदांचा अभ्यास व्यापारशास्त्र, कला अवगत असावी अशा व्यक्तीच पात्र ठरत. पापी, भ्रष्ट, गैरमार्गानी संपत्ती कमावलेली समाजबहिष्कृत अथवा वेडाचारी व्यक्ती या पंचायत कारभारासाठी अपात्र ठरविल्या होत्या. शिवाय पंचायत सदस्यत्वाच्या काळात हिशेब व्यवहार पूर्ण केला तरच पुनश्चः निवडीस संधी होती. अन्यथा अपात्र ठरविले जाई. गावचा कारभार नीट करता यावा यासाठी विविध समित्या स्थापन केल्या जात असत. संरक्षण

समिती, न्याय समिती, शेती (बाग) समिती, गावकारभार पाहण्यासाठी विशेष पर्यवेक्षण समिती असे आणि या समित्यांच्या सदस्यांची निवड सर्वानुमते अथवा चिठ्ठी टाकून केली जाई. ग्रामसभेमार्फत जमीन महसूल गोळा करणे, न्यायदान करणे, संरक्षण करणे, भांडणतंटे सोडविणे (वाद मिटविणे), शांतता व सुव्यवस्था राखणे, रस्ता बांधणी, पिण्याच्या पाण्याचे तलाव, कालवे, विहिरी खोदणे, दुष्काळ रोगराई, प्रतिबंधक उपाय योजना करणे अशा गावच्या कल्याणाच्या सर्व गोष्टींची कामे व जबाबदाऱ्या या सर्व ग्रामपंचायत सदस्यावर असत. गावकारभाराचे नियोजन करणे, नियम बनविणे, करवसुली, लिलाव, जप्ती, सार्वजनिक हिशेब या सर्व गोष्टी ग्रामपंचायती करत. गावगुंडांचा बंदोबस्त करणे, त्यांना शिक्षा देणे, गुन्हेगारांना दंड करणे, ही कामे देखील केली जात. ग्रामसभेच्या आर्थिक नियोजनासाठी कर, दंड, देणग्या या सर्व मार्गांनी उत्पन्न मिळवून गावकारभाराचा गावगाडा चालविला जाई. ग्रामकारभारासाठी ग्रामिणी (गावप्रमुख) सह हिशोब तपासनिस, रखवालदार, सिमारक्षक, पाणीपुरवठा अधिकारी, पुरोहित, शिक्षक, वैधु इ. अधिकारी गावकारभार करत असत. त्यासाठी त्यांना कांही मोबदला दिला जाई. तसेच त्यांना गावच्या वतन जमिनी दिल्या जात. अशा प्रकारे प्राचीन ग्रामपंचायती स्वायत्त व स्वयंपूर्ण होत्या.

**ब) ब्रिटिशकालीन ग्रामपंचायती :**

ब्रिटिश कालखंडात इ.स. १८७० मध्ये जाहीर झालेल्या लॉर्ड मेयोच्या जाहिरनाम्यामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणास अधिकृत आधार प्राप्त झाला. इ.स. १८८२ मध्ये लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वराज्य संस्था विषयीचा कायदा संमत केला. आणि भारतातील ग्रामीण विकासास सत्तेच्या विकेंद्रीकरणास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. म्हणूनच भारताच्या आधुनिक इतिहासात लॉर्ड रिपनला स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक असे म्हटले जाते. संसदीय शासन पद्धतीसाठी स्थानिक नेतृत्व शोधून त्यांना एक प्रकारचे प्रशिक्षण व अनुभव देण्यासाठी लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्थांचे जाळे सुसंगतपणे सर्व भारतभर कार्यरत केले. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या ग्रामपंचायतीचे मुस्लीम राज्यवटीत महत्त्व कमी झाले. मुस्लीम राज्यवटीने ग्रामपंचायती व ग्रामप्रमुखांचे कांही अधिकार कमी केले होते. आणि त्यानंतर तर ब्रिटिश राज्यवट आली व त्यांनी ग्रामपंचायतींचे पूर्ण अधिकार व कार्ये काढून घेतली व त्यांनी आपले अधिकारी नेमले. जमिन महसूल गोळा करण्यासाठी कलेक्टर व मामलेदार, न्यायदानासाठी न्यायाधिश कायदा व सुव्यवस्थेसाठी पोलीस इ. अधिकारी नेमले. गाव संरक्षणासाठी पोलीस, तुरुंग, न्यायालये सुरू केली. शिक्षण देण्यासाठी शाळा व महाविद्यालये काढली. मनोरंजनासाठी संस्था काढल्या. विविध उद्योग व्यवसाय आणले. त्यामुळे शहरीकरण (नागरीकरण) वाढले. खेड्यातून शहराकडे ग्रामवासियांचे स्थलांतर सुरू झाले. त्यामुळे ग्रामपंचायतींचे विघटन झाले. पंचायती निष्प्रभ झाल्या. खेड्यांची स्वायत्तता आणि स्वयंपूर्णता लोप पावू लागली. परंतु यामुळे ब्रिटिश आणि ग्रामवासिय यांच्यातील दरी वाढू लागली. ब्रिटिश राज्यकर्ते व ग्रामीण जनता यात अलगता येऊ लागली व यामुळे ब्रिटिशांना आपली सत्ता टिकविण्यासाठी पुनश्चः विकेंद्रीकरणाचे धोरण स्विकारणे आवश्यक वाटू लागले. आणि सुरवातीस भारतीयांना स्थानिक कारभारात सहभागी करून घेण्याबरोबरच सुशिक्षीत भारतीयांना इस्ट इंडीया कंपनी कारभारात स्विकारले. ब्रिटिश राज्यवटीतच १६८७ ला मद्रासमध्ये १७२६ साली मुंबई, कलकत्ता येथे महानगरपालिका स्थापन

केल्या व १८५० साली नगरपालिका कायदा मंजूर करून भारतातील प्रमुख शहरात नगरपालिका स्थापन केल्या. पुढे १८८२ मध्ये लॉर्ड रिपनने शहराप्रमाणेच ग्रामीण समाजातही स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला. या स्थानिक स्वराज्य संस्था स्थानिक ग्रामवासिय लोकांनी चालवाव्यात. असे सदस्य लोकांनी निवडून दिलेले असावेत. सरकारने या संस्थांना केवळ मार्गदर्शन करावे. त्याचे प्रमुख वा ताबेदार बनू नये. इ. अनेक तरतुदी त्यात होत्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने हा प्रस्ताव क्रांतीकारी होता. परंतु नंतर आलेल्या लॉर्ड कर्झनने केंद्रीकरणाचे धोरण स्विकारून हा प्रस्ताव धुडकावून लावला व स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना व कार्य थंडावले. (थांबले) परिणामी सरकार व जनता यांच्यात पुनश्चः अलगता वाढली असहकार्य, भेदभावाची दरी रुंदावली. या बाबीकडे मोर्ले या अधिकाऱ्याने सरकारचे लक्ष वेधले त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विचारार्थ १९०७ साली रॉयल कमिशन नेमले. या कमिशनने पुनःश्च ग्रामस्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था सुरू कराव्यात अशी ठळक शिफारस केली व अशा स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवावे असेही सुचविले. त्यासाठी शेतसाऱ्यातील उत्पन्नातील काही हिस्सा स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावा असे सुचविले व स्थानिक स्वराज्य संस्थांना न्यायदानाचा अधिकार ही द्यावा असे सुचविले होते. या शिफारशींचा हा प्रस्ताव स्विकारण्यासाठी काँग्रेस नेत्यांनी सरकारकडे आग्रही मागणी केली. ग्रामस्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थाविषयक सुधारणा कराव्यात ही मागणी सरकारकडे केली. १९१५ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाविषयक कायदे करण्याचा अधिकारही प्रांतिक सरकारला देण्यात आला. जरी ही अंमलबजावणी यावेळी झाली नसली तरी हे महत्त्वपूर्ण पाऊल होते हे निश्चित. त्यानंतर पुढे म्हैसूर व बडोदा संस्थानांनी हे कायदे स्वखुशीने तर इतर संस्थानांनी जनतेच्या दबावामुळे स्विकारले. पण या कायद्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. १९३७ साली प्रांतिक मंत्रिमंडळे सत्तेवर आली. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य हे लोकांनी निवडून दिलेले असावेत असा बदल करण्याचे ठरविले होते पण १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले त्यात सरकारने भारतास ओढले म्हणून प्रांतिक मंत्रिमंडळांनी राज्यीनामे दिले त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय पुनःश्च दुर्लक्षित राहिला. ब्रिटिश काळात स्थानिक स्वराज्य संस्था प्रत्यक्षात अस्तित्वात आल्या नाहीत. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्मितीचे बिजारोपन मात्र निश्चित झाले.

### क) स्वातंत्र्योत्तर काळातील पंचायत राज्यव्यवस्था

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यघटनेला धरून ग्रामपंचायतीची स्थापना होण्यासाठी आवश्यक ती सत्ता व अधिकार द्यावेत अशी तरतूद केली. यासाठी सरकारने वेळोवेळी कांही समित्या नेमल्या. काँग्रेस ग्रामपंचायत चौकशी समिती १९५२, स्थानिक स्वराज्य संस्था मंत्र्यांची परिषद १९५४, कर चौकशी समिती १९५४ इ. सर्वच समित्यांनी ग्रामपंचायतींची स्थापना, अधिकार, कार्ये, योजना, आराखडे, प्रशासन, विकास कार्यक्रम, उत्पन्न साधन, लोकसहभाग इ. विविध बाबीसह ग्रामपंचायतींची स्थापना व आवश्यकता याविषयी प्रतिपादन केले होते.

### बलवंतराय मेहता समिती आणि पंचायत राज्य

पंचायत राज्यची पार्श्वभूमी पाहताना सर्वात महत्त्वाचा घटक ठरतो तो म्हणजे बलवंतराय मेहता समिती आणि पंचायत राज्यची सुरू झालेली वाटचाल हा होय. स्वयंपूर्ण आणि स्वायत्त अशा

प्रकारचे पंचायत राज्य पुन्हा सुरू करण्यासाठी श्री बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीतून लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी पंचायती राज्यचा उगम झाला. भारतात ८० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. या ग्रामीण समाजाचा विकास झाला तरच देशाचा सर्वांगिण विकास होईल. या दृष्टिकोनातूनच स्वातंत्र्यानंतर कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी ग्रामीण विकासाच्या अनेक योजना सुरू करण्यात आल्या. २ ऑक्टोबर १९५२ रोजी समाज विकास योजना सुरू करण्यात आली. या समुदाय विकास कार्यक्रमात (Community Development Programme) जनतेच्या सहकार्याला म्हणजे लोकसहभागाला अग्रक्रम देण्यात आला. लोकसहभागाद्वारे शेती, उद्योगधंदे, शिक्षणप्रसार, आरोग्य, दळणवळण, पशुपालन ग्रामसंरक्षण इ. सर्व क्षेत्रात विकास घडवून आणण्याचे उपक्रम राबविले पण सुरुवातीला लोकांच्याकडून अपेक्षित सहकार्य मिळाले नाही. जनतेकडून प्रतिसाद मिळावा. ग्रामीण, आर्थिक व सर्वांगिण विकासासाठी लोक सहभाग वाढावा यासाठी काय करावे लागेल याचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी आणि समाजविकास कार्यक्रमात लोकांचे अपेक्षित सहकार्य का मिळत नाही या अपयशाची कारणे शोधून त्यावर उपाय सुचविण्यासाठी केंद्र सरकारने जानेवारी १९५७ मध्ये बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने देशातील कांही निवडक विकास गटांना भेटी दिल्या. तेथील लोकांशी, पदाधिकाऱ्यांशी, सरकारी कर्मचाऱ्यांशी व इतर तज्ज्ञ लोकांशी चर्चा केली. व नोव्हेंबर १९५७ मध्ये केंद्र सरकारला आपला अहवाल सादर केला. या अहवालानुसार बलवंतराय मेहता समितीने समाज विकासाला जनतेचे सहकार्य मिळविण्यासाठी, लोकांचा समाज विकासातील सहभाग वाढविण्यासाठी समाज विकासाचा कार्यक्रमच लोकांच्या स्थानिक व प्रातिनिधीक संस्थेकडे सोपविला पाहिजे असे सुचविले. या अहवालानुसार या समितीने राज्य सरकारच्या विकास कार्यक्रमांचे लोकशाही तत्त्वानुसार विकेंद्रीकरण करण्याची शिफारस केली. त्यासाठी या समितीने सत्तेच्या विकेंद्रीकरणाची त्रिसुत्री योजना मांडली. त्या त्रिसूत्री योजनेनुसार जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, तालुका पातळीवर पंचायत समिति व गाव पातळीवर ग्रामपंचायत असावी अशा पद्धतीने सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात याचे अशी शिफारस केली. या लोकशाही विकेंद्रीकरणालाच ‘पंचायत राज्य’ असे म्हणतात. केंद्र सरकारने बलवंतराय मेहता समितीच्या या शिफारशी स्विकारून राज्य सरकारना या त्रिस्तरीय योजनेची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले. या योजनेलाच पंडीत नेहरूंनी पंचायत राज्य हे नाव दिले. देशात सर्वप्रथम राज्यस्थानमध्ये २ ऑक्टोबर, १९५९ रोजी पंचायत राज्य सुरू झाले. त्या पाठोपाठ आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि इतर राज्यात पंचायत राज्य पद्धती सुरू झाली.

समाज विकास कार्यक्रमांना गती प्राप्त व्हावी. विकासाचे फायदे अगदी खेडोपाडी पोहोचावेत. जनतेने अगदी स्वयंस्फूर्तीने त्यात सहभागी व्हावे. प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे सर्वांचाच त्यात सहभाग असावा हा प्रमुख उद्देश पंचायत राज्य निर्मितीमागे आहे. याशिवाय तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेती विकास, उत्पादन वाढ, उद्योगधंद्यांचा विकास, सहकाराचा विकास, दुर्बल घटकांचा विकास सर्वांना अधिकार व सत्ता सहभागाची संधी लोकांचे ऐक्य व सहकार्य वाढविणे. लोकांची कार्यकुशलता म्हणजे मनुष्यबळाचा विकास करणे. सरकारी अनुदानाचा सर्वांच्यापर्यंत लाभ पोहोचविणे इ. अनेक उद्दिष्टे घेऊन ‘पंचायत राज्य’ची निर्मिती झाली आहे. पंचायत राज्य हे ग्रामीण पुनर्रचनेचे व राष्ट्रीय विकासाचे एक मुलभूत साधन आहे.

## ड) 'पंचायत राज्य' मूल्यमापन समित्या

बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनुसार संपूर्ण देशभर सर्व राज्यात पंचायत राज्य व्यवस्था सुरू झाली. सत्तेच्या लोकशाही विकेंद्रीकरण पद्धतीसाठी जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायती अशी त्रि-सुत्री योजना स्थापन होऊन विकास कामांना लोकसहभागातून सुरुवात झाली. केंद्र सरकारने ही योजना स्विकारून राज्य सरकारना या त्रि-स्तरीय योजनेच्या अंमलबजावणीचे आदेश दिले. पंडीत नेहरूंनी या योजनेचे 'पंचायत राज्य' असे नामकरण केले व 'पंचायत राज्य'ची भारतात सर्वत्रच सुरुवात झाली. आणि वेळोवेळी अनेक समित्या नेमून पंचायत राज्यचे मूल्यमापन सुरू झाले. वेळोवेळी नेमलेल्या समित्यांनी सुचविलेल्या शिफारशी केंद्र सरकारने स्विकारून पंचायत राज्य व्यवस्था अधिकाधिक बळकट करण्याचे कार्य केले. त्यामुळे वेळोवेळी 'पंचायत राज्य' पद्धतीत अनेक सुधारणा होत गेल्या. नियोजन आयोगाने १७ ऑगस्ट १९६२ ला श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी समिती नेमली. त्यांच्या सुचनेप्रमाणे पंचायत राज्य पद्धतीची जलद अंमलबजावणी करणे व पंचायती राज्य पद्धतीकडे अधिकाधिक अधिकार सोपविणे या गोष्टी मान्य केल्या. १७ जुलै १९६६ रोजी नेमलेल्या श्री तरवतमल जैन समितीच्या शिफारशीनुसार पंचायत राज्यमध्ये दुर्बल घटकांना सहभागी करून घेण्याची प्रेरणा स्विकारली. तसेच इ.स. १९७७ मध्ये केंद्र सरकारने नेमलेल्या अशोक मेहता समितीच्या शिफारशीनुसार 'पंचायत राज्य' आणि लोकशाही सत्तेचे विकेंद्रीकरण यासाठी प्रसंगी घटना दुरुस्ती करणे, अधिकाधिक निधी देणे, या संस्थांच्या वेळेत निवडणुका घेणे, दुर्बल घटकांचे हितसंबंध जोपासने या गोष्टीबाबत विचार केला गेला. श्री. जी. व्ही. के. राव समिती (१९८५) ने ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलनासाठी पंचायत राज्यातील संस्थांना केंद्रिय महत्त्व द्यावे असे सुचविले. श्री. पी. के. थुंगल समिती (१९८८) यांनी सुचविले की पंचायत राज्यास घटनात्मक दर्जा द्यावा. त्यानुसार १९९२ मध्ये ७३ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे १९८७-८८ मध्ये पंतप्रधान राज्यीव गांधींनी पंचायत राज्यास घटनात्मक दर्जा देण्यासाठी व महिला आणि दुर्बल घटकांना राखीव जागा देण्यासाठी केलेले पण नामंजूर झालेले घटना दुरुस्ती विधेयक पंतप्रधान नरसिंहराव सरकारच्या काळात मंजूर होऊन २४ एप्रिल १९९३ पासून त्याचा अंमल सुरू झाला. हीच ती ७३ वी घटना दुरुस्ती होय. यात पंचायत राज्य विषयीच्या अनेक तरतुदी दिल्या आहेत. पंचायत राज्यमधील त्रिस्तरीय रचना स्पष्ट केली असून त्यातील संस्थात म्हणजे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये अधिकारी व पदाधिकारी यांची निवड करण्याच्या पद्धती घटनेप्रमाणे होतात. याचे स्वरूप राज्य व देशभर सारखेच आहे. तिन्ही स्तरावरील संस्थांचे पदाधिकारी प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडले जातात. अध्यक्ष निवड कायदे मंडळाच्या नियमाप्रमाणे होते. प्रत्येक स्तरावरील संस्थात अनुसूचित जाती व जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा आहेत. तर महिलासाठी १/३ जागा राखीव आहेत. प्रत्येक संस्थेचा कालावधी पाच वर्षापर्यंत असतो. पंचायत सदस्यत्वासाठी सदस्यांची पात्रता म्हणून भारताचे नागरिकत्व असणे. वयाची १८ वर्षे पूर्ण असणे यासह निवडणुक संदर्भातील कायद्याने निर्धारित केलेली इतर सर्व पात्रता निश्चित केली आहे. सरकारकडून राज्य निवडणूक आयोग स्थापन करून त्यासाठी आयुक्त नेमला जातो. आयुक्तांची नेमणूक राज्यपाल करतात. तसेच ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या सर्व संस्थांना दिलेले अधिकार, कार्यसुची व जबाबदाऱ्या देखील ७३ व्या घटना दुरुस्तीमध्ये निश्चित केल्या गेल्या आहेत. पंचायत राज्यमधील या सर्व संस्थांना उत्पन्नाची साधने म्हणून कर किती व

कशाप्रकारे गोळा करावा. अर्थसहाय्य (अनुदान) कसे दिले जाईल हे देखील वित्त आयोगाद्वारे सरकार निश्चित करते. यासाठी दर पाच वर्षानी वित्त आयोगाची सरकार नेमणूक करते. अशा प्रकारे पंचायत राज्यची वाटचाल ही प्राचीन ग्रामपंचायतीपासून ते आता आधुनिक काळातील सुधारित व बळकट स्वरूपातील पंचायत राज्य व्यवस्थेपर्यंत आपणास पहावयास मिळते.

### **४.३.२ ग्रामपंचायत–रचना व कार्ये** (Gram Panchayat : Structure and functions)

पंचायत राज्य मध्ये गाव पातळीवर ग्रामपंचायतीची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामपंचायत ही गावच्या स्वराज्याचा मूळ पाया आहे. ग्रामोद्धार करणारी ग्रामपंचायत ही आपल्या लोकशाहीचा आधार आहे. स्थानिक विभागाच्या गरजांना अनुसरून स्थानिक विकास कामांची पूर्तता करणे व स्थानिक लोकांना विकास कार्यक्रमात सहकारी करून घेणे यासाठी ग्रामपंचायतीची निर्मिती झाली. कारण स्थानिक जनतेचा विकास कामातील सहभाग कशा प्रकारे वाढविता येईल आणि त्यासाठी निश्चित कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत. याचा अभ्यास करण्याची राष्ट्रीय पातळीवर जी पहिली समिती १९५७ ला नेमली ती बलवंतराय मेहता समिती होय. या समितीने स्थानिक जनतेचा विकास प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे असे सुचविले इ.स. १९५८ मध्ये या समितीने हा अहवाल शासनाला सादर केला. व 'पंचायत राज्य' ही संकल्पना पुढे आली. ही त्रि-स्तरीय रचना आहे. म्हणजे जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, तालुका पातळीवर पंचायत समिती आणि गाव पातळीवर ग्रामपंचायत असावी अशी शिफारस केली. आणि १ मे १९६२ या महाराष्ट्र दिनापासून पंचायत राज्य पद्धती सुरू झाली. पंचायत राज्य व्यवस्थेचा स्वतंत्र भारतात जन्म होऊन लोकशाही सत्तेच्या विकेंद्रीकरणाद्वारे ग्रामीण जनतेच्या हातात सत्ता सोपविण्यात आली. कै. न. वि. गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणे 'गाव गावकऱ्यांचा, व्यवस्था पंचायतीची व फायदा सर्व गावाचा' हे मुख्य धोरण पंचायतीचे असेल.

ग्रामपंचायत प्रौढ मतदान पद्धतीवर आधारीत प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे स्थापन होते. यात दोन स्त्री सभासद व अनुसूचित जातीचा व जमातीचा प्रत्येकी एक प्रतिनिधी समाविष्ट करण्याची तरतूद आहे. ग्रामपंचायत स्थापन होण्यासाठी गावची लोकसंख्या किमान ६०० असावी लागते. लोकसंख्या कमी असेल तर जवळपासच्या कांही गावांची मिळून गट पंचायत स्थापन केली जाते. ग्रामपंचायतीच्या सभासदांची संख्या कमीत कमी ७ आणि जास्तीत जास्त १७ इतकी असावी लागते. अशी सभासद किंवा प्रतिनिधी संख्या नेहमी विषम असते. त्यातील राखीव जागांची निश्चिती जिल्हाधिकारी ठरवितात. लोकनियुक्त सभासदांना पंच म्हणून संबोधले जाते. पंचामधून सरपंच आणि उपसरपंच यांची निवड होते. भारताचा १८ वर्षे पूर्ण असलेला कोणीही नागरीक पंचायतीचा सदस्य होऊ शकतो. त्यासाठी त्या क्षेत्रातील मतदार यादीत त्याचे नाव असावे लागते. तसेच तो ग्रामपंचायतीचा व जिल्हा परिषदेचा थकबाकीदार नसावा. तो दोषी नसावा किंवा किमान सहा महिन्यांची शिक्षा झालेली नसावी. दोषी अथवा सहा महिन्यांची शिक्षा झाली असल्यास ती व्यक्ती ग्रामपंचायत सदस्य होण्यास अपात्र ठरते. अशी व्यक्ती वेडी दिवाळखोरीग्रस्त असू नये. दोनपेक्षा अधिक अपत्ये असू नयेत. अन्यथा या व्यक्ती अपात्र ठरतात. ग्रामपंचायत सदस्यांचा कालखंड पाच वर्षाचा असतो. परंतु राज्य शासन हा कालखंड पूर्ण होण्यापूर्वी ग्रामपंचायत विसर्जित करू शकते. अथवा जास्तीत जास्त सहा महिन्यांचा कालखंड वाढवू शकते. सरपंच हा ग्रामपंचायतीचा प्रमुख पदाधिकारी असतो. सरपंच व

उपसरपंच निवड ग्रामपंचायतीत निवडून आलेल्या सदस्यामधून केली जाते. तसेच प्रत्येक पंचायतीसाठी राज्य सरकार एक ग्रामसेवक नियुक्त करते. व तो ग्रामपंचायतीचा सचिव या नात्याने दप्तर सांभाळतो कामकाज करतो. विकासात्मक कामांची सर्व जबाबदारी पार पाडतो. ग्रामसेवक हा शासकीय अधिकारी तर सरपंच हा ग्रामपंचायतीचा प्रमुख पदाधिकारी असतो. त्याची भूमिका ही देखील ग्रामपंचायत व गावचा विकास यासाठी महत्त्वाची असते. ग्रामपंचायतीच्या रचनेतील ग्रामसेवक व सरपंच यांची भूमिका व कार्ये प्रथम पाहूया व त्यानंतर ग्रामपंचायतीची कार्ये यांचा अभ्यास करूया.

**ग्रामसेवकाची भूमिका अथवा कार्ये :**

ग्रामपंचायतीचा मुख्य अधिकारी व ग्रामपंचायतीचा सचिव म्हणून दप्तर सांभाळणे, पत्रव्यवहार करणे, प्रशासन पहाणे, ठरावांची नोंद घेणे व कार्यवाही करणे, जिल्हा परिषदेच्या योजना राबविणे, ग्रामपंचायतीची अंदाजपत्रके तयार करणे, कायदेशीर तरतुदींची माहिती देणे, सरकारी योजना राबविणे, करवसुली करणे, ग्रामसभा बोलावणे, अहवाल, कार्यवृत्तांत लिहिणे. जन्म, मृत्यू, विवाह नोंदी, ग्राम नकाशे, जमिनी मोजमापे ठेवणे. गावातील संस्था, मंडळे, शाळा इ. कार्यक्षम बनविणे, गावप्रश्न सोडविणे, ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे. गावच्या बऱ्या, वाईट घटनांचा वृत्तांत गट विकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविणे. निवडणुकांचे आदेश पालन करणे. ग्रामपंचायत कर्मचारी वर्गाची सेवापुस्तके, रजा, वेतन, बोनस, भविष्य निर्वाह निधी इ. चा पाठपुरावा करणे. पंचवार्षिक आराखडा, अनुदान आराखडा, गावात विविध योजना, सुधारणा राबविणे. उदा. साक्षरता, स्वच्छता, पर्यावरण, व्यसनमुक्ती, तंटामुक्ती इ. शासनाच्या लाभार्थी योजना ग्रामस्थांना मिळवून देणे. दारिद्र्यरेषा सर्वेक्षण, रोजगार योजना, कुटुंब नियोजन, कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविणे, महिला, बालकल्याण, समाजकल्याण पाणीपुरवठा, मनोरंजन, आपत्कालीन व्यवस्थापन इ. सर्व कार्ये याशिवाय जिल्हा परिषदेने वेळोवेळी सांगितलेली कार्ये पार पाडणे इ.

**सरपंचाची भूमिका व कार्ये :**

ग्रामपंचायतीचा प्रमुख पदाधिकारी म्हणून कार्य करणे, ग्रामपंचायतीच्या सभा बोलावणे, ग्रामसभा कामकाज चालविणे, ग्रामपंचायतीची पदे भूषविणे, ग्रामपंचायतीच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे, विकास योजनावर देखरेख ठेवणे, कामकाज व विकास कामांचे अहवाल तयार करणे. ठराव मांडणे, अंमलबजावणी करणे, अर्थसंकल्प तयार करणे, सदस्य मान्यता घेणे, अंदाजपत्रक पंचायत समितीकडे मंजुरीसाठी पाठविणे. ग्रामपंचायत क्षेत्रातील व्यक्तींना उत्पन्न, निवास इ. संदर्भातील दाखले देणे. वेळच्या वेळी करवसुली करून घेणे. ग्रामसभांचे अध्यक्षस्थान भूषविणे व कामकाज चालविणे ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांवर, कारभारावर व विकास योजनांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे. आवश्यक ते अहवाल, विवरणपत्रे, तक्ते तयार करणे. ठरावांची अंमलबजावणी करणे. ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक पंचायत समितीकडून मंजूर करून घेणे. ग्रामपंचायतीच्या संदर्भातील दाखले, उत्पन्नपत्रे इ. देणे. ग्रामसेवकाकडून सर्व कार्ये पूर्ण करून घेणे. इ. अनेक प्रकारची कार्ये सरपंच करतात. शासन, जिल्हा परिषद यांनी वेळोवेळी राबविलेल्या योजना अभियान यात सरपंच सहभागी होऊन ग्रामपंचायतीसाठी अभिमान वाटेल असे कार्य करण्यास भाग घेतात.

**ग्रामपंचायतीची कार्ये**

ग्रामीण विकासासाठी ग्रामीण लोकांच्या कल्याणासाठी आणि ग्रामीण समस्यांचे निर्मूलन करून ग्रामवासियांचे जीवन सुखी समृद्ध करण्यासाठी ग्रामपंचायत वविध कार्ये पार पाडत असते. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८-५९ अनुसार उपलब्ध ग्रामनिधीतून पुढील विविध कार्ये ग्रामपंचायतीकडे सोपविली असून या कार्याद्वारे ग्रामीण विकास करणारी ग्रामपंचायत ही एक मूलभूत संस्था आहे. ग्रामपंचायतीची विविध कार्ये पुढीलप्रमाणे.

**अ) सार्वजनिक सेवा/कार्ये**

❋ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे ❋ सार्वजनिक रस्ते बांधणी करणे ❋ सार्वजनिक तलाव, विहीरी बांधणे ❋ सार्वजनिक जागांची स्वच्छता करणे ❋ सार्वजनिक दिवाबत्तीची सोय करणे ❋ जनावरासाठी पाणीपुरवठ्याचे हौद इ. बांधणे ❋ गायरान आणि गावठाण यांची व्यवस्था करणे ❋ स्मशानभूमीची व्यवस्था करणे ❋ बेवारस प्रेते, मृत जनावरे यांची विल्हेवाट लावणे ❋ हॉटेल, दुकानगाळे यांना परवानगी देणे ❋ सार्वजनिक बांधकाम दळणवळण व्यवस्था करणे ❋ मंदिर, घाट, बाजार इ. सार्वजनिक इमारती बांधणे ❋ सार्वजनिक गटर, नाले, पूल बांधणे ❋ अतिक्रमण निर्मूलन करणे ❋ झाडे लावणे ❋ भटक्या, बेवारस कुत्र्यांचा बंदोबस्त करणे ❋ दुष्काळात रोजगार व्यवस्था करणे.

**ब) कृषीविषयक कार्ये**

❋ कृषीसुधारणा व उत्पादनवाढीसाठी प्रयत्न करणे ❋ पडीक, ओसाड, नापिक जमिनींची लागवड करणे ❋ सुधारित बी-बियाणे पुरवठा करणे ❋ रोपवाटीका तयार करणे, जंगल वाढ करणे ❋ शेतीसाठी पाणीपुरवठा, जलसिंचन योजना तयार करणे ❋ धान्य कोठारे बांधणे, किटकनाशके फवारणे ❋ कंपोस्ट खत, रासायनिक खत पुरवठा करणे ❋ नवीन पिक प्रयोग करणे, पिक संवर्धन करणे ❋ जमीन सुधारणा याद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारणे ❋ सहकारी तत्त्वावर शेती संवर्धन करणे.

**क) सार्वजनिक आरोग्यविषयक कार्ये**

❋ गावचे आरोग्य चांगले राहण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवणे ❋ साथींच्या रोगांचे निर्मूलन करणे ❋ रोगप्रतिबंधक लस टोचणी इ. उपाययोजना करणे ❋ सार्वजनिक स्वच्छता करणे, शौचालये बांधणे ❋ भटक्या प्राण्यांचा बंदोबस्त करणे ❋ गटार बांधणी व रस्ते सफाई करणे ❋ प्रसुती विषयक सेवा सुविधा निर्मूलन करणे ❋ आरोग्याच्या सुविधा, क्रिडांगणे व्यायामशाळा करणे ❋ गावातील प्रदुषणाला आळा घालणे ❋ आरोग्यविषयक शिबीरांचे आयोजन करणे इ.

**ड) पशुसंवर्धनविषयक कार्ये**

❋ पशुवैद्यकिय सेवा उपलब्ध करणे ❋ जनावरांची निगा राखणे ❋ कुक्कुटपालनासाठी सहकार्य व सुविधा पुरवणे ❋ पशुंच्या पैदाशिमध्ये वाढ घडवून आणणे ❋ जनावरासाठी चराऊ कुरणे उपलब्ध करणे ❋ जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचे हौद बांधणे.

### इ) शैक्षणिक व सांस्कृतिक कार्ये

* गावातील मुलांच्या शिक्षणाची सोय करणे * शिक्षण प्रसार करणे * अंगणवाडी व बालवाडीस अर्थसहाय्य करणे * प्राथमिक शाळांचे बांधकाम व सुविधा करणे * माध्यमिक शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे * सार्वजनिक ग्रंथालये सुरू करणे * सामुहिक मनोरंजन केंद्र निर्माण करणे * सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम निर्मिती करणे * दारुबंदीला उत्तेजन देणे * जत्रा, यात्रा, भजन, किर्तन, मेळे यांचे आयोजन करणे * अस्पृश्यता निवारण, हुंडाबंदी, कुटुंब नियोजन, साक्षरता प्रसार, महिला कल्याण यासारखे उपक्रमासाठी प्रबोधनपर कार्यक्रम करणे.

### फ) समाजकल्याण विषयक कार्ये

* अस्पृश्यता निर्मूलन करणे * दारुबंदी, हुंडाबंदी, व्यसनमुक्ती करणे * लाचलुचपत/भ्रष्टाचार निर्मूलन करणे * अपंग, आजारी निराधार लोकांना मदत करणे * मागासवर्गियांचा आर्थिक विकास घडवून आणणे * स्वस्त धान्य दुकाने सुरू करणे * श्रमदानातून वनीकरण, सफाई करणे * संरक्षण पथकाद्वारे गाव सुरक्षा करणे.

### ग) इतर कार्ये

* जमीन महसूल गोळा करणे * गाव संरक्षण करणे, पहारा ठेवणे, गस्त घालणे * धोकादायक बेकायदेशीर धंदे बंद करणे * ग्रामोद्योग, कुटीर उद्योग संवर्धन करणे * गावात सहकारी सोसायटी स्थापन करणे, प्रोत्साहन देणे * गावात वाचनालये, करमणूक केंद्रे स्थापन करणे * शेतकरी, युवक, महिलामंडळे, बचत गट काढणे * अल्पबचतीची सवय ग्रामस्थांना लावणे * राष्ट्रीय अभियानाचे उपक्रम राबविणे.

वरीलप्रमाणे ग्रामपंचायतीची ग्रामीण विकासासाठी विविध प्रकारची कार्ये करतात. गावकऱ्यांची अगदी सर्वात जवळची संस्था म्हणून ग्रामपंचायत कार्य करते.

## ४.३.३ पंचायत समिती : रचना व कार्ये (Panchayat Samiti : Structure and Functions)

पंचायत राज्य मधील तालुका किंवा गट पातळीवरील संस्था म्हणजे पंचायत समिती होय. प्रत्येक राज्यातील प्रत्येक जिल्ह्याची विभागणी कांही विकास गटात करून प्रत्येक गटासाठी एक पंचायत समिती स्थापन केली आहे. तालुका पातळीवर विविध विकास गटांचा स्वतंत्रपणे कारभार पाहणाऱ्या संस्थेला पंचायत समिती म्हणतात. गाव पातळीवरील ग्रामपंचायत आणि जिल्हा पातळीवरील जिल्हा परिषद यांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा म्हणजेच पंचायत समिती होय.

पंचायत समितीमध्ये किमान १५ ते कमाल २१ सदस्य असतात. १९७८ पासून पंचायत समितीकरिता निवडणुकीचे तत्त्व स्विकारले आहे. २००० लोकसंख्येमागे एक सभासद पंचायत समितीवर प्रौढ मतदान पद्धतीने निवडून दिला जातो. जिल्हा परिषदेचे निर्वाचन क्षेत्र ४०००० लोकसंख्येचे असल्यामुळे एका जिल्हा परिषद मतदार संघातून २ सदस्य पंचायत समितीवर निवडून दिले जातात. अधिनियम दुरुस्तीनुसार स्त्री प्रतिनिधीसाठी ३० टक्के राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे १/३ जागा महिलांसाठी राखीव असतात त्याच प्रमाणे अनुसूचित जाती व जमाती तसेच इतर मागासवर्गीय लोक यांच्यासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कांही जागा राखीव

असतात. तालुक्यातून जिल्हा परिषदेवर निवडून गेलेले सदस्य हेही पंचायत समितीचे सदस्य असतात. तालुका शेतीमाल खरेदी विक्री सहकारी संघाचे अध्यक्ष यांना सहयोगी सदस्य म्हणून पंचायत समितीत स्विकृत केले जाते. जिल्हा परिषदेच्या प्रत्येक मतदार संघातील सर्व ग्रामपंचायतीचे सदस्य आपल्यातून दोन सदस्य पंचायत समितीवर निवडून देतात. नवनियुक्त पंचायत समितीचा कार्यकाल पाच वर्षे असतो. पण गैरकारभार आढळल्यास राज्य सरकार पंचायत समिती बरखास्त करू शकतात.

**पंचायत समितीचे पदाधिकारी व अधिकारी**

पंचायत समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांपैकी एकाची पंचायत समितीचा अध्यक्ष म्हणून व एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड केली जाते. पंचायत समितीतील नियुक्त झालेले सर्व सदस्य त्यांची निवड करतात. या पंचायत समितीच्या अध्यक्षांना सभापती असे म्हणतात. तर उपाध्यक्षंना उपसभापती असे म्हणतात. यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. पण अलिकडे ही निवड अडीच वर्षासाठी करतात व अनुसूचित जाती व जमाती, इतर मागास वर्ग व महिला यांच्यासाठी नेमून दिलेल्या पद्धतीने क्रमशः सभापतीपद राखीव ठेवले जाते. तर ज्या विकास गटात ५० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या अनुसूचित जमीतीची असते तेथे सभापती व उपसभापती (अध्यक्ष व उपाध्यक्ष) अनुसूचित जमातीचे असावे लागतात. सभापती व उपसभापती यांना मानधन व निवासस्थान अशा कांही सुविधा पुरविल्या जातात. पंचायत समिती सदस्य १/५ बहुमताने अविश्वास ठरावाद्वारे त्यांना पदच्यूत करू शकतात. उपसभापतींना सभापतीकडे तर सभापतींना जिल्हा परिषद अध्यक्षाकडे राज्यीनामा द्यावा लागतो.

पंचायत समितीचे मुख्य पदाधिकारी म्हणजे सभापती होत. तर पंचायत समितीचे मुख्य अधिकारी गट विकास अधिकारी (Block Development Officer - B.D.O.) हे होत. त्यांची भूमिका व कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात

**पंचायत समिती सभापती :** सभापती हा पंचायत समितीचा लोकनियुक्त मुख्य पदाधिकारी असतो. सभापतीची नियुक्ती व कार्यकाल याविषयी आपण वर सविस्तर माहिती घेतली आहे. आता सभापतींची कार्ये व अधिकार पहाणे आवश्यक आहेत ती पुढीलप्रमाणे –

✻ पंचायत समितीची सभा बोलविणे, अध्यक्षस्थान स्विकारणे आणि सभेचे कामकाज चालविणे. ✻ पंचायत समितीच्या बैठकांना मार्गदर्शन करणे ✻ जिल्हा परिषद अंतर्गत तालुका विकास, गट क्षेत्रातील कामाची आणि संस्थांची पहाणी करणे ✻ गट विकास क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या कामावर नियंत्रण आणि देखरेख ठेवणे ✻ कर्मचाऱ्यांकडून कागदपत्र, दस्तऐवज आणि इतर माहिती मागविणे ✻ राज्य सरकार व जिल्हा परिषदेने सोपविलेल्या विकास योजनांची गटात अंमलबजावणी करणे ✻ अनुदानाच्या सहाय्याने गटारांची विकास कार्ये पार पाडणे ✻ पंचायत समितीचे ठराव आणि निर्णय यांची अंमलबजावणी करणे ✻ पंचायत समितीच्या कार्याचा अहवाल जिल्हा परिषदेस सादर करणे ✻ पंचायत समितीच्या आर्थिक व प्रशासकीय व्यवहारावर देखरेख ठेवणे इ. ✻ सभापतीच्या अनुपस्थितीत उपसभापती वरील कार्याची जबाबदारी पार पाडतात.

**गट विकास अधिकारी** (Block Development Officer - B.D.O.)

गट विकास अधिकारी हा पंचायत समितीचा मुख्य प्रशासकीय अधिकारी असतो. सभापती हा पदाधिकारी असल्याने तो प्रौढ मतदान पद्धतीवर आधारीत लोकनियुक्त पदाधिकारी असतो. तर गट विकास अधिकारी हा शासकीय अधिकारी असतो. तो पंचायत समितीचा सचिव (कार्यकारी अधिकारी) असतो. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेद्वारे गट विकास अधिकाऱ्यांची राज्य सरकारकडून निवड होते. तर कांही जागा पदोन्नतीनेही भरतात. पंचायत समितीला गट विकास अधिकाऱ्यांची कार्ये व अधिकार पुढीलप्रमाणे असतात.

* पंचायत समितीचा, स्थायी समितीचा पदसिद्ध सचिव म्हणून काम पहावे लागते. * पंचायत समितीच्या प्रशासकीय कामावर आणि कर्मचाऱ्यावर देखरेख ठेवणे * पंचायत समितीचा सचिव म्हणून बैठकांना उपस्थित राहणे * पंचायत समितीने आखलेल्या विकास योजनांची गटात अंमलबजावणी करणे * शासकीय अधिकारी म्हणून पंचायत समितीच्या कामाचा अहवाल राज्य सरकारकडे पाठविणे * पंचायत समितीच्या अंदाजपत्रकास जिल्हा परिषदेकडून मंजुरी मिळवून त्याची अंमलबजावणी करणे. * ग्रामपंचायतीच्या कामावर देखरेख ठेवणे. * पंचायत समितीच्या सभांच्या कामकाजाचे नियोजन करणे * पंचायत समितीच्या अनुदानाचे आर्थिक व्यवहार पाहणे * विकास योजनांची अंमलबजावणी करताना एखादी मालमत्ता संपादन करणे. तिची विक्री करणे किंवा हस्तांतरण करणे इ. अधिकार असतात. * पंचायत समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून कोणतीही माहिती पत्रके, हिशेब किंवा स्पष्टीकरणे ते मागवू शकतात. * ग्रामपंचायतीच्या कामावर देखरेख ठेवणे इ. कामासाठी त्याला शेती, आरोग्य, शिक्षण, बांधकाम सहकार, उद्योग या क्षेत्रातील विस्तार अधिकारी त्यांना मदत करत असतात.

**पंचायत समितीची कार्ये**

**पंचायत समितीची कार्यालयीन कार्ये**

(१) पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील कामाचे व विकास योजनांचे आराखडे तयार करणे व ते जिल्हा परिषदेकडे सादर करणे. (२) पंचायत समितीचे अंदाजपत्रक तयार करून ते मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविणे. (३) जिल्हा परिषदेने सोपविलेल्या कामांचे योजनांचे नियोजन करणे. अंमलबजावणी करणे. (४) प्रत्येक तीन महिन्यांनी आपल्या सभांचा, कामांचा कार्यवृत्तांत (आढावा) जिल्हा परिषदेकडे सादर करणे. (५) एखादी विकास योजना गटक्षेत्रात राबविण्याची शिफारस जिल्हा परिषदेकडे पाठविणे. (६) अनुदानातून करता येतील अशा कामास आणि विकास योजनांस मंजुरी देऊन त्यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवून कार्यपूर्ती करणे. (७) पंचायत समिती क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे. (८) कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतीना विकासाच्या तसेच प्रशासकीय कामाच्या संदर्भात मार्गदर्शन करणे. (९) पंचायत समितीच्या अधिकार कक्षेतील कामे पार पाडणे. (१०) स्थानिक साधन संपत्तीचा जनकल्याणासाठी वापर करून घेणे इ.

**पंचायत समितीची विकासाची कार्ये**

ग्रामीण समाजाचा विकास व्हावा आणि ग्रामीण विकासाबरोबरच राष्ट्रीय विकास व्हावा या दृष्टीने पंचायत समिती आपल्या गटात म्हणजेच तालुक्यात विकास योजनांची अंमलबजावणी करण्याचे कार्य करते. पंचायत समिती विकासाच्या दृष्टीने पुढील अनेक प्रकारची कामे करत असते.

१) **शेती विकास** : आपल्या पंचायत गटात शेतीचा विकास घडवून आणण्यासाठी खरीप व रब्बी पिक मोहीमाद्वारे नवीन पिकांची लागवड करणे शेतीच्या प्रगतीसाठी आधुनिक तंत्राचा प्रसार करणे. सुधारित बी-बियाणांचा, शेती अवजारांचा व रासायनिक खतांचा शेतकऱ्यांना पुरवठा करणे. शेतीसंस्था स्थापन करणे. शेतकऱ्यांचे मेळावे घेणे. कृषीतज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे. शेतीमालांचे प्रदर्शन भरविणे. पिक, फळे, भाजीपाला यांच्या उत्पादनात वाढ करणे. पिक स्पर्धांचे आयोजन करणे. शेतीमालाच्या साठवणुकीसाठी गोदाम (गोडावून) बांधणे.

२) **पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय :** शेतीपूरक व्यवसाय म्हणून पशुसंगोपनास चालना देणे, दुभत्या जनावरांचे संवर्धन होण्यासाठी पशुवैद्यकीय मदत केंद्रे (दवाखाने) बांधणे, सुधारित जातीच्या गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या इ. पशुपैदासींचे प्रयोग करणे. कृत्रीम रेतन पद्धतीची सोय करणे. सुधारित शेळ्या-मेंढ्या, गाई-म्हशींचे वाटप करणे. पशुपक्षी आरोग्य संवर्धनासाठी औषध उपचार मोहीमा राबविणे. जनजागृती करणे. कुक्कूटपालन आणि दुग्धव्यवसाय विकास उत्तेजन देणे.

३) **जंगले व गायराने :** गाव जंगलांचे नियोजन करणे. गायरानांची निर्मिती करणे. चराऊ राने तयार करणे. गावजंगले व गायरानांचे संरक्षण करणे. पंचायत समिती गटातील मोकळ्या व पडीक जमिनीवर वृक्षलागवड करणे. वृक्षांचे संवर्धन करणे. वनक्षेत्र वाढवून लोकांना त्याचे महत्त्व समजून देणे.

४) **समाजकल्याण :** पंचायत समिती कार्यक्षेत्रातील मागासवर्गीयांच्या विकासासाठी कार्य करणे. अनुसूचित जाती, जमाती, अपंग, बेकार, वृद्ध, विधवा परितक्त्या, भुमिहीन शेतमजूर इ. दुर्बल घटकांच्या कल्याणाच्या योजना राबविणे. त्यासाठी त्यांना शेती कर्जे देणे. कुटीरउद्योगासाठी कर्जपुरवठा करणे. हस्तउद्योगासाठी आवश्यक ते सहकार्य करणे. आर्थिक मदत करणे. अस्पृश्यता निर्मूलनासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे. आंतरजाती विवाहांना प्रोत्साहन देणे इ.

५) **शिक्षणप्रसार करणे :** प्राथमिक शाळा सुरू करणे. प्राथमिक शाळांच्या इमारती बांधणे, वर्गखोल्या बांधणे. त्यांची देखरेख ठेवणे, शाळांना शैक्षणिक साहित्य पुरविणे, क्रिडांगणाची सोय करणे, शाळेसाठी साहित्याचे वाटप करणे. प्रौढ साक्षरता केंद्र सुरू करणे. पालक मेळावे आयोजित करणे. शिक्षणप्रसाराचे महत्त्व पटवून देणे इ.

६) **समाजशिक्षण :** शिक्षण, ज्ञान-विज्ञान, शेती विकासाचे ज्ञान, जातीभेद, अस्पृश्यता निर्मुलन, आरोग्य व लसिकरण अशा जिवनावश्यक गोष्टींचे समाजाला शिक्षण देयाचे कार्य पंचायत समिती आपल्या गटात करत असते. त्यासाठी वाचनालये, व्यायामशाळा, देवालये, दवाखाने आदि ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शिबीरे, चर्चासत्रे, माहितीपट, चित्रपट, प्रदेर्शने मेळावे, शेतकरी मेळावे, पालक सभा, व्याख्याने, करमणुकीचे कार्यक्रम इ. असंख्य मार्गांनी समाजशिक्षणाचे कार्य केले जाते.

७) **आरोग्य व सार्वजनिक आरोग्य :** पंचायत समिती आपल्या कार्यक्षेत्रातील लोकांसाठी त्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी दवाखाने सुरू करणे. दवाखान्यात प्रसुतीगृहे लसिकरण केंद्रे, माता व बालसंगोपन केंद्रे, कुटुंब नियोजन व कुटुंब कल्याण केंद्रे इ. सुरू केली जातात. सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण आणि सुधारणा यासाठी ग्रामीण साफसफाई, गटारींची स्वच्छता, औषधांची फवारणी, घनकचऱ्याची विल्हेवाट, सांडपाण्याचे निर्मूलन, डास निर्मूलन, मोकाट प्राण्यांचा बंदोबस्त, पिण्याच्या स्वच्छ निर्जंतुक पाण्याचा पुरवठा इ. सोयी केल्या जातात. तसेच लोकांना स्वच्छतेच्या सवयी लावणे. साथींच्या रोगावर नियंत्रण ठेवणे. दुषित आजारांचा फैलाव रोखण्यासाठी वैद्यकीय पथकांची योजना करणे इ.

८) **दळणवळणाच्या सोयी करणे :** गावातील रस्ते तयार करणे, त्यांची निगा राखणे, रस्त्यांची दुरुस्ती करणे. रस्त्यावर पुल बांधणे, रस्त्यांना संरक्षण कठडे बांधणे. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे. रस्त्यावरील अडथळे दूर करणे. वाहतुकीसाठी मार्गदर्शन करणारे फलक लावणे. नदीवर सार्वजनिक नावांची सोय करणे इ.

९) **सार्वजनिक बांधकाम :** पंचायत समिती गटातील कार्यक्षेत्रातील, गावातील सार्वजनिक इमारतींचे बांधकाम करणे. दवाखाने, शाळा, धर्मशाळा, समाजमंदिरे, बाजाराचे ओटे, शाळेच्या इमारती, रस्त्यांचे संरक्षक कठडे, पूल बंधारे इ. बांधकाम करणे. दुरुस्ती करणे, गरीबांना किंवा बेघरांना घरे बांधून देणे. इ.

**१०) रोजगार निर्मिती करणे :** पंचायत समिती गटातील लोकासाठी रोजगार उपलब्ध करून देणे. लघुउद्योग, कुटीर उद्योग, हस्त व्यवसाय यांना चालना देणे. त्यासाठी ट्रायसेम किंवा जिल्हा उद्योग व्यवसाय मार्गदर्शन केंद्राच्या योजनाद्वारे मार्गदर्शन करणे. भांडवल पुरवठा अनुदान सायी. इ. उपलब्ध करणे. उद्योग व्यवसायाचे शिक्षण, प्रशिक्षण देणे, खरेदी विक्री व्यवस्था करणे इ.

**११) इतर :** रेशनधान्य, इंधनपुरवठा, आपत्कालीन प्रसंगी मदत पथके, दुष्काळ, पुर निवारण कार्य, ग्रामस्वच्छता मोहीमा, व्यसनमुक्ती, आदर्श गाव निर्मिती, इ. अनेक इतर कार्ये. पंचायत समितीद्वारे पार पाडली जातात.

### ४.३.४ जिल्हा परिषद : रचना व कार्ये (Zilla Parishad : Structure and Functions)

बलवंतराय मेहता समितीच्या अहवालानुसार अस्तित्वात आलेल्या व सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित 'पंचायत राज्य' मधील गावपातळीवरील ग्रामपंचायत, तालुका पातळीवरील पंचायत समिती आणि जिल्हा पातळीवरील जिल्हा परिषद या तीन प्रकारच्या सत्ता संस्थांच्यामधील सर्वात मोठी सत्ता संस्था म्हणजे जिल्हा परिषद होय. पंचायत समिती अधिनियम १९६१ अनुसार प्रत्येक जिल्ह्यास एक जिल्हा परिषद अशी रचना करण्यात आली आहे. १ मे १९६२ मध्ये जिल्हा परिषदांची स्थापना करण्यात आली. ७३ व्या घटना दुरुस्तीप्रमाणे संपूर्ण देशात पंचायत राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषदा यांच्या रचनेत व कार्यात एकसारखेपणा निर्माण केला गेला आहे. त्याचा पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल.

## जिल्हा परिषद सदस्य व पदाधिकारी रचना

जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील ३५ ते ४० हजार लोकसंख्येमागे एक सदस्य प्रौढ मतदान पद्धतीने निवडून द्यावयाचा असतो. अशा कमीत कमी ५० व जास्तीत जास्त ७५ सदस्यांची मिळून जिल्हा परिषद तयार होते. यात अनुसुचित जाती जमाती व इतर मागासवर्ग यांच्यासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कांही जागा राखीव असतात. तसेच यात महिला प्रतिनिधीसाठी देखील १/३ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच पदसिद्ध सदस्य म्हणून जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील सर्व पंचायत समित्यांचे अध्यक्ष (सभापती) हे जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सदस्य असतात. जिल्हा परिषदेचे पदाधिकारी म्हणून जिल्हा परिषदेचे सर्व निर्वाचित सदस्य आपल्यातून एकाची अध्यक्ष म्हणून निवड करतात. तसेच एक उपाध्यक्षदेखील निवडला जातो. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष या दोन्ही पदाधिकाऱ्यास मानधन तसेच निवासस्थान मिळते. अध्यक्षास तर राज्य मंत्र्याचा दर्जा दिला आहे. इतर मागासवर्ग तसेच महिला या प्रवर्गातील सदस्यासाठी नेमून दिलेल्या पद्धतीनुसार अध्यक्षपद क्रमशः राखीव ठेवले जाते. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची मुदत अडीच वर्ष आहे. (पूर्वी ती पाच वर्ष होती.) २ मार्च २००० मधील राज्यपालांच्या अध्यादेशानुसार अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची मुदत अडीच वर्ष करण्यात आली आहे. तसेच एखाद्याची सलग दोन वेळा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून निवड झाली असेल तर तिसऱ्यांदा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष पदास तो अपात्र ठरतो. जिल्हा परिषदेचे सदस्य आपल्या १/५ बहुमताने अविश्वासाचा ठराव आणून अध्यक्षास पदच्यूत करू शकतात. तसेच पंचायत समितीचे सभापती किंवा उपसभापती यांची या पदावर निवड झाल्यास त्यांची पंचायत समितीमधील पदे रिक्त होतात. आमदार आणि खासदार यांना मात्र पंचायत समिती व जिल्हा परिषद समितीवर कोणतेही स्थान देण्यात आलेले नाही. जिल्हा परिषदेच्या सर्व सदस्यांचा. कार्यकाल ५ वर्षाचा असतो. ही मुदत जिल्हा परिषदेच्या पहिल्या सभेच्या दिवसापासून होते. पण विभागीय आयुक्तांच्या अहवालानुसार राज्य सरकार त्यापूर्वीही जिल्हा परिषद बरखास्त करू शकते.

## जिल्हा परिषद अध्यक्षांचे अधिकार व कार्ये

⁕ जिल्हा परिषदेचे सभा/बैठक बोलाविणे. त्याचे अध्यक्षपद भूषविणे, बैठकीचे कामकाज चालविणे त्यावर नियंत्रण ठेवणे. ⁕ जिल्हा परिषदेच्या कोणत्याही प्रशासकीय कामांची कागदपत्रे पाहण्याचा, तपासण्याचा अधिकार त्यांना आहे. ⁕ जिल्हा परिषदेच्या आर्थिक व प्रशासकीय कारभारावर देखरेख ठेवणे. जिल्हा परिषद अथवा कोणत्याही विषय समितीच्या ठरावांची, हुकुमांची अंमलबजावणी करून घेणे याप्रसंगी संबंधित अधिकाऱ्यावर देखरेख ठेवणे ⁕ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा गोपनिय अहवाल लिहणे व तो विभागीय आयुक्तांना पाठविणे. ⁕ जिल्ह्यात एखादी आणिबाणीची परिस्थिती उद्‌भवल्यास किंवा गंभीर समस्या, संकट, आपत्‌कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास कांही कार्ये चालू ठेवणे अथवा स्थगित करणे याविषयीचे अधिकार त्यांना असतात. ⁕ विकास योजनांच्या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात नसल्यास जिल्हा निधीमधून तशी तरतूद करून अंमलबजावणीचे आदेश देणे. ⁕ जर अध्यक्ष अनुउपस्थित असतील तर उपाध्यक्ष जिल्हा परिषदांच्या सभांचे अध्यक्षस्थान स्विकारतात, तसेच अध्यक्षांचे अधिकार व कर्तव्ये उपाध्यक्ष पार पाडतात.

## जिल्हा परिषदेचे अधिकारी व त्यांची कार्ये

ग्रामपंचायतीकडे ग्रामसेवक, पंचायत समितीकडे गट विकास अधिकारी (B.D.O.) हे सरकारी अधिकारी असतात. तसेच जिल्हा परिषदेकडे मुख्य कार्यकारी अधिकारी (C.E.O.) आणि उप-मुख्य कार्यकारी अधिकारी आणि याशिवाय वर्ग-१ चे तज्ज्ञ अधिकारी व त्यांच्या मदतीला वर्ग-२ चे तज्ज्ञ अधिकारीही असतात. त्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

## मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांची कार्ये

हा जिल्हा परिषदेचा मुख्य प्रशासकीय अधिकारी असतो. भारतीय प्रशासकीय सेवा (I.A.S.) मधून त्याची नियुक्ती होते. राज्य सरकारकडून ही नियुक्ती होते. जिल्हा परिषद सदस्यांनी २/३ बहुमताने ठराव मंजूर केल्यास राज्यसरकार त्याला परत बोलावू शकते. जिल्हा परिषदेच्या बैठका (सभा) चे कामकाजात सहभागी होणे. जिल्हा परिषद कामकाजाबाबतचा अहवाल राज्य सरकारकडे सादर करणे. जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प सादर करणे. करवसुलीची व्यवस्था करणे. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे. जिल्हा परिषदेच्या तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मच्यांची भरती करणे. गरजेनुसार अध्यक्षांच्या संमतीने जिल्हा परिषदेची सभा (बैठक) बोलावण्याचा त्यास अधिकार आहे. जिल्हा परिषदेच्या सभांना मार्गदर्शन करणे. जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना व सदस्यांना कायदेशीर तरतुदी समजावून देणे.

## उपमुख्य कार्यकारी अधिकारी (Dy. C.E.O.)

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या मदतीसाठी साधारणतः दोन उपमुख्य कार्यकारी अधिकारी असतात. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने स्पर्धा परीक्षेतून त्याची निवड केली जाते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे प्रशासनाची, विकास योजनांच्या अंमलबजावणीची कार्ये ते करतात.

## इतर तज्ज्ञ अधिकारी

मुख्य कार्यकारी अधिकारी आणि दोन उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशिवाय जिल्हा परिषदेचे वित्त अधिकारी, समाजकल्याण अधिकारी, शिक्षणाधिकारी, आरोग्य अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी व कृषी अधिकारी इ. वर्ग-१ चे तज्ज्ञ अधिकारी असतात. आणि त्यांच्या मदतीला वर्ग-२ चे तज्ज्ञ अधिकारी, अधीक्षक, वरिष्ठ, कनिष्ट लिपीक व शिपाई अशी शासकीय अधिकारी व कर्मचारीवर्गाची देखील रचना असते.

## जिल्हा परिषदेच्या समित्या : रचना व कार्ये

जिल्हा परिषदेचे कामकाज अधिक कार्यक्षम व्हावे. कामकाजाला गती प्राप्त व्हावी. कामकाजात सुसुत्रता असावी अशा दृष्टीने जिल्हा परिषदेत विषय समित्यांची रचना व कामकाज पद्धतीची आखणी केलेली आहे. यासाठी एक स्थायी समिती व नऊ विषय समित्या अशा एकूण दहा समित्या असून या समित्यामार्फत कामकाज चालते. जिल्हा परिषदेच्या पहिल्या बैकीनंतर एक महिन्याच्या आत या समित्या स्थापन केल्या जातात. यातील स्थायी समिती ही सर्वात महत्त्वाची समिती असते. या सर्व समित्यांची रचना व कामकाज याचा पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल.

**स्थायी समिती :**

स्थायी समितीमध्ये जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी हा स्थायी समितीचा सचिव असतो. जिल्हा परिषदेच्या निर्वाचित सदस्यांतील आठ सदस्य या समितीत घेतले जातात. यापैकी दोन सदस्य अनुसूचित जाती, जमाती किंवा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील असतात. याशिवाय स्थायी समितीच्या कार्याबाबत विशेष ज्ञान व अनुभव असलेले दोन सहयोगी सदस्य यात घेतले जातात. स्थायी समितीची कार्ये म्हणजे जिल्हा परिषदेच्या सर्व कार्याबाबतच्या प्रगतीचा सतत आढावा घेणे. जिल्हा परिषदेच्या संस्थांवर देखरेख ठेवणे, जिल्हा परिषदेच्या विकास कामांवर व योजनांवर लक्ष ठेवणे, जिल्हा परिषदेच्या कर व आर्थिक बाबी यासंबंधीचे धोरण ठरविणे. इ. असतात.

**विषय समित्या :**

जिल्हा परिषदेची विविध कामे पार पाडण्यासाठी विविध विषय समित्या असतात. त्यात घ्यावयाच्या सदस्यांची संख्या, अनुसूचित जाती, जमाती, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील लोक आणि महिला सदस्य व स्विकृत सदस्य असतात व प्रत्येक विषय समितीना ज्या त्या विषय समितीनुसार कार्ये व अधिकार यांची विभागणी केली जाते. यात पुढीलप्रमाणे विषय समित्या असतात.

समाजकल्याण समिती, शिक्षण समिती, कृषी व सहकार समिती, सार्वजनिक बांधकाम समिती, आरोग्य समिती, महिला व बाल कल्याण समिती, जलसंधारण व पिण्याचे पाणीपुरवठा समिती, अर्थ समिती (वित्त), पशुसंवर्धन व दुग्ध विकास समिती इ. समित्या असतात. जिल्हा परिषदेचा प्रत्येक सदस्य कोणत्या ना कोणत्या समितीचा सदस्य असतोच या समित्यामुळे सर्व सदस्यांना जिल्हा परिषदेच्या कामकाजात सहभागी केले जाते.

**जिल्हा परिषदेची कार्ये :**

जिल्हा परिषदेची रचना पाहिल्यावर जिल्हा परिषदेच्या व्याप्तीची कल्पना येते. जिल्हा परिषदेची कार्येदेखील व्यापक आहेत. प्रशासकीय सामान्य कार्ये आणि विकासाची कार्ये अशा जिल्हा परिषदेच्या समग्र कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१) प्रशासकीय सामान्य कार्ये :** ※ राज्य सरकारने दिलेल्या सर्व कार्याची जबाबदारी पार पाडणे. ※ जिल्ह्याच्या विकास योजनांचा आराखडा तयार करणे. ※ स्थानिक साधन संपत्तीचा पुरेपूर वापर करणे. ※ जिल्हा परिषदेच्या स्थायी व इतर विषय समित्यांकडून अहवाल, वित्तीय प्रपत्रे, तक्ते इ. मागविणे. ※ जिल्ह्यातील सर्व पंचायत संस्थांना सल्ला वा मार्गदर्शन करणे. ※ जिल्ह्यातील आपत्कालीन घटनात उपाययोजना करणे. ※ दुष्काळ, पूर, भूकंप, रोगराई इ. संकटे उद्‌भवल्यास त्यावर योग्य ती उपाययोजना करणे. ※ पंचायत समित्यांचे अर्थसंकल्प मंजुर करणे व त्यांच्या विकास कार्यात समन्वय साधने. ※ राज्य सरकारच्या अनुदानाचे पंचायत समित्यामध्ये वाटप करणे. ※ स्थानिक बेकारी निर्मूलनासाठी रोजगार, स्वयंरोजगार संधी उपलब्ध करणे. ※ बाजारपेठा, धर्मशाळा, चावड्या, डाकघर, दहनभुमि, दफनभुमी, उद्याने, इ. ची निर्मिती व देखभाल करणे. ※ वृक्षारोपण

वृक्ष संवर्धन, वनिकरण विकास करणे. * राज्य सरकारकडून आलेल्या पंचवार्षिक योजनांतील सर्व कार्ये पार पाडणे इ.

२) **कृषी विकास :** भारत कृषीप्रधान देश असल्याने कृषी विकास हाच खरा राष्ट्रीय विकास आहे. म्हणूनच केंद्र व राज्य सरकारच्या कृषी विकास कार्यक्रमाची जिल्हा परिषदेला अंमलबजावणी करावी लागते. आधुनिक उत्पादन तंत्रे अवजारे, रासायनिक खते, संकरित बि-बियाणे, जंतुनाशके शेतकऱ्यांना मिळवून देणे. प्रगत पिक प्रात्यक्षिके, पिक स्पर्धांचे आयोजन करणे, आधुनिक मशागत, लागवड पद्धती, पिक संरक्षण इ. बाबत माहिती देणे, शेतजमिनीचा व उत्पादनाचा विकास घडवून आणणे इ.

३) **पशुसंवर्धन व दुग्धविकास:** शेतीला मुख्य पुरक व्यवसाय दुग्धव्यवसाय आहे. जिल्ह्यातील पशुसंवर्धन केंद्रे, जनावरांचे दवाखाने, कृत्रीम रेतन केंद्रे, सुधारीत जनावरांची पैदास केंद्रे, सुधारीत जातीच्या शेळ्या-मेंढ्या, कोंबड्यांचे वाटप करणे. मत्स्य उद्योग, माशांची पैदास आणि जोपासना करणे, पशुपक्षी प्रदर्शन भरविणे, पशुसंवर्धन व दुग्ध विकास याबाबत शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणे इ.

४) **समाजकल्याण :** अनुसूचित जातीजमातीच्या कल्याणासाठी विविध योजना राबविणे, शिष्यवृत्ती, मोफत शिक्षण, वसतीगृहांच्या सोयी करणे, मागासवर्गियांना शेतीसाठी, लघुउद्योगासाठी अल्पव्याजाची व दिर्घ मुदतीची कर्जे देणे. अंध, अपंग, वृद्ध, निराधार, विधवा, परित्यक्ता या सर्वांच्या कल्याणासाठी योजना, वसतीगृहे, अनाथआश्रम वृद्धाश्रम इ. सुरू करणे.

५) **शिक्षणप्रसार :** प्राथमिक व माध्यमिक शाळा स्थापन करणे चालविणे. तपासणी करणे, व्यवस्था ठेवणे, भेटी देणे, अनुदान देणे, शिष्यवृत्त्या देणे, शाळांच्या इमारती, क्रिडांगणे यांची सोय करणे, देखभाल करणे. अंगणवाड्या, बालवाड्या, आश्रमशाळा चालविणे, प्रौढ शिक्षण केंद्रे, निरंतर शिक्षण केंद्रे इ. सुरू करणे.

६) **सार्वजनिक आरोग्य विकास :** प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करणे. फिरती आरोग्य केंद्रे, आरोग्य पथके, प्रसुतीगृहे, बाल कल्याण केंद्रे सुरू करणे. रोगप्रतिबंधक लस टोचणी, शालेय आरोग्य सेवा, ग्रामीण स्वच्छता अभियान, रोगराईचे उच्चाटन, दारुबंदी, व्यसनमुक्तीसारखे उपक्रम, धर्मादाय आरोग्य केंद्रे, प्रसुतीगृहे, औषध वाटप केंद्रे सुरू करणे. बालक व रुग्णांना मोफत, सकस आहार पुरविणे. पिण्याचे पाणी, आरोग्याबाबत लोकांत जाणीवजागृती करणे. सार्वजनिक शौचालये बांधणे इ. अनेक आरोग्यविषयक कार्ये जिल्हा परिषद करते.

७) **बांधकाम व दळणवळण :** गावातील सार्वजनिक रस्ते पुल, शासकीय कार्यालये, प्राथमिक शाळा, बालवाड्या यांचे बांधकाम करणे, लघु पाटबंधारे योजना, पाझर तलाव, सार्वजनिक शौचालये, रस्त्यांचे संरक्षक कठडे बांधणे, लहान रेल्वे मार्ग इ. व्यवस्था करणे. बसस्थानके, स्मशानभूमी, नदीवरील घाट बांधणे अशी अनेक सार्वजनिक बांधकाम व दळणवळणविषयक कार्ये जिल्हा परिषद करत असते.

८) **गृहनिर्माण कार्य :** जिल्ह्यात गृहनिर्माण कार्य योजना राबविणे, बेघर वसाहती निर्माण करणे. बेघरांना घरे बांधून देणे, बाजार, धर्मशाळा, चावड्या, समाज मंदिरे, ग्रामपंचायत कार्यालये, व्यायामशाळा इ. गृहनिर्माण कार्य केले जाते.

**९) सामाजिक वनिकरण :** जंगले, कुरणे यांचा विकास करणे. वन उत्पादन वाढविणे, जंगलांचे संरक्षण करणे. संवर्धन करणे. जंगलांचे विस्तारीकरण करणे. फेर लागवडीकरण, जंगल संपत्तीचा विकास करणे. जंगलातील पशु पक्ष्यांचे संरक्षण व संवर्धन करणे.

**१०) पाणी योजनांची विकासकामे :** लघु पाटबंधारे, विहीर बांधणी अनुदाने, पाणी अडवा पाणी जिरवा, बोअरवेल्स, पिण्याच्या पाण्याच्या योजना, शेतीसाठी पाणीपुरवठ्याच्या योजना अशा पाणी पुरवठा योजनांचे कार्य जिल्हा परिषद करते.

**११) सहकारी कार्ये :** भांडवली सहकारी संस्थांची नोंदणी करणे, मंजुरी देणे, सहकारी संस्थांची वाढ करणे. त्यांच्यावर देखरेख ठेवणे, सहकारी संस्थांना मार्गदर्शन व अर्थसहाय्य करणे, सहकारी शिक्षण, प्रशिक्षण प्रचार व प्रसार करणे इ.

**१२) लघुउद्योग व कुटीर उद्योग :** लघुउद्योगांना प्रोत्साहन देणे, लघु उद्योगांना मर्यादीत कर्जवाटप करणे, कुशल कारागिरांना अनुदान व कर्जे देणे, गृहोद्योग आणि ग्रामोद्योग यांना उत्तेजन देणे, त्यांच्या मालाच्या विक्रीची व्यवस्था पाहणे, त्यांचा विकास करणे, लघु व कुटीर उद्योगाद्वारे स्वयंरोजगार निर्मिती करणे इ.

**१३) लोकशिक्षण कार्य :** जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यातील पंचायत व ग्रामपंचायत स्तरापर्यंत ज्ञानविज्ञानाचा प्रसार करणे. नवीन माहिती, नवीन तंत्रे, नवीन पद्धती यांची प्रसार मोहीम राबविणे त्यासाठी कार्यशाळा, पिकशाळा, प्रबोधन शिबीरे, मेळावे आयोजित करणे. आरोग्य, लोकसंख्या शिक्षणाचे जनजागरण करणे, भित्तीपत्रके, घोषवाक्ये, चित्रपट, लघुपट, वाचनालये, प्रदर्शने, मनोरंजन, लोकरंजन, जनजागृतीचे कार्यक्रम राबविणे असे निरंतर समाज शिक्षणाचे कार्य जिल्हा परिषदेद्वारे सुरू असते.

अशाप्रकारे जिल्हा परिषदेचे कार्य व्यापक स्वरूपाचे आहे.

### ४.३.५ महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण (Empowerment of women and weaker sections)

भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक विषमतेमुळे मुठभर लोक सधन झाले. तर बहुसंख्य दुर्बलच राहिले. त्यांचा दुबळेपणा राष्ट्राच्या अधोगतीस कारणीभूत ठरला. देशात सुमारे ५० टक्के महिला आहेत. त्यांना विकासाच्या कोणत्याही संधी मिळाल्या नव्हत्या. तसेच निरक्षर व दरिद्री कोट्यावधी लोक दुर्बलतेमुळे विकासापासून वंचित राहिले व त्यांचा विकास होऊ शकला नाही. परिणामी भारत देशही अविकसित राहिला. म्हणूनच भारतीय राज्य घटनेत पंचायत राज्य व्यवस्थेचया माध्यमातून महिला आणि दुर्बल घटक यांना राखीव जागा देऊन विकासाच्या संधी दिल्या व महिला आणि दुर्बल घटकांचे सबलीकरण म्हणजेच सक्षमीकरण अथवा सशक्तीकरण यासाठी चालना दिली आहे. या ठिकाणी आपण क्रमशः महिलांच्या तसेच दुर्बल घटकांच्या सबलीकरणाविषयी पंचायत राज्य व इतर माध्यमातून होणाऱ्या प्रयत्नाविषयी सविस्तर अभ्यास करणार आहोत.

**महिलांचे सबलीकरण (Empowerment of Women)**

प्राचीन काळापासून महिलांना समाजात दुय्यम स्थान होते. चूल आणि मूल या कार्यातच स्त्री कोंडली गेली होती. तिला घराबाहेरचे जग माहित नव्हते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सत्ता व अधिकार यापासून स्त्रियांना वंचित केले गेले होते. परिणामी स्त्रिया निरक्षर, अडाणी व दुर्बलच राहिल्या होत्या. प्राचीन तसेच मध्ययुगीन काळात भारतात स्त्रियांना निम्न जीवन जगावे लागे. पुरुषी वर्चस्व होते. राज्याच्या मृत्यूनंतर राज्याच्या गादीवर लहान राज्यपुत्रास बसवून राज्यकारभार होई. प्रधान, सेनापती, सरदार अशा पुरुष अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानेच विधवा राणीस जगावे लागे. रझिया सुलतान, चितोडची राणी कर्णावती, अहमदनगरची चांदबिबी, म्हैसुरजवळील राणी चन्नमा, बंगालमधील राणी भवानी अशा काही मोजक्या स्त्रियांनी राज्यसत्ता उपभोगली. तसेच जिजाबाई, अहिल्याबाई होळकर, आनंदीबाई पेशवे, ताराराणी, झाशीची राणी इ. स्त्रियांनी राज्यकाणात आपला ठसा उमटविला. पण या मोजक्या उदाहरणापेक्षा वेगळा स्त्री विकास सांगण्याजोगा नव्हता. १८४८ साली देशातील पहिली शिकलेली व शिक्षिका म्हणून उभी राहिलेली मुलगी म्हणून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य सुरू झाले.

पुढे ब्रिटिश भारतात आले त्यांनी स्त्रियांना शिक्षणाची संधी दिली. त्यामुळे स्त्रिया थोड्याफार प्रमाणात घराबाहेर पडून कामधंदा करू लागल्या. राज्यकारण, समाजकारणात दिसू लागल्या. महात्मा गांधीनी स्वातंत्र्य लढ्याच्या काळापासून स्त्रियांना मानाचे स्थान द्यायला सुरुवात केली. ॲनी बेझंट, कृष्णा हाथीसिंग, कमला नेहरू, सरोजिनी नायडू, सरलादेवी, मादाम कामा, राज्यकुमारी अमृता कौर, विजयालक्ष्मी पंडीत, अनुसयाबाई काळे, मिलानी सिप्पी, श्रीमती अरुणा असफअली (भारतरत्न), सुचेता कृपलानी, उषा मेहता, पद्मजा नायडू, कॅप्टन लक्ष्मी सेहगल अशा अनेक स्त्रियांनी आपली शक्ती आपल्या कार्याने सिद्ध केली. पण ही केवळ मोजण्याइतकी नगण्य नावेच होती. बाकी स्त्री ही गुलामीतच व अबला म्हणून जीवन जगणारी होती. १९५० मध्ये भारताने स्विकारलेल्या राज्यघटनेतही महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क, समान दर्जा, समान संधी देण्यात आली आहे.

इ.स. १९७५ मध्ये नैरोबी येथे झालेल्या पहिल्या जागतिक महिला परिषदेत महिलांच्या राजकीय व आर्थिक हक्कासंदर्भात ठराव संमत करण्यात आला व स्त्रियांना सर्वच क्षेत्रात विकासाला संधी द्यावी. अडथळे दूर करावेत असे आवाहन करण्यात आले. त्यानंतर जगातील अनेक देशात जागतिक महिलादिन साजरा करण्यास सुरवात झाली. ८ मार्च हा 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' असतो व त्यामुळे महिलांना शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात प्रेरणा मिळते. १८ डिसेंबर १९७९ च्या राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेने संमत केलेल्या प्रस्तावानुसार लिंगभेदाच्या आधारे केला जाणारा भेदभाव अमान्य करण्यात आला. त्यामुळेच या विधेयकाला आंतरराष्ट्रीय महिला विधेयक असे म्हटले जाते. त्यामुळे आजही लिंगसमभाव जागृती अभियान कार्यक्रम देशभर घेतले जातात.

भारतात १९९२-९३ मधील ७३ व्या घटना दुरुस्तीने पंचायत राज्यात व ७४ व्या घटना दुरुस्तीने शहरी स्थानिक स्वराज्य संस्थात १/३ जागा स्त्रियांसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या. परिणामी स्त्रियांना राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्वच प्रकारच्या सबलीकरणास चालना मिळाली. पंचायत राज्य आणि स्त्रियांना दिलेले स्वातंत्र्याचे हक्क यामुळे आज गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत सर्वच क्षेत्रात स्त्रिया कार्यक्षमतेने सहभागी होत आहेत.

महिलांना दिलेल्या अधिकारांमुळे पुढील फायदे झालेले आहेत.

### १) महिलांचा राजकीय सहभाग वाढला :

महिला सबलीकरणाचे धोरण महिलांना प्रेरणादायी ठरले. सर्वच क्षेत्रात महिला पुढे येऊ लागल्या. एकेकाळी केवळ मतदानापासूनही वंचित असलेल्या स्त्रिया राज्यकारणात आल्या. इतकेच नव्हे तर अगदी गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतच्या सर्व सत्तेत आज महिला सक्षमतेने कार्यरत आहेत. काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा व देशाच्या पंतप्रधान पदाच्या किंग मेकर सोनिया गांधी व राष्ट्रपती प्रतिभा पाटील अशा देशाच्या दोन सर्वोच्च पदावर आज स्त्रियाच प्रभावी कामगिरी करत आहेत.

### २) सामाजिक कार्यातील सहभाग वाढला :

आज स्त्रियांना घटनेने समान हक्क दिल्याने महिलांच्या कार्यशक्तीला प्रेरणा अथवा बळ प्राप्त झाले आहे. सर्वच सामाजिक, सांस्कृतिक कार्यात स्त्रिया अत्यंत प्रभावीपणे कार्य करत आहे. महिला मंडळे, बचत गटाच्या माध्यमातून असो अथवा सत्तेच्या सहभागातून असो स्त्रिया सामाजिक कार्यात सहभागी होत आहेत.

### ३) स्त्री–पुरुष विषमतेची दरी कमी झाली :

स्त्री म्हणजे चूल व मूल या कार्यक्षेत्रातील मर्यादा ओलांडून स्त्रिया सर्वच कार्यक्षेत्रात सहभागी झाल्या त्यामुळे विशिष्ट कामेच स्त्रियांनी करावीत हे बंधन संपुष्टात आले. परंपरागत कार्यातच गुरफटलेली स्त्री मुक्त झाली व सर्वच क्षेत्रे स्त्रियांनी यशस्वीपणे काबिज केली. यामुळे स्त्री–पुरुष विषमता कमी झाली.

### ४) कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढला :

स्त्रियांच्या मताला पूर्वी दुय्यम स्थान असे पण महिला सबलीकरण, महिला आरक्षण यामुळे स्त्री कमावती झाली. तिचे परावलंबन कमी झाले. स्त्रिया स्वावलंबी झाल्याने शिक्षण, कला क्रीडा, कौशल्ये यात पारंगत झाल्याने व नोकरी उद्योग व्यवसाय या सर्वच क्षेत्रात यशस्वी कार्य करू लागल्याने स्त्रियांना मानाचे स्थान प्राप्त झाले. स्त्रियांच्या मतांना व निर्णय प्रक्रियेतील सहभागाला संधी मिळाली.

### ५) महिला नेतृत्वाचा उदय झाला :

आज महिला अगदी ग्रामपंचायतीपासून ते अगदी संसदेपर्यंत कार्यरत झाल्या. त्यामुळे महिला नेतृत्वाचा उदय झाला. अगदी सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद अध्य, आमदार, खासदार, मंत्री, पंतप्रधान, राष्ट्रपती पदापर्यंत महिला सक्षमपणे नेतृत्व करत आहेत. इतकेच काय तर अगदी उद्योग, व्यवसाय, शिक्षण, आरोग्य, समाजकार्य अशा सर्वच क्षेत्रात महिला नेतृत्वाचा उदय झाला आहे.

### ६) महिलांची धैर्यशक्ती वाढली :

आज महिला शिक्षण, राज्यकारण, समाजकारणात पुढे आल्या. परिणामी महिला शक्तीचा उदय झाला. आज देशात सुमारे ७५००० महिला सरपंच, तर १७०० महिला पंचायत समिती सभापती तर

सुमारे १५८ महिला जिल्हा परिषद अध्यक्ष झाल्या आहेत. राज्यकारणात आज हजारो आजा माजी पदाधिकारी महिला आहेत. यामुळे महिलांची धैर्यशक्ती वाढली आहे. आपण कुठेही कमी नाही याची जाणीव वाढली आहे.

**७) भीती, संकोच, उदासिनता, संपली :**

महिलांच्यातील परावलंबन गेले. त्याच्यात स्वावलंबन वाढले. आपण कुठेही कमी नाही. आपणास जगणेत, जिंकणेत कांही अडचण नाही. याची जाणीव झाली त्यामुळे महिला उद्योग, व्यवसाय, नोकरी, अशा सर्वच ठिकाणी अधिकारी, पदाधिकारी, कार्यकारी म्हणून वावरू लागल्या आहेत. परिणामी त्यांच्यातील भिती, संकोच व उदासिनता नष्ट झाली व यामुळे स्त्रिया पुढे येण्याची गती वाढली ही परस्परपुरकता महिला प्रगतीस उपकारक ठरत आहे.

**८) महिलांवरील अन्याय अत्याचारास आळा बसला :**

महिला सबलिकरणातून महिला कार्यक्षम बनल्या. सुशिक्षित बनल्या. स्वावलंबी बनल्या यामुळे महिलांच्या शेषणास आळा बसला. त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार इ. प्रमाण खूपच कमी झाले. तसेच राजकीय, प्रशासकीय, औद्योगिक अशा सर्वच क्षेत्रात महिलांची संघटनशक्ती वाढली. महिलांनी संघटीतपणे अनेक कायदे करण्यास भाग पाडले. महिलांची छेडछाड, विनयभंग, अशा प्रसंगीसुद्धा दक्षता समिती, पोलीस कारवाई सुरू झाली. परिणामी जनमानसात महिलापासून सावध राहण्याची भूमिका वाढीस लागली व अन्याय अत्याचारास आळा बसला.

**९) महिलांच्या मूलभूत समस्यांची सोडवणूक होऊ लागली :**

महिलांच्या कांही पारंपारीक मुलभूत समस्या होत्या त्या म्हणजे पिण्याचे पाणी भरणे. कपडे धुणे इ. च्या अडचणी. इंधन टंचाई, पशुवैरण, औषधपाणी सोयी, शिलाई मशीन, दळप कांडप मशीन इ. सर्व मुलभूत भौतिक गरजा पूर्तीसाठी महिला मंडळे, बचत गट इ. मार्फत या सर्व सुविधा पुरविल्या जाऊ लागल्या. तसेच महिलांना पोटगीचे हक्क, वारसा हक्क, पुनर्विवाहाचा हक्क, सर्वच क्षेत्रात समानतेचे तत्त्व, शिक्षणाचा हक्क, उद्योग व्यवसायाचा हक्क, कौटुंबिक हक्क इ. सर्व प्राप्त झाल्यामुळे महिलांच्या अनेक मुलभूत समस्यांची सोडवणूक झाली व महिला समस्यामुक्त होण्यास सहाय्य झाले.

**१०) महिलांच्या साक्षरतेत वाढ झाली :**

महिला सबलिकरणामुळे सर्व क्षेत्रात महिलांचा पुढाकार वाढला. सर्वच क्षेत्रात महिला कार्यरत झाल्या त्यामुळे मुली सर्वच क्षेत्रात जात आहेत. त्यांनाही सर्वच प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे. उद्याच्या काळात आपल्या मुलींनाही शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाने त्यांचे भवितव्य घडेल अशा आशा आकांक्षा समाजमनात निर्माण झाल्या. परिणामी महिलांच्या साक्षरतेत व शिक्षण प्रशिक्षणात वाढ झाली.

**११) महिलांची आर्थिक प्रगती झाली :**

महिला सबलिकरणातून महिला साक्षरता वाढली. महिला सर्वच उद्योग, व्यवसाय, रोजगार, स्वयंरोजगारात पुढे आल्या. महिला अधिकारी, पदाधिकारी बनू लागल्या. हर एक महिला आपण

कांहीतरी केले पाहिजे असा विचार करू लागली. आज यामुळेच सर्वच क्षेत्रात महिला क्रियाशील झाल्या. स्वावलंबी झल्या. आर्थिक दृष्ट्या कमावत्या झाल्या. त्यामुळे महिलांची आर्थिक प्रगती झाली.

**१२) महिला शक्तीचा राष्ट्रीय प्रगतीस उपयोग झाला :**

महिला सबलिकरणामुळे महिलांची प्रगती झाली. महिला साक्षर, सुशिक्षित झाल्या. त्यांच्यातील अज्ञान अंधश्रद्धा कमी झाल्या. उत्पादनात त्यांचा सहभाग वाढला. परिणामी राष्ट्रीय प्रगतीला चालना मिळाली.

भारत एक बलाढ्य लोकसंख्येचा देश असून लोकसंख्येत स्त्रियांची संख्या पन्नास टक्के आहे. या महिलांचा देखील सर्व अंगानी राष्ट्रीय प्रगतीस हातभार लागला. महिला शक्ती राष्ट्र बळकटीसाठी उपयुक्त ठरली.

अशाप्रकारे महिला सबलिकरण हे अनेक प्रकारे परिणामकारक, उपयुक्त वा फायदेशीर ठरले आहे.

**दुर्बल घटकांचे सबलीकरण (सक्षमीकरण) (Empowerment of weaker Sections)**

प्रास्ताविक : पुरातन काळापासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशी चातुर्वर्ण व्यवस्था अस्तित्वात आहे. त्यानुसार अध्ययन, अध्यापन पौरोहित्य इ. ब्राह्मणांनी करावे. क्षत्रियांनी संरक्षण व राज्यकारभार पाहावा. शेती, व्यापार इ. वैश्यांनी तर शुद्र लोकांना कनिष्ठ मानून त्यांनी अगदी सेवाभावाची कार्ये करावीत असे लादले गेले होते. याला धर्म, कर्म, पाप, पुण्य, मोक्ष, स्वर्ग, नरक इ. संकल्पना लावून ही व्यवस्था अगदी भक्कम केली होती. शुद्रांना ज्ञान, सत्ता, संपत्ती इ. सर्व अधिकारापासून वंचित ठेवले होते. धर्माच्या आधारे शूद्रांना सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय अशा सर्व क्षेत्रात अपात्रता लादल्या होत्या. कोणतेच अधिकार दिले गेलेले नव्हते. त्यामुळे हे शुद्र लोक, अडाणी, दरिद्री व दुर्बल बनले. इतर उच्च जातींनी त्यांचे शोषण केले. भारतीय राज्यघटनेत या शुद्रांनाच 'अनुसूचित जाती' (Scheduled Caste), अनुसूचित जमाती (Scheduled Tribes), भटक्या जाती (Nomedic Caste) आणि भटक्या जमाती (Nomedic Tribes) आणि इतर मागासवर्गीय (Other Backward Class) असे संबोधण्यात आले आहे. हेच ते भारतीय समाजातील दुर्बल घटक (Weaker Sections) आहेत.

अशा या दुर्बल घटकांचा विकास घडवून आणण्यासाठी आणि त्यांना देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक सवलती देऊन कायदेशीर तरतूदी करून त्यांचे सक्षमीकरण (सशक्तीकरण) (Empowerment) करण्याचा प्रयत्न शासकीय पातळीवर केला जात आहे. कारण अजुनही समाजात जातीयतेचे अस्तित्व असून मागास जाती जमाती म्हणजेच दुर्बल घटक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक इ. सर्वच बाबतीत मागे आहेत. राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने ही बाब चिंताजनक असून त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्याची गरज आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

भारतात जन्मावर आधारीत जातीयतेचे विभाजन केले गेले होते. उच्च-निच अशी उतरंड रचली गेली होती. त्याप्रमाणे श्रेष्ठ-कनिष्ट दर्जाची वागणूक दिली जात होती. अनेक बंधने, अपात्रता लादल्या गेल्या होत्या. अनेक सोयी-सुविधांपासून दुर्बल घटकांना वंचित केले होते. त्यामुळे दारिद्र्य, दिनता, निर्धनता, अज्ञान व अधोगती त्यांच्या वाट्याला आली होती. ते निर्धन, दरिद्री व मागासच राहिले होते. त्यांना हिन व गुलामासारखे वागविले जात होते. स्वातंत्र्यपूर्व काळात विविध संतांनी जातीयता निर्मूलनार्थ प्रबोधन व समाजकार्य केले होते. त्याबरोबरच राजा राममोहन रॉय, डॉ. रविंद्रनाथ टागोर, केशवचंद्र सेन, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, दयानंद सरस्वती यांसह अनेक सामाजिक सुधारक, धार्मिक, सामाजिक विचारक यांनी जातीयता निर्मूलनार्थ कार्य केले आहे. अस्पृश्यांची अस्पृश्यता नष्ट व्हावी. त्यांच्यात शिक्षणाने प्रगतता यावी. त्यांचे दारिद्र्य, अज्ञान नष्ट व्हावे. त्यांची गुलामगिरीतून मुक्तता व्हावी म्हणून महात्मा जोतीबा फुले, छ. राजर्षि शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी क्रांतीकारी कार्य केले. लोकांना जाणीवजागृत केले. तसेच शुद्र जातींना आरक्षण देण्याचे देशातील सर्वप्रथम कार्य कोल्हापूर संस्थानात राजर्षी शाहू महाराज यांनी केले. २६ जुलै १९०८ रोजी राज्यातील प्रशासकीय सेवेतील ५० टक्के जागा राखीव करण्याचा ऐतिहासिक जाहिरनामा त्यांनीच सर्वप्रथम प्रसिद्ध केला. मागासवर्गियांना शिक्षणात शिष्यवृत्ती दिली. आणि शिक्षणाचे व व्यवसायाचे दरवाजे खुले केले. महात्मा फुले यांनी हंटर कमिशनसमोर मांडलेले विचार छ. शाहू राजे यांनी प्रत्यक्षात अंमलबजावणीत आणले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या मुलभूत हक्कांची मागणी करणारा जाहिरनामा प्रसिद्ध केला व कायद्याने सर्व नागरीकांना समान लेखले. तसेच देशातील प्रांतिक व मध्यवर्ती विधीमंडळात अस्पृश्य वर्गियांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळविण्याचा हक्क असावा. म. गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात पुणे करार झाला. त्यानुसार अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ ठेवण्याऐवजी राखीव मतदार संघ असावा असा करारा झाला. राखीव जागेच्या पद्धतीनुसार आपली माणसे निवडून देण्याचा हक्क अस्पृश्यांना असावा. कायद्याने अस्पृश्यता पालन, विषम लेखने हे भेद नष्ट करावेत अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिशा दिली व भारतीय राज्यघटनेत अस्पृश्य वर्गाच्या संदर्भात केलेल्या तरतुदींना बळकटी येण्यासाठी इ.स. १९५५ मध्ये अस्पृश्यता निवारण कायदा करून कायद्याने सर्व देशातील अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यात आले. पण जातीभेदाचा अद्यापही बिमोड झाला नाही. त्यामुळे आजही दुर्बल घटकांच्या सबलीकरणासाठी विशेष प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. पुणे करारानुसार भारतीय राज्यघटनेच्या कलम ३३० नुसार लोकसभेत तर कलम ३३२ अनुसार राज्यांच्या विधानसभेत राखीव मतदार संघ निर्माण केले.

**दुर्बल घटकांच्या सबलीकरण धोरणाचे फायदे (दुर्बल घटकांच्या आरक्षणाचे परिणाम)**

इ.स. १९९३ मध्ये भारतीय राज्यघटनेत करण्यात आलेल्या घटना दुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेत ागासवर्गियांना आरक्षण उपलब्ध करून देण्यात आले. त्यानुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीमध्ये मागासवर्गियांसाठी २७% आरक्षण ठेवण्यात आले. आणि स्त्रियांच्या बरोबरच मागासवर्गियांनाही राजकीय सत्तेतील मार्ग खुला झाला. मागासवर्गियांसाठी विविध कल्याणकारी कार्यक्रम राबवून पाहिले होते. त्यासाठी करोडो रुपये खर्च केले होते. पण या सर्वापेक्षा

पंचायत समितीतील राखीव जागामुळे अनुसूचित जाती जमातीच्या सबलीकरणाला गती आली. पंचायत राज्य अरक्षणातून दुर्बल घटकांचे सबलीकरण या धोरणाचे अनेक फायदे दिसून येतात. अनेक चांगले परिणाम दिसून येतात. पण अजूनही दुर्बल घटकांच्या सबलीकरण धोरणाची आवश्यकता आहे. सारांशाने याबाबत पुढीलप्रमाणे सांगता येईल. दुर्बल घटकांच्या सबलीकरण धोरणाचे फायदे, परिणाम वा आवश्यकता पुढील अनेक घटकासाठी महत्त्वाची आहे.

**१) दुर्बल घटकांच्या विकासाचा मार्ग खुला झाला :**

पंचायत राज्य व्यवस्थेतील आरक्षणामुळे कनिष्ट असणाऱ्या जातीमध्ये जाणीवजागृती झाली. आत्मविश्वास वृद्धींगत झाला. त्यांच्यात संघटनशक्ती निर्माण झाली. स्वबळावर पुढे येण्यासाठी संधी प्राप्त झाली. विकासाचा मार्ग खुला झाला व गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्तास्थानात येण्याचा मार्ग खुला झाला व संधी निर्माण झाली.

**२) नेतृत्वाची संधी :**

दुर्बल घटकांना परंपरागत कधी नेतृत्वाची संधी मिळाली नव्हती. नेतृत्वातील अध्यक्षपद, वरिष्ट पदे, तर कधीच मिळत नसत. पण आता सरपंच पदापासून ते पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, आमदार, खासदार, मंत्री, राष्ट्रपती इथपर्यंतची पदे मागासवर्गियांना मिळत गेली. ही या धोरणाची महत्त्वाची यशस्वीता आहे व त्यातूनच आवश्यकताही स्पष्ट होते.

**३) राजकीय व सामाजिक सहभागात वाढ :**

दुर्बल घटकांच्या सबलीकरणास संधी दिली गेली. यामुळे राजकीय क्षेत्रात तसेच सामाजिक जीवनात, कार्यात देखील मागासवर्गीयांचा सहभाग वाढला. उदा. ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, अध्यक्ष, उपाध्यक्ष अशा अनेक पदांमुळे राजकीय सहभाग तर वाढलाच शिवाय सामाजिक कार्यही सुरू झाले.

**४) साक्षरता प्रमाणात वाढ :**

आरक्षणामुळे अनुसूचित जाती जमातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढले. आपली मुले भविष्यात मोठमोठ्या पदावर जाणार आहेत. त्यांना शिक्षण आवश्यक आहे. अशी दुर्बल घटकांच्यात जाणिवजागृती झाली. साक्षर असण्याबरोबरच मुले पुढे पदवीधर व्हावयास हवीत याचीही जागृती झाली. परिणामी एकूण शिक्षणप्रसार वाढ होण्यास चालना मिळाली.

**५) राजकीय जागृती व परिवर्तनास गती :**

खेडोपाडी राज्यकारण, आरक्षण, सत्ताप्राप्ती इ. राज्यकारणावर चर्चा होऊ लागली. निरक्षर, दरिद्री, आदिवासी, दुर्बल घटक या सर्वांच्यात राजकीय जीवनाचा प्रभाव पडून आपल्या मतासही महत्त्व आहे. याची जाणीव झाली. त्यामुळे दुर्बल घटकांच्या एकूण राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक जीवनात परिवर्तन होऊ लागले.

**६) दर्जा आणि भूमिकांत बदल :**

गावपातळीपासून ते पंचायत समिती, जिल्हा परिषद अशा सर्वत्रच सत्तेत व सामजिक जीवनात स्थान मिळाल्यामुळे अनुसूचित जाती जमातीच्या कुटुंबातील सदस्यांचा दर्जा आणि भूमिकेत बदल झालेला दिसून येतो.

**७) समानता आणि स्वातंत्र्याची जाणीव :**

पंचायत राज्याची निर्मिती, प्रौढ मतदानाचा हक्क, स्त्रिया व मागासवर्गियांना आरक्षण यामुळे ग्रामीण भागातील लोकांमध्ये समानतेची आणि स्वातंत्र्याची जाणीव निर्माण झाली. नवनेतृत्वाचा उदय झाला.

**८) समस्यांचे निराकरण :**

म्हणजेच समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी समाजातीलच लोक पुढे येऊ लागले. आपले प्रश्न मांडण्यासाठी ऐकूण घेणारे कुणीतरी आपल्यातलेच आहेत. याची जाणीव झाली यामुळेच समस्यांचे निराकरण होण्यास एकमेकांचे नेता आणि समाज यात नात्याचे बंध निर्माण झाले.

वरीलप्रमाणे अनेक गोष्टी दुर्बल घटकांच्या सबलीकरण धोरणातूनच शक्य झाल्या.

**४.३.६ पंचायत राज्यव्यवस्थेचा ग्रामीण समाजावरील प्रभाव** (Impact of Panchayat Raj System on Rural Society)

भारतात पंचायत राज्यव्यवस्थेची अंमलबजावणी सुरू होऊन सुमारे ५५ वर्षाचा कालावधी लोटला आहे. या कालावधीत पंचायत राज्यव्यवस्थेचा भारतातील ग्रामीण समाजावर लक्षणीय प्रभाव पडला आहे. हा प्रभाव इष्ट (चांगला) तसेच अनिष्ट (वाईट) अशा दोन्ही प्रकारचा आहे. या प्रभावाचे स्वरूप तुम्ही आता समजावून घेणार आहात.

**अ) इष्ट प्रभाव**

**१) ग्रामीण विकासास गती :** पंचायत राज्यव्यवस्था स्थापन करण्यापूर्वीच भारतात ग्रामीण विकासाची सुरुवात झाली होती. तथापि, पंचायत राज्याच्या स्थापनेनंतर खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासास गती प्राप्त झालेली आहे. कृषी, उद्योग, रोजगार या क्षेत्रात विकास घडून आला आहे. बहुतेक खेड्यांमध्ये पायाभूत सुविधा उदा. रस्ते, पाणी, वीज, संप्रेषण व वाहतूक साधने, शाळा, आरोग्य केंद्रे इत्यादी निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण जीवनाचा भौतिक कायापालट झालेला आहे.

**२) ग्रामीण लोकांच्या मनोवृत्तीत बदल :** पंचायत राज्याचा प्रभाव पडून ग्रामीण लोकांच्या मनोवृत्तीत बदल घडून आला आहे. ग्रामीण लोकांत परिवर्तनशील व विकासाभिमूख मनोवृत्ती निर्माण झाली आहे. नवे ज्ञान, विचार, मूल्ये यांचा स्वीकार ग्रामीण लोक करू लागले आहेत. तर परंपरागत आचारविचारांचा, रूढीपरंपरांचा त्याग करू लागले आहेत.

**३) सामाजिक कल्याणात वाढ :** पंचायत राज्यव्यवस्थेत ग्रामीण भागातील दुर्बल घटकांच्या उदा. अनुसूचित जाती व जमाती, इतर मागास वर्ग, महिला, बालके, अनाथ, अपंग, वृद्ध इत्यादींच्या

विकासाच्या किंवा कल्याणाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. परिणामी, या घटकांचे कल्याण साध्य होऊन सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यास मदत होत आहे.

४) **राजकीय सहभागात वृद्धी :** पंचायतराज्यामुळे ग्रामीण जनतेचा राजकीय सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. परंपरेने राजकारणापासून दूर असलेले ग्रामीण लोक ग्रामपंचायत, पंचायत, समिती, जिल्हा परिषद या संस्थांच्या निवडणुकामध्ये सहभागी होऊन राजकीय विषयावर चर्चा करू लागले आहेत. या संस्थावर वर्चस्व मिळविण्यासाठी हे लोक स्पर्धा करू लागले आहेत. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग, महिला इत्यादींना पंचायतराज्यात राखीव जागा दिल्याने त्यांचाही राजकीय जीवनातील सहभाग वाढला आहे. परिणामी त्यांचा विकास होण्यास चालना मिळाली आहे. थोडक्यात ग्रामीण लोकांचा पंचायत राज्यव्यवस्थेमुळे राजकीय सहभाग वाढून त्यांच्यात राजकीय जागृती निर्माण होत आहे.

५) **लोकशाहीच्या विकासास मदत** : स्वातंत्र्यानंतर भारताने स्वीकारलेल्या लोकशाही व्यवस्थेचा विकास घडवून आणण्यात पंचायत राज्याची मोठी मदत झाली आहे. पंचायत राज्यव्यवस्थेमुळे समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, सहिष्णूता, सहकार्य इत्यादी लोकशाही तत्त्वांची ग्रामीण जनतेस ओळख होऊ लागली आहे. पंचायत राज्यव्यस्था ही लोकशाही विकेंद्रीकरणावर आधारलेली असल्याने ग्रामीण लोकांना लोकशाही पद्धतीने राज्यकारभार कसा करावा याचे शिक्षण मिळत आहे. त्यामुळे देशातील लोकशाही व्यवस्था मजबूत होण्यास मदत होत आहे.

६) **ग्रामीण नेतृत्वाचा उदय :** पंचायत राज्यामुळे नवे ग्रामीण नेतृत्व उदयास आले आहे. पूर्वीचे जमीनदार, जहागिरदार, इनामदार, पाटील, देशमुख, कुलकणी, असे नेतृत्व मागे पडून त्याच्या जागी नवीन असे सुशिक्षित व लोकशाही स्वरूपाचे नेतृत्व उदयास आले आहे. हे नवीन नेतृत्व आपणास पाठिंबा मिळावा म्हणून सर्व जाती धर्माच्या लोकांना आपल्या बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न करू लागले आहे. हा एक मोठा विधायक प्रभाव आहे. पंचायत राज्यव्यवस्थेतून उदयास आलेल्या ग्रामीण नेतृत्वाने पुढे राज्य व राष्ट्र पातळीवरील सत्तास्थाने (आमदार, खासदार, मंत्री इ. पदे) हस्तगत केल्याचे दिसून येत आहे.

७) **महिलांच्या सहभागात वाढ :** ७३ व्या राज्यघटनेनुसार महिलांना पंचायत राज्यव्यवस्थेत आरक्षण मिळाल्याने त्यांच्या पंचायत राज्यव्यवस्थेतील सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. अनेक महिला ह्या सरपंच, सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष अशा पदावर विराजमान होऊ लागल्या आहेत. या महिलांनी ग्रामीण भागात पाणीपुरवठा, इंधनपुरवठा, शिक्षणप्रसार, दारूबंदी, जुगारबंदी, रोजगारनिर्मिती इत्यादी क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केलेली आहे. महत्त्वाचे म्हणजे राजकारण हे केवळ पुरुषाचेच क्षेत्र नाही तर महिलाही त्या क्षेत्रात समर्थपणे कार्य करू शकतात हे पंचायत राज्यामुळे सिद्ध होत आहे.

अशाप्रकारे पंचायत राज्यव्यवस्थेचा ग्रामीण समाजावर इष्ट प्रभाव पडलेला आहे.

**ब) अनिष्ट प्रभाव**

१) **विकासाचा असमतोल :** पंचायत राज्यव्यवस्थेमुळे ग्रामीण भागात विकासाचा असमतोल निर्माण झाला आहे. पंचायत राज्यामुळे जो विकास झाला आहे त्याचे लाभ किंवा फायदे हे केवळ

उच्च व श्रीमंत वर्गापुरतेच मर्यादित असलेले दिसतात. ग्रामीण समाजातील दुर्बल घटक या फायद्यापासून वंचित राहिलेले आढळतात. विकास योजनांचे फायदे हे बडे बागाईतदार शेतकरी, सावकार, व्यापारी, जमीनदार, इनामदार इत्यादींनाच जास्त प्रमाणात मिळतात आणि गरजू असणारे अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर, अनुसूचित जाती व जमाती यांना हे फायदे म्हणावे तेवढ्या प्रमाणात मिळत नाहीत. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत असमतोल दिसून येतो.

२) **पंचायत राज्यावर उच्चवर्गाचे प्रभुत्व :** ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या संस्थावर उच्चजातींचे व उच्चवर्गाचे प्रभुत्व प्रस्थापित झालेले असून कनिष्ठ जातीजमातीचे लोक हे राजकीय सत्तेपासून वंचित राहिलेले आहेत. ७३ व्या घटनादुरुस्तीपूर्वी या संस्थांचे सदस्य व पदाधिकारी हे बहुसंख्येने उच्चजातीचे व उच्चवर्गाचे लोक होते. पारंपरिक नेतृत्वाने म्हणजेच पाटील, देशमुख, इनामदार, जहागिरदार इत्यादींनी या संस्था बळकावलेल्या होत्या. ७३ व्या घटनादुरुस्तीने दुर्बल घटकांना पंचायत राज्यव्यवस्थेत आरक्षण मिळाले असले व या घटकांचे प्रतिनिधी हे पदाधिकारी होत असले तर त्यांचा फारसा प्रभाव पडत नाही. कारण उच्चजातीतील नेत्यांच्या मतानुसार त्यांना वागावे लागते. अनुसूचित जातीजमातीचे व महिलांचे प्रतिनिधी हे पंचायत राज्यात आजही वास्तविक सत्तेपासून दूर आहेत. कारण उच्चजातीचे नेते त्यांच्यावर हुकूमत गाजवितात.

३) **पक्षीय राजकारण :** पंचायत राज्याचा कारभार हा राजकीय पक्षांच्या प्रभावापासून मुक्त असावा अशी अपेक्षा आहे. प्रत्यक्षात मात्र पंचायत राज्यपद्धतीतही पक्षीय राजकारण मोठ्या प्रमाणावर बोकाळले आहे. राजकीय पक्षाचे राज्य व राष्ट्रीय स्तरावरील नेते हे पंचायत राज्यव्यवस्थेतील नेतृत्वावर हुकूमत गाजवितात. त्यामुळे या नेतृत्वास स्वतंत्रपणे कार्य करता येत नाही. त्यामुळे पंचायत राज्यातील संस्थावर ताबा मिळविण्यासाठी ग्रामीण भागात विविध गट निर्माण झाले असून ते विकासाकडे दुर्लक्ष करून केवळ स्वार्थासाठी सत्ता मिळवू पाहात आहेत. हे गट सत्ताप्राप्तीसाठी जीवघेणी स्पर्धा करीत आहेत. विरोधी गटाच्या विधायक कार्यासही विरोध करीत आहेत. यातून ताणतणाव वाढून ग्रामीण जीवनातील पूर्वीची शांतता धोक्यात आली आहे. प्रत्येक खेडे हे राजकारणाचा अड्डा बनला आहे. पक्षीय राजकारणाचे सर्व दुष्परिणाम पंचायत राज्यव्यसस्थेत दिसून येतात.

४) **घराणेशाही :** पंचायत राज्य संस्थांवर ग्रामीण भागातील कांही ठराविक कुटुंबाची मक्तेदारी निर्माण झाली असून या संस्था जणू त्यांची खाजगी मालमत्ता बनल्या आहेत. यातूनच पंचायत राज्यात घराणेशाही उदयास आली आहे. यातूनच पंचायत राज्यव्यवस्थेतील संस्था या अपात्र, अकार्यक्षम, कमी गुणतत्तेच्या व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या हातात गेलेल्या आहेत. घराणेशाहीमुळे ग्रामीण भागातील गुणवान व पात्र कार्यकर्त्यांना व व्यक्तींना संधी मिळेनासी झाली आहे.

५) **विकास कार्यात अडथळे:** ग्रामीण समाजाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याची जबाबदारी ही पंचायत राज्यव्यवस्थेवर आहे. पंचायत राज्यव्यवस्थेतील जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी व शासकीय अधिकारी यांनी परस्परसहकार्याने विकास घडवून आणवयाचा आहे. पण दुर्दैवाने त्यांच्यातील संबंध हे अपेक्षेप्रमाणे सहकार्याचे व सामंजस्याचे नाहीत. ग्रामपंचायतीचा सरपंच व ग्रामसेवक, पंचायत समितीतील सभापती व गट विकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेतील

अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विविध समित्यांचे सभापती व त्यांचे शासकीय प्रमुख यांच्यात मतभेद व संघर्ष असल्याचे दिसते. प्रत्येकाचे हक्क व कर्तव्ये निश्चित असूनही ते एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतात. परिणामी, विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.

६) **राजकारणाचे गुन्हेगारीकरण**: पंचायत राज्यव्यवस्थेमुळे ग्रामीण भागात राजकीय प्रक्रिया म्हणजेच राजकारणाची प्रक्रिया गतिमान झाली असली तरी ग्रामीण राजकारणाचे अलिकडे मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारीकरण घडून आलेले आहे. पंचायत राज्यव्यवस्थेत उदयास आलेले हे नवे नेतृत्व सेवा, विकास, सामाजिक बांधिलकी इत्यादीकडे दुर्लक्ष करून केवळ राजकीय सत्ता प्राप्तीसाठी पैसा, दहशत, हिंसा, जात व धर्म इत्यादींचा वापर करीत आहे. निवडणूका जिंकण्यासाठी गुन्हेगारी, गुंड, मवाली, अशा लोकांची साहाय्य घेत आहे. विरोधकांना पळवून नेणे, त्यांना मारहाण करणे, मतदारांना धमकावणे, जातीधर्माच्या आधारे मते मागून जातीयवादास व सांप्रदायिकवादास खतपाणी घालणे इत्यादी कृत्ये केली जातात. त्यामुळे पंचायत राज्यव्यवस्थेतील राजकारण म्हणजे गुन्हेगारांचे राजकारण असा समज झाला आहे. त्यामुळे सज्जन व प्रामाणिक लोक राजकारणाविषयी उदासिन बनले आहेत. ते पंचायत राज्यव्यवस्थेतील राजकारणापासून दूर राहाताना आढळतात.

अशाप्रकारे पंचायत राज्यवस्थेचा इष्ट तसेच अनिष्ट प्रभाव ग्रामीण जीवनावर पडलेला आढळतो.

## ४.४ स्वयं: अध्ययनासाठी प्रश्न (Check your progress)

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. पहिली पंचवार्षिक योजना कोणत्या साली सुरू झाली?

२. प्राचीन ग्रामपंचायतीच्या प्रमुखास काय म्हणतात ?

३. स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक कोणाला म्हणतात?

४. १९५७ च्या पंचायत राज्य समितीचे अध्यक्ष कोण होते?

५. पंचायत समितीच्या अध्यक्षास काय म्हणतात?

६. पंचायत राज्याचा ग्रामीण समाजावरील प्रभाव स्पष्ट करा.

## ६.५ सारांश (Let us sum up)

भारताचा सर्वांगिण विकास होण्यासाठी लोकसहभागाची आवश्यकता महत्त्वाची होती. हा लोकसहभाग प्राप्त होण्यासाठी लोकांच्या हातात विकासाचे साधन असले पाहिजे या हेतूने विचारविनिमय झाला. लोकांच्या हातात सत्तेचे साधन दिले तर लोक स्वयंस्फूर्तपणे विकास कार्यात सहभागी होतील. म्हणूनच इ.स. १९५७ च्या बलवंतराय मेहता समितीने सत्तेचे विकेंद्रीकरण सुचविले. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय रचना सुचविली. अगदी

खेड्यातील नागरिकापासून ते सर्व देशातील लोकांना यात सहभागी होता येईल अशी ही रचना होती. आपण या प्रकरणात या पंचायत राज्यचे समग्र अध्ययन केले आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांची रचना आणि कार्ये यांचा समग्र आढावा या प्रकरणात आपण घेतला आहे.

तसेच दुर्बल घटकांचा आणि महिलांचा देखील विकास झाला पाहिजे. त्यांनी देखील सबल झाले पाहिजेत तरच देशाची प्रगती होईल. दुर्बल घटक व महिला सक्रियपणे राष्ट्रविकासात पुढाकार घेतील व त्यामुळे दुर्बल घटकांची, महिलांची उन्नती होईल व राष्ट्राची देखील प्रगती होईल या हेतूने महिला आणि दुर्बल घटक यांच्या सबलीकरणासाठी झालेले प्रयत्न व त्यातून झालेला महिलांचा आणि दुर्बल घटकांचा विकास याचा देखील समग्र आढावा आपण या प्रकरणात घेतला आहे.

## ६.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

१. पहिली पंचवार्षिक योजना इ.स. १९५१ साली सुरू झाली.

२. प्राचीन ग्रामपंचायतीच्या प्रमुखास ग्रामिणी असे म्हणतात.

३. लॉर्ड रिपनला स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक म्हणतात.

४. १९५७ च्या पंचायत राज्य समितीचे अध्यक्ष बलवंतराय मेहता हे होते.

५. पंचायत समितीच्या अध्यक्षास सभापती असे म्हणतात.

## ६.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise or Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. ‘पंचायत राज्य’ची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करा.

२. ग्रामपंचायतीची रचना व कार्ये स्पष्ट करा.

३. पंचायत समितीची रचना व कार्ये सविस्तर लिहा.

४. जिल्हा परिषदेची रचना व कार्ये सांगा.

५. महिला सबलिकरणाचे महत्त्व (फायदे) सांगा.

६. पंचायत राज्यव्यवस्थेचा ग्रामीण समाजावर पडलेला प्रभाव स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. ग्रामसेवकाची कार्ये

२. गट विकास अधिकाऱ्याची कार्ये

३. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची कार्ये

४. महिलांचे सबलीकरण

५. दुर्बल घटकांचे सबलीकरण

६. ग्रामपंचायतीची कार्ये

७. पंचायत समितीची कार्ये

८. जिल्हा परिषदेची कार्ये

## ६.८ चिंतन आणि कार्य

- पंचायत राज्यातील लोकप्रतिनिधींची मुलाखत घेऊन त्यांचे ग्रामीण विकासाबाबतचे विचार लिहून काढा.
- पंचायत राज्यातील महिला प्रतिनिधीशी चर्चा करून त्यांना येणाऱ्या अडचणींची नोंद करा.

## ६.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)


१. Rural Sociology – N. Jayapalan Atlantic - New Delhi-2002.

२. Rural Development in India - K. Venkata Reddy - Himalaya Publishing House - 1998.

३. Management and Planning of Rural Development in India - Chamanlal Kashyap - Ashish Publishing House, New Delhi- 1989.

४. ग्रामीण समाजशास्त्र – प्रा. चंद्रकांत खंडागळे, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली – २००५.

५. ग्रामीण समाजशास्त्र – प्रा. ए. वाय. कोंडेकर, प्रा. पी. व्ही. चांदोरकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, डिसेंबर २००५.


❑❑❑